Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाग १

जन्म हा अखेरचा

श्रीकाशीजगद्गुरु
डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी

अनुवाद / संपादन
डॉ. शे. दे. पसारकर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जन्म हा अखेरचा

भाग आठवा

'श्रीसिद्धान्तशिखामणी' ग्रंथातील लिंग-षट्स्थलातील
माहेश्वरस्थलावरील आशीर्वचने

श्रीकाशीविश्वाराध्यज्ञानसिंहासनाधीश्वर
काव्य-सर्वदर्शनतीर्थ, वेदान्ताचार्य, विद्यावारिधि, विद्यावाचस्पति
श्री १००८ जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी
जंगमवाडी मठ, श्रीक्षेत्र काशी

अनुवाद / संपादन
डॉ. शे. दे. पसारकर

शैवभारती भवन
जंगमवाडी मठ, वाराणसी
१९९५

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जन्म हा अखेरचा - भाग ८ (मराठी)
श्रीकाशीजगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी

Janma Ha Akheracha, Part-8 (Marathi)
By Shri Kashi Jagadguru Dr. Chandrashekhar Shivacharya Mahaswamiji

प्रकाशक :
कार्यवाह, शैवभारती भवन, जंगमवाडी मठ, वाराणसी

प्रथमावृत्ती : आश्विन शु. द्वितीया, शके १९१७
दि. २६ सप्टेंबर १९९५
लिंगैक्य श्री १००८ काशीजगद्गुरू विश्वेश्वर शिवाचार्य महास्वामीजी षष्ठम पुण्यतिथी

© शैवभारतीभवन, जंगमवाडी मठ, वाराणसी (उ.प्र.) २२१ ००१

मूल्य : पंचवीस रुपये

संगणकीय अक्षरलेखन / मुद्रण :
गणेश फोटो टाईप सेटर्स,
३७४ उत्तर कसबा, सोलापूर-४१३ ००७

मुखपृष्ठ : शिरीष घाटे

ग्रंथ उपलब्धिस्थळे :
१. व्यवस्थापक, शैवभारती भवन, जंगमवाडीमठ,
वाराणसी (उत्तर प्रदेश) २२१ ००१
२. बाबूराव मैंदर्गीकर, जयंती पेपर्स ॲन्ड प्रिंटर्स,
३७४ उत्तर कसबा, सोलापूर (महाराष्ट्र) ४१३ ००७

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरु

डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मनोगत

'जन्म हा अखेरचा' या ग्रंथमालेचा हा आठवा भाग वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. ही ग्रंथमाला हळूहळू पूर्णत्वाकडे जात आहे याचे एक वेगळे समाधान वाटत आहे. प. पू. श्रीकाशीजगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या कृपाशीर्वादाने मराठी भाषकांसाठी अत्यंत सुलभ, सोप्या भाषेत वीरशैवसिद्धान्त या ग्रंथमालेच्या रूपाने प्रकट होत आहे. वीरशैवसिद्धान्तावर प्रवचने करणाऱ्यांसाठी देखील ही ग्रंथमाला एक शिदोरी ठरणार आहे.

या ग्रंथमालेच्या अनुवादकार्यासाठी माझ्याकडून आणि माझ्या कुटुंबियाकडून सेवा घडत आहे, याचे विशेष समाधान वाटते. गतजन्मांतल्या पुण्याईनेच ही सेवेची संधी आम्हाला लाभली अशी आमची श्रद्धा आहे. अन्यथा हे अनुवादकार्य अन्य कोणीही पार पाडू शकला असता. विदर्भ सोडून माझे सोलापुरात येणे, इथल्या मातीत महत्प्रसायाने रुजणे-वाढणे, प. पू. श्रीकाशीजगद्गुरूंशी संबंध येऊन त्यांच्या विश्वासाला पात्र ठरणे आणि त्यांनी या संपूर्ण ग्रंथमालेचे अनुवादकार्य माझ्यावर सोपवणे या साऱ्या घटनांत एक नियति-क्रम असावा, असे मला अलीकडे वाटू लागले आहे. कोणीतरी आधी ठरवल्याप्रमाणे हे सारे घडत गेले. माझ्या बाबतीत बोलायचे तर ही सेवेची संधी आली आणि मी ती स्वीकारली, एवढेच खरे आहे.

'श्रीसिद्धान्तशिखामणी' ग्रंथातल्या अंग-षट्स्थलांतील माहेश्वरस्थलावरील ही आशीर्वचने आहेत. प. पू. श्रीकाशीजगद्गुरूंनी वाराणशीच्या जंगमवाडी मठातील ज्ञानमंदिरात १९९३ मध्ये श्रावणमासानुष्ठानाच्या निमित्ताने केलेली ही आशीर्वचने होत. नेहमीप्रमाणे ध्वनिफितींच्या साहाय्यानेच हा अनुवाद सिद्ध झाला आहे.

ग्रंथसिद्धीसाठी अनेकांचे सहकार्य लाभले. यावेळी लेखनिक म्हणून अनेकांनी हातभार लावला. श्री. ब्रिजकुमार मोहनसिंग परिहार (केकतउमरा, ता. वाशीम, जि. अकोला) या एम्.ए.च्या विद्यार्थ्याने बऱ्याच आशीर्वचनांचे लेखन केले. माझी पत्नी सौ. उषा पसारकर हिने उर्वरित आशीर्वचनांचे लेखन केले. शेवटी शेवटी तर अकरावीत शिकणारा माझा पुतण्या चि. अभिजीत अशोक पसारकर, दहावीत शिकणारी माझी कन्या कु. केतकी आणि सहावीत शिकणारी माझी धाकटी मुलगी कु. अबोली यांनी देखील यथाशक्ती लेखनिकाची भूमिका पार पाडली. संगणकीय अक्षरलेखन कु. परिणिता डुमणे हिने केले. श्री. अप्पासाहेब मैंदर्गीकर आणि श्री. बाबूराव मैंदर्गीकर यांनी मुद्रणाची जबाबदारी पार पाडली. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

ग्रंथप्रकाशनासाठी तासगाव (जि. सांगली) येथील महाजन परिवार, शाळगावकर परिवार आणि शेटे परिवार यांनी अर्थसाहाय्य केले. त्यांचा मी ऋणी आहे.

या ग्रंथमालेचे उत्स्फूर्त स्वागत करणाऱ्या वाचकांचेही आभार.

'उषास्वप्न'
१२६ ब, मार्कंडेय नगर, सोलापूर-३
१५ सप्टेंबर १९९५

शे. दे. पसारकर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनुक्रम

१	क्रियागमस्थल..१	१
२	क्रियागमस्थल..२	८
३	भावागमस्थल..१	१६
४	भावागमस्थल..२	२४
५	ज्ञानागमस्थल..१	३३
६	ज्ञानागमस्थल..२	४१
७	सकायस्थल	५०
८	अकायस्थल..१	५७
९	अकायस्थल..२	६२
१०	परकायस्थल..१	७०
११	परकायस्थल..२	७७
१२	धर्माचारस्थल..१	८६
१३	धर्माचारस्थल..२	९४
१४	धर्माचारस्थल..३	१०२
१५	धर्माचारस्थल..४	११२
१६	धर्माचारस्थल..५	१२०
१७	धर्माचारस्थल..६	१२७
१८	भावाचारस्थल..१	१३३
१९	भावाचारस्थल..२	१४१
२०	ज्ञानाचारस्थल	१४८

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य करणारे दाते

कै. विश्वनाथ शकरशेठ महाजन
मृत्यू ता. २-२-८१

श्रीमती पार्वतीबाई विश्वनाथ महाजन,

कै. विश्वनाथ शंकरशेठ महाजन यांचा जन्म ता. १५ मार्च १९१६ रोजी झाला. तासगाव येथील गरीब कुटुंबात त्यांच्या कर्तृत्वाची सुरुवात झाली. परिस्थितीवर मात करीत त्यावेळी ७ वी पर्यंत शिक्षण घेतले. परंतु नाईलाजाने एका दुकानात नोकरी करण्यास सुरुवात केली. प्रामाणिकपणा, अत्यंत कष्ट, सचोटी, माणुसकीच्या जोरावर अखंड तासगाव परिसरात आपली वेगळी प्रतिमा उभी केली व दोन भाऊ व चार बहिणींचा संसार नेटका उभा केला. व नंतर त्याच दुकानाचे पुढे मालक झाले. त्यांच्या संसाराला हसत हसत साथ देऊन श्रीमती पार्वती विश्वनाथ महाजन यांनी संसारवेल बहरून टाकली. प्रसंगी सर्व संकट दुःख पोटात घालून हसरा व आनंदमय, संसार फुलवायला पार्वतीबाईंनी अजोड साथ दिली. ही संसारवेल ३ मुले व ४ मुलींनी बहरून टाकली. दोघांनी आपल्या संततीला संस्कारक्षम बनवले.

श्री. आण्णासाहेब, अरविंद, विजयकुमार, सौ. कमल, सौ. कुसुम, सौ. सुशीला, सौ. मंगल या भावंडांचा संसार सुखासमाधानाने चालला असताना कै. विश्वनाथ महाजन यांची देवाज्ञा झाली.

त्यांची पूर्ण प्रेरणा व आशीर्वाद आजही आमच्या पाठीशी आहे. त्यांनी आम्हाला दिलेली चतकोर संस्काररूपी भाकर हीच आमची अखंड शिदोरी झाली आहे. आम्ही भावंडे कै. विश्वनाथ महाजन यांचे आशीर्वादावर प्रतिष्ठेवर ताठ मानेने उभा आहोत व त्यांनी नेमून दिलेल्या रस्त्याने जात आहोत.

कै. विश्वनाथ महाजन हे श्रद्धाळू होते. आपले आयुष्य कुटुंबासाठी व समाजासाठी खर्ची घातले. त्यांचे दातृत्व अमूल्य होते. त्यांनी जे दिले ते आजही संपत नाही व संपणार नाही असे पितृत्व क्वचित्‌च लाभते. म्हणून आम्ही खरे भाग्यवान आहोत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनुक्रम

१	क्रियागमस्थल..१	१
२	क्रियागमस्थल..२	८
३	भावागमस्थल..१	१६
४	भावागमस्थल..२	२४
५	ज्ञानागमस्थल..१	३३
६	ज्ञानागमस्थल..२	४१
७	सकायस्थल	५०
८	अकायस्थल..१	५७
९	अकायस्थल..२	६२
१०	परकायस्थल..१	७०
११	परकायस्थल..२	७७
१२	धर्माचारस्थल..१	८६
१३	धर्माचारस्थल..२	९४
१४	धर्माचारस्थल..३	१०२
१५	धर्माचारस्थल..४	११२
१६	धर्माचारस्थल..५	१२०
१७	धर्माचारस्थल..६	१२७
१८	भावाचारस्थल..१	१३३
१९	भावाचारस्थल..२	१४१
२०	ज्ञानाचारस्थल	१४८

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य करणारे दाते

कै. विश्वनाथ शकरशेठ महाजन
मृत्यू ता. २-२-८१

श्रीमती पार्वतीबाई विश्वनाथ महाजन,

कै. विश्वनाथ शंकरशेठ महाजन यांचा जन्म ता. १५ मार्च १९१६ रोजी झाला. तासगाव येथील गरीब कुटुंबात त्यांच्या कर्तृत्वाची सुरुवात झाली. परिस्थितीवर मात करीत त्यावेळी ७ वी पर्यंत शिक्षण घेतले. परंतु नाईलाजाने एका दुकानात नोकरी करण्यास सुरुवात केली. प्रामाणिकपणा, अत्यंत कष्ट, सचोटी, माणुसकीच्या जोरावर अखंड तासगाव परिसरात आपली वेगळी प्रतिमा उभी केली व दोन भाऊ व चार बहिणींचा संसार नेटका उभा केला. व नंतर त्याच दुकानाचे पुढे मालक झाले. त्यांच्या संसाराला हसत हसत साथ देऊन श्रीमती पार्वती विश्वनाथ महाजन यांनी संसारवेल बहरून टाकली. प्रसंगी सर्व संकट दुःख पोटात घालून हसरा व आनंदमय, संसार फुलवायला पार्वतीबाईंनी अजोड साथ दिली. ही संसारवेल ३ मुले व ४ मुलींनी बहरून टाकली. दोघांनी आपल्या संततीला संस्कारक्षम बनवले.

श्री. आण्णासाहेब, अरविंद, विजयकुमार, सौ. कमल, सौ. कुसुम, सौ. सुशीला, सौ. मंगल या भावंडांचा संसार सुखासमाधानाने चालला असताना कै. विश्वनाथ महाजन यांची देवाज्ञा झाली.

त्यांची पूर्ण प्रेरणा व आशीर्वाद आजही आमच्या पाठीशी आहे. त्यांनी आम्हाला दिलेली चतकोर संस्काररूपी भाकर हीच आमची अखंड शिदोरी झाली आहे. आम्ही भावंडे कै. विश्वनाथ महाजन यांचे आशीर्वादावर प्रतिष्ठेवर ताठ मानेने उभा आहोत व त्यांनी नेमून दिलेल्या रस्त्याने जात आहोत.

कै. विश्वनाथ महाजन हे श्रद्धाळू होते. आपले आयुष्य कुटुंबासाठी व समाजासाठी खर्ची घातले. त्यांचे दातृत्व अमूल्य होते. त्यांनी जे दिले ते आजही संपत नाही व संपणार नाही असे पितृत्व क्वचित्‌च लाभते. म्हणून आम्ही खरे भाग्यवान आहोत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मातृपितृऋणाची परतफेड म्हणून व सामाजिक ऋणातून मुक्तता मिळावी या सद्भावनेने 'जन्म हा अखेरचा, भाग ८'च्या प्रकाशनासाठी आम्ही अर्थसाहाय्य करीत आहोत.

आण्णासाहेब वि. महाजन   अरविंद वि. महाजन   विजयकुमार वि. महाजन

श्री. नारायण बाबुराव शाळगावकर

कै. सौ. लक्ष्मी नारायण शाळगावकर
(तासगाव, जि. सांगली)

श्री. नारायण शाळगावकर यांचा तासगाव येथील अत्यंत गरीब कुटुंबात जन्म झाला. एकुलता एक मुलगा म्हणून गरीब मातापित्यांचे भरपूर लाड, प्रेम व आशीवार्दात लहानपण गेले. परंतु शिक्षणाच्या बाबतीत नेहमी प्रथम क्रमांक होता. एस्.एस्.सी. पर्यंत शिक्षण झाले. व गरिबीमुळे पुढे शिक्षण घेता आले नाही. पण त्याचवेळी आपल्या मुलांना शिक्षणात परिपूर्ण करण्याचे व्रत घेतले. स्वत: सहकारी बँकेत क्लार्क म्हणून नोकरीस सुरुवात केली. करारी बाणा, प्रामाणिकपणा, शालीनता,चारित्र्य, निस्वार्थीपणा, परिश्रम व सेवाभाव, योग्य निर्णय या सर्व गुणांच्या साहाय्याने संपूर्ण तासगाव परिसर व तालुका आपलासा करून घेतला. पत्नी कै. लक्ष्मीबाईंनी साथ दिली. नेहमी अल्प संतुष्ट राहून सुखाचे गमक शोधणारे नारायण शाळगावकर यांना आयुष्यभर यश प्राप्त होत गेले व त्यांचा ५ मुले व १ मुलगी असा संसार बहरून गेला.

जयप्रकाश, बी.कॉम्., डॉ. चंद्रकांत, एम्.एस्सी. पीएच्.डी, सुरेश, बी.कॉम्., अशोक, डी.एम.ई., भरत, बी.कॉम्. (ऑ.), एल.एल.एम. अशी सर्व मुले शिक्षणात अग्रेसर ठरली. सर्व मुले चांगल्या हुद्यावर काम करीत आहेत व त्यांना आपल्या मातापित्याचा आशीर्वाद अखंड लाभला आहे. आजही नारायण शाळगावकर स्वत:ला श्रीमंत मानतात. कारण सर्व मुलांवर सुसंस्कार करून त्यांना मार्गी लावले आहे. यातच ते स्वत:ची श्रीमंती मानतात. स्वत:साठी काहीही अपेक्षा न करता दुसऱ्यासाठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राबणारे व कष्ट करणारे नारायण शाळगावकर यांनी आपला संसार नेटका व काटकसरीने केला. शिवाय समाजऋणातून मुक्तता मिळावी म्हणून तासगाव नगरपालिकेचे कौन्सिलर म्हणून प्रचंड मताने निवडून आले होते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या तासगाव अर्बन को-ऑप. बँक तासगावमध्ये त्यांनी क्लार्क म्हणून नोकरी केली. त्याच बँकेत गेल्या बऱ्याच वर्षापासून संचालक ते म्हणून निवडून आले व त्याच बँकेचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. स्वत: अगदी हलाखीची परिस्थिती पाहिली, अनुभवली, पचवली. अशा सुखी संसारातून गतवर्षी ता. ७।६।९४ रोजी त्यांची सहचारी व अर्धांगी सौ. लक्ष्मीबाई शाळगावकर या उठून गेल्या. अचानक कुटुंबावर दु:खाची छाया पसरली. परंतु ५ मुले, सुना व नातवंडे यांच्या प्रेमाने त्यांना विसर पडायला भाग पाडले.

आम्हापैकी कै. सुरेश शाळगावकर ह्यांचे अकाली निधन झाले. परंतु आमचा भरवसा, त्याग, चारित्र्य, कष्ट यावर मातापित्यांचे आशीर्वाद यावर संसारवेल जशीच्या तशी सुखासमाधानाने तृप्त मनाने बहरत चालली आहे. आम्ही सर्व भावंडे आमची कै. आई लक्ष्मी नारायण शाळगावकर व कै. सुरेश नारायण शाळगावकर यांचे स्मरणार्थ 'जन्म हा अखेरचा, भाग ८' च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य करीत आहोत.

जयप्रकाश शाळगावकर   डॉ. चंद्रकांत शाळगावकर   सुरेश शाळगावकर
अशोक शाळगावकर   भरत शाळगावकर

कै. नागनाथ बाळा शेटे

कै. गंगूबाई नागनाथ शेटे

कै. विश्वनाथ नागनाथ शेटे

तासगावचे कै. कृष्णा नरसिंगा शेटे यांचे सुपुत्र व कै. बाळा नरसिंगा शेटे यांचे दत्तक सुपुत्र कै. नागनाथ बाळा शेटे यांचा जन्म बांबवडे, ता. तासगाव, जि. सांगली येथे आजोळी झाला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लहानपणी त्यांचे वडील व चुलते यांचे छत्र गेले व लहानपणीच ते मोठ्या अपघातातून बचावले. आजी, आई व चुलत्या यांनी त्यांचे पालनपोषण केले. त्यांचे शिक्षण इ. ७ वी पर्यंत होते. विटा येथील कै. शंकर बळवंत सगरे यांची कन्या कृष्णाबाई ऊर्फ गंगूबाई यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. तासगाव हे सर्कशीचे माहेरघर होते. इतरांप्रमाणे आपणही सर्कस काढावी अशी त्यांना इच्छा झाली. त्यातून त्यांनी भागीदारीत सर्कस काढली. काही दिवस सर्कस चांगली चालली. दोन्ही घराण्यांत एकच मुलगा असल्याने त्यांचे फारच लाड झाले. त्यांची आई व आजी यांनी घरी पुरुषमनुष्य कोणीही नसल्याने सर्कसमध्ये जाऊन हट्ट करून त्यांना घरी आणले. नंतर सर्कशीकडे त्यांना लक्ष देता आले नाही. त्यामुळे तो धंदा नुकसानीत येऊन बंद पडला. भागीदारास सर्कस चालवता आली नाही. त्या सर्कशीचे फार नुकसान झाले. त्यामध्ये जमिनी, घरे, सोनेनाणे सर्व सर्कशीत गेले. कोर्टकचेरी कामात बराच काळ हेलपाटे घालावे लागले व बराचसा त्रास सहन करावा लागला.

त्यांनी राजकारणात व समाजकार्यात बराच भाग घेतला. तासगाव नगरपरिषदेत नगरसेवक म्हणून निवडूनही गेलेले होते. दि. तासगाव अर्बन को.ऑप. बँक लि. तासगाव स्थापन करण्यामध्ये त्यांचा बराच भाग होता. त्यांनी आठ मुलगे व दोन मुली असा परिवार सांभाळून संसार केला. त्यास गंगूबाई पत्नी यांनी कष्ट करून अमोल साथ दिली. त्यांनी ५।३।१९६० रोजी देह ठेवला. तदनंतर तारीख १।१०।१९७८ रोजी गंगूबाई पत्नी यांना देवाज्ञा झाली व विश्वनाथ नागनाथ शेटे यांना सन १९८३ साली देवाज्ञा झाली. त्यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने आम्ही सात भाऊ व दोन बहिणी प्रगतिपथावर आहोत.

रामचंद्र कृष्णा शेटे (दत्तक) — वसंतराव नागनाथ शेटे
मल्लिकार्जुन नागनाथ शेटे — बसवेश्वर नागनाथ शेटे
किसन नागनाथ शेटे — बाळासाहेब नागनाथ शेटे
विलास नागनाथ शेटे — सौ. शांताबाई रामचंद्र तवटे, रा.पेठ
सौ. कमलाबाई सुधाकर आवळकर, रा. बिळाशी

आई-वडील-भाऊ यांच्या स्मरणार्थ श्री. वसंतराव नागनाथ शेटे यांनी 'जन्म हा अखेरचा-भाग ८' या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य केले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्रियागमस्थल..१

विश्वेशलिंगसंभूतं विश्वविद्याविबोधकम् ।
विश्ववंद्यं सदा वंदे विश्वाराध्यं जगद्गुरुम् ॥

श्रीकाशीज्ञानसिंहासनाचे आदिजगद्गुरू विश्वाराध्यापासून विश्वेश्वर शिवाचार्यांपर्यंत जी गुरुपरंपरा चालत आली आहे तिला अनंत प्रणिपात समर्पित करून श्रावणमासानिमित्त आयोजिलेल्या या धर्मसभेत उपस्थित असलेल्या जिज्ञासू सद्भक्तांनो आणि मातांनो,

षट्स्थलांत अंग-षट्स्थल आणि लिंग-षट्स्थल असे दोन भाग आहेत. आतापर्यंत आपण लिंग-षट्स्थलातील भक्तस्थलावर आशीर्वचने ऐकली आहेत. येथून पुढे लिंग-षट्स्थलातील दुसऱ्या माहेश्वरस्थलावरील आशीर्वचनांचा प्रारंभ होत आहे. भक्तस्थलातील परस्थलाचे विवेचन संपल्यानंतर महर्षी अगस्त्यांनी ज. रेणुकाचार्यांना प्रश्न विचारला -

स्थलानां नवकं प्रोक्तं भक्तस्थलसमाश्रयम् ।
माहेश्वरस्थले सिद्धं स्थलभेदं वदस्व मे ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-१)

'लिंग-षट्स्थलातील भक्तस्थलाच्या नऊ अवांतरस्थलांविषयी आपण विवेचन केले. आता माहेश्वरस्थलाचे स्थलभेद आणि त्यातील विषय आपण मला समजावून सांगावेत.' त्यावेळी ज. रेणुकाचार्य म्हणाले, 'हे तपस्वी अगस्त्या, या माहेश्वरस्थलात देखील क्रियागमस्थल, भावागमस्थल, ज्ञानागमस्थल, सकायस्थल, अकायस्थल, परकायस्थल, धर्माचारस्थल, भावाचारस्थल आणि ज्ञानाचारस्थल अशी नऊ अवांतरस्थले आहेत.'

पहिले अवांतरस्थल आहे क्रियागमस्थल. क्रिया म्हणजे काय? ज्ञान आणि कर्म हे शब्द आपण अनेकदा ऐकतो आणि त्यावर चर्चा देखील करतो. ज्याच्यामुळे स्व-रूपाचा बोध होतो त्याला 'ज्ञान' म्हणतात. ज्ञान प्राप्त करण्यासाठी योग्यता लागते. ती मिळवण्यासाठी आपल्याला काही क्रिया करावी लागते, शास्त्रविहित कर्मे करावी लागतात. या कर्मांनाच 'क्रिया' असे म्हणतात. शास्त्रात सांगितलेल्या विहित कर्मांचेच आचरण करावे. निषिद्ध कर्मांचे करू नये. 'सत्यं वद, धर्मं चर, अतिथी देवो भव, मातृदेवोभव,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पितृदेवोभव' हे शास्त्राचे आदेश आहेत. या आदेशांचे पालन केले पाहिजे. मांसभक्षण, मद्यपान, चौर्यकर्म, असत्यभाषण इत्यादी निषिद्ध कर्मांपासून दूर राहिले पाहिजे. शास्त्र 'करा' असे ज्याबद्दल सांगते ते विहित कर्म होय आणि 'करू नका' असे ज्याबद्दल सांगते ते निषिद्ध कर्म होय. निषिद्ध कर्म केल्यामुळे पाप घडून दुःख भोगावे लागते तर विहित कर्म केल्यामुळे पुण्यप्राप्ती होऊन सुख मिळते. आपण सुखी असावे असे प्रत्येक मनुष्याला वाटत असते. परंतु केवळ सुखी होण्याच्या इच्छेमुळे सुख मिळत नसते.

सुखी होण्यासाठी माणसाला चांगली कर्मे करावी लागतात. शास्त्रविहित कर्मेच मनुष्याला सुख देऊ शकतात. वातुलतंत्रात एक वचन आहे –

'अल्पक्रिया बहुफलं वीरशैवं महेश्वरी'

शंकर पार्वतीला सांगतात की, कर्मे अनेक प्रकारची आहेत. माणसाच्या प्रवृत्तीप्रमाणे आणि फलप्राप्तीनुसार कर्मांचे अनेक प्रकार आहेत. परंतु वीरशैवसिद्धान्तात इष्टलिंगपूजा आदी जी कर्मे सांगितली आहेत ती 'अल्पक्रिया बहुफल' अशा प्रकारची आहेत. त्यामध्ये श्रम कमी परंतु फल अधिक आहे. कमी श्रम करून अधिक फळ मिळावे असे प्रत्येक मनुष्याला वाटत असते. परंतु 'अल्पक्रिया बहुफल' अशा कर्मांचे त्याला ज्ञान नसते. हे ज्ञान झाले तर अल्पश्रमात त्याला भरपूर फळ मिळणे शक्य आहे. आता क्रियागम या शब्दाचा अर्थ सांगतात –

शिवो हि परमः साक्षात् पूजा तस्य क्रियोच्यते ।
तत्परा आगमा यस्मात् तदुक्तोऽयं क्रियागमः ॥ १६-५ ॥

परस्थलात प्रवेश केलेला ज्ञानी साक्षात् शिवस्वरूपच होतो. अशी उत्कृष्ट स्थिती प्राप्त झाल्यानंतर देखील तो इष्टलिंगपूजा आदी कर्मांचे आचरण करत असतो. ते कर्म म्हणजेच 'क्रिया' होय. ज्ञानी पुरुषाच्या क्रिया विशद करणारे जे शास्त्र आहे त्यालाच 'क्रियागम' असे म्हणतात. ज्ञानी पुरुषाचे कर्म हे विहित कर्मच असते आणि विहित कर्म ज्यात ग्रथित केलेले असते तेच शास्त्र होय, क्रियागम होय. क्रियागमस्थलात सामान्य मनुष्यापासून ज्ञानी पुरुषापर्यंत सर्वांच्या क्रिया विशद केलेल्या आहेत. क्रिया का करावी? तिचे कोणते महत्त्व आहे? याविषयी पुढे सांगतात –

प्रकाशते यथा नाग्निरण्यां मथनं विना ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्रियां विना तथान्तःस्थो न प्रकाशो भवच्छिवः ॥ १६-६ ॥

प्रत्येक जीवात्म्याच्या हृदयात भगवान शिवाचे वास्तव्य असते. बीजात अंकुर असतो तसा जीवात्म्याच्या हृदयात शिव नांदतो, असे 'सिद्धान्तशिखामणी'त म्हटले आहे. प्राणिमात्रांच्या हृदयात ईश्वराचा निवास असतो आणि तो आपल्या मायेने, यंत्रचालकाने यंत्र चालवावे त्याप्रमाणे, शरीररूपी यंत्र चालवतो, असे गीतेत म्हटले आहे. असे असले तरी आपल्या हृदयात परमात्म्याचे वास्तव्य असते याची जाणीव माणसाला नसते. अत्यंत जवळची अथवा अत्यंत दूरची वस्तू आपल्याला दिसत नाही. विमानाचा आवाज कानावर आला तरी डोळे बारीक करून आकाशात पाहिल्यावर विमान दिसते. पण क्षणभरच. पुन्हा दिसत नाही. कारण ते अत्यंत दूर गेलेले असते. त्याप्रमाणे जी वस्तू आपल्या अतिशय जवळ असते ती देखील आपल्याला दिसत नाही. आपण जर पुस्तक अगदी डोळ्यांजवळ धरले तर ते वाचता येत नाही, त्याप्रमाणे परमात्मा अत्यंत जवळ असल्यामुळे तो देखील सामान्य माणसांना दिसत नाही. जीवात्म्याची प्रवृत्ती बहिर्मुख असल्यामुळे त्याला आपल्या हृदयात नांदणाऱ्या परमात्म्याचे दर्शन होत नाही. हृदयस्थ परमात्म्याचा साक्षात्कार करून घेण्यासाठी काही क्रिया, साधना करावी लागते. हेच उदाहरण देऊन येथे सांगितले आहे.

प्राचीन काळी यज्ञासाठी अरणीमंथन करून अग्नी उत्पन्न करीत असत. दोन लाकडे एकमेकांवर घासणे म्हणजे अरणीमंथन होय. अग्नी उत्पन्न करणे ही अतिशय कठीण बाब होती. आजच्या विज्ञानयुगात अत्यंत सहजपणाने अग्नी पेटवता येतो. आगपेटीने अथवा लायटरने. परंतु त्यामध्येही घर्षणक्रिया असते. अग्नी हे सर्वव्यापक तत्त्व आहे. परंतु जोपर्यंत घर्षणक्रिया होत नाही तोपर्यंत तो प्रकट होत नाही. अरणीमंथन केल्यावर जसा अग्नी प्रकट होतो त्याप्रमाणे पूजा इत्यादी शास्त्रविहित क्रिया केल्याशिवाय हृदयस्थ परमात्म्याचा साक्षात्कार होत नाही. प्राणलिंगाची आणि भावलिंगाची पूजा घडण्यासाठी इष्टलिंगपूजा करणे आवश्यक असते. चेहरा पाहण्यासाठी आरशाची गरज असते त्याप्रमाणे प्राणलिंग पाहण्यासाठी, तेथपर्यंत पोहोचण्यासाठी इष्टलिंगपूजेची आवश्यकता असते.

आपल्या बाहेर जाणाऱ्या प्रवृत्तींना एकत्र करण्यासाठी, एकवटण्यासाठी वीरशैवसिद्धान्तात इष्टलिंगपूजा सांगितली आहे. बाहेर वाहणाऱ्या प्रवृत्तींना प्रथम एके ठिकाणी स्थिर करावे लागते. मनुष्याची बुद्धी चंचल असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तो ईश्वराला एकाच ठिकाणी पाहत नाही तर अनेक ठिकाणी पाहत असतो. त्याचा शोध अनेक ठिकाणी घेत असतो. खरे तर ईश्वर सर्वत्रच आहे. परंतु जोपर्यंत आपली बुद्धी स्थिर होऊन त्याचा एका ठिकाणी साक्षात्कार करून घेत नाही तोपर्यंत त्याचे सर्वत्र दर्शन घडत नाही. म्हणून आपल्या बाह्य प्रवृत्तींना एकत्र करण्यासाठी आपल्या हाती इष्टलिंग दिलेले आहे. इष्टलिंग हे सर्व इष्ट प्राप्त करून देणारे आणि सर्व अनिष्ट दूर करणारे आहे. इष्ट प्राप्त होणे आणि अनिष्ट दूर होणे यापेक्षा मनुष्याला दुसरे काय हवे असते? त्यासाठीच तर त्याची सारी धडपड चाललेली असते. म्हणून आपल्या सर्व वृत्ती इष्टलिंगातच केंद्रित झाल्या पाहिजेत. इष्टलिंगामुळे आपण अंतर्मुख होऊ शकतो. मूलाधारात, हृदयात आणि भ्रूमध्यात प्राणलिंगाचा साक्षात्कार योग्यांना झाला आहे. त्याच प्राणलिंगाच्या आकाराएवढे इष्टलिंग श्रीगुरू आपल्या हाती देतात. म्हणून इष्टलिंगपूजा करता करता साधकाची वृत्ती अंतर्मुख होते आणि त्याला आपल्या मूलाधारात, हृदयात किंवा भ्रूमध्यात प्राणलिंगाचा साक्षात्कार होतो.

कोणतेही शास्त्र घ्या. त्यात हेच सांगितले आहे की परमात्म्याचा शोध प्रपंचात घेण्यापेक्षा आपल्या हृदयात घ्या. ब्रह्मांडात त्याचा शोध कुठे कुठे घ्याल? जे ब्रह्मांडात आहे तेच आपल्या पिंडांडात आहे. मानवी शरीर ही ब्रह्मांडाची एक छोटी प्रतिकृतीच होय. व्यापक वस्तू आत-बाहेर सर्वत्र असते. म्हणून परमात्म्याचा शोध बाहेर घ्यायला गेलो तर खूप श्रम होतील. त्यापेक्षा निश्चल बसून मन एकाग्र केले तर त्याचे दर्शन आपल्या आतच घडेल. मनाची एकाग्रताच आपल्याला परमात्म्यापर्यंत घेऊन जाते. इष्टलिंगपूजा ही क्रिया अंतर्लिंगाच्या चिंतनासाठी साहाय्यक ठरते. जोपर्यंत इष्टलिंगाची पूजा घडत नाही तोपर्यंत अंतर्लिंगपूजेची योग्यता प्राप्त होत नाही. बाह्य क्रिया आपल्या अंतःकरणाला परिपक्व करत असते. भात करण्यासाठी एका भांड्यात तांदूळ व पाणी एकत्र घालतात आणि ते अग्नीवर ठेवतात. अग्नीचा तांदळाशी साक्षात् संबंध येत नाही. त्याचा संबंध भांड्याशी येतो. अग्नीमुळे भांडे तापते आणि भांडे तापल्यामुळे आतील तांदूळ शिजतात, पक्व होतात. भांड्याला बाहेरून उष्णता दिल्यावर त्याच्या आतील तांदूळ शिजतात. त्याप्रमाणे आपल्या शरीराकडून घडलेल्या बाह्य क्रियांमुळे आपले मन, आपली बुद्धी शुद्ध होते. मन शुद्ध झाले की जशी बाहेर इष्टलिंगाची पूजा घडते तशीच आत प्राणलिंगाची पूजा होऊ लागते. बाह्य क्रियांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महत्त्व असे आहे. अरणीमंथन केल्यावरच अग्नी प्रकट होतो त्याप्रमाणे पूजा इत्यादी बाह्य क्रियांमुळे आपल्या हृदयातील परमात्म्याचा साक्षात्कार होतो. क्रिया कशी करावी त्याविषयी पुढे सांगतात -

न यथा विधिलोप: स्याद्यथा देव: प्रसीदति ।
यथागम: प्रमाणं स्यात्तथा कर्म समाचरेत् ॥ १६-७ ॥

कर्म करताना ते योग्य रीतीने करावे लागते. काहीही केले, कसेही केले तर त्याचे फळ मिळत नाही. स्वयंपाक करताना देखील क्रमवार करावा लागतो तरच स्वादिष्ट भोजन तयार होते. जे आधी करायचे ते नंतर केले, जे नंतर करायचे ते आधी केले तर स्वयंपाक चांगला होणार नाही. म्हणून आपल्या सर्व क्रिया पद्धतशीरपणेच व्हायला हव्यात. पूजा कधी करावी, कशी करावी यासंबंधी शास्त्रात विधिविधान सांगितले आहे. वैदिक शिवपूजाविधी वेगळा आणि संक्षिप्त शिवपूजाविधी वेगळा आहे. ज्याच्याकडे वेळ कमी असेल तो संक्षिप्त रीतीने करील. वैदिक असो की संक्षिप्त, शास्त्रोक्त विधीप्रमाणेच आपण पूजा केली पाहिजे. आधी लिंगावर जलाभिषेक करावा, मग गंध लावावे, मग बिल्वपत्र वाहावे; याप्रमाणे शास्त्राने पूजेचा क्रम सांगितला आहे. त्याप्रमाणेच पूजा करायला हवी. आधी बेल वाहिला, नंतर भस्म लावले नंतर पाणी वाहिले असे केले तर पूजाविधीचे पालन होणार नाही. विधी पाळला नाही तर पूजेचा क्रम बिघडतो आणि ज्याची आपण पूजा करतो तो अप्रसन्न होतो.

शिवभक्ताने सहा वेळा लिंगपूजा करावी असे शास्त्रात सांगितले आहे. सर्वांनाच ते करणे शक्य नाही. संसारी माणसाला एवढा वेळ कुठे मिळणार? परंतु त्यांच्यासाठीही पूजाविधी सांगायला हवा. ज्यांना सहा वेळा शक्य नाही त्यांनी तीन वेळा करावी, ज्यांना तीन वेळा शक्य नाही त्यांनी दोन वेळा करावी आणि ज्यांना दोन वेळा शक्य नाही त्यांनी किमान एकवेळ पूजा करावी. यात मात्र शास्त्राने 'कन्सेशन' दिलेले नाही. तुम्ही म्हणाल आम्ही फक्त सोमवारीच पूजा करू किंवा महाशिवरात्रीला वर्षातून एकदाच पूजा करू, तर ते शास्त्राला मान्य नाही. नैमित्तिक पूजा महिन्यातल्या एखाद्या तिथीला केली जाते, परंतु नित्यपूजा मात्र नित्य केली जाते. त्यासाठी विशिष्ट महिन्याची अथवा तिथीची गरज नसते. इष्टलिंगपूजा हे नित्यकर्म आहे. शरीरात प्राण आहे तोपर्यंत इष्टलिंगपूजा केली पाहिजे. ती केली नाही तर दुरिताची प्राप्ती होते. म्हणून जन्मभर त्याचे पालन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करावे लागते.

पूजेसंबंधी शास्त्रात अनेक प्रकारे विधिविधान सांगितले आहेत. त्यात उपचारांचीही संख्या सांगितली आहे. पंचोपचारांनी, अष्टोपचारांनी, षोडशोपचारांनी आणि राजोपचारांनी पूजा करता येते. ज्याचे जसे सामर्थ्य त्याची तशी पूजा. ज्याच्याकडे अधिक वेळ असतो तो अधिक वेळा पूजा करू शकतो. जगात अशाही लोकांची आवश्यकता असते. सगळ्या संसारी, क्षुद्र सुखोपभोगाच्या मागे धावणाऱ्या गर्दीत अशी चार-दोन माणसे वेगळी उठून दिसतात. त्यामुळे समाजात संतुलन राहते. अजिबात पूजा न करणारे लोक जगात राहतात. त्यामुळे रात्रंदिवस केवळ पूजाच करणाऱ्या लोकांमुळे संतुलन टिकून राहते असे म्हणायला हवे. पूजा विधिपूर्वक करावी. एवढेच नव्हे तर आपल्या पूजेमुळे ईश्वर प्रसन्न व्हावा. केवळ विधिपूर्वक पूजा केल्यामुळे ईश्वर प्रसन्न होत नसतो. तुम्ही जर तुमचे मन त्याला दिले तर मात्र तो प्रसन्न होतो. तुम्ही विधिपूर्वक पूजन केले, रुद्राचे पठण केले, खूप काही केले, परंतु तुमचे मन जर ईश्वराकडे नसेल तर ते करणे देखील व्यर्थ होईल. तुमचे मन त्याला द्याल तेव्हा त्याला तुमच्या उपचारांची गरज नसते. त्याला हवी असते तुमच्या मनातील गाढ प्रीती, भक्ती.

मग पूजासामग्रीची गरज काय? असे कोणाला वाटेल. तुमचे मन काही काळ ईश्वराच्या ठिकाणी एकाग्र व्हावे, गुंतून राहावे यासाठी पूजासामग्रीची आवश्यकता असते. पूजासामग्री असून देखील तुमचे मन एकाग्र होत नाही तर ती नसल्यास कसे होईल? आपल्या मनात ईश्वराबद्दल प्रेम असायला हवे. त्याच्याबद्दल प्रेम नसेल तर त्याची आपल्यावर कृपा होणार नाही. घरी आलेल्या पाहुण्याचा आदर-सत्कार जर प्रेमपूर्वक केला नाही तर त्या सत्काराला काही अर्थ नाही. आदर-सत्कार स्वीकारून देखील पाहुणा अप्रसन्न राहतो. आपण सांसारिक वस्तू मोठ्या प्रेमाने गोळा करतो, कुणी जिवलग भेटल्यावर त्याला प्रेमाने मिठी मारतो. एवढे देखील प्रेम ईश्वरावर केले तर तो अत्यंत प्रसन्न होईल. माणसाला संसार अत्यंत प्रिय असतो. तो ईश्वराकडे जातो ते देखील सांसारिक वस्तू मागण्यासाठीच. भगवंताकडे जाणाऱ्या माणसाच्या मनात भगवंताबद्दल प्रेम नसते तर प्रेम असते संसाराबद्दल! म्हणून भगवंताकडे जाताना त्याच्याबद्दल प्रेम असेल तरच त्याची कृपा होईल. म्हणून पूजा करताना ती विधिपूर्वक करावी, एकाग्रतेने करावी आणि ती करताना ईश्वराबद्दल प्रेम असावे. आपली पूजा आगममान्य असावी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्यामुळे ईश्वराची कृपा होत नाही, ज्यात विधीचा लोप होतो, जी आगममान्य नसते अशी पूजा करणे निरर्थक होय.

विधि: शिवनियोगोऽयं तस्माद् विहितकर्मणि ।
शिवाराधनबुद्ध्यैव निरत: स्याद् विचक्षण: ॥१६-८॥

विधी ही शिवाची आज्ञा, शासन होय. शिवाने केलेला उपदेश आहे. विहित कर्म करावे असा शिवाचा आदेश आहे. म्हणून प्रत्येक मनुष्याने आपण जे कर्म करीत आहोत ते भगवान शिवाला मान्य आहे की नाही याचा सर्वप्रथम विचार करावा. विहित कर्मांचे पालन करावे आणि निषिद्ध कर्मांचा त्याग करावा. आपली बुद्धी शिवाराधनेकडे असावी. आपली बुद्धी जर सदोदित शिवाराधनेत राहिली तर व्यवहाराचे काय? असा प्रश्न काही जणांना पडेल. जीवात्म्याला व्यवहार तर सांभाळला पाहिजे. येथे थोडा सूक्ष्म विचार करावा लागतो. शिवाची आराधना म्हणजे एकाद्या मूर्तीची आराधना नव्हे. शिव म्हणजे कल्याण. जो सर्वांचे कल्याण करतो आणि सर्वांकडे समदृष्टीने पाहतो तो शिव होय. सर्वांचे कल्याण करणाऱ्या आणि सर्वांना समदृष्टीने पाहणाऱ्या भगवत्तत्त्वालाच 'शिव' असे संबोधले जाते. शिवाराधनेची बुद्धी निरंतर असावी याचा अर्थ, तुम्ही रात्रंदिवस पूजा करावी, असा नाही. शिवपूजा करणाऱ्याची भावना शिवमय होऊन जाते. ज्या हातांनी शिवाची पूजा केली त्या हातांनी शिवकार्येच (पवित्र कार्ये) घडतात, अशिव कार्ये घडत नाहीत. त्यामुळे सर्वांचे कल्याणच होते. कोणाचेही अकल्याण होत नाही. त्याच्या मनाने कोणाचेही अशुभ चिंतन घडत नाही. सर्व सुखी असावेत अशी जी मनाची भावना तीच शिवमय भावना होय. ही भावना निरंतर मनात राहणे हीच अखंड शिवाराधना होय. सामान्य मनुष्य फक्त पूजेच्या वेळीच पूजा करीत असतो, परंतु असामान्य शिवयोगी मात्र पूजेच्या वेळी पूजा तर करतोच पण इतर वेळीही त्याच्या मनात अखंड पूजा सुरू असते. जो सर्वांचेच कल्याण चिंततो, सर्वांवर उपकार करतो, कोणाशी अनादराने बोलत नाही, तो निरंतर शिवपूजाच करत असतो. त्याच्या मनात सदैव शिव नांदत असतो, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांति: शांति: शांति: ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
२८ जुलै १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्रियागमस्थल..२

जिज्ञासू सद्भक्तांनो,

नित्य शिवपूजा हीच वीरशैवांची मुख्य क्रिया होय. ती शिवपूजारूपी क्रिया कशी करावी यासंबंधी येथे सांगतात –

गुरुरादेशमासाद्य पूजयेत् परमेश्वरम् ।
पूजिते परमेशाने पूजिताः सर्वदेवताः ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-९)

आपल्या इष्टलिंगाची पूजा करण्याचा अधिकार आपल्याला आपल्या सद्गुरूकडून प्राप्त होतो. जोपर्यंत साधकाला गुरूकडून शिवदीक्षा, मंत्रोपदेश आणि इष्टलिंगधारण होत नाही तोपर्यंत तो पूजेचा अधिकारी होत नाही. गुरूची आज्ञा घेऊन ते पूजेचा जो विधी सांगतील त्याप्रमाणेच पूजा करायला हवी. अनेक पुस्तकांत शिवपूजेची वेगवेगळी विधिविधाने सांगितलेली असतात. ती वाचून साधकाच्या मनात संदेह उत्पन्न झाला तर त्याने आपल्या गुरूचा निर्णय शिरसावंद्य मानावा. आपल्याला सारे काही गुरूनेच दिलेले असते म्हणून त्यांची जशी आज्ञा असेल त्याप्रमाणे शिवपूजा करावी.

जगात अनेक देवी-देवता आहेत, मग एकाच शिवाची पूजा करून कसे चालेल? वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या देवांची पूजा कशी करावी त्याचे उत्तर देतात-

'पूजिते परमेशाने पूजितः सर्व देवताः'

भगवान शिवात सर्व देवता समाविष्ट आहेत. म्हणून त्याला महादेव असे नाव आहे. 'देवानां देवः महादेवः' जो सर्व देवांचा देव तो महादेव होय. त्याचे पूजन सर्व देव करतात. 'सिद्धान्तशिखामणी'च्या लिंगधारणस्थलात सांगितले आहे की, ब्रह्मादी देव आणि लक्ष्म्यादी देवता यांनी आपल्या मस्तकांवर शिवलिंगे धारण केलेली आहेत. शिवपूजा ही प्राचीन परंपरा आहे. ज्याची पूजा सर्व देव करतात अशा महादेवाची पूजा केल्यावर सर्व देवांची पूजा केल्यासारखी आहे. 'लिंगमध्ये जगत्सर्वम्' म्हणजे लिंगामध्येच समग्र विश्व अवस्थित आहे. सर्व देवता याच विश्वात असल्यामुळे लिंगपूजा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केल्यावर सर्व देवतांची पूजा घडते. त्यामुळे लिंगपूजकाला अन्य देवतांची पूजा करण्याची आवश्यकता नाही. यानंतर एक प्रश्न उपस्थित होतो की, लिंगपूजेचे फळ कोणते? प्रत्येक कर्माच्या फळाची इच्छा मनुष्याला असते. अगदी निर्बुद्ध मनुष्यदेखील आपण हे कर्म केले तर त्याचे कोणते फळ मिळेल, याचा विचार करत असतो. एका सुभाषितकाराने म्हटले आहे-

'प्रयोजनमनुद्दिश्य मंदोऽपि न प्रवर्तते'

प्रयोजनाशिवाय मंदबुद्धीचा मनुष्य देखील कर्म करण्यास प्रवृत्त होत नाही. प्रत्येक कार्यात कोणते ना कोणते तरी प्रयोजन असतेच. लौकिक कार्यात लौकिक प्रयोजन असते तर आध्यात्मिक कार्यात आध्यात्मिक प्रयोजन असते. मनुष्याला कुठले तरी प्रयोजन हवे असते. मग शिवलिंगपूजन करण्याचे प्रयोजन कोणते आहे? याचे उत्तर येथे देतात-

सदा शिवार्चनोपायसामग्रीव्यग्रमानस: ।
शिवयोगरतो योगी मुच्यते नात्र संशय: ॥ १६-१० ॥

शिवपूजा हा योग असून त्याला शिवयोग म्हणतात. शिवयोग म्हणजे शिवाशी साक्षात् संबंध जुळवणे. कोणतीही बाह्य क्रिया न करता आपल्या मनात शिवचिंतन करणे यालाच काही लोक शिवयोग समजतात. भ्रमराचे ध्यान करून कीडा जसा भ्रमररूप होतो त्याप्रमाणे शिवचिंतन करणारा साधक देखील शिवरूप होतो, असे एक उदाहरण या संदर्भात दिले जाते. शिवयोगाची ही अंतिम अवस्था होय. परंतु येथे क्रियागमस्थल या कर्मप्रधान स्थलाचे निरूपण चाललेले आहे. शिवपूजा ही एक महत्त्वपूर्ण क्रिया आहे असे प्रतिपादन करायचे असल्यामुळे येथे कर्माला प्राधान्य देऊन शिवयोगाची व्याख्या केली आहे. शिवपूजेला लागणारी सामग्री संपादन करण्यात जो सदैव मग्न असतो तो 'शिवयोगी' होय. ही सामग्री मिळवताना देखील त्याच्या मनात शिवाशिवाय दुसरा कोणताही विचार नसतो. शिवपूजेसाठी दूध हवे, बेल हवा, भस्म हवे असाच विचार त्याच्या मनात सदैव नांदत असतो. बाह्य सामग्री मिळवून जो शिवाची भक्तिपूर्वक पूजा करतो तो देखील एक शिवयोगीच होय. अशा पूजेने साधक मुक्त होतो अर्थात् शिवरूप होतो. मुक्ती हेच शिवपूजेचे प्रयोजन असते. येथे आणखी एक प्रश्न उपस्थित होतो. मोक्षप्राप्तीसाठी ज्ञानाची आवश्यकता असते. शास्त्रात म्हटले आहे -

'ज्ञानादेवऋते ज्ञानान्न मुक्ति:'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जीवात्म्याला केवळ ज्ञानानेच मुक्ती मिळू शकते. ज्ञानावाचून मिळत नाही. येथे तर तुम्ही सांगत आहात की शिवपूजा-कर्माने मुक्ती मिळते. मग यात खरे कोणते? मुक्ती ज्ञानाने मिळते की कर्माने? याचे उत्तर असे की, ज्ञान आणि कर्म ही मुक्तीची दोन साधने होत.

न कर्मरहितं ज्ञानं न ज्ञानरहिता किया ।
अपश्यन् अन्धको दग्धः पश्च पंगुश्च दह्यते ॥

ज्ञानाशिवाय केलेले कर्म फलप्रद होत नाही आणि कर्मावाचून होणारे ज्ञान देखील फलदायक ठरत नाही. याविषयी आध्यात्मिक क्षेत्रात अंध-पंगू दृष्टान्त दिला जातो. जो दोन्ही डोळ्यांनी आंधळा होता असा अंध मनुष्य आणि जो दोन्ही पायांनी पांगळा होता असा पंगू मनुष्य एका अरण्यात राहात होते. अरण्यात वणवा लागला. झाडे भस्मसात होऊ लागली अग्नी सर्वत्र वेगाने पसरू लागला. पांगळ्याला डोळे होते. सारे उत्पात तो पाहत होता. परंतु त्याच्या ठिकाणी पळून जाण्याची शक्ती नव्हती. आंधळ्याकडे पाय होते परंतु दृष्टी नसल्यामुळे कुठल्या दिशेने पळून गेले म्हणजे आपला जीव वाचेल हे त्याला समजत नव्हते. पांगळ्याकडे ज्ञान होते, परंतु तो क्रियेवाचून लंगडा होता. आंधळ्याकडे क्रियाशक्ती होती, परंतु तो ज्ञानावाचून आंधळा होता. शेवटी दोघेही त्या प्रलयंकर वणव्यात जळून गेले.

प्रत्येक जीवात्म्याला मुक्तीपर्यंत मजल मारायची आहे. परंतु त्या वाटेवर संसाररूपी वणवा लागलेला आहे. या अग्नीत केवळ ज्ञान मिळवणारा मनुष्य भस्म होतो आणि केवळ कर्म करणारा मनुष्य देखील भस्म होतो. मग या संसाररूपी अग्नीपासून सुटका कशी होईल? तर जो ज्ञान आणि क्रिया यांचा समन्वय आपल्या जीवनात करील तोच या संसार-अग्नीपासून सुटू शकेल. हेच अतिशय स्पष्टपणे पुढे सांगतात -

अंधपंगुवदन्योन्यसापेक्षे ज्ञानकर्मणी ।
फलोत्पत्तौ विरक्तस्तु तस्मात् तद्द्वयमाचरेत् ॥ १६-११ ॥

अंध आणि पंगू दोघांनाही परस्परांच्या सहकार्याची गरज असते. अंध-पंगू अरण्यात जळून गेल्याची वार्ता जेव्हा दुसऱ्या अंध-पंगूंना कळली तेव्हा त्यांनी पहिल्यांचे अनुकरण केले नाही. त्यांनी परस्परांशी विचारविनिमय केला. पांगळा आंधळ्याच्या खांद्यावर बसला आणि त्याला वाट दाखवू लागला. डावीकडे वळ, उजवीकडे वळ, समोर चल, सरळ चालत राहा,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इत्यादी. त्याप्रमाणे आंधळा चालत राहिला आणि दोघेही वणव्यातून सुरक्षित बाहेर पडले. त्यावेळी त्या दोघांमध्ये जणू तादात्म्य झाले होते. चालणाऱ्याला वाटत होते की, मी पाहात आहे आणि पाहणाऱ्याला वाटत होते की, मी चालत आहे. दोघे जणू एकजीव झाले होते. त्याप्रमाणे जर संसारातून मुक्त व्हायचे असेल तर अंधपंगूसारखा ज्ञान आणि कर्म यांचा समन्वय करायला हवा.

येथे एक प्रश्न उपस्थित होतो की, ज्ञानप्राप्ती झाल्यावर जर ज्ञानीपुरुष कर्म करत राहील तर तो पुन्हा कर्मबंधनात पडणार नाही काय? कर्मामुळेच तर जीवात्मा बंधनात पडतो. याचे उत्तर येथे दिलेले आहे. फलाची अपेक्षा सोडून जर कर्म केले तर ते बंधनकारक ठरत नाही. कर्म करणे हा जीवात्म्याचा अधिकार आहे, फळ मागणे हा त्याचा अधिकार नव्हे. फळ देणे हा परमेश्वराचा अधिकार आहे. म्हणूनच भगवंतांनी गीतेत सांगितले आहे की, निष्काम भावनेने कर्म केले तर कर्मबंधनात पडत नाही. ज्ञानाशी सकाम कर्माची मैत्री जुळत नसली तरी ज्ञानाला निष्काम कर्माचे वावडेही नाही.

इष्टलिंगपूजारूपी नित्यकर्म काही विशेष फळाच्या उद्देशाने केले जात नाही. गुरूकडून जेव्हा लिंगदीक्षा दिली जाते तेव्हा 'हे लिंगपूजाव्रत जीवनभर आचर' असा आदेश शिष्याला मिळतो. इष्टलिंगाला शरीरापासून कधीही वियुक्त करू नये आणि इष्टलिंगातच आपले सर्वस्व सामावले आहे अशी भावना ठेवावी, असा आदेश गुरू देतात. ज्ञानप्राप्तीनंतर, आता मी शिवरूप झालो आहे, मला इष्टलिंगपूजेची गरज नाही असे शिवयोग्याला म्हणता येत नाही. कारण गुरूच्या आज्ञेप्रमाणे 'देहात प्राण आहे तोपर्यंत मी इष्टलिंगपूजा करीन' असा संकल्प त्याने केलेला असल्यामुळे त्याला इष्टलिंगपूजा करावीच लागते. इष्टार्थाच्या प्राप्तीसाठी आणि अनिष्टाच्या निवारणासाठी इष्टलिंगाची पूजा केली जाते आपली सारी अनिष्टे दूर झाली आहेत आणि आपल्याला इष्टार्थाची – लिंगांगसामरस्यरूपी सर्वश्रेष्ठ इष्टार्थाची प्राप्ती झाली आहे मग यापुढेही आता इष्टलिंगपूजा करण्यात काय अर्थ आहे? त्याचे फळ तर मिळालेच आहे, असे कुणाला वाटेल. या प्रश्नाचे समाधान मंत्रशास्त्रात केलेले आहे.

प्राचीन काळी पाऊस पडावा म्हणून यज्ञ केला जात असे. यज्ञारंभी वीस दिवस किंवा तीस दिवस यज्ञ करू, असा संकल्प सोडला जाई. यज्ञ सुरू केल्यानंतर आठ दिवसांतच जर पाऊस पडला, यज्ञाचे फळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्राप्त झाले तर यज्ञ चालू ठेवायचा की संपवायचा? या प्रश्नाचे उत्तरही तेव्हा दिले गेले. यज्ञ सुरु केल्यानंतर त्याचे फळ अगदी आरंभी अथवा मध्ये अथवा अंती केव्हाही मिळाले तरी यज्ञक्रिया मात्र संकल्पानुसारच पूर्ण करायला हवी. त्याप्रमाणे वीरशैवाला दीक्षासमयी लिंगांगसामरस्याच्या प्राप्तीसाठी लिंग दिलेले आहे. एखाद्या साधकाला त्याच्या आयुष्यमध्यावरच लिंगांगसामरस्याची प्राप्ती झाली तर त्याने इष्टलिंगपूजा करावी की नाही? याचे उत्तर 'करावी' असे आहे. कारण देहात प्राण असेतो लिंगपूजा करण्याचा संकल्प त्याने केलेला असतो. म्हणून पूजेचे फळ मिळाल्यानंतर देखील त्याला पूजेचा त्याग करता येत नाही.

ज्ञाने सिद्धेऽपि विदुषां कर्मापि विनियुज्यते ।
फलाभिसन्धिरहितं तस्मात् कर्म न सन्त्यजेत् ॥ १६-१२ ॥

ज्ञान प्राप्त झाल्यानंतर देखील ज्ञानी पुरुषाने कर्म करीत राहिले पाहिजे. त्यावेळी त्याला कर्माची काही गरज नसते. परंतु वडीलधाऱ्या माणसाचे वर्तन पाहून त्याप्रमाणे घरातली लहान मुले वागत असतात, हे वडील माणसाला लक्षात ठेवावे लागते. ज्ञानप्राप्तीनंतर जर एखाद्याने आपल्या गळ्यातील लिंग काढून ते खुंटीवर टांगून ठेवले तर त्याचा सामान्य माणसावर काय परिणाम होईल? ते म्हणतील की एवढ्या मोठ्या ज्ञानी पुरुषाने गळ्यातले लिंग काढून टाकले तर मग आपल्यासारख्या सामान्य माणसाने काढून टाकले तर काय बिघडले? मोठ्या माणसांनीच सद्वर्तनाचा त्याग केला तर लहान माणसे तशीच वागू लागतील. त्यामुळे समाजात विपरीत भावना बळावण्याची शक्यता असते. म्हणून ज्ञानी पुरुषाला स्वत:साठी नाही पण इतरांना मार्गदर्शन करण्यासाठी तरी लिंगपूजा करावीच लागते.

एखाद्या शिक्षकाची जेव्हा प्राथमिक शाळेत नियुक्ती होते तेव्हा त्याला वर्गातल्या मुलांना अ आ इ ई ही अक्षरओळख करून द्यावी लागते. त्यांना नीट समजावून सांगून त्यांच्याकडून अक्षरे गिरवून घ्यावी लागतात. शिक्षकाला त्या अक्षरज्ञानाची काही गरज नसते. त्याला केव्हाच, तो प्राथमिक शाळेत असतानाच अक्षरओळख झालेली असते. बरेच शिक्षण घेऊन तो जेव्हा प्राथमिक शाळेत शिकवायला येतो तेव्हा त्याला पुन्हा अ आ इ ई म्हणावी लागते, शिकवावी लागते. या अक्षरांचा पुन्हा पुन्हा उच्चार करणे आणि ही अक्षरे पुन्हा पुन्हा फलकावर लिहिणे या क्रियांचा शिक्षकाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काही उपयोग नसतो. तरी देखील तो मुलांना शिकवण्यासाठी त्या क्रिया करत असतो. त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाला लिंगपूजादी क्रियांची गरज नसली तरी तो इतरांना मार्गदर्शन करण्यासाठी त्या क्रिया करत असतो. त्याच्या क्रियेमुळे इतरांनाही प्रेरणा मिळत असते. ज्ञानी पुरुषानेंही ज्ञानोत्तर कर्मे करावीत असा शास्त्रांचा आदेश आहे, तर मग अज्ञानी माणसाने तर ती करायलाच हवीत. क्रियेला एवढे महत्त्व का? याचे स्पष्टीकरण पुढे केले आहे –

आचार एवं सर्वेषामलंकाराय कल्प्यते ।
आचारहीन: पुरुषो लोके भवति निन्दित: ॥ १६-१३ ॥

येथे ज्ञान आणि आचरण या दोन महत्त्वपूर्ण बाबी आहेत. एखाद्याकडे ज्ञान आहे, परंतु त्याचे आचरण ज्ञानानुसार नसेल तर त्याच्या ज्ञानाला काही अर्थ नाही. ते ज्ञान ना त्याच्या उपयोगाचे ना इतरांच्या उपयोगाचे. म्हणून येथे आचार हा एक अलंकार मानला आहे. आपले शरीर छान दिसावे म्हणून आपण ते वस्त्रालंकारांनी सजवतो, नटवतो. स्थूल शरीर वस्त्रालंकारांनी सजवणे चांगलेच आहे, परंतु मनुष्याला एक अंत:शरीर देखील असते. त्याला 'सूक्ष्मदेह' म्हणतात. स्थूलदेहावर तुम्ही उत्तम कपडे घालाल, सुवर्णालंकारांनी ते सजवाल. परंतु तुमचा सूक्ष्मदेह मात्र वस्त्रालंकारांनी सजवता येत नाही. जोवर तुमचे सूक्ष्मशरीर सुंदर होत नाही, ते अलंकृत होत नाही तोवर तुमच्या स्थूलशरीरावर तुम्ही कितीही अलंकार घातले, ते कितीही नटवले तरीही समाजात तुम्हाला पूज्यता लाभणार नाही. बाहेरच्या अलंकारांपेक्षा आतले अलंकार अधिक महत्त्वाचे असतात. त्यामुळे व्यक्तीचेही कल्याण होते आणि समाजाचेही कल्याण होते. एखादा आचारशून्य मनुष्य शास्त्रनिषिद्ध मार्गावरच चालत असेल, सर्वांचे अकल्याण चिंतीत असेल तर अशा माणसाने आपले शरीर सुवर्णालंकारांनी कितीही नटवले तरी ते शोभायमान दिसणार नाही. भगवान शिवाच्या अंगावर कोणतीही बाह्य आभूषणे नाहीत. एवढेच नव्हे तर त्यांच्या अंगावर वस्त्रेदेखील नाहीत.

'दिगंबरत्वेन निवेदितं वसु' असे महाकवी कालिदासाने भगवान शिवाचे वर्णन केले आहे. शिवाच्या प्राप्तीसाठी जेव्हा पार्वती तपस्या करते तेव्हा एका ब्राह्मणाचे रूप घेऊन शिव तेथे येतात. त्याला पार्वतीच्या निष्ठेची परीक्षा घ्यायची असते. त्यावेळी भगवान शिवाबद्दल काही चमत्कारिक उद्गार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काढलेले आहेत. पार्वती ही पर्वतराजाची कन्या. तिच्यापुढे सर्व लौकिक सुखे हात जोडून उभी असताना ती शंकराच्या प्राप्तीसाठी का तपस्या करते? याचे आश्चर्य वाटून तो ब्रह्मचारी हसून म्हणतो की, 'हिची तपस्या व्यर्थ आहे. रत्नपारख्याने आणि ग्राहकाने रत्नाचा शोध घ्यायचा असतो. रत्नाने ग्राहकाचा शोध घ्यायचा नसतो. येथे तर एक कन्यारत्न वराच्या प्राप्तीसाठी तपस्या करीत आहे. म्हणून ही तपस्या व्यर्थ होय. बरे, ज्याच्यासाठी ती तपस्या करते आहे तो वर तरी कसा आहे?

'वपुर्विरूपाक्ष अलक्ष जन्मत: दिगंबरत्वेन निवेदितं वसु'

'वराच्या ठिकाणी ज्या रूप-गुणांची अपेक्षा असते, त्यांपैकी एक देखील शिवाच्या ठिकाणी नाही. वर देखणा असावा, सुस्वरूप असावा. परंतु हा तर विरूपाक्ष आहे. तीन डोळे असलेला शिव सुरूप कसा असेल? तो विरूपच असणार. बरे, नसू दे सुंदर, परंतु तो श्रीमंत तरी असावा. याच्याकडे तर अंगावर घालण्याइतकी वस्त्रेसुद्धा नाहीत. यावरून त्याच्या श्रीमंतीची कल्पना येते. तेही सोडून दिले तर निदान उत्तम कुळातला तरी असावा. याचा कुलीनपणा काय सांगावा? याच्या मायबापाचा पत्ता नाही. याचा जन्म कुठे झाला? कधी झाला? कोणत्या वंशात झाला? हे त्याला देखील सांगता येत नाही. रूप, ऐश्वर्य आणि कुल यांपैकी एकही लक्षण याच्यापाशी नाही. अशा वराच्या प्राप्तीसाठी तपस्या करणे व्यर्थ नाही तर काय?'

ब्रह्मचाऱ्याचे रूप घेऊन शंकराने पार्वतीसमोर जी शिवनिंदा केली ती दुसऱ्या अर्थाने निंदा नसून स्तुतीदेखील आहे. समग्र विश्वाला भस्म करण्याचे सामर्थ्य ज्याच्याकडे आहे, आकाशच ज्याचे वस्त्र होऊ शकते असा जो विशाल आहे आणि जो जन्ममृत्यूच्या अतीत आहे अशा शिवपरब्रह्माचे हे वर्णन होय. सांगायचा मुद्दा असा की, जे शिवभक्त आहेत त्यांनी शिवाची वैशिष्ट्ये समजून घ्यावीत. शिवाला बाह्य अवडंबर आवडत नाही. त्यांना बाह्य आभूषणे प्रिय नाहीत. विशुद्ध आचरण हाच भगवान शिवाचा एक अलंकार होय. म्हणून शिवभक्ताने शुद्धाचरण करून त्याच्या द्वारा आपले सूक्ष्मशरीर अलंकृत करावे. आपले अंत:करणच शिवाला अर्पण करायचे असते. तेच जर सुंदर नसेल तर बाह्य सौंदर्याला काय अर्थ आहे? क्रियागमस्थलाचा समारोप करताना पुढे सांगतात -

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञानेनाचारयुतेन प्रसीदति महेश्वरः ।
तस्मादाचारवान् ज्ञानी भवेदादेहपातनम् ॥ १६-१४ ॥

शुष्क ज्ञानामुळे शिव प्रसन्न होत नाहीत, तर सदाचारयुक्त ज्ञानाने ते संतुष्ट होतात. याची मर्यादा देखील सांगतात. जोपर्यंत देहात प्राण आहेत तोपर्यंत सदाचारण करावे. मी ज्ञानी आहे, मी कसाही वागलो तरी चालते असे मानून जो मनःपूत वर्तन करतो त्याच्यावर शिव प्रसन्न होत नाहीत.

याप्रमाणे क्रियागमस्थलात क्रियेचे महत्त्व वर्णिले आहे. इष्टलिंगपूजा हीच क्रिया असून तिचे आजन्म परिपालन करणे म्हणजे सदाचरण होय. अंतःकरणात आणि बुद्धीत सद्भावनांची आणि सद्विचारांची पेरणी केली तर सर्वेंद्रियांकडून सदाचरण घडू लागते. ज्याने आपल्या अंतःकरणात सुगंध भरून घेतला असेल त्याच्या आचरणातून जगावर सुगंधाचीच बरसात होत असते. म्हणून ज्ञानाची सदाचरणाशी गाठ घालावी. अशा माणसावरच भगवान शिवाची पूर्ण कृपा होते. ज्ञान आणि आचरण अशा दोन पंखांनीच परमात्म्यापर्यंत झेप घेता येते. म्हणून प्रत्येकाने आपल्या जीवनात ज्ञान आणि कर्म यांचा समन्वय साधावा, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
२९ जुलै १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भावागमस्थल..१

जिज्ञासू सद्भक्तांनो,

काशीक्षेत्रात हा जो सत्संग चालू आहे त्याचे अपार महत्त्व आहे. मास देखील पवित्र आहे आणि क्षेत्र देखील पवित्र आहे. त्यातही ज्ञानपीठात हा सत्संग सुरू आहे. येथे जमलेले भक्त पवित्र भावनेने आलेले आहेत. पवित्र मास, पवित्र क्षेत्र आणि पवित्र भक्त असा हा त्रिपुटीयोग आहे. जो फळाची अपेक्षा सोडून निष्काम भावनेने कर्म करतो त्याच्यावर भगवंताची कृपा होते, असे कालच्या आशीर्वचनात आपण ऐकले आहे. निष्काम कर्म केल्यामुळेच मनुष्याचे अंत:करण शुद्ध होते. जोपर्यंत तुमच्या मनात एखाद्या वस्तूची वासना आहे तोपर्यंत तुमचे मन शुद्ध नाही. ज्याच्या वृत्तीत संपूर्णपणे भगवंताची इच्छा मुरलेली असते त्याच्या वृत्तीलाच शुद्ध मानले जाते. पवित्र वस्तूचे चिंतन करणारी वृत्ती पवित्र असते तर अपवित्र वस्तूचे चिंतन करणारी वृत्ती अपवित्र असते. संसार पवित्र नाही, शुची नाही; परंतु परमात्मा मात्र पवित्र, शुची आहे. ऋग्वेदात म्हटले आहे –

'पवित्रं विततं ब्रह्मणस्पते'

वीरशैवाच्या इष्टलिंगाचे एक पर्यायनाम 'पवित्र' असे आहे. अपवित्र वस्तूंनाही पवित्र करण्याचे सामर्थ्य त्याच्या ठायी असल्यामुळे त्याला 'पवित्र' असे म्हणतात. गंगेला आणि काशीक्षेत्राला आपण पवित्र मानतो ते कशासाठी? तर पाप्यातल्या पापी मनुष्याने येथे येऊन प्रायश्चित्त घेतले, गंगास्नान केले तर त्याची पापे नष्ट होतात; म्हणून गंगा आणि काशीक्षेत्र पवित्र मानले जातात. इष्टलिंगही असेच पवित्र आहे. कर्माच्या उद्देशामुळे ते कर्म पवित्र कर्म की अपवित्र कर्म, ते ठरत असते. अपवित्र संसाराचे चिंतन करणारी वृत्ती अपवित्र तर पवित्र परमात्म्याचे चिंतन करणारी वृत्ती पवित्र होय. निष्काम भावनेने केलेले कर्मच पवित्र होय. गीतेत भगवंतांनी 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' असे जोर देऊन का म्हटले आहे? तुझा केवळ कर्मावरच अधिकार आहे असा 'च' कार (एव) जोडून कर्मावर भर दिला आहे. तो यासाठी की फळाची अपेक्षा धरून तुम्ही माझ्याजवळ याल तर तुमच्या मनात केवळ संसारच भरलेला असेल, मी नव्हे. जोपर्यंत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मी तुमच्या मनात येणार नाही तोपर्यंत तुम्ही पवित्र होणार नाही. जीवात्मा परमात्म्याचाच अंश असल्यामुळे त्याला शुद्ध करण्याची इच्छा परमात्म्याच्या ठिकाणी असते. एवढेच नव्हे तर प्रत्येक जीवात्म्याला जवळ घ्यावे, त्याला आपले स्वरूप प्रदान करावे अशी इच्छा देखील परमात्म्याच्या ठायी असते. म्हणून भगवंतांनी सर्व शास्त्रांची, वेदागमांची निर्मिती केली.

केवळ भगवद्प्राप्तीसाठी जे कर्म केले जाते ते निष्काम कर्म होय, असे तुम्ही कालच्या आशीर्वचनात ऐकले आहे. निष्काम कर्म केल्यावर मनुष्याची कोणती प्रगती होते या विषयी या भावागमस्थलात वर्णन केले आहे. निष्काम कर्म करतां करता जीवात्म्याच्या ठिकाणी एक शिवमय वृत्ती निर्माण होते. तिला भाव असे नाव आहे. भाव याचा अर्थ काय आहे?

'भावो मानसचेष्टात्मा परिपूर्णः शिवात्मकः'

अन्तर्बाह्य परमात्म्याचे चिंतन करणाऱ्या वृत्तीला 'भाव' असे म्हणतात. आपला भाव जसा असेल तसे आपण होऊ. बृहदारण्यक उपनिषदात म्हटले आहे – 'यं यथोपासते तदेवभवति यद्भावं तद्भवति'. उपास्याची उपासना करणारा उपासक शेवटी उपास्यच होतो आणि ज्याची जशी भावना तो तसा होतो. याच संदर्भात योगज-आगमात म्हटले आहे –

'शिवभावानुसंधानात् शिवो भावे प्रकाशते'

शिवमय भावनेने तुम्ही शिवचिंतन कराल तर तुमच्या मनात शिव प्रकाशमान होईल. ज्ञान आणि कर्म ही मुक्तीची साधने मानली जातात. ज्ञानाने मुक्ती मिळते असे काही जण मानतात तर ज्ञान आणि कर्म यांच्या समन्वयाने मुक्ती मिळते असे काही जण मानतात. परंतु 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त ज्ञान आणि कर्म यांच्या बरोबरच 'भाव' हे एक मुक्तीचे साधन मानले जाते.

भावचिह्नानि विदुषो यानि सन्ति विरागिणः ।
तानि भावागमत्वेन वर्तन्ते सर्वदेहिनाम् ।

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-१५)

कर्मफलाची अपेक्षा न ठेवता कर्म करणाऱ्या ज्ञानी पुरुषाची जी मानसिक स्थिती असते तिला 'भाव' असे म्हणतात. फळाची अपेक्षा तुमच्या मनात असेल तर तुमची भावना शुद्ध राहणार नाही. फळाच्या अपेक्षेमुळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपली मानसिक स्थिती बिघडत असते. एखादे समान कर्म करीत असताना आपल्यापेक्षा दुसऱ्याला अधिक फळ मिळालेले पाहिले तर आपले मानसिक संतुलन बिघडते. म्हणून कोणतीही फलापेक्षा न ठेवता कर्म करीत असताना जी मानसिक स्थिती असते तिलाच उत्तम भावना असे म्हणतात. अशा उत्तम भावनेचे प्रतिपादन करणाऱ्या स्थलाला 'भावागमस्थल' असे नाव आहे.

शिवोऽहमिति भावोऽपि शिवतापत्तिकारणम् ।
न ज्ञानमात्रं नाचारो भावयुक्तः शिवो भवेत् ॥ १६-१६ ॥

शिवत्व प्राप्त करून घेणे हे प्रत्येक जीवात्म्याचे परमलक्ष्य होय. संसारातील सारे भोग भोगून झाल्यावर जेव्हा भोगण्यासाठी काही उरत नाही त्यावेळी जीवात्म्याला शिवत्वाची ओढ लागते. हे देखील काही जणांच्या बाबतीत खरे आहे. साऱ्यांनाच ही ओढ लागते असे नाही. ज्याने जन्मजन्मांतरात साधना करून शरणस्थलात प्रवेश केला आहे अशा जीवात्म्यालाच, संसारात काही अर्थ नाही, असे वाटू लागते. त्यानंतर शिवत्वाची प्राप्ती हेच त्याचे जीवनध्येय होते, त्याचे अंतिम लक्ष्य होते. त्याला शिवत्वाची प्राप्ती करून घेण्यासाठी काय केले पाहिजे ते येथे सांगतात. वेदान्तात चार महावाक्ये आहेत. त्यांपैकी 'तत्त्वमसि' हे महावाक्य होय. ते (ब्रह्म) तूच आहेस, असा याचा अर्थ आहे. परिपक्व अंतःकरणाचा शिष्य जेव्हा गुरूकडून हे महावाक्य ऐकतो तेव्हा त्याचे आपल्या अंतःकरणात चिंतन करू लागतो.

'शिवोऽहम्'-मी शिवच आहे, असे चिंतन त्याच्या मनात चालू राहते. यालाच शिवोऽहम् भावना असे म्हटले जाते. शिवोऽहम् भावना दृढ झाली की शिवत्वाची प्राप्ती होते. केवळ ज्ञानाने किंवा केवळ कर्माने मुक्ती मिळत नाही तर त्यासाठी भावाचीही आवश्यकता असते. हे कसे? असा प्रश्न कुणाला पडेल तर त्याविषयी पुढे सांगतात -

ज्ञानं वस्तुपरिच्छेदो ध्यानं तद्भावकारणम् ।
तस्माद् ज्ञाते महादेवे ध्यानयुक्तो भवेत् सुधीः ॥ १६-१७ ॥

वस्तूचे यथार्थ स्वरूप जाणणे म्हणजे ज्ञान होय आणि तदाकार होऊन चिंतन करणे म्हणजे ध्यान होय. म्हणून ज्ञानानंतर ध्यानाची आवश्यकता असते. परमात्मा सद्रूप, चिद्रूप आणि आनंदरूप आहे असे शास्त्रे सांगतात. परमात्मा सच्चिदानंदरूप आहे याचे ज्ञान तुम्हाला झाले. त्याच्या स्वरूपाचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञान तुम्हाला मिळाले तरी तुमच्या अंतरात्म्याशी त्याचें तादात्म्य झाले नाही. तुमच्यासमोर भाकरी ठेवलेली आहे. ती भाकरी आहे हे ज्ञान तुम्हाला आहे आणि ते खाल्ल्यामुळे पोट भरते याचेही तुम्हाला ज्ञान आहे. परंतु हे ज्ञान झाल्यामुळे तुमचे पोट भरत नाही. जोपर्यंत ती भाकरी तुम्ही खाणार नाही तोपर्यंत तुमचे पोट भरणार नाही आणि तुम्हाला तृप्ती मिळणार नाही. हा तर आपला व्यवहारातला अनुभव आहे. आपल्याला परमात्म्याला काही द्यायचे नसते. परमात्मा जसा सत्, चित्, आनंदरूप आहे तसाच आपला आत्मादेखील सच्चिदानंदरूप आहे. दोघांच्या स्वरूपांत साम्य आहे. असे असले तरी आत्मा आणि परमात्मा या दोहोंचे सामरस्य करण्यासाठी साधना करायला हवी, चिंतन करायला हवे. उपनिषदात म्हटले आहे –

'आत्मा वा अरे द्रष्टव्य: श्रोतव्य: मन्तव्य: निदिध्यासितव्य:

आत्मदर्शन ही तर प्रत्येक माणसाचे अंतिम ध्येय होय. म्हणून अत्यंत दर्शनीय वस्तू म्हणजे आपला आत्माच होय. आत्मदर्शन घेण्यासाठी प्रथम त्याचे श्रवण केले पाहिजे. नंतर त्याचे मनन केले पाहिजे. त्यानंतर त्याचे चिंतन केले पाहिजे. जर श्रवणानेच ज्ञान होत असेल तर पुढे मननाची आणि निदिध्यासाची आवश्यकता काय? ज्ञानानेच मुक्ती मिळत असेल तर आपल्याला आत्म्याचे आणि परमात्म्याचे ज्ञान तर झाले आहे, मग पुढे त्याचे मनन करावे, निदिध्यास करावा, असे उपनिषदांना का सांगावे लागले?

आत्मा-परमात्म्याचे ज्ञान झाले तरी आपली वृत्ती तदाकार राहत नाही. ती अन्याकार होऊ शकते, प्रपंचात शिरू शकते. परमात्मचिंतन करताना आपल्या मनात अन्य विषयांचे चिंतनही होऊ लागते. पूजा करताना अथवा भगवत्कथा ऐकताना काही काळ तुमचे मन त्यात रमते. त्यानंतर मात्र त्याच्या संस्कारांनुसार ते दुसरीकडे वळते. जेव्हा तुमच्या लक्षात येते की, आपण आपल्या मनाला जे काम करायला सांगितले ते काम हे करत नसून दुसरेच काही करत आहे, तेव्हा तुम्ही त्याला पुन्हा पकडून पहिल्या कामाला लावता. अन्याकार होणाऱ्या वृत्तीला पुन्हा पुन्हा पकडून भगवंताच्या चिंतनास लावण्यासाठी जीवात्म्याची निरंतर चाललेली धडपड म्हणजेच मनन होय. ही धडपड एकदोन दिवसांची नसते तर आयुष्यभराची असते. जेव्हा ध्यानाला बसल्यावर तुमची वृत्ती आत्माकार राहील, अन्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोणत्याही विषयाकडे किंचितदेखील वळणार नाही, तेव्हा समजा की, तुमचे मनन पक्व झाले आहे.

त्यानंतर तुम्हाला निदिध्यास करावा लागतो. अखंड तैलधारेप्रमाणे कुठेही खंडित न होता आपल्या मनात सदोदित परमात्म्याचे जे चिंतन चाललेले असते त्याला 'निदिध्यास' म्हणतात. तुमची वृत्ती जेव्हा अखंडपणे शिवचिंतनात मग्न होते, कुठलाही अन्य विषय मध्ये प्रवेश करीत नाही तेव्हा तीच शिवोऽहम् भावना होय. ज्ञानानंतर जर तुमच्या मनात शिवोऽहम् भावनेचा उगम झाला नाही, ती दृढ झाली नाही तर तुम्हाला मुक्ती प्राप्त होणार नाही. केवळ शुष्क ज्ञान तुम्हाला मुक्ती देऊ शकत नाही. आपल्या देशाचे राष्ट्रपती कोण आहेत, याची सामान्यत: सर्वांना माहिती असते. त्यांच्या रूपाबद्दल, कामकाजाबद्दल आणि दैनंदिन जीवनाबद्दल तुम्हाला ज्ञान झाले तरी ते ज्ञान तुम्हाला लाभदायक ठरत नाही. परंतु जेव्हा तुमचा राष्ट्रपतींशी प्रत्यक्ष परिचय होईल, त्यांच्या मनात तुमच्याबद्दल सौहार्दभाव उत्पन्न होईल, त्यांच्या सान्निध्यात तुम्ही राहाल तेव्हा त्यांच्याकडून तुमचे कल्याण होईल. हे व्यवहारातील उदाहरण होय. त्याप्रमाणे तुम्हाला परमात्म्याचे केवळ ज्ञान झाले तर त्यापासून काही लाभ मात्र होणार नाही. ज्ञान तुम्हाला मिळेल ग्रंथ वाचून, सत्संगात जाऊन. परंतु आपला आत्मा आणि परमात्मा एकच आहे अशी भावना जर तुमच्या मनात दृढ झाली तरच तुम्हाला परमानंदाची प्राप्ती होईल. म्हणून येथे म्हटले आहे की वस्तूचे यथार्थ स्वरूप जाणणे म्हणजे ज्ञान आणि तन्मय होऊन वस्तूत निमग्न होणे म्हणजे ध्यान. परमात्म्याचे ज्ञान होऊन देखील जर तुमच्या मनात सांसारिक विषयांचे ध्यान होत असेल तर ज्ञान होऊन देखील तुम्हाला दु:खच भोगावे लागेल.

महाभारतात एक कथा आलेली आहे. पांडव वनवासात असताना एके दिवशी अर्जुन काही कामानिमित्त हिमालयात गेला. त्याच दिवशी बृहदश्व महर्षी पांडवांच्या पर्णकुटीत आले. सर्वांनी त्यांचे यथोचित स्वागत करून जलपानाची, फलाहाराची व्यवस्था केली. महर्षी फार दुरून अनवाणी पायांनी चालत आले. हे जाणून युधिष्ठिर त्यांचा श्रमपरिहार करण्यासाठी त्यांचे चरणसंवाहन करू लागला, त्यांचे पाय चुरू लागला. थोड्या वेळाने त्याच्या डोळ्यांतील अश्रू महर्षींच्या पायावर पडले तेव्हा महर्षींनी चमकून युधिष्ठिराकडे पाहिले. त्याचे डोळे अश्रूंनी भरलेले होते. वास्तविक एक तपस्वी त्यांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पर्णकुटीत अतिथी म्हणून आला होता. त्याचे आतिथ्य करण्याचे भाग्य लाभल्यामुळे युधिष्ठिराला आनंद व्हायला हवा होता. मग तो दुःखी का बरे झाला असावा? असा महर्षींना प्रश्न पडला.

'युधिष्ठिरा, तू का बरे रडत आहेस?' महर्षींनी विचारले.

'महाराज, आज सकाळीच माझा बंधू अर्जुन हिमालयात गेला तो अजून परतलेला नाही. त्याच्या आठवणीने व्याकुळ होऊन माझ्या डोळ्यांत अश्रू आले. क्षमा असावी.' युधिष्ठिर म्हणाला.

बृहदश्व म्हणाले, 'युधिष्ठिरा, संसार तर असाच आहे. जेव्हा जेव्हा तुझ्या भावनेत संसार शिरेल तेव्हा तेव्हा तो तुला रडवल्याशिवाय राहणार नाही. म्हणून संसाराला आपल्या भावनेत प्रवेश करू देऊ नये. तू भलेही संसारात राहा, पण तुझ्या भावनेत संसार राहू देऊ नकोस. तू कसाही असलास तरी संसार तुला रडवल्याशिवाय राहणार नाही.'

'पण महाराज, या दुःखाला विसरावे कसे?' युधिष्ठिराने विचारले.

'युधिष्ठिरा,' बृहदश्व म्हणाले, 'आपले दुःख विसरण्यासाठी आपल्यापेक्षाही जे अधिक दुःखी आहेत त्यांच्याकडे पाहायला शिकले पाहिजे. आपल्यापेक्षा कितीतरी जीव संसारात अधिक दुःख भोगत असतात, सुख-दुःख तर आपल्या प्रारब्धाने आपल्याला मिळत असतात. हे जाणून आपल्या भावनेत संसाराला घुसू न देता तिथे निरंतर परमात्मचिंतन व्हावे असा प्रयत्न केला तर आपल्याला दुःख भोगावे लागणार नाही.'

सांगण्याचे तात्पर्य असे की, जीवात्मा जन्मजन्मांतरापासून अनेक भलीबुरी कर्मे करत, नवनवे देह धारण करत, कर्मांची फळे भोगत आलेला असतो. त्याला जे काही मिळते ते त्याच्या प्राक्तनामुळेच मिळते. मिळायच्या वेळीच ते मिळते आणि जेवढे मिळायचे तेवढेच मिळते. आधी काही मिळत नाही आणि अधिक काही मिळत नाही. मृत्यूच्या वेळी घर, दार, आप्तेष्ट, संपत्ती आणि देहदेखील येथेच सोडून जीवात्म्याला जावे लागते. परंतु भल्याबुऱ्या कर्मांचे संस्कार मात्र तो घेऊन जातो. संस्कार म्हणजेच वासना. ही वासना जीवाला पुन्हा पुन्हा जन्म घ्यायला भाग पाडते आणि दुःख भोगवते. जीवात्म्याने जन्मजन्मांतरात अधिकाधिक संसारचिंतनच केलेले असते. क्वचित् काही काळ परमात्मचिंतन केले असते. माणसे जागृतावस्थेत संसारचिंतन करतातच, परंतु झोपल्यावर स्वप्नातदेखील संसारच पाहात असतात. प्रामाणिकपणे आत्मपरीक्षण केले तर असे दिसून येईल की, आपण संसाराचे अधिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चिंतन करतो आणि भगवंताचे अगदी थोडे चिंतन करतो.

भगवंताचे ध्यान करणे म्हणजे चिंतन आणि संसाराचे ध्यान करणे म्हणजे चिंता. चिंतन आणि चिंतेत खूपच अंतर आहे. जिच्यामुळे जीवात्म्याला दु:खच दु:ख मिळते तिला 'चिंता' असे म्हणतात. चिंता आणि चिता या दोन शब्दांत एका अनुस्वाराचा फरक आहे. चिता माणसाला मेल्यावर एकदाच जाळते तर चिंता माणसाला जिवंतपणी सतत जाळत राहते. जी जाळते ती 'चिंता' होय. म्हणून शास्त्रकार म्हणतात की, चिंता सोडा चिंतन करा. संसार करण्याला मनाई नाही. संसार अवश्य करा. परंतु तो करताना भगवच्चिंतन देखील करा. प्रत्येक जीवाला आपापली कर्तव्ये पार पाडावीच लागतात. संसार करताना भगवच्चिंतन केले तर संसार तुमचे काहीही बिघडवू शकत नाही. बाहेर संसार आणि आत भगवंत. ही एक जीवनकला आहे. तुम्ही संसारात राहा आणि तुमच्या आत परमात्म्याला राहू द्या. त्यामुळे संसारही चालेल आणि परमार्थही चालेल. कर्नाटकातल्या निजगुणशिवयोगी या संताने म्हटले आहे की, जो लौकिक आणि पारमार्थिक अशी दोन्ही जीवने एकाच वेळी जगत असतो तोच बुद्धिमान होय. संसार सर्वांसाठी आहे. प्रत्येकाचा संसार वेगवेगळा आहे. गृहस्थाचा संसार वेगळा, ब्रह्मचाऱ्याचा संसार वेगळा, वानप्रस्थाचा संसार वेगळा आणि संन्याशाचा संसार वेगळा. त्यांची कर्तव्ये करणे हाच त्यांचा संसार होय. हृदयात भगवच्चिंतन चालले असताना बाहेर कर्मे देखील चालू असावीत.

अनेक जन्मांतील संस्कारांमुळे जीवात्म्याच्या ठिकाणी देहाबद्दल आणि इंद्रियांबद्दल अभिमान दृढ झालेला असतो. म्हणून तो त्यांचेच अधिकाधिक चिंतन करीत असतो. आयुष्यात परिवर्तन घडवायचे असेल तर संस्कारात बदल करावा. अभ्यासामुळे दृढ संस्कार नष्ट होऊ शकतात. आपल्या हातून घडणारे एखादे लहान धर्मकार्य देखील आपले एखादे मोठे पाप नष्ट करू शकते. अग्नीची ठिणगी लहान असली तरी ती कापसाचा पर्वत भस्मसात करून नामशेष करू शकते. जन्मजन्मांतरातील पापांचे पर्वत भगवच्चिंतनामुळे नष्ट होतात. परमात्म्याचे ज्ञान झाले तरी परमात्म्याचे ध्यान केले पाहिजे. ध्यान म्हणजे अंतर्यात्रा होय. काशी, रामेश्वर, ज्योतिर्लिंग इत्यादी यात्रा बाह्य आहेत. ह्या यात्रा आपण नेहमीच करीत असतो. त्या यात्रा केल्यामुळे मानसिक समाधान मिळते. बाह्ययात्रा केल्याने जर तुम्हाला ऐवढे समाधान मिळते तर अंतर्यात्रा केल्याने तुम्हाला किती समाधान मिळेल? प्रत्येकाचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शरीर म्हणजे एक क्षेत्र आहे असे गीतेत म्हटले आहे. ते क्षेत्र का? तर तेथे तीर्थ आहे, तेथे भगवंत आहे. पवित्र मन म्हणजे तीर्थ होय आणि देहात नांदणारा आत्मा म्हणजेच परमात्मा हा तेथला देव होय. जेथे परमात्मा नित्य राहतो त्याला तीर्थक्षेत्र म्हणतात. जो परमात्मा बाह्य क्षेत्रामध्ये आहे तोच परमात्मा आपल्या देहरूपी क्षेत्रात देखील वास्तव्य करतो. परमात्मा सर्वव्यापक असल्यामुळे तो केदारला आहे तसा काशीला आहे. काशीला आहे तसा रामेश्वरलाही आहे, तो बाहेर आहे तसाच आत देखील आहे. बाह्य यात्रेत माणसाला सुख मिळते त्यापेक्षाही सहस्रपटीने अधिक सुख अंतर्यात्रा केल्याने मिळते.

ध्यान हाच अंतर्यात्रेचा मुख्य मार्ग आहे. वृत्ती अंतर्मुख झाल्यावर आत्मा आणि परमात्मा यांच्या सामरस्याचे ज्ञान होते आणिं हृदयात सतत भगवच्चिंतन चालू होते तेव्हा आपले शरीर हे एक तीर्थक्षेत्रच होऊन राहते. कोणत्याही बाह्य क्षेत्रात तुम्ही काही काळ राहू शकाल, परंतु नंतर क्षेत्राचा त्याग करावाच लागतो. म्हणून शास्त्रकारांनी म्हटले आहे की, तीर्थक्षेत्र सोडण्याआधी तुम्ही स्वत:च तीर्थक्षेत्र होऊन गेलांत तर पुन्हा येथे येण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यावेळी तुम्हाला क्षेत्रात जाऊन देवदर्शन करण्याऐवजी तुमच्या हृदयातच आत्मदर्शन होऊ लागेल. म्हणून परमात्म्याचे स्वरूपज्ञान झाल्यावर त्याचे सतत ध्यान करावे लागते, त्याला आपल्या भावनेत सदैव वागवावे लागते. यालाच भावागमस्थल म्हणतात. भावनेचे काय महत्त्व आहे आणि भावनेशिवाय राहणाऱ्या मनुष्याची स्थिती कशी असते याविषयी उद्या विचार करू.

एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांति: शांति: शांति: ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
३० जुलै १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भावागमस्थल..२

जिज्ञासू सद्भक्तांनो,

कालच्या आशीर्वचनात 'सिद्धान्तशिखामणी'तील भावागमस्थलावर थोडा प्रकाश टाकला आहे. ज. रेणुकाचार्यांचे म्हणणे असे की, केवळ ज्ञानामुळे परमानंदाची प्राप्ती होत नाही. ज्याचे ज्ञान आपल्याला झाले आहे त्याच्याशी जर आपण समरस होऊ शकलो नाही तर परमानंद प्राप्त होणारच नाही. आनंदप्राप्ती हेच तर जीवात्म्याचे ध्येय आहे.

'आनंदाद्येव भूतानि जायन्ते आनंदेन जातामि जीवन्ति'

परब्रह्माची स्थिती कशी आहे याचा शास्त्रात विचार केला आहे. शास्त्रे सांगतात -

'आनंदं प्रयन्त्यभिविशन्ति तस्माद्विजिज्ञासस्व आनंदं ब्रह्मेति'

आनंद हेच तर परब्रह्म होय. आनंद ब्रह्म आहे तर विषयांत देखील आनंद मिळतो म्हणून विषयदेखील ब्रह्म मानायला हवेत का? तर सांगतात की, विषयांच्या ठिकाणी जो आनंद प्रतीत होतो तो ब्रह्मानंदाचा अंशमात्र असतो. ती त्याची एक झलकच असते. गूळ आणि साखर सर्वांगाने मधुर असते. साखरेचा एक कण जरी जिभेवर ठेवला तरी त्याचे माधुर्य आपल्या अनुभवाला येते. लाडवात जी गोडी असते ती गुळाची. लाडवातील इतर पदार्थ गोड नसतात, परंतु लाडू खाताना जरी गूळ दिसत नसला तरी त्याच्याच गोडीचा आस्वाद आपण घेत असतो. त्याप्रमाणे परमात्म्याच्या ठिकाणी असलेल्या आनंदसागराचा अंशमात्र विषयांच्या ठिकाणी असतो. म्हणूनच विषय आनंदरूप भासतात. विषयांतील आनंद परमानंद नाही, शाश्वत आनंद नाही आणि वास्तविक आनंद देखील नाही. काही काळापूर्वी सुखरूप वाटणारे विषयच कालांतराने दुःखरूप वाटू लागतात. विषय जेव्हा अनुकूल असतात तेव्हा ते सुखरूप भासतात आणि जेव्हा प्रतिकूल असतात तेव्हा ते दुःखरूप भासतात. हिवाळ्यात जे ऊन सुखदायक वाटते तेच उन्हाळ्यात दुःखदायक ठरते त्याप्रमाणे. म्हणून विषय सुखाचे साधन आहे तसेच दुःखाचेही साधन आहे. विषय अनुकूल असतील तर सुख आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रतिकूल असतील तर दुःख. परमानंदाची प्राप्ती कशी करून घ्यावी या विषयी येथे सांगत आहेत –

> अन्तर्बहिश्च सर्वत्र परिपूर्णं महेश्वरम् ।
> भावयेत् परमानंदलब्धये पण्डितोत्तमः ॥
>
> (श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-१८)

येथे 'पण्डितोत्तमः' असे पंडिताला विशेषण लावले आहे. एक असतो पंडा, दुसरा असतो पंडित आणि तिसरा असतो पंडितोत्तम. जो काशीयात्रेला येतो त्याला पंड्याचा परिचय होतो. 'पण्डा' या शब्दाचा अर्थ आज बदलला आहे. पंडा म्हणजे फसवणारा असे लोक समजतात. परंतु पंडा या शब्दाचा हा अर्थ नव्हे. ज्याच्या जवळ सारासारविवेकबुद्धी असते तो पंडा होय. पंडा ही बुद्धीची एक स्थिती आहे. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जो पंडा आढळतो तो मूलतः चांगलाच होता. प्राचीन काळी आजच्या सारख्या यात्रा कंपन्या नव्हत्या. त्यावेळी तीर्थयात्रेला जाणाऱ्या व्यक्तीला काय पाहावे, कोणता विधी करावा यांचे मार्गदर्शन करून तिची सेवा करून, ती व्यक्ती संतुष्ट होऊन जे देईल ते पंडा घेत असे. तो यात्रेकरूंचा मार्गदर्शक आणि सेवक होता. परंतु आधुनिक काळात पंडे बिघडले असून त्यांची व्याख्याही बदलली आहे.

पंडा म्हणजे ज्याच्या जवळ विवेकबुद्धी आहे असा मनुष्य. विवेकबुद्धी असलेला, दुसऱ्यांना साहाय्य करणारा, ज्ञान देणारा, क्षेत्रमाहात्म्य सांगणारा, यात्रापद्धती समजावून देणारा जो मनुष्य तो 'पंडा' होय. अनेक ग्रंथांचे अध्ययन करून जो शास्त्रव्रत सांगतो तो 'पंडित' होय. परंतु जो स्वतःला जाणतो तो 'पंडितोत्तम' होय. पंडितोत्तम म्हणजे आत्मज्ञानी व्यक्ती. केवळ आत्मज्ञानामुळे परमानंद प्राप्त होत नाही त्यासाठी काहीतरी करावे लागते. त्याविषयी येथे सांगतात – 'अन्तर्बहिश्च सर्वत्र परिपूर्णं महेश्वरम्'.

ईश्वर कोठे आहे? आपल्या आत की आपल्या बाहेर? शास्त्रे सांगतात की, ईश्वर आत आहे तसाच बाहेरही आहे. जी वस्तू व्यापक असते ती अंतर्बाह्य सर्वत्र असते. आकाश हे व्यापक तत्त्व आहे. ते येथे काशीत आहे तसेच रामेश्वरात देखील आहे. आपल्या देशात आहे तसेच परदेशात देखील आहे. किंबहुना सर्व विश्वात भरून राहिले आहे. ईश्वर हे आकाशापेक्षाही व्यापक तत्त्व आहे. ते अंतर्बाह्य सर्वत्र व्याप्त आहे. ईश्वराचे व्यापकत्व सांगताना आकाशाचेच उदाहरण दिले जाते. कारण आकाश ही आपल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नित्य अनुभवाला येणारी वस्तू आहे. आकाश हे अविकृत तत्त्व आहे. पृथ्वी, आप, तेज आणि वायू ही तत्त्वे प्रदूषित होऊ शकतात, आकाश नव्हे. कितीही पाऊस पडला तरी आकाश भिजत नाही. सूर्य कितीही तापला तरी आकाश तापत नाही. आत्म्याची स्थिती जशी आहे तशीच आकाशाची देखील आहे. आत्म्याप्रमाणेच आकाशाला अग्नी जाळू शकत नाही, पाऊस भिजवू शकत नाही, वायू शोषू शकत नाही आणि शस्त्र छेदू शकत नाहीत. आकाशाची स्थिती जवळ-जवळ आत्म्यासारखीच असते. कारण आत्म्यापासून प्रथम आकाशच निर्माण झाले. म्हणून जसा परमात्मा तसे आकाश आहे. परमात्मा निर्गुण आहे, परंतु आकाशात मात्र एक गुण आहे. शब्दगुण. पुढे महाभूते निर्माण होत गेली आणि गुण वाढत गेले. पृथ्वीत शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे पाच गुण आहेत. तर आकाशात एकच शब्दगुण आहे. त्यापलीकडे असलेल्या परमात्म्यात तर एकही गुण नाही. परमात्मा अशब्द आहे. आकाश जसे सर्वत्र व्याप्त आहे तसाच परमात्मादेखील सर्वव्यापक आहे.

आपण परमात्मरूपात पूर्ण एकरूप झालो आहोत, असे जीवात्म्याने ध्यान केले पाहिजे. आपल्या आतही परमात्मा आहे आणि आपल्या बाहेरदेखील परमात्मा आहे, अशी भावना दृढ केली पाहिजे. गंगेच्या प्रवाहात घडा टाकला तर तो गंगाजलाने पूर्ण भरतो आणि गंगेतच बुडतो. त्याच्या आतबाहेर सर्वत्र गंगाजलच असते. त्याप्रमाणे प्रपंचातील प्रत्येक जीवात्म्याच्या आत आणि बाहेर परमात्माच आहे. गंगेच्या गार पाण्यात डुंबणाऱ्या माणसाला प्रखर उन्हाळ्यात देखील शीतलतेचाच अनुभव येत असतो. जोपर्यंत तो पाण्यात असतो तोपर्यंत त्याच्या सर्वांगाला शीतलता वेढून राहिलेली असते. तो पाण्याबाहेर आला तर त्याला उन्हाचे चटके बसतात. त्याप्रमाणेच जीवात्मा जोपर्यंत आत्मस्वरूपाचे चिंतन करीत असतो तोपर्यंत त्याला परमानंदाची प्राप्ती होत असते, परंतु जेव्हा आत्मस्थिती सोडून तो बहिर्मुख होतो तेव्हा त्याला सांसारिक दुःखाचे चटके सोसावे लागतात. म्हणूनच येथे सांगितले आहे की आपल्या आत आणि बाहेर केवळ परमात्माच आहे अशी भावना दृढ करावी. असे केल्यावरच त्याला परमानंदाची प्राप्ती होईल. प्रत्येकाला परमानंद हवा असतो. परंतु जो भावना दृढ करतो त्यालाच आनंदाची प्राप्ती होते. जो भावना करीत नाही त्याला आनंद दुर्लभ असतो. म्हणून परमानंदप्राप्तीसाठी परमात्मा सर्वत्र आहे, अशी भावना दृढ करण्याचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अभ्यास केला पाहिजे. परमात्मा आनंदरूप असल्यामुळे त्याच्या भावनेमुळे जीवात्म्याला आनंद मिळतो, तर प्रपंच दु:खरूप असल्यामुळे त्याच्या चिंतनाद्वारे जीवात्म्याला दु:खच दु:ख मिळते. ज्याच्या ठिकाणी भावना नसते अशा व्यक्तीची स्थिती कशी असते या विषयी पुढे सांगतात -

अर्थहीना यथा वाणी पतिहीना यथा सती ।
श्रुतिहीना यथा बुद्धिर्भावहीना तथा क्रिया ॥ १६-१९ ॥

या ठिकाणी तीन उदाहरणे दिली आहेत. 'अर्थहीना यथा वाणी'. आपल्या वाणीतून प्रकट झालेले शब्द जर अर्थशून्य असतील तर त्याला काहीही महत्त्व नसते. शब्द अर्थपूर्ण असावेत. अर्थहीन, अन्यार्थ, अवाच्य आणि अश्लील शब्दांचा प्रयोग आपल्या वाणीने करू नये. सर्व प्राण्यांत केवळ मनुष्यालाच वाणीची देणगी मिळाली आहे. म्हणून मनुष्याने या देणगीचा सदैव सदुपयोगच केला पाहिजे. आपल्या वाणीमुळे आपल्याला आणि इतरांना आनंदच मिळावा अशा प्रकारे अर्थपूर्ण शब्दांचा प्रयोग करावा.

दुसरे उदाहरण आहे - 'पतिहीना यथा सती'. एखादी पत्नी जर पतीला सोडून राहात असेल तर तिचे जीवन अर्धभग्न असते. लौकिक जीवनात पतिपत्नीची समरसताच महत्त्वाची असते. एखाद्या वस्तूचे दोन तुकडे केले तर त्या वस्तूची जशी अवस्था होते तशीच गृहस्थजीवन स्वीकारलेल्या परंतु पतीपासून वेगळ्या राहणाऱ्या पत्नीची अवस्था असते. अध्यात्मसाधना करणारा साधक गृहस्थजीवन नाकारू शकतो, परंतु त्याच्या दृष्टीने परमेश्वर हाच त्याचा पती असतो. म्हणून लौकिक जीवनातील स्त्री असो अथवा आध्यात्मिक क्षेत्रातील साधक असो, कुणीही पतीवाचून राहू शकत नाही. अध्यात्मजीवन उच्चकोटीतले असते म्हणून त्याची गोष्ट वेगळी. परंतु लौकिक जीवनात पतियुक्त सतीला जेवढे महत्त्व असते तेवढे पतीपासून वियुक्त झालेल्या स्त्रीला नसते. तिचे जीवन अर्धवट मानले जाते.

तिसरे उदाहरण आहे - 'श्रुतिहीना यथा बुद्धि:. वेदाध्ययनाचा संस्कार न झालेली बुद्धी असंस्कृत आणि व्यर्थ असते त्याप्रमाणे भावनेशिवाय केलेली कृती व्यर्थ असते. तुम्ही कोणते कर्म करीत आहात हे फारसे महत्त्वाचे नसून तुम्ही ते कोणत्या भावनेने करीत आहात हे महत्त्वाचे असते. भावनाशून्य होऊन केलेले सत्कर्म देखील उत्तम फल प्रदान करीत नसते. म्हणून एका कन्नड संताने म्हटले आहे -

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'माडि माडि केट्टरु मनविल्लदे
नीडि नीडि केट्टरु निजविल्लदे.'

काही लोक कर्म करून देखील त्याचे फळ मिळवू शकत नाहीत. लोकांना उत्तम भोजन घालून देखील त्या कर्माचे फळ काही लोकांना मिळत नाही. याचे कारण तो लोकांना भावनेने, प्रेमभराने खाऊ घालत नसतो हे होय. तो कर्म करतो, परंतु त्याची भावना चांगली नसल्यामुळे त्या कर्माचे फळ त्याला मिळत नाही. आपण मंदिरात जातो आणि दर्शन घेऊन बाहेर येतो. त्यावेळी मंदिराबाहेर ओळीने भिकारी बसलेले असतात. बिचाऱ्यांना पोटासाठी भीक मागावीच लागते. ते मोठ्या अजिजीने देवाच्या आणि धर्माच्या नावाने भीक मागत असतात. एखाद्याची काहीच देण्याची इच्छा नसते तरीही एखादा भिकारी त्याच्या मागे चिवटपणाने लागतो. अशा वेळी भिकाऱ्यापासून सुटका व्हावी म्हणून त्या मनुष्याने खिशातून एक रूपयाचे नाणे काढले आणि भिकाऱ्याच्या थाळीत फेकले तर त्याला या कर्माचे कोणते फळ मिळेल? त्याने भिकाऱ्याला प्रेमाने दान दिले नाही तर ते रागाने दिले. त्याच्याजवळ नाण्याऐवजी जर दगड असता तर कदाचित् तोच त्याने भिकाऱ्याला फेकून मारला असता. त्याने दान केले, परंतु त्या मागची त्याची भावना शुद्ध नव्हती. म्हणून त्याला त्या दानामुळे पुण्य मिळणार नाही तर पापच मिळेल. रागाने दगड फेकून मारल्यामुळे जेवढे पाप होते तेवढेच पाप, त्याने अशुद्ध भावनेने भिकाऱ्याला दान दिल्याबद्दल त्याला मिळेल. दानामुळे पुण्य मिळते हे खरे असले तरी अशुद्ध भावनेने केलेले दान आपल्या पदरी पापच बांधते हेही तेवढेच खरे. क्रिया चांगली असली तरी ती जेव्हा भावशून्य असते अथवा अशुद्ध भावनायुक्त असते तेव्हा कर्त्याला तिचे चांगले फळ मिळत नाही. म्हणून आपण कोणती क्रिया करीत आहोत आणि ती कोणत्या भावनेने करीत आहोत याचे प्रत्येकाने भान ठेवले पाहिजे. हाच विषय पुढे अधिक सोपा केला आहे -

चक्षुर्हीनो यथा रूपं न किंचिद्वीक्षितुं क्षम: ।
भावहीनस्तथा योगी न शिवं द्रष्टुमीश्वर: ॥ १६-२० ॥

येथे काही चांगल्या उपमा देऊन आशय स्पष्ट केला आहे. बाह्य वस्तू पाहण्यासाठी डोळ्यांची आवश्यकता असते. डोळ्यांशिवाय आपण रूप

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाहू शकत नाही. ज्याप्रमाणे आंधळा मनुष्य रूप पाहण्यास असमर्थ असतो त्याप्रमाणे भावनाशून्य मनुष्य परमात्म्याला पाहू शकत नाही. म्हणून ज्ञानी होऊन देखील जर भावना नसेल तर त्याला परमानंदाची प्राप्ती होणार नाही. ज्ञानप्राप्तीनंतर जो सूक्ष्म अहंभाव ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी असतो तो नष्ट करण्यासाठी भावनेची आवश्यकता असते. तुलसीदासाने 'रामचरितमानसा'त या विषयी सुंदर विवेचन केले आहे.

प्रसंग आहे सीतास्वयंवराचा. शिवधनुष्य उचलून त्याला प्रत्यंचा लावण्यास मोठमोठे वीर असमर्थ ठरले. त्यावेळी श्रीरामाने ते शिवधनुष्य सहज उचलले आणि प्रत्यंचा लावण्यासाठी ते वाकवताच ते मोडले. श्रीरामाने पण जिंकला म्हणून त्यांना वरमाला घालण्यासाठी आपल्या दोन सख्यांसह सीता त्यांच्यासमोर गेली. श्रीराम उंच होते तर सीता त्यांच्यापेक्षा ठेंगणी. तिने वरमाला घालावी म्हणून श्रीरामांनी आपली मान खाली झुकवली. सीता लवकर माळ घालीचना. म्हणून श्रीराम म्हणाले, 'वरमाला घालायला इतका उशीर कशाला लावतेस?'

'आपण शिवधनुष्य तोडताना किती उशीर लावला? सारे लोक उत्सुकतेने पाहात होते. केंव्हा तोडतात! केंव्हा तोडतात! म्हणून मी देखील वरमाला घालायला उशीर लावत आहे.'

'सीते', हसून श्रीराम म्हणाले, 'शिवधनुष्य मोडणे हे फार कठीण काम होते. वरमाला घालणे हे अत्यंत सोपे काम आहे. त्यासाठी इतका उशीर कशाला?'

'मोडणे फार सोपे असते, परंतु जोडणे मात्र कठीण असते. आपल्याला फक्त शिवधनुष्य मोडायचे होते. परंतु मला मात्र दोन घराण्यांचे चिरंतन नाते जोडायचे आहे. म्हणून उशीर होत आहे.' सीता उत्तरली.

या दोघांच्या संभाषणात तुलसीदासांनी आपले मनोगत प्रकट केले आहे. सीता लवकर वरमाला घालत नाही. त्यामुळे श्रीरामाला बराच वेळ मान खाली झुकवून उभे राहावे लागते. याप्रसंगी तुलसीदासांनी सीतेच्या मुखात पुढील वाक्य घातले आहे -

'आपण ज्ञान आहात, मी भक्ती आहे. भक्तीसमोर ज्ञानाला नम्र झालेच पाहिजे. म्हणून तर मी येथे वरमाला घालायला उशीर लावत आहे'.

जे नम्र होत नाही ते ज्ञानच नव्हे, हेच तुलसीदासांनी या प्रसंगी समजावून सांगितले आहे. ज्यांना शिवधनुष्य पेलता आले नाही असे अनेक राजे सभामंडपात मान ताठ करून बसलेले होते आणि ज्याने शिवधनुष्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पेलून पण जिंकला तो श्रीराम मात्र मान खाली झुकवून उभा होता.

अज्ञानी माणसे अहंकारानी फुगलेली असतात तर ज्ञानी मात्र न असतात हेच तुलसीदासांना सूचित करायचे आहे. जो वृक्ष फळांनी लहडलेल असतो तो खाली झुकलेला असतो आणि ज्याला एकही फळ धरले नसते तो वृक्ष मात्र ताठ उभा असतो. ज्ञानी पुरुष फळांनी लहडलेल वृक्षासारखा नम्र असतो तर अज्ञानी माणूस निष्फल वृक्षासारखा अहंका असतो. जो नम्र आहे तोच जगात सुखासमाधानाने जीवन व्यतीत क शकतो. जो अहंकारी असतो तो फार काळ सुखी राहू शकत नाहि आपल्या मुखात जीभ आणि दात असतात. जीभ जन्मापासून असते त दात नंतर येतात. म्हातारपणी जीभ जशीच्या तशीच असते, परंतु दा मात्र पडून जातात. उशिरा आलेले दात लवकरच पडतात, परंतु जी मात्र तशीच असते. याचे कारण काय? दातांच्या ठिकाणी मृदुता नाही विनम्रता नाही. जिभेच्या ठिकाणी ती आहे. दात कठोर असतात. काही समोर येईल त्याच्याशी ते झगडतात, युद्ध करतात. म्हणून ते लवक पडतात. जो जिभेसारखा नम्र असतो तो फार काळ जिवंत राहतो आणि जो दातांसारखा कठोर असतो तो फार काळ जगत नाही.

'महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती' असे एका संताने म्हट आहे. महापुरात आणि वादळात मोठमोठे वृक्ष उन्मळून पडतात. कार ते झुकत नाहीत, ताठ असतात. परंतु त्यावेळी नम्र होणारे लव्हाळे मा टिकून राहतात. आपल्या भावनेत जर परिवर्तन केले नाही तर आपल अवस्थाही अशा वृक्षासारखी होईल. म्हणून येथे भावनेला खूप महत्त्व दिले आहे. शिवयोग्याजवळ जर भावना नसेल तर त्याला भगवद्दर्शन होणा नाही. भावनाबळानेच भगवंताला वश करता येते. म्हणून म्हटले आहे -

'भावनाविहितं कर्म पावनादपि पावनम्'

अर्थात् भावनायुक्त होऊन केलेले कर्म सर्व पवित्र कर्मांत पवित्र होय ज्याची भावना शिवमय असते त्यालाच शिवाचा सर्वत्र साक्षात्कार होतो यासाठी पुढे सांगतात -

'भावशुद्धेन मनसा पूजयेत् परमेष्ठिनम् ।
भावहीनां न गृह्णाति पूजां सुमहतीमपि ॥ १६-२१ ॥

भावशुद्धीने भगवंताची पूजा केली जाते. पूजा करण्याआधी सामान्यत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्वांना शुद्ध व्हावे लागते. स्नान करून, स्वच्छ धुतलेली वस्त्रे परिधान करून आपण पूजेला बसतो. शुद्धी दोन प्रकारची आहे. बाह्यशुद्धी आणि अंतरंगशुद्धी. बाह्यशुद्धी सोपी आहे. गंगास्नान करून तुम्ही शुद्ध होऊ शकता किंवा घरी न्हाणीघरात बसून 'गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वती' असे म्हणत स्नान करून शुद्ध होऊ शकता. स्नान करून बहिरंगशुद्धी होऊ शकते, परंतु अंतरंगशुद्धी झाल्याशिवाय पूजा सफळ होत नाही. तुम्ही फार मोठी पूजा करीत आहात. चार तास, सहा तास, बारा तास पूजेत घालवता, परंतु जर तुमचे अंतरंग शुद्ध नसेल तर तुमची पूजा भगवंताला प्रिय होणार नाही. तुमची पूजा मोठी असेल, परंतु भगवंताला प्रिय होणार नाही. तुमची पूजा मोठी असेल परंतु भावना मात्र छोटी आहे. आपण भगवंताला जे अर्पण करतो, हजार बिल्वपत्रे असो की हजार कमळफुले, ते भगवंताचेच असते. पाणी त्याचेच आहे, बेल त्याचाच आहे, फुले त्याचीच आहेत. आपण जे काही त्याला अर्पण करीत असतो ते सारे त्याचेच असते. त्याचे त्यालाच द्यायचे असते, परंतु ते देताना त्याच्यासोबत आपली भावना जोडून द्यायची असते. तरच त्या पूजेचे फळ आपल्याला मिळते. भगवंताला आपल्या उपचारांपेक्षा आपली भावना हवी असते. म्हणून भावना अत्यंत श्रेष्ठ आहे असे शास्त्रांत म्हटले आहे. पूजेचे विधिविधान लहान असेल पण आपली भावना मोठी, उत्कट असेल तर पूजेचे अधिकाधिक फळ आपल्याला प्राप्त होईल.

> नैरन्तर्येण संपन्ने भावे ध्यातुं शिवं प्रति ।
> तद्भवो जायते यद्वत् क्रिमे: कीटस्य चिंतनात् ॥ १६-२२ ॥

भावनेमुळे काय घडू शकते याचे एक सुंदर उदाहरण येथे दिले आहे. एक सामान्य कीटक भ्रमराचे चिंतन करता करता शेवटी भ्रमरच होतो. मग जो जीवात्मा परमात्म्याचे निरंतर चिंतन करतो तो जीवात्मा परमात्मा का बरे होणार नाही? आपले संपूर्ण व्यक्तित्व बदलण्याचे सामर्थ्य ध्यानामध्ये असते. प्रत्येकाला महान व्हायचे असते, आपले व्यक्तित्व विशाल करून घ्यायचे असते. मोठ्याचे चिंतन कराल तरच मोठे व्हाल. लहानाचे चिंतन कराल तर लहानच व्हाल. जगात सर्वांत मोठे काय आहे? उपनिषदांत म्हटले आहे की, जो सर्वात मोठा आहे तोच परमात्मा होय, तोच आनंदरूप आहे. प्रपंच लहान आहे. जे लहान आहे ते दुःखरूप आहे. जे सर्वांत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मोठे असते त्यालाच 'ब्रह्म' म्हटले जाते. म्हणून सर्वांनी परब्रह्माचे चिंतन केले पाहिजे. भावागमस्थलाचा समारोप करताना शेवटी सांगतात –

'निष्कलंकं निराकारं परब्रह्म शिवाभिधम् ।
निर्ध्यातुमसमर्थोऽपि तद्विभूतिं विभावयेत् ॥ १६-२३ ॥

भगवंताचे चिंतन करणे योग्य आहे. परंतु जो निष्कलंक आणि निराकार आहे त्याचे ध्यान कसे करावे? आपल्या मनाला निराकाराचे ध्यान करण्याचा अभ्यास नसतो. ते सदोदित आकाराचे चिंतन करीत असते. मग निराकाराचे ध्यान कसे करावे? त्याविषयी येथे सांगितले आहे. जर निराकाराचे ध्यान करण्याइतके सामर्थ्य आपल्यामध्ये नसेल तर भगवंताच्या ऐश्वर्ययुक्त सगुण रूपाचे ध्यान करावे. ज्याच्यापासून सृष्टी उत्पन्न झाली, ती ज्याच्यात स्थिर आहे आणि शेवटी ती ज्याच्यात विलीन होणार आहे असा तो परमात्मा कसा असेल? असे ध्यान केले तरी ते फलप्रद होऊ शकते. हा सर्व प्रपंच म्हणजे परमात्म्याचे ऐश्वर्य होय, विभूती होय. म्हणून प्रपंचाकडे परमात्मभावनेने पाहण्याचा अभ्यास केला तर साकारातून निराकाराकडे जाण्याचा मार्ग दिसू लागेल, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांति: शांति: शांति: ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
३१ जुलै १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञानागमस्थल..१

जिज्ञासू सद्भक्तांनो,

कर्म, भाव आणि ज्ञान ही भगवत्प्राप्तीची तीन साधने होत. ज्ञान आणि कर्म यांच्याविषयी बऱ्याच ग्रंथांत चर्चा केलेली आढळते. परंतु भावाविषयी मात्र ते ग्रंथ मौन राहिले आहेत. गेले दोन दिवस भावाचे महत्त्व आपण ऐकले आहे. आजपासून ज्ञानागमस्थलाचा आरंभ होत आहे. या स्थलात ज्ञानाचे माहात्म्य वर्णिले आहे. शास्त्रांत म्हटले आहे -

'यथेह कर्मचितो लोक: क्षीयते ।
एवमेवामुत्र पुण्यचितो लोक: क्षीयते ॥'

कर्म करून जे काही संपादन केले जाते त्याचा कालांतराने क्षय होतो. कर्मे करून जीवात्मा पारलौकिक भोगांच्या इच्छेने पुण्यसंचय करतो, स्वर्गादी लोकांत जाऊन त्यांचा भोग घेतो आणि पुण्यक्षय होताच पुन्हा भूतलावर येतो. इहलोक ही कर्मभूमी होय. येथेच कर्म करून सारे काही मिळवायचे असते. पाप असो, पुण्य असो की ज्ञान असो, तुमच्याकडून घडलेल्या पापांचा दुःख भोगूनच क्षय होतो आणि तुमच्याकडून घडलेल्या पुण्याचा सुख भोगूनच क्षय होतो. सुख-दुःख देऊन पुण्य-पाप दोन्ही नष्ट होतात. त्यानंतर पुन्हा मनुष्यजन्म घ्यावा लागतो. शास्त्रकार विचारतात की तुम्ही किती वेळा जन्म घेणार? माणूस किती जन्म घेतो याची गणना करणे अत्यंत कठीण आहे. माणसाची जन्मजन्मांतरे मोजताना शास्त्रकार देखील थकून गेले आहेत. अंत्यक्रिया करण्यासाठी पृथ्वीदेखील अपुरी पडावी इतक्या वेळा एक जीवात्मा देह धारण करतो, असे म्हटले जाते.

महाभारतात एक कथा आहे. कर्ण जेव्हा अंतिम श्वास सोडत होता त्यावेळी भगवान श्रीकृष्ण त्याच्याजवळ दान मागण्यासाठी गेले. कारण कर्ण दानशूर होता अशी त्याची ख्याती होती. एखाद्या तत्त्वाचे निष्ठेने पालन करून काही लोकांनी त्या तत्त्वाशी आपले नाव कायम जोडून घेतले. सत्यवादी हरिश्चंद्र, धर्मराज युधिष्ठिर, दानशूर कर्ण इत्यादी. कर्णाने आजवर अनेकांना अनेक प्रकारची दाने केली, परंतु हे दान अंतिम होते. अंतिम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काळी केले जाणारे दान सर्वश्रेष्ठ असते. म्हणून एखादा मनुष्य अस्वस्थ होऊन त्याचे जगण्याचे चिन्ह दिसत नसेल तर घरातील इतर माणसे त्याच्या नावाने दानधर्म करतात. युद्धभूमीवर त्यावेळी श्रीकृष्णांनी कर्णाला दान मागितले, 'मला काही तरी दान दे.'

'मी आपल्याला काय दान देऊ?' कर्ण म्हणाला, 'माझ्याजवळ आता काय आहे?'

कृष्णाने त्याला आठवण दिली. ते म्हणाले,

'तुझे दोन दात सोन्याचे आहेत. तू जवळ काही नाही म्हणतोस. तुझ्या दातात सोने आहे. हेच मला दे.'

त्यावेळी कर्णाने एक दगड घेऊन आपले दोन्ही दात पाडले आणि श्रीकृष्णाला देऊन टाकले. त्यावेळी भगवान श्रीकृष्ण प्रसन्न होऊन त्याला म्हणाले, 'तुझी दानशूरता पाहून मी प्रसन्न झालो आहे. तुला काही वर मागायचा असेल तर माग.'

'मी आयुष्यभर दान देत आलो, कुणाकडे कधी याचना केली नाही. मी दाता आहे. याचक नाही.' कर्णाने उत्तर दिले.

'देवांचा एक स्वभाव आहे. न देता जो जातो तो देव नव्हे, जो केवळ घेऊन जातो तो जीव आहे आणि जो देऊन जातो तो देव आहे. मी देव असल्यामुळे तुला काही दिल्याशिवाय जाऊ शकत नाही. म्हणून तुला काय हवे ते सांग.' श्रीकृष्ण म्हणाले.

'मला काही मागायची इच्छा उरलेली नाही.' कर्ण म्हणाला, 'परंतु भगवान होऊन तुम्ही हट्ट धरून बसलात म्हणून मी असे मागतो की, पूर्वी जिथे कधीच कुणावर अंत्यसंस्कार केले नसतील त्याच ठिकाणी माझ्या देहावर अंत्यसंस्कार करावे.'

असे म्हणून कर्णाने आपला प्राण सोडला आणि भगवान कृष्ण चिंतेत पडले. त्याचा देह घेऊन ते अंत्यक्रियेसाठी जागा शोधू लागले. ज्या ज्या ठिकाणी ते देह खाली ठेवत त्या त्या ठिकाणी भूमीतून आवाज येई – 'इथे अशा हजारो कर्णांवर अंत्यसंस्कार केले आहेत.' साऱ्या पृथ्वीवर ते फिरले, पण त्यांना योग्य अशी जागा मिळाली नाही.

सांगण्याचे तात्पर्य असे की, आपण असंख्य वेळा जन्म घेतो आणि असंख्य मरणे भोगतो. आपल्यावर इतके वेळा अंत्यसंस्कार केले गेले की सारी पृथ्वीच आपल्यासाठी स्मशानभूमी बनली आहे. आपल्या अगणित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जन्मांची आपल्याला आठवण नसली तरी जे ज्ञानी आहेत, ज्यांनी योगसाधना केली आहे, ज्यांना जन्मजन्मांतराचे स्मरण आहे अशा लोकांना मात्र त्यांची जाणीव असते. जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटण्यासाठीच तर ज्ञानमार्गाचा अवलंब केला जातो. आतापर्यंत कर्म आणि भाव यांच्याविषयी आपण ऐकले. आहे आता येथून पुढे ज्ञानाचा विचार करायचा आहे.

भावेन किं फलं पुंसां कर्मणा वा किमिष्यते ।
भावकर्मसमायुक्तं ज्ञानमेव विमुक्तिदम् ॥
(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-२५)

केवळ भावनेने आणि केवळ कर्माने भगवत्प्राप्ती होणार नाही. भावना आणि कर्म यांनी युक्त जे ज्ञान तेच मुक्तीचे साधन ठरते. या ठिकाणी अतिशय सुरेख रीतीने त्रिपुटी वर्णिली आहे. प्रथम कर्म, मध्ये भाव आणि शेवटी ज्ञान. भाव मध्यभागी ठेवलेला आहे. तो उभयान्वयी आहे. ज्याची कर्मालाही आवश्यकता आहे आणि ज्ञानालादेखील. भावयुक्त कर्म फलप्रद असते आणि भावयुक्त ज्ञान मुक्तिप्रद असते. भावरहित कर्म आणि भावरहित ज्ञान काही उपयोगाचे नाही. म्हणूनच कर्म आणि ज्ञान या दोहींना सांभाळणारा भाव मध्यभागी ठेवलेला आहे. ज्ञानाविषयी येथे सांगितले आहे-

केवलं कर्ममात्रेण जन्मकोटिशतैरपि ।
नात्मनां जायते मुक्तिर्ज्ञानं मुक्तेर्हि कारणम् ॥ १६-२६ ॥

कुणी म्हणेल की कर्म करून आम्ही मुक्ती प्राप्त करून घेऊ. तर त्यांनी विचार करावा की शेकडो कल्प लोटले तरी मुक्ती मिळणे असंभव होय. कर्मचक्र मोठे विलक्षण आहे. संचित, प्रारब्ध आणि आगामी अशी तीन प्रकारची कर्मे आहेत. ती परस्परांशी संबंधित आहेत. प्रत्येकजण या जन्मात जे आयुष्य भोगत असतो ते प्रारब्धकर्माच्या बळावर. मनुष्य या जन्मात जे सुखदुःख भोगतो ते या जन्मातल्या कर्माचे फळ नसते. तो गतजन्मातल्या कर्माचे फळ भोगत असतो. यालाच 'प्रारब्ध' असे म्हणतात. फल देण्यासाठी जे सिद्ध झाले ते कर्म प्रारब्ध होय. गतजन्माची कर्मफळे भोगता भोगता मनुष्य नवीन कर्मे करीत असतो. कर्मापासून कोणाचीही सुटका नाही. शुभाशुभ कर्मे प्रत्येकाकडून घडतातच. प्रारब्धकर्माचा भोग घेताना मनुष्याकडून जी नवी कर्मे घडतात त्या कर्मफळांचा संचय होत जातो. तेच संचित कर्म होय. संचित कर्मातलेच थोडे कर्म प्रारब्धकर्म

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होते. कर्मचक्रात फसलेला मनुष्य त्यापासून लवकर मुक्त होत नाही. संचित कर्म नष्ट करून, नव्या कर्माची फळे मिळू नयेत अशी खबरदारी घेऊन आणि प्रारब्धकर्म भोगून जो संपवतो त्यालाच मुक्ती मिळते. अशाच मनुष्याची कर्मजालातून सुटका होते. केवळ ज्ञानानेच कर्मजालातून जीवात्मा मुक्त होऊ शकतो.

ज्ञानाला शास्त्रांमध्ये 'अग्नी' असे म्हटले आहे. जेव्हा ज्ञानाग्नी प्रकट होतो तेव्हा तो सर्व कर्मांना भस्म करतो. सर्व कर्म म्हणजे संचित कर्म, प्रारब्ध कर्म नव्हे. जर ज्ञानाग्नीने प्रारब्धकर्म नष्ट झाले तर मनुष्याला ऐहिक जीवन जगताच येणार नाही, त्याला मरावेच लागेल. ज्ञानामुळे जर ज्ञानी पुरुषांचा मृत्यू झाला तर ज्ञानपरंपरा कशी चालत राहील? प्रारब्धकर्म ज्ञानी आणि अज्ञानी दोघांत भेद करत नाही. म्हणून आपण जगात पाहतो की भल्या भल्या ज्ञानी पुरुषांना देखील मोठे कष्ट सहन करावे लागतात, दुःख भोगावे लागते. एवढ्या मोठ्या ज्ञानी पुरुषांना देखील इतके दुःख का भोगावे लागते? असा प्रश्न सामान्य माणसाला पडतो. परंतु प्रारब्धकर्म भोगूनच संपवावे लागते. त्याशिवाय ते संपत नाही. प्रारब्धकर्माला थोडेफार बदलण्याचे सामर्थ्य योगी पुरुषांकडे असते. काल, कर्म आणि माया या तिन्हींना शिवभक्त पार करू शकतो, असे निजगुण शिवयोगींनी म्हटले आहे. ईश्वराबद्दल जर अनन्य भक्ती असेल तर प्रारब्धकर्माला थोडीशी मुरड घालता येते. सामान्य व्यवहारात आपण पाहतो की एखाद्या आजारी मनुष्याला औषधोपचार करून देखील उतार पडत नाही. एखादे अनुष्ठान केल्यावर मात्र त्याला बरे वाटू लागते. उत्कट भक्तीमुळे एखाद्या वेळी प्रारब्धकर्मात किंचित बदल होऊ शकतो इतकेच.

ज्ञानहीनं सदा कर्म पुंसां संसारकारणम् ।
तदेव ज्ञानयोगेन संसारविनिवर्तकम् ॥ १६-२७ ॥

ज्ञानशून्य कर्म हे संसाराचे कारण ठरते. तेच कर्म ज्ञानयुक्त झाले तर संसारसागर तरून जाण्याचे एक साधन ठरते. एखादा लोखंडाचा गोळा खांद्यावर घेऊन जर आपण नदीत उतरलो तर तो आपल्याला बुडवतो, परंतु त्याच लोखंडाचा पत्रा करून जर नाव बनवली तर ती आपल्याला नदीच्या पैलतीरी नेते. त्याप्रमाणे कर्मासोबत ज्ञान असेल तर ते आपल्याला संसारातून तारून नेते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अज्ञानी मनुष्यांची कर्मे बंधनकारक आहेत आणि ज्ञानी पुरुषांची कर्मे बंधनकारक का नाहीत? कर्तृत्वभावना बंधनाचे कारण असते. हे कर्म मी करीत आहे अशा अहंकारी भावनेने अज्ञानी मनुष्य कर्म करीत असतो. हीच कर्तृत्वभावना होय. परंतु ज्ञानी पुरुष मात्र कर्तव्य भावनेने कर्म करत असतो. कर्तृत्वभावना आणि कर्तव्यभावना यांच्यामध्ये महदंतर आहे. भगवान श्रीकृष्णाने युद्धभूमीवर अर्जुनाला 'कर्तव्यभावनेने युद्ध कर' असे सांगितले. कारण युद्ध करून दुष्टांचा नाश करणे आणि सुष्टांचे पालन करणे हे क्षत्रियांचे कर्तव्य होय. मी माणसांचा संहार करतो अशी भावना मनात न आणता मी माझे नियत कर्तव्य करतो अशा भावनेने जर तू युद्ध केलेस तर तुला पाप लागणार नाही, असे श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले म्हणून ज्ञानी मनुष्य कर्तृत्व भावनेने कर्म करीत नसतो तर कर्तव्य भावनेने करत असतो. त्यामुळे त्यांना कर्मफलांचा उपभोग घ्यावा लागत नाही.

फलं क्रियावतां पुंसां स्वर्गाद्यं नश्वरं यतः ।
तस्मात् स्थायिफलप्राप्त्यै ज्ञानमेव समभ्यसेत् ॥ १६-२८ ॥

आगमांमध्ये पशुकर्म आणि पतिकर्म असे कर्मांचे दोन भाग केले आहेत. एखाद्या वस्तूच्या अभिलाषेने अथवा स्वर्गादी भोगाच्या इच्छेने जे यज्ञयागादी कर्म केले जाते ते पशुकर्म होय. पशूमध्ये भोगलालसा अधिक असते. भाजी मंडईत एखादा पशू भाजीत तोंड घालतो, त्यासाठी मार खातो तरी, पुन्हा पुन्हा तेच ते कर्म करत राहतो. मनुष्य हा देखील दोन पायांचा पशू आहे. एखादे अनुचित कर्म केल्याबद्दल शिक्षा भोगून देखील तो पुन्हा पुन्हा तेच कर्म करतो. त्याच्या कडून घडणारे कर्म पशुकर्म होय. पतीच्या प्राप्तीसाठी केले जाणारे कर्म हे पतिकर्म. भगवान शिव हे पशुपती आहेत. सर्व जीव पशू असून भगवान शिव त्यांचे पती आहेत. जीवाला प्रिय असणारे कर्म पशुकर्म आहे तर शिवाला प्रिय असणारे कर्म पतिकर्म आहे. पशुकर्म म्हणजे सामान्य सांसारिक वस्तूंच्या प्राप्तीसाठी केले जाणारे स्वार्थप्रेरित कर्म होय, तर पतिकर्म म्हणजे भगवान शिवाला प्रसन्न करण्यासाठी, त्यांच्याशी समरस होण्यासाठी केले जाणारे परमार्थप्रेरित कर्म होय. भगवान शिव प्रसन्न झाले की अवघे विश्व आपल्याला मिळाले, असे होते. परंतु माणसांना एवढे ज्ञान नसते. ते ईश्वराजवळ जाऊन देखील त्याच्या कृपेची याचना करीत नाहीत. त्याला मागतात पुन्हा सांसारिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वस्तू आणि सांसारिक सुखच. पतीजवळ जाऊन देखील त्यांची पशुभावना सुटलेली नसते. सत्त्वगुणी झाल्याशिवाय मनुष्याची पशुभावना सुटणार नाही. बऱ्याच माणसांचे शरीर मनुष्याचे असते, परंतु विचार आणि भावना मात्र पशूच्या असतात. शास्त्रे सत्य सांगतात. सत्य कटू असते म्हणून माणसांना ते अप्रिय वाटते. परंतु शास्त्राने जीवात्म्यांना त्यांच्या उद्धाराचा मार्ग नेहमीच दाखवून दिला आहे.

पशुकर्म जीवात्म्याला जन्ममरणाच्या चक्रात भरडत असते. पतिकर्म मात्र त्याची संसारचक्रातून सुटका करते. वीरशैवांच्या इष्टलिंग पूजेला 'पतिकर्म' म्हणतात. कारण लिंगस्वरूप होणे हेच लिंगपूजेचे अंतिम फळ होय. 'अंगा'चे (जीवाचे) 'लिंगा'शी (शिवाशी) सामरस्य साधण्यासाठीच इष्टलिंगपूजा, प्राणलिंगपूजा आणि भावलिंगपूजा केली जाते. याशिवाय जी अन्य कर्मे आहेत ती पशुकर्मे होत. माणसाला संपत्तीचा अनिवार लोभ असतो. त्याला लोभ सोडता सोडवत नाही. या विषयी एक कथा सांगण्यात येते.

एका राजाच्या दरबारात एक बालकवी गेला आणि एक स्वरचित कविता गाऊन त्याने वाहवा मिळवली. राजा खूष झाला. त्याने प्रधानाला जवळ बोलावून सांगितले की 'या बालकवीला घेऊन खजिन्यात जा आणि एक घटकेपर्यंत त्याला जे हवे असेल ते नेऊ दे. मात्र घटका संपताच खजिना बंद झाला पाहिजे.'

प्रधान त्या बालकवीला घेऊन खजिन्याकडे निघाला. जड जवाहीर नेण्यासाठी बालकवीने प्रधानाकडून प्रचंड मोठे पात्र मागून घेतले. ते त्याला नीट उचलता येईना. प्रधानाने खजिन्याचे दार उघडले आणि दारात बसून तो बालकवीला म्हणाला,

'तुला या खजिन्यातले जे काही हवे असेल ते तू नेऊ शकतोस. परंतु फक्त एक घटके पर्यंतच. त्याच्या आत तुला जे घ्यायचे ते घेऊन तू बाहेर आला पाहिजेस. घटका संपताच मी दार बंद करून घेणार.'

संपत्ती पाहून बालकवीला मोह आवरेना. आधी त्याने भांड्यात मोती भरून घेतले. त्याला वाटले सोने यापेक्षा मौल्यवान आहे. मग त्याने भांड्यात सोने भरून घेतले. मग त्याला वाटले हिरे सोन्यापेक्षा मौल्यवान आहेत. त्याने भांड्यातले सोने काढून त्यात हिरे भरले, परंतु ते भांडे याला उचलता येईना. त्यानंतर हे काढ, ते ठेव असे करता करता एक घटका सरली. प्रधान दारातून म्हणाला,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'ए बाळा; तुझ्या एवढ्याशा देहात किती प्रचंड लोभ भरलेला आहे. रिकामे असून देखील उचलता येणार नाही असे मोठे भांडे तू आणलेस आणि ते गच्च भरून घेतलेस. तुझा लोभ किंचित जरी कमी असता तर तू गळ्यात, हातात दागिने घालून, गाठोड्यात हिरे, जडजवाहीर बांधून तू सहज नेऊ शकला असतास आणि तेवढे तुला मौजमजा करण्यासाठी आयुष्यभर पुरले असते. पण तुझा प्रचंड लोभ नडला. आता ठेव ते भांडे तिथेच आणि निघ बाहेर'.

असे म्हणून प्रधानाने त्याला बाहेर काढले आणि खजिन्याचे दार बंद करून घेतले.

ऐकायला ही एक कथा आहे, परंतु तिच्यात आशय देखील भरला आहे. आपल्याला मनुष्यजन्म मिळाला आहे, तो रत्नांचे खडे वेचण्यासाठी नव्हे तर ज्ञानरत्नांचा संग्रह करण्यासाठी. ज्ञान संपादन करून नंतर तुम्ही काहीही केले तरी ते हानिकारक ठरत नाही. पण आपण म्हणतो की एवढ्या लवकर ज्ञान कशाला मिळवायचे? रिटायर्ड झाल्यानंतर करू त्याचा विचार. परंतु तोपर्यंत आपल्या जगण्याचा भरवसा नाही हे आपण ध्यानात घेत नाही. सर्व माणसे त्या बालकासारखी लोभी असतात आणि मिळवता येईल तेवढी संपत्ती, कुणाला लुबाडून, फसवून, खोटे बोलून कमावतात. भरलेले पात्र येथेच ठेवून जीवात्म्याला निमूटपणे रिकाम्या हाताने इहलोक सोडावा लागतो.

'मुट्ठी बांध के आया था। हाथ पसार के जायेगा ॥'

कबीर म्हणतात की, जेव्हा बाळाचा जन्म होतो तेव्हा तो मूठ बांधून येतो. काही ना काही सोबत घेऊन येतो, परंतु जाताना मात्र हात पसरून जातो. मेलेल्या माणसाची मूठ बांधण्याचा कितीही प्रयत्न केला तरी ती बांधली जात नाही. प्रकृती माणसाला सतत ज्ञान देत असते ते समजून घेण्याची क्षमता मात्र माणसाजवळ नसते. राजा असो की रंक, तो जिवंत असेपर्यंत सांसारिक वस्तूंचा उपभोग घेत असतो. परंतु त्या सोबत मात्र नेऊ शकत नाही. तुम्ही हॉटेलमध्ये जाऊन खाद्यपदार्थ खाऊ शकता चहा पिऊ शकता. परंतु ज्यात खाद्यपदार्थ खाता ती प्लेट, चमचे आणि कपबशी घरी नेऊ शकत नाही तुम्ही एक प्लेट मागवलेली असते आणि त्याचे पाच रुपये मोजलेले असतांत. ते पाच रुपये खाद्य पदार्थांचे असतात, प्लेटचे नसतात. हॉटेलमध्ये खाण्याचा, पिण्याचा अधिकार तुम्हाला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्लेट, कपबशी घरी नेण्याचा अधिकार मात्र नाही. त्याप्रमाणे संसारात आल्यावर जीवात्म्याला सांसारिक पदार्थांचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे. परंतु मृत्युसमयी ते सोबत घेऊन जाण्याचा अधिकार नाही.

म्हणून सर्वांनी प्रामाणिकपणे विचार करावा. आपल्याला सर्वश्रेष्ठ असा मनुष्यजन्म मिळाला म्हणून त्याचा सदुपयोग करून घ्यावा. ज्ञान संपादन करावे, ज्ञानयुक्त कर्मच आपल्याला तारणारे आहे हे समजून घ्यावे. पशुकर्म न करता पतिकर्म करण्यातच आपले कल्याण आहे याची जाणीव ठेवावी. ज्ञानाइतकी पवित्र वस्तू जगात दुसरी कुठलीही नाही. ज्ञानच आपल्या अभ्युदयाचा मार्ग आहे हे ओळखून ज्ञानसाधना करावी, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर जंगमवाडी मठ, वाराणसी
१ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

६

ज्ञानागमस्थल..२

जिज्ञासू सद्भक्तांनो,

ज्ञान हे सर्वश्रेष्ठ आहे असे कालच्या आशीर्वचनात आपण ऐकले आहे. लौकिक ज्ञानाशिवाय मनुष्य जगात सुखी होऊ शकत नाही आणि आध्यात्मिक ज्ञानाशिवाय त्याला मुक्ती मिळत नाही. सुखी होण्यासाठी आणि मुक्त होण्यासाठी ज्ञानाची आवश्यकता असते. म्हणून सुभाषितकाराने म्हटले आहे – 'ज्ञानेन हीना: पशुभि: समान:' ज्याच्याजवळ ज्ञान नाही त्याचे शरीर मनुष्यासारखे असले तरी त्याची गणना पशूतच केली जाते. ज्ञानामुळेच मनुष्याला फार मोठा लाभ होतो. ज्ञानाची प्राप्ती कशी होते या विषयी 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त म्हटले आहे –

शास्त्राभ्यासादियत्नेन सद्गुरोरुपदेशत: ॥
ज्ञानमेव समभ्यस्येत् किमन्येन प्रयोजनम् ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-२९)

'मला ज्ञान हवे, मला ज्ञान हवे' असा केवळ घोष केल्याने ज्ञान प्राप्त होत नाही. शास्त्राभ्यास आणि सद्गुरूची कृपा यांमुळेच ते प्राप्त होऊ शकते. त्यासाठी प्रथम शास्त्राध्ययन करायला हवे. शास्त्रे अनेक आहेत. त्याविषयी म्हटले आहे –

'शब्दजालं महारण्यं चित्तभ्रमणकारणम्'

शास्त्रांना 'शब्दजाल' अशी संज्ञा दिली आहे. एखाद्या घोर अरण्यात नवखा मनुष्य चुकून शिरला तर त्या अरण्याच्या बाहेर येण्याचा मार्ग त्याला सापडत नाही, तो पुरता भांबावून जातो. तशीच अवस्था शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्या नवख्या अभ्यासकाची होते. एका शास्त्राच्या परिपूर्ण अभ्यासासाठी एक आयुष्य देखील पुरत नाही. व्याकरण, ज्योतिष, आयुर्वेद, न्याय, सांख्य, वैशेषिक, वेदान्त, जैन, बौद्ध, चार्वाक अशी कितीतरी शास्त्रे आहेत. आयुष्यभर अनेक शास्त्रांचा अभ्यास केला तरी शेवटी अध्यात्मशास्त्रच माणसाचे कल्याण करू शकते.

आद्यशंकराचार्य जेव्हा प्रथम काशीला आले तेव्हा ते नगरात कोण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काय करीत आहे हे पाहण्यासाठी भ्रमण करू लागले. एका गल्लीतून जाताना त्यांना दिसले की ८०-९० वर्षांचा एक वृद्ध व्याकरणाच्या सूत्रांचा अभ्यास करीत बसला होता. त्याच्या वयाकडे पाहता तो मृत्यूच्या अगदी समीप गेला होता आणि अध्ययन मात्र करीत होता व्याकरणाचे. सर्व शास्त्रांत व्याकरणाचा अभ्यास प्रथम करायचा असतो, परंतु तो वृद्ध मात्र आयुष्याच्या संध्याकाळी त्याचे अध्ययन करीत होता. त्यावेळी त्याच्याजवळ जाऊन शंकराचार्य म्हणाले,

'हे व्याकरणशास्त्र सोडून द्या आणि ईश्वराचा नाम जप करा.

भज गोविन्दम् भज गोविन्दम् । गोविन्दम् भज मूढमते ॥

आयुष्याच्या संध्याकाळी ईश्वराचे नाव न घेता तुम्ही अन्य शास्त्रांचे अध्ययन करीत आहात. यामुळे तुमचे कल्याण होण्याची शक्यता नाही. म्हणून आता निवांत बसून परमात्मचिंतन करा, ज्ञान संपादन करा, तरच तुमचे कल्याण होईल.'

प्रत्येकाला शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो. आपण नित्य पूजापाठ करतो तसे रोज थोडे फार धर्मग्रंथाचे अध्ययन केले पाहिजे. जर धर्मग्रंथाचे अध्ययन कोणी करत नसेल तर तो त्याचा प्रमाद होय. आयुष्याच्या अंतिम काळात स्वाध्याय करावा लागतो, असा काही लोकांचा गैरसमज असतो. परंतु जशी नित्य शिवपूजा करतात तसाच स्वाध्याय देखील नित्य केला पाहिजे आणि तो देखील प्रमादरहित. त्यामध्ये आळस करू नये. आज पारायण राहू दे, उद्या करू, असा विचार माणूस करत असतो. आपल्या जीवनात 'उद्या' उजाडेल की नाही याची फिकीर तो करीत नाही. एकदा आळसाची सवय झाली तर मनुष्य कायमचा आळशी बनून जातो. एकदा प्रमादाची सवय झाली की मनुष्याकडून पुन्हा पुन्हा प्रमाद होत राहतात. म्हणून स्वाध्याय, अभ्यास कधीही सोडू नये. अभ्यासामुळेच तर ज्ञान प्राप्त होते. 'करत करत अभ्यास । जडमति होत सुजाण' असे तुलसीदासांनी म्हटले आहे. अभ्यासामुळे जडबुद्धी मनुष्य देखील ज्ञानी होऊ शकतो.

शास्त्रे अनेक असली तरी त्यांच्यामध्ये दोनच महत्त्वाची आहेत. पहिले, वेदांचा अंतिम भाग म्हणजे 'वेदान्त' आणि दुसरे, आगमांतील अंतिम भाग म्हणजे 'सिद्धान्त'. भगवान शिवांच्या श्वासोच्छ्वासातून वेदांची उत्पत्ती झाली आणि त्यांच्या मुखातून आगमांची निर्मिती झाली. वेद आणि आगम हे भगवान शिवाचेच उपदेश होत. वेदांचा अंतिम उपदेश 'वेदान्त' आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आगमांचा अंतिम उपदेश 'सिद्धान्त' होय. ज्याला वेदान्त इष्ट असेल त्याने वेदान्ताचे अध्ययन करावे आणि ज्याला सिद्धान्त इष्ट असेल त्याने सिद्धान्ताचे अध्ययन करावे. जे वेदान्ताचा अभ्यास करून प्राप्त होते तेच सिद्धान्ताचा अभ्यास करून प्राप्त होते. वेदान्तात ज्याला 'ब्रह्म' म्हणतात त्यालाच सिद्धान्तात 'लिंग' म्हणतात. ब्रह्म आणि लिंग यात काहीही भेद नाही.

म्हणून प्रत्येक मनुष्याने शास्त्राभ्यास केला पाहिजे. प्रयत्न करून देखील शास्त्रांचा अर्थ कळत नसेल तर सद्गुरूला शरण गेले पाहिजे. स्वाध्याय करून जे समजत नाही ते गुरूच्या उपदेशामुळे ध्यानात येते. हृदयग्रंथी आणि शास्त्रग्रंथी या दोन्ही ग्रंथी गुरूपदेशामुळे मोकळ्या होतात, सुटतात. शास्त्रांच्या बाबतीत आणि आत्म्याच्या व परमात्म्याच्या अस्तित्वाच्या बाबतीत आणि आत्मा-परमात्म्याच्या ऐक्याच्या बाबतीत आपल्या मनात जे संदेह असतात ते गुरूपदेशामुळे नष्ट होतात. या ग्रंथाचे श्रोता महर्षी अगस्त्य हे काही सामान्य नव्हते. सर्व शास्त्रांचे अध्ययन केलेले ते एक विद्वान होते, तरी देखील त्यांच्या मनात काही संदेह उत्पन्न झाले होते. जेव्हा जगद्गुरू रेणुकाचार्य त्यांच्या आश्रमात येतात तेव्हा त्यांचे पूजन करून, त्यांना नमस्कार करून अगस्त्य विचारतात,

'मी सर्व आगमांचे आणि वेदान्ताचे अध्ययन केले आहे तरी माझ्या मनात संदेह आहे तो दूर करण्यासाठी सर्व सिद्धान्ताचे जे सारसत्त्व आहे, जे ऐकल्यावर माझे सगळे संशय नष्ट होऊन मी कृतकृत्य होईन आणि ज्यामुळे माझाच नव्हे तर सर्व प्रपंचाचा उद्धार होईल असा उपदेश आपण मला करावा.'

अशी अगस्त्यांनी प्रार्थना केली. अगस्त्यांसारख्या महर्षींना स्वाध्याय करून देखील जेव्हा शास्त्र कळले नाही तेव्हा त्यांना सद्गुरूला शरण जावे लागले. त्यावेळी सद्गुरूंनी जो उपदेश केला तो केवळ महर्षी अगस्त्यांनाच नव्हे तर विश्वातल्या सर्व प्राणिमात्रांना उपकारक ठरला. आज अगस्त्य नाहीत आणि जगद्गुरू रेणुकाचार्यही नाहीत. परंतु 'सिद्धान्तशिखामणी'च्या रूपाने त्यांचा ज्ञानप्रवाह आज देखील वाहात राहिला आहे. सद्गुरूची करुणा हीच त्यांची कृपा असते. अभ्यासात थोडे न्यून असले तरी सद्गुरूच्या कृपेने ते पुरते होते. म्हणून शास्त्रावर आणि आपल्या इष्टदेवतेवर साधक जेवढी श्रद्धा ठेवतो त्यापेक्षाही अधिक श्रद्धा त्याने गुरूवर ठेवली पाहिजे. अशा प्रकारे शास्त्राभ्यास करून आणि सद्गुरूंची कृपा संपादन करून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञान प्राप्त करून घ्यायला हवे.

ज्ञानं परशिवाद्वैतपरिपाकविनिश्चयः ।
येन संसारसम्बन्धविनिवृत्तिर्भवेत् सताम् ॥ १६-३० ॥

शिवाद्वैत निश्चित होणे हेच ज्ञान होय. सर्व प्रपंच शिवमय आहे हेच शिवाद्वैत होय. शिवाशिवाय दुसऱ्या कशालाही अस्तित्व नाही अशा दृढ ज्ञानालाच येथे 'ज्ञान' असे म्हटले आहे. शिवाद्वैत ज्ञानामुळे संसारबंधने गळून पडतात. जीवात्म्याचे संपूर्ण लक्ष शिवाकडे लागले म्हणजे त्याची संसारातून सुटका होते. आपले मन एकावेळी एकाच विषयाशी समरस होऊ शकते, अनेक विषयांशी नव्हे. आपले मन ज्या ठिकाणी असते त्याच ठिकाणी आपले खरे वास्तव्य असते. मग आपला देह घरात असला आणि आपले मन बाजारात असले तर आपण खरे बाजारात असतो, घरी नव्हे. जेव्हा तुमच्या दृष्टीने सर्व प्रपंच शिवमय होतो तेव्हा प्रपंच शिल्लक राहातच नाही, प्रपंचरूपात देखील शिवच विद्यमान असतो. मग त्यावेळी तुमचा प्रपंचाशी संबंध राहत नाही. अशा प्रकारे शिवाद्वैत ज्ञानामुळे प्रपंचातून सुटका होते.

प्रपंचाशी संबंध का बरे तोडून टाकावा? असा प्रश्न एखाद्याच्या मनात उत्पन्न होईल. तर जोपर्यंत प्रपंचाशी संबंध राहील तोपर्यंत आपल्याला क्षणिक सुखांचा मोह पडत राहील. परंतु जेव्हा प्रपंचापासून मुक्त होऊन तुमचे मन शिवाशी समरस होईल तेव्हा अखंड परमानंदाची प्राप्ती होते. अखंड आनंद मिळावा अशी जीवात्म्याची इच्छा असते. परमात्म्याशी अखंड संबंध जुळला तरच अखंड आनंद मिळू शकतो. ज्या सांसारिक वस्तूपासून वा व्यक्तींपासून तुम्हाला आनंद मिळत असतो ती वस्तू किंवा व्यक्ती दूर गेल्यावर तुम्हाला दुःख होते. सांसारिक वस्तू तुम्हाला अखंड सुख केव्हाही देऊ शकणार नाही. ज्याची निर्मिती अथवा जन्म होतो त्याचा विनाशही अटळपणे होतो. त्यामुळे वस्तू आणि व्यक्ती यांचा वियोग देखील अटळ आहे. त्यामुळे सांसारिक वस्तू काही काळ आनंद देतात आणि सर्वकाळ दुःखच देतात. एकदा परमात्म्याशी मन समरस झाले की ते तेथून दूर होत नाही. कारण जेथे तुमचे मन जाईल तेथे तेथे परमात्माच विद्यमान असतो. जेथे जेथे मन जाते तेथे तेथे त्याला परब्रह्माचेच दर्शन होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिवात्मकमिदं सर्वं शिवादन्यन्न विद्यते ।
शिवोऽहमिति या बुद्धिस्तदेव ज्ञानमुत्तमम् ॥ १६-३१ ॥

सर्व प्रपंच शिवमय असून त्याच्याशिवाय दुसरी कोणतीही वस्तू अस्तित्वातच नाही. मी देखील शिवस्वरूपच आहे, हेच सर्व श्रेष्ठ ज्ञान होय. उत्तम ज्ञान होय. हीच अद्वय स्थिती आहे. जगत्, जीवात्मा आणि परमात्मा असे तीन पदार्थ चिंतनयोग्य आहेत, असे शास्त्रात म्हटले आहे. माणूस एकतर स्वत:विषयी विचार करील - मी कोण आहे? माझे स्थान काय आहे? इत्यादी. किंवा प्रपंचाविषयी विचार करील - प्रपंच केव्हा उत्पन्न झाला? कसा उत्पन्न झाला? कुणी उत्पन्न केला? इत्यादी. अथवा प्रपंचाच्या कर्त्याविषयी म्हणजे ईश्वराविषयी विचार करील. हा एवढा मोठा प्रपंच दृष्टीपुढे उभा आहे तो काय सहजासहजी, आपोआप उत्पन्न झाला असेल? प्रपंच हे कार्य मानले तर त्याचे कारण काहीतरी असलेच पाहिजे. प्रचंड वटवृक्ष पाहिला तर त्याच्या बीजाचा विचार जिज्ञासू माणसाला सुचतो. विश्वाच्या कारणाला ईश्वर म्हणा की परब्रह्म म्हणा. एकंदरीत जगत्, जीव आणि ईश्वर या तीन वस्तूबद्दलच मनुष्य विचार करीत असतो. या तीनही वस्तू एकरूपच आहेत, अर्थात् शिवमय आहेत, हेच येथे सांगितले आहे. असे ज्ञान उत्तम ज्ञान असून त्याच्यामुळेच जीवात्म्याला मुक्ती मिळते आणि तो कृतार्थ होतो. असे उत्तम ज्ञान ज्याला प्राप्त होत नाही त्याची स्थिती कशी असते हे पुढील श्लोकात सांगतात -

अन्धो यथा पुरस्थानि वस्तूनि च न पश्यति ।
ज्ञानहीनस्तथा देही नात्मस्थं वीक्षते शिवम् ॥ १६-३२ ॥

जन्मांधासमोर कितीही सजावट करून ठेवली तरी तो त्यातली एकही वस्तू पाहू शकत नाही. त्याप्रमाणे ज्ञानहीन मनुष्य आपल्या हृदयात आणि प्रपंचात असलेल्या शिवतत्त्वाला पाहू शकत नाही. परमात्मा ब्रह्मांडात आहे तसाच पिंडात - शरीरात देखील आहे. जेथे जीव आहे तेथेच शिव देखील आहे. जीव आणि शिव हे दोन पक्षी वृक्षाच्या शाखेवर बसले असून त्यांपैकी एक फळे चाखत आहे तर दुसरा त्याच्याकडे पाहात स्तब्ध बसला आहे; असे उपनिषदात विशद केले आहे. आपल्या हृदयात जो जीवात्मा आहे तो कर्मफळे चाखून सुखदु:ख भोगत आहे तर आपल्या हृदयातला परमात्मा त्याच्याकडे साक्षीभूत होऊन पाहात आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक महात्मा एका गावातून जात होता. गावातल्या पारावर टवाळखो बसलेले असतात. त्यांपैकी एकाने त्यांना पाहिले आणि शिव्या द्यायल सुरुवात केली.

महात्मा तेथेच थांबला आणि शांतपणे ऐकू लागला त्यामुळे शिव्य देणाऱ्याला अधिकच चेव आला. संत-महात्म्यांना शिव्या देणे सोपे असते सामान्य माणसाला शिवी दिली तर तो कानशिलाखाली आवाज काढतो संत बिचारे गप्प बसतात.

त्या महाभागाने शिव्या देण्याचा सपाटा सुरूच ठेवला, पण त्याच महात्म्यावर काहीही परिणाम झाला नाही. शेवटी शिव्या देणारा कंटाळल आणि चिडून म्हणाला, 'मी तुम्हाला इतक्या शिव्या दिल्या तरी तुम्ही चिडत कसे नाही? तुम्ही मला शिव्या का देत नाही? आतापर्यंत मी ज्यांना शिव्या दिल्या त्यांनी मला परत शिव्या दिल्या आहेत. मी एखाद्याल शंभर शिव्या दिल्या तर त्याने मला किमान दहा शिव्या तरी दिल्य आहेत. मग तुम्ही मला का शिव्या देत नाही?'

'भल्या माणसा', तो महात्मा हसून म्हणाला, 'एखाद्या माणसाल तू भेटवस्तू दिलीस तर ती स्वीकारणे किंवा न स्वीकारणे हे कुणाच्य मर्जीवर अवलंबून असते? देणाऱ्याच्या की घेणाऱ्याच्या?'

'घेणाऱ्याच्या'. त्या माणसाने उत्तर दिले.

'मग मी तू दिलेली भेट स्वीकारलीच नाही तर ती तुला परत कशी करू?' असे म्हणून तो महात्मा हसत आपल्या मार्गाने निघून गेला.

सांगण्याचे तात्पर्य असे की, प्रत्येकाची मानसिक स्थिती भिन्न असते शिव्या देणाऱ्या माणसाची मानसिक स्थिती वेगळी तर शिव्या ऐकून त्यांच प्रतिवाद न करणाऱ्या महात्म्याची मानसिक स्थिती वेगळी होती. याप्रमाणे शिवाला प्रपंचरूपात पाहणाऱ्या आणि प्रपंचात शिवरूप पाहणाऱ्या दोघांच्या दृष्टींत अंतर असते. आंधळा जशी समोरची वस्तू पाहू शकत नाही तसाच अज्ञानी देखील प्रपंचरूपाने दृष्टीपुढे उभ्या असलेल्या आणि प्राणलिंगाच्या रूपाने हृदयात विराजमान असलेल्या शिवाला पाहू शकत नाही. अज्ञानी माणसे तर ईश्वराबद्दल आणि त्याच्या नावाबद्दलही भांडण करीत असतात.

एका गावात सर्व गावकऱ्यांनी मिळून विश्वस्त मंडळ, ट्रस्ट स्थापन केला. त्या गावात कोणत्याच देवाचे मंदिर नव्हते. म्हणून गावात सर्वप्रथम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंदिर बांधायचे असे ट्रस्टींनी ठरवले. मंदिर बांधून झाले. मंदिरात कोणत्या देवतेची मूर्ती स्थापन करायची यावर चर्चा झाली. रामभक्त म्हणाले - रामाची करा. कृष्णभक्त म्हणाले - कृष्णाची करा. अशी अनेकांनी अनेक देवतांची नावे सुचवली. शेवटी ट्रस्टींनी निर्णय घेऊन मंदिरात रामाची मूर्ती स्थापन केली.

गावातले सगळे रामभक्त रोज पूजेसाठी आणि दर्शनासाठी मंदिरात येऊ लागले. परंतु कृष्णभक्त मात्र येईनात. कारण कृष्णमूर्तीची स्थापना न केल्यामुळे ते नाराज झाले होते. शेवटी कृष्णभक्तांच्या आग्रहाला बळी पडून ट्रस्टींनी रामाच्या मूर्तीचे विसर्जन केले आणि त्या ठिकाणी कृष्णाच्या मूर्तीची स्थापना केली.

तेव्हापासून गावातील झाडून सारे कृष्णभक्त पूजा-दर्शनासाठी रोज मंदिरात येऊ लागले. परंतु रामभक्तांनी मंदिरात जाणे बंद केले. सर्व गावकऱ्यांनी मंदिरात यावे अशी ट्रस्टींची इच्छा होती. शेवटी प्रत्येकाच्या मागणीप्रमाणे मंदिरातील मूर्ती बदलली गेली. जेवढ्या म्हणून देवता आहेत त्या साऱ्यांच्या मूर्तींची स्थापना मंदिरात क्रमाक्रमाने झाली. परंतु मंदिरात जी मूर्ती असे तिचेच भक्त दर्शनासाठी मंदिरात येत, बाकीचे येत नसत. राम हाच कृष्ण आहे, कृष्ण हाच शिव आहे, शिव हीच शक्ती आहे, याचे भान कुणालाच नव्हते. सत्य एकच आहे पण त्याची नावे भिन्न आहेत हे ज्ञान कुणाला नव्हते. ट्रस्टींना तर सर्व गावकऱ्यांनी मंदिरात यावे असे वाटत होते.

मंग सर्व ट्रस्टींनी मिळून विचार केला की मंदिरात सर्व गावकरी एकत्र येतील यासाठी काय करावे? आणि मग सर्वांनी मिळून ठरवून मंदिराचे हॉटेलमध्ये रूपांतर केले.

मग मात्र सगळे गावकरी तेथे खाण्या-पिण्यासाठी, विड्या फुंकण्यासाठी एकत्र येऊ लागले!

ही अज्ञानी लोकांची कहाणी आहे. ईश्वराविषयी ज्ञान नसल्यामुळे त्याच्या भिन्न नामरूपांविषयी अडाणी माणसे भांडत असतात. परमात्म्याची भिन्न नामरूपे, लोकांनी आपापसात भांडावे यासाठी नाहीत. नामरूपे भिन्न असली तरी तत्त्व मात्र एकच आहे. प्रत्येकाची रुची भिन्न असल्यामुळे कुणाला शिवलिंगाच्या रूपात, कुणाला रामाच्या रूपात, कुणाला श्रीकृष्णाच्या रूपात तर कुणाला देवीच्या रूपात भगवंताची पूजा-ध्यान करायला आवडते. त्यामुळे त्यांच्यासाठी त्यांच्या रुचीनुसार परमात्म्याची नावरूपे भिन्न आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परंतु ज्ञानी पुरुषाला मात्र या भिन्न नामरूपांत एकच तत्त्व वसत आहे याचा साक्षात्कार होतो. त्यांना वेगळेपणा जाणवत नाही. शरीरे भिन्न असली बुद्धी, इंद्रिये, विचार यांमध्ये तफावत असली तरी प्रत्येकाच्या अंतरं नांदणारे चैतन्य मात्र एकच असते. आत्म्याच्या अस्तित्वातच सगळा व्यवहा चाललेला असतो. अशा आत्म्याला पाहण्याचे ज्ञान ज्याच्याजवळ अस त्यालाच 'ज्ञानी' म्हणतात. अज्ञानी माणसांना भगवंताच्या मूर्तीत देखील भगवंताचा साक्षात्कार होत नाही. जोपर्यंत माणसांना ज्ञान लाभणार नाही तोपर्यंत जगातले कलह थांबणार नाहीत. परमेश्वराच्या नामावरून, रूपावरून, त्याच्या उपासनापद्धतींवरून अज्ञानी माणसे झगडत असतात. हा कलह थांबवण्यासाठी तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे. भेदबुद्धी नष्ट करून सम मानवजातीला सुखी करण्यासाठीच आचार्य प्रयत्नशील राहिलेले आहेत.

शिवस्य दर्शनात् पुंसां जन्मरोगनिवर्तनम् ।
शिवदर्शनमप्याहुः सुलभं ज्ञानचक्षुषाम् ॥ १६-३३ ॥

ज्याला ज्ञानदृष्टी प्राप्त झालेली असते त्याला शिवदर्शन होते. शिवदर्शनामुळे जन्म-मरणरोगाचे निवारण होते. जन्म आणि मरण हे दोन्ही रोग आहेत. जीवात्म्याला त्यांच्यामुळे वारंवार दुःख भोगावे लागते. या रोगांच्या निवारणासाठी शिवदर्शनाची आवश्यकता असते आणि शिवदर्शनासाठी शिवज्ञानाची गरज असते. या ज्ञानागमस्थलाचा शेवटी समारोप करतात –

दीपं विना यथा गेहे नान्धकारो निवर्तते ।
ज्ञानं विना तथा चित्ते मोहोऽपि न निवर्तते ॥ १६-३४ ॥

अंधार पडल्यावर माणूस स्वस्थ बसत नाही. सूर्य अस्ताला गेल्यावर रात्र हळूहळू दाट होऊ लागते. अशा वेळी मनुष्य विद्युत्दिव्याचे बटन तरी दाबतो, अन्यथा पणती तरी पेटवतो. घर प्रकाशित झाल्यावरच तो निवांत बसतो. दिवा लावल्याशिवाय जसा घरातला अंधार दूर होत नाही त्याप्रमाणे शिवज्ञान झाल्याशिवाय मनुष्याच्या मनातील मोह, अज्ञान नष्ट होत नाही. गीतेचा संपूर्ण उपदेश अर्जुनाच्या ठिकाणी असलेल्या मोहाचे निवारण करण्यासाठीच झालेला आहे. गीतेच्या शेवटी अर्जुन म्हणतो –

'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत'

हे अच्युता, तुझ्या प्रसादामुळे माझा मोह नष्ट होऊन मला पूर्व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्मृती प्राप्त झाली आहे.

मोह निवारणासाठी ज्ञान हे अमोघ साधन होय. जोपर्यंत ज्ञान मिळत नाही तोपर्यंत माणसाची मोहातून सुटका होत नाही. जो विवेकशक्तीला नष्ट करतो त्याला 'मोह' म्हणतात. मोहाच्या अधीन होऊन 'हे माझे, हे माझे' असे म्हणत ममत्व वाढत जाते. 'हे माझे आहे' असे म्हणत जीवात्मा बंधनात पडतो तर 'हे माझे नाही' असे म्हटल्यावर तो बंधनातून मुक्त होतो. प्रपंच ईश्वराचा आहे. त्यातील वस्तूचा उपभोग घेताना 'ही माझी नसून ईश्वराची आहे' आणि 'ही मला माझ्या प्रारब्धाने ईश्वराचा प्रसाद म्हणून मिळाली आहे' अशा भावनेने तिचा उपभोग घेतला पाहिजे. मोहाच्या निवृत्तीसाठी प्रत्येकाला ज्ञानाची आवश्यकता असते. ज्याला ज्याला ही ज्ञानदृष्टी लाभते त्याच्या दृष्टीने विश्वातले सारे भेद नष्ट होतात. जर सर्वांनाच अशी ज्ञानदृष्टी लाभली तर जगातले कलह क्षणार्धात थांबतील आणि विश्वात शांती प्रस्थापित होईल. म्हणून प्रत्येकाने स्वाध्याय करून आणि सद्गुरूला शरण जाऊन हे उत्तम ज्ञान संपादन करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला पाहिजे, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
२ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

७

सकाय स्थल

जिज्ञासू सद्भक्तांनो,

कालच्या आशीर्वचनात आपण ऐकले आहे की प्रत्येक माणसाला अध्यात्मज्ञानाची नितांत गरज असते. सर्व शास्त्रांचे ज्ञान होऊन देखील जर अध्यात्मज्ञान नसेल तर मनुष्याला सुखशांतीचा लाभ होणार नाही. म्हणून प्रत्येकाने आत्मचिंतन, परमात्मचिंतन आणि त्या दोहोंचे अभेदचिंतन करून आत्मज्ञान प्राप्त करून घ्यायला हवे. जोवर आत्मज्ञान होत नाही तोवर मनातला मोह नष्ट होत नाही आणि मोह नष्ट झाल्याशिवाय मनुष्याला सुखशांती भेटत नाही. ज्ञानागमस्थलात ज्ञानाचे प्रयोजन आणि ज्ञानाची प्राप्ती याविषयी आपण ऐकले आहे. आज सकायस्थलाचे निरूपण करायचे आहे. सामान्यत: या ग्रंथातील स्थलांची नावे श्रोत्यांना थोडी चमत्कारिक वाटण्यासारखी आहेत. परंतु अत्यंत विचारपूर्वक ही नावे योजण्यात आली आहेत. आत्मज्ञान झाल्यानंतर शरीराचे प्रयोजन कोणते आहे? असा प्रश्न येथे उपस्थित होतो. आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीच तर जीवात्म्याला मानवजन्म घ्यावा लागतो. मनुष्यजन्म घेऊन जर आत्मज्ञान मिळवले नाही तर जीवात्म्याची फार हानी होते, असे उपनिषदांत म्हटले आहे. आत्मज्ञान प्राप्त केल्यानंतर मात्र अन्य कोणतेही प्राप्तव्य उरत नाही. जे मिळवायचे ते मिळवल्यानंतर मग या देहाचे काय करायचे? तो सांभाळायचा की टाकून द्यायचा? तर त्याविषयी सांगतात -

परस्य या तनुर्ज्ञेयाऽदेहकर्माभिमानिन: ।
तया सकायो लोकोऽयं तदात्मत्वनिरूपणात् ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-३५)

ज्ञानप्राप्तीनंतर देखील ज्ञानी पुरुषाने आपल्या कायेचे, देहाचे रक्षण केले पाहिजे, असा येथे उपदेश केला आहे. शरीरधारी जीवात्म्यांचे गीतेत चार प्रकार केलेले आहेत. आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू आणि ज्ञानी. कुणी आर्त म्हणजे दु:खी असतो, कुणी अर्थार्थी म्हणजे धनप्राप्तीची इच्छा ठेवणारा असतो. कुणी जिज्ञासू म्हणजे ज्ञानप्राप्तीची उत्कट इच्छा बाळगणारा असतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर कुणी ज्ञानी म्हणजे ज्ञानप्राप्ती करून घेतलेला असतो. 'सिद्धान्तशिखामणी'त मात्र मनुष्यदेहाची विभागणी तीन प्रकारांत केली आहे. देह, तनू आणि काय. या तिन्ही शब्दांत गूढ अर्थ दडलेला आहे. काही लोक 'देहधारी' आहेत, काही लोक 'तनुधारी' आहेत तर काही लोक 'कायधारी' आहेत. शब्दकोशाच्या दृष्टीने मात्र 'देह' शब्दाचा पर्याय 'काय' हा आहे, परंतु या शब्दात जो गूढार्थ आहे त्यावरून त्या त्या व्यक्तींच्या व्यक्तित्वाचा परिचय होतो. शरीर तर सर्वांनाच आहे, परंतु शरीरात राहणाऱ्या जीवात्म्याची स्थिती कशी आहे आणि त्याची आपल्या देहासंबधी कोणती भावना आहे यावरून त्याच्या योग्यतेचा निर्णय केला जातो.

काही जीवात्मे देहभावाने राहतात. शरीर म्हणजे मीच आहे, अशी त्यांची दृढ भावना असते. यांना देहात्मवादी असे म्हणतात. देह हाच आत्मा आहे असे हे लोक मानतात. चार्वाकदर्शनाने देहात्मवादाचा पुरस्कार केलेला आहे. तो सर्वसामान्य माणसाला आपलासा वाटण्याची शक्यता आहे.

'यावज्जीवं सुखं जीवेद् ऋणं कृत्वा घृत पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुत: ॥'

असे चार्वाकदर्शनात सांगितले आहे. जोपर्यंत आयुष्य आहे तोपर्यंत मौजमजा करा. मौजमजा करण्यासाठी पैसे नसतील तर कर्ज काढा. जे खायचे-प्यायचे असेल ते भरपूर खा, प्या. कर्ज फेडण्याची काळजी करू नका. एकदा देहाचे भस्म झाल्यावर तुम्हाला कोण कर्ज मागायला येतो? जो कर्ज देतो त्याच्या देहाचे एके दिवशी भस्म होईल आणि जो कर्ज घेतो त्याचाही देह एके दिवशी चितेत जळतो. त्यावेळी घेण्या-देण्याचा व्यवहारच शिल्लक राहाणार नाही. यालाच 'चार्वाकसिद्धान्त' असे म्हणतात. देहाचे पालनपोषण करणे, त्याला सजवणे हेच त्यांचे उद्दिष्ट असते. त्यांच्या दृष्टीने देह हाच त्यांचा आत्मा असतो. अज्ञानी आणि ज्ञानी दोघेही देहाचे पोषण करतात, परंतु त्या दोघांच्या भावनेत महदंतर असते. देहाभिमानी जीवात्मा आपल्या शरीरालाच सर्वस्व समजतो. पहिलवान जसा आपल्या देहाच्या कौडकौतुकातच मग्न असतो. खूप व्यायाम करतो, भरपूर खातो, दंडावरील बेटकुळी फुगवून पाहतो. त्याप्रमाणे देहधारी जीवात्मा देहाच्या कौतुकातच मग्न असतो. पहिलवानाच्या शरीरसाधनेमागे निदान उद्दिष्ट तरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असते. परंतु देहधारी जीवात्मे मात्र खाऊन पिऊन शरीर बेडौल करण्यात धन्यता मानतात. अशा लोकांना आत्मा आणि परमात्मा यांच्याविषयी किंचित देखील जाणीव नसते.

यानंतर तनुधारी लोकांचा क्रमांक येतो. तनू म्हणजे सूक्ष्म. जसे काही लोक आपल्या शरीराला तट्ट फुगवणारे असतात तसे काही लोक आपल्या देहाला झिजवणारे देखील असतात. उपवास करून, व्रतवैकल्ये करून, तपश्चर्या करून ते आपल्या देहाला शुष्क करीत असतात. शरीरशोषण करणे हेच त्यांच्या जीवनाचे लक्ष्य असते. योगाभ्यास करून, उपवास करून, अनेक नियमांचे पालन करून ते दैनंदिन व्यवहारात आपल्या देहाला बांधून ठेवतात. अधिक खायचे नाही, अधिक प्यायचे नाही, खायचे तेवढेच, प्यायचे तेवढेच, असे नियम स्वतःवर लादून घेऊन जे आपले शरीर कृश करीत असतात त्यांना 'तनुधारी' म्हणतात. त्यांचे शरीर तपश्चर्येने 'तनू' म्हणजे कृश झालेले असते.

'काय' हा शब्द यापेक्षाही विलक्षण आहे. जन्मजन्मांतरात तपश्चर्या केल्यावर ज्याच्यावर दीक्षासंस्कार होऊन श्रीगुरुंची कृपा झालेली असते अशा शरीराला 'काय' असे म्हणतात. काय हा 'मांसपिंड' नसून 'मंत्रपिंड' असतो. जेव्हा दीक्षासंस्कार होतो तेव्हा त्याच्या प्रत्येक अंगावर संस्कार केले जातात. त्याच्या स्थूलशरीरावर, सूक्ष्मशरीरावर आणि कारणशरीरावर संस्कार केले जातात. जेव्हा ही तिन्ही शरीरे सुसंस्कृत होतात तेव्हा त्या जीवात्म्याच्या शरीराला 'काय' असे संबोधले जाते. सारांश, जे देहालाच आत्मा समजून त्याचे कोडकौतुक करून मौजमजा करतात ते 'देहधारी' होत. जे यमनियमांचे पालन करून तपश्चर्येने आपले शरीर कृश करतात ते 'तनुधारी' होत आणि गुरूकडून दीक्षा घेऊन जे सुसंस्कारित झालेले असतात व ज्यांना सद्गुरूकृपा लाभलेली असते ते 'कायधारी' होत. आत्मज्ञानप्राप्तीसाठीच सद्गुरूकडून दीक्षासंस्कारयुक्त काया मिळालेली असते ती ज्ञानप्राप्तीनंतर टाकून द्यावी की तशीच ठेवावी याविषयी येथे विचार केलेला आहे –

कायं विना समस्तानां न क्रिया न च भावना ।
न ज्ञानं यत् ततो योगी कायवानेव संचरेत् ॥ १६-३६ ॥

जर तुम्हाला श्रीगुरूंकडून दीक्षित शरीर म्हणजे 'काय' मिळाले नसेल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर त्याच्याशिवाय तुम्हाला लिंगपूजादी क्रिया करता येणार नाहीत, भावना करता येणार नाही आणि ज्ञानप्राप्तीदेखील होणार नाही. पूजा करण्यासाठी, भावना करण्यासाठी आणि ज्ञानप्राप्तीसाठी 'काये'ची आवश्यकता आहे. ज्ञानप्राप्तीनंतर देखील जोपर्यंत प्रारब्धकर्म संपत नाही तोपर्यंत 'काये'चे रक्षण करावे, ते सोडू नये असे शास्त्रात सांगितले आहे. ज्ञानप्रामी होईपर्यंत त्याचे शरीर स्वत:साठी उपयोगी होते. ज्ञानप्राप्तीनंतर त्याच्या शरीराचा इतरांसाठी उपयोग झाला पाहिजे. 'शरीरं आद्यं खलु धर्मसाधनम्' असे कालिदासाने म्हटले आहे. पार्वती अत्यंत कठोर तपाचरण करून जेव्हा कृश झाली तेव्हा तिची अवस्था पाहाणाऱ्या आईच्या मुखातून वरील श्लोक कालिदासाने वदवला आहे. आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी, परमात्म्याच्या प्राप्तीसाठी शरीर हे साधन आहे. ते जर कठोर तपश्चर्येने शोषून टाकले आणि अकाली मरण आले तर त्या शरीराचा साधनेसाठी उपयोग होत नाही. म्हणून शरीर स्वस्थ राखून त्याला भगवंताच्या पूजन-भजन-कीर्तनात लावले पाहिजे. शरीराला त्रास देऊन जर रुग्ण बनवून ठेवले तर त्या शरीराने तुम्हाला धड संसार करता येणार नाही की परमार्थ. आपल्या 'काये'संबंधी साधकाने काळजी वाहिली पाहिजे. सुसंस्कृत 'काय' आणि 'आत्मा' यांच्या संबंधालाच 'काययोग' असे म्हणतात. तुम्हाला हठयोग, राजयोग, मंत्रयोग, लययोग, भक्तियोग यांच्यापैकी कोणताही योग साधायचा असेल तर प्रथम तुमचा 'काययोग' स्थिर असला पाहिजे. तुमचा 'काययोग' सुरक्षित नसेल तर तुम्हाला कोणताही योग साधता येणे शक्य नाही. अज्ञानी मनुष्य शरीर म्हणजे आपणच आहोत असे म्हणून देहाचे पालन पोषण करतो आणि ज्ञानी मनुष्य देह म्हणजे आपण नाही हे माहीत असून देखील साधनेसाठी देहाचा उपयोग आहे हे जाणून त्याचे पालन करतो.

शिवैकज्ञानयुक्तस्य योगिनोऽपि महात्मन: ।
काययोगेन सिद्ध्यन्ति भोगमोक्षादय: सदा ॥ १६-३७ ॥

तुम्ही योगी असाल, महात्मा असाल, शिवयोगी असाल; पण तुम्हाला मुक्ती प्राप्त होते ती 'काये'मुळेच. मुक्ती दोन प्रकारची असते. जीवन्मुक्ती आणि विदेहमुक्ती. देह सोडल्यानंतर जी मुक्ती मिळते ती विदेहमुक्ती होय. त्यावेळी जीवात्म्याला काही आनंद होत नाही. आनंदाचा उपयोग करण्यासाठी, आनंद व्यक्त करण्यासाठी देहाची आवश्यकता असते. सुख-दुःख भोगण्यासाठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शरीराची नितांत गरज असते. भोग आणि मोक्ष यांची प्राप्ती शरीरामुळेच होते जीवन्मुक्तीचा आनंद उपभोगायचा असेल तर देहाचे रक्षण करायलाच हवे.

काष्ठं विना यथा वह्निर्जायते न प्रकाशवान् ।
मूर्तिं विना तथा योगी नात्मतत्त्वप्रकाशवान् ॥ १६-३८ ॥

प्राचीन काळी अग्नी उत्पन्न करण्यासाठी दोन लाकडे एकमेकांवर घासावी लागत. याला अरणी-मंथन असे म्हणत. अग्नी प्रकट होण्यासाठी जशी लाकडाची आवश्यकता असते त्याप्रमाणे आत्मतत्त्व प्रकट होण्यासाठी शरीराची आवश्यकता असते. अग्नीला प्रकाशित होण्यासाठी काष्ठाचे आलंबन (आधार) हवे असते.

मूर्त्यात्मनैव देवस्य यथा पूज्यत्वकल्पना ।
तथा देहात्मनैवास्य पूज्यत्वं परयोगिनः ॥ १६-३९ ॥

आपल्याला देवतेची पूजा करायची असेल तर त्याची मूर्ती घडवावी लागते. तुम्हाला शिवाची पूजा करायची असेल तर शिवलिंग निर्माण करावे लागेल. विष्णूची पूजा करायची असेल तर विष्णूची मूर्ती निर्माण करावी लागेल. देवीची करायची असेल तर देवीची मूर्ती घडवावी लागेल. मूर्ती केल्याशिवाय तुम्हाला कोणत्याही देवतेची पूजा करता येणार नाही. निराकाराची पूजा करणे केवळ अशक्य आहे. निराकार अशा परमात्म्याला मूर्तिरूपात साकार करूनच त्याची पूजा करावी लागते. मूर्तीशिवाय भगवंताची पूजा करता येत नाही, तशी शरीराशिवाय ज्ञानी पुरुषाची पूजा करता येत नाही. आपल्या संस्कृतीत भगवंताच्या पूजेएवढीच ज्ञानी पुरुषांची पूजा श्रेष्ठ मानली जाते. म्हणूनच सद्गुरूची पूजा, त्यांची पादपूजा केली जाते. ज्या शरीराच्या द्वारा ज्ञान प्रकट झाले आहे असे शरीर मांसतुल्य नसून साक्षात ज्ञानमूर्तीच असते. म्हणून अशा शरीराची पूजा केली जाते. त्याच्या मृत्यूनंतर देखील त्याच्या समाधीची मोठ्या भक्तिभावाने पूजा केली जाते. ज्या शरीराने सद्गुरूकडून ज्ञान प्राप्त करून घेतले, जे शरीर इतरांना ज्ञानप्राप्तीसाठी साहाय्यक ठरले ते शरीर आपण इतरासारखे कुठेही जाळून-पुरून टाकत नाही; तर त्याला आदरपूर्वक एका स्थानी विधियुक्त समाधी देतो. केवळ सद्गुरूलाच नव्हे तर ज्याच्या गळ्यात शिवलिंग आहे त्याचे देखील दहन केले जात नाही. ज्याने आयुष्यभर शिवलिंग आपल्या अंगावर धारण केले,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिवमंत्राचा जप केला अशा शिवभक्ताची देखील समाधिक्रिया केली जाते. जशी एखाद्या सत्पुरुषाची केली जाते त्याप्रमाणे.

शरीराला मंदिर मानले जाते. ज्या शरीरावर सद्गुरूने मंत्रपूर्वक लिंगधारण केलेले असते ते शरीर एखाद्या मंदिराप्रमाणे पवित्र असते. एखाद्या मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना केल्यानंतर त्या मंदिराभोवती प्रदक्षिणा केली जाते, त्याप्रमाणे सद्गुरूभोवती देखील प्रदक्षिणा करावी असे शास्त्रात म्हटले आहे. मंदिराला जेवढे महत्त्व असते त्यापेक्षाही अधिक महत्त्व सद्गुरूच्या शरीराला असते. सद्गुरूचे शरीर म्हणजे चालते बोलते मंदिरच होय. त्याप्रमाणेच ज्याने शरीरावर लिंगधारण केले आहे आणि जन्मभर शिवभक्ती केली आहे अशा शिवभक्ताचे शरीर देखील मंदिराइतकेच पवित्र मानले जाते. एखादे मंदिर भग्न झाले अथवा मूर्तिविहीन झाले तर ते जसे जाळले जात नाही त्याप्रमाणे. ज्या शरीराच्या द्वारा आत्मकल्याण आणि समाजकल्याण झाले अशा योग्याचे शरीर समाधिक्रिया करून एक प्रकारे सुरक्षित ठेवले जाते, ते जाळून नष्ट केले जात नाही.

निष्कलो हि महादेवः परिपूर्णः सदाशिवः ।
जगत्सृष्ट्यादिसंसिद्ध्यै मूर्तिमानेव भासते ॥ १६-४० ॥

सदाशिव हा परिपूर्ण, निष्कल (सर्वविकाररहित), सर्वव्यापक, कल्याणकारक असून जेव्हा सृष्टिनिर्मिती करायची असते तेंव्हा त्यालाही दिव्यदेह धारण करावा लागतो. त्याला शरीरधारण केल्याशिवाय सृष्टी करता येत नाही, तिचे पालन करता येत नाही आणि संहारही करता येत नाही. म्हणून शरीर सद्गुरूसाठी आणि सामान्य माणसासाठी देखील महत्त्वाचे आहे.

ब्रह्माद्या देवताः सर्वा मुनयोऽपि मुमुक्षवः ।
कायवन्तो हि कुर्वन्ति तपः सर्वार्थसाधकम् ॥ १६-४१ ॥

ब्रह्मादी देवता आणि मुक्तीची इच्छा करणारे सर्व महर्षी यांना तपश्चर्येसाठी शरीराचाच अत्यंत उपयोग होतो. शरीराशिवाय त्याला देखील कोणतीही साधना करता येत नाही.

या स्थलाचा समारोप करताना शेवटी सांगतात -

तपो हि मूलं सर्वासां सिद्धीनां यज्जगत्त्रये ।
तपस्तत्कायमूलं हि तस्मात् कायं न सन्त्यजेत् ॥ १६-४२ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राकाम्य, ईशत्व, वशित्व इत्यादि अनेक सिद्धींचे वर्णन योगशास्त्रात केलेले आहे. यातली एखादी सिद्धी जरी कुणाला प्राप्त करून घ्यायची असेल तर ते तपश्चर्येविना शक्य नाही. तपश्चर्येशिवाय अलौकिक सिद्धींची प्राप्ती होत नाही. बऱ्याचदा वरवर सामान्य दिसणाऱ्या माणसांच्या ठिकाणी अलौकिक सिद्धीचे वास्तव्य असते परंतु त्यापाठीमागे त्याची तपस्या असते याची आपल्याला कल्पना नसते. तपश्चर्या हे सर्व सिद्धींचे कारण आहे आणि तपश्चर्येसाठी शरीर कारणीभूत ठरते. शरीरच नसेल तर तपश्चर्या कशी करणार ?

तुमच्यापैकी पुष्कळ जण अनुष्ठान करण्यासाठी, सत्संग करण्यासाठी, तपस्या करण्यासाठी या पवित्र काशीक्षेत्रात आले आहेत. तपश्चर्या कुठेही करता येते, परंतु जेव्हा ती एखाद्या क्षेत्रात केली जाते तेव्हा शतपटीने फलदायक होते. ज्या ठिकाणी अनेक महापुरुषांनी तपस्या केलेली असते त्या ठिकाणी बसल्यावर रजोगुणी मनुष्याचे मन देखील सात्त्विक होते. महर्षींच्या आश्रमात परस्परभिन्न प्रवृत्तींचे पशू - गाय, सिंह, साप, मुंगूस - देखील एकत्र वावरल्याचे वर्णन आपण ग्रंथात वाचतो. महर्षींच्या तपस्येमुळे तेथील वातावरणात मैत्री, करुणा इत्यादी भावना पसरलेल्या असतात, हाच याचा अर्थ होय. महर्षींच्या ठिकाणी असलेल्या सात्त्विक वृत्तीमुळे इतर प्राण्यांतही सात्त्विकतेचा उदय झालेला असतो. हे तपश्चर्येचे परिणाम होत. परंतु तपश्चर्येला शरीर हेच मूळ कारण असते. शरीराचे असे महत्त्व असल्यामुळे कोणीही जाणून बुजून त्याचा त्याग करू नये अर्थात् देह सोडू नये. ज्ञानप्राप्तीनंतर देखील ज्ञानी पुरुषाने प्रारब्धकर्म संपेपर्यंत देहाचे रक्षण करावे आणि लोकोद्धारासाठी त्याचा उपयोग करावा. देह हा आत्मा नव्हे हे खरे असले तरी आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी देहाची आवश्यकता असते आणि ज्ञानप्राप्तीनंतर लोककल्याणासाठी त्याचा सदुपयोग करता येतो हे ध्यानात घेऊन साधकांनी आणि ज्ञानी पुरुषांनी आपल्या देहाची निगा राखावी असे शास्त्रात म्हटले आहे, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी

३ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अकायस्थल..१

जिज्ञासू सद्भक्तांनो,

'सिद्धान्तशिखामणी'तील एकेका स्थलात मनुष्याच्या उन्नतीचा मार्ग दाखवला आहे. अनेक मजले असलेल्या इमारतीच्या छतावर जायचे असेल तर त्या इमारतीचे सर्व जिने चढावे लागतात. तेव्हा कुठे आपण छतावर पोहोचू शकतो. त्याप्रमाणे मुक्तीचे शिखर गाठण्यासाठी या ग्रंथात अनेक स्थले, आचार, विचार सांगितलेले आहेत. आत्मप्राप्तीसाठी शरीर एक साधन आहे. सर्व प्राण्यांच्या शरीरात मनुष्यशरीर श्रेष्ठ समजले जाते. 'भागवत' ग्रंथात 'काये'ला नौका असे म्हटले आहे. नौका अछिद्र आणि उत्तम असली तर तिच्यात बसून नदी आणि समुद्र पार करता येतो. संसार हा देखील एक सागरच आहे. संसारसागरातून प्रवास करताना शरीरनौकेला थोडादेखील धक्का पोहोचू नये अशी काळजी घेतली पाहिजे. शास्त्रविहित मार्गावर चालणारा सात्त्विक मनुष्यच आपली शरीरनौका सुरक्षित राखून तिच्याद्वारा मुक्ती प्राप्त करून घेऊ शकतो.

नाव तर आम्हाला मिळालेली आहे, परंतु ती सुरक्षित ठेवणे आपले कर्तव्य आहे. तुम्ही तिला छिद्र पाडत बसाल तर पाणी आत शिरून तुम्हाला ती तळाशी घेऊन जाईल, तारणार नाही. प्रत्येक जीवात्म्याला ही शरीररूपी नाव अनेकदा मिळाली आहे. परंतु तो तिला सारखी छिद्रे पाडत बसला आणि त्यामुळे स्वत: जन्मजन्मांतरात बुडत राहिला. मनुष्यदेह ही अमूल्य नौका आहे. ती मिळवण्यासाठी अगणित पुण्य वेचावे लागते. चौऱ्यांशी लक्ष योनींतून फिरता फिरता जीवात्म्याला जेवढे पुण्य गाठीशी बांधता आले ते सारे मनुष्यदेहरूपी नौका विकत घेण्यात खर्च झाले आहे. शरीराला केवळ सांभाळणे एवढेच काम नसून शरीराकडून पुढे देखील अधर्माचरण होऊ नये याकडेही लक्ष दिले पाहिजे. शरीराशिवाय मनुष्य क्रिया करू शकत नाही, भावना करू शकत नाही आणि ज्ञान देखील मिळवू शकत नाही. म्हणून ज्ञानोत्तर अवस्थेत देखील शिवयोग्याने आपले शरीर जतन केले पाहिजे, असे कालच्या आशीर्वचनात सांगितले आहे. त्या स्थलाचे नाव होते सकायस्थल. आज 'अकायस्थला'विषयी निरूपण करायचे आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शरीर धारण करून देखील जो अशरीरी होतो त्याला 'अकायस्थल' असे म्हणतात. मार्मिक रीत्या हे पुढील श्लोकात स्पष्ट केले आहे -

औपचारिकदेहित्वाज्जगदात्मत्वभावनात् ।
मायासम्बन्धराहित्यादकायो हि परः स्मृतः ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-४३)

या ठिकाणी तीन गोष्टी सांगितल्या आहेत. या तीन गोष्टी जर आपण आचरणात आणू शकलो तर शरीरात राहून देखील आपण अशरीरी होऊ. यालाच 'अकायस्थिती' असे म्हणतात. यामधील पहिली गोष्ट आहे 'औपचारिकदेहित्वात्'. ज्या शरीरात जीवात्मा राहतो त्या शरीरातले आपले वास्तव्य औपचारिक आहे असे त्याने मानावे. शरीर आपले सर्वस्व नाही, त्याचे कोडकौतुक करणे हेच आपल्या जीवनाचे परम लक्ष्य नाही. घरी अतिथी आला तर त्याचे तेवढ्यापुरते आतिथ्य करणे हा एक उपचार असतो. त्याप्रमाणे जीवात्म्याने शरीराशी केवळ औपचारिक संबंध ठेवावा, त्याच्याशी तादात्म्य होऊ नये. तुम्ही जर शरीराशी तादात्म्य झालात तर तुमच्या मनात शरीरभाव निर्माण होतो आणि अज्ञानी माणसासारखे वर्तन तुमच्याकडून घडू लागते.

दुसरी गोष्ट आहे 'जगदात्मत्वभावना'. हा सर्व प्रपंच म्हणजे शिवशक्तीचा विलास होय. प्रपंचातल्या कणाकणांत शिवशक्ती अवस्थित आहे. हा सर्व प्रपंच शिवापासूनच झाला आहे. म्हणून तो शिवस्वरूप आहे. साखरेची बाहुली केली तर ती दिसायला वेगळी दिसली तरी अंतर्बाह्य साखरच असते. महाराष्ट्रात गुढीपाडव्याला जसे साखरेचे हार करतात तसे कर्नाटकात काही प्रसंगी देविदेवतांच्या मूर्ती केल्या जातात. तबकात मूर्ती ठेवून देवीची आरती करतात. घरी आल्यावर ती साखरेची मूर्ती खाण्यासाठी मुले आपापसात भांडतात. मूर्ती रूपाने आणि आकाराने वेगवेगळ्या असतात. परंतु विकणारा मात्र त्या एकाच भावाने तराजूत तोलून देत असतो. मग ती ईश्वराची मूर्ती असेल, घोड्याची असेल अथवा मंदिराची असेल. घेणारा आपल्या पसंतीप्रमाणे मूर्ती विकत घेत असतो. कोणी देवाची, कुणी घोड्याची, कुणी माकडाची तर कुणी कशाची. वस्तुतः साऱ्या मूर्ती साखरेच्या असून त्यांच्यात एकाच प्रकारची गोडी असते. त्यांच्यामध्ये मूलतः कोणताही भेद नसतो त्याप्रमाणे हा सर्व प्रपंच शिव-शक्तीचा विलास होय. जड पदार्थ असो,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वृक्ष-वल्लरी असो, पशुपक्षी असो की मनुष्य असो, सर्व चराचर, दृश्य-अदृश्य सारा प्रपंच शिव-शक्तीचेच रूप आहे.

एवढे ज्ञान झाले की मनुष्य कुठल्याही वस्तूवर आसक्त होत नाही. तो सहज वर्तणूक करू लागतो. साखरेच्या मूर्तीसाठी मुले भांडण करतात, कुणी म्हणतो मला घोडा हवा, कुणी म्हणतो मला माकड हवे, तर कुणी म्हणतो मला माणूस हवा. त्यांचे भांडण पाहून मोठी माणसे मनाशी हसतात. कारण त्यांना माहीत असते की मूर्ती वेगळ्या असल्या तरी त्या साखरेच्याच आहेत. मुलांचे भांडण निरर्थक आहे. त्याप्रमाणे अज्ञानी माणसांच्या दृष्टीला प्रपंचात भेद दिसतो. परंतु ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीला मात्र विश्व शिवशक्तीचे स्वरूप आहे असा साक्षात्कार होत असतो. म्हणून तो जगताला परमात्मस्वरूप अर्थात् आत्मस्वरूप मानतो.

तिसरी गोष्ट आहे 'मायासंबंधराहित्य'. मायेच्या संबंधापासून जो दूर आहे असा जीवात्मा शरीरात राहात असला तरी तो 'अकाय' आहे. अर्थात कायेच्या स्वभावाचा, तिच्या गुणांचा त्याच्यावर थोडादेखील प्रभाव नसतो. मायेसंबंधी शास्त्रात खूप वर्णन केलेले आहे. तिची रूपे अनेक आहेत. कोणत्या रूपाने, कोणत्या प्रकारे ती मनुष्याला मोहात पाडील ते सांगता येत नाही. ती कोणत्या ना कोणत्या रूपात मनुष्यासमोर उभी राहते आणि त्याच्यावर आपली अधिसत्ता गाजवते. शिवभक्त रावण शिवाचे आत्मलिंग प्राप्त व्हावे म्हणून कठोर तपश्चर्या करीत होता. तेव्हा भगवान विष्णूंनी आपली मायाशक्ती त्याच्या ठिकाणी संचरवली. त्यावेळी प्रसन्न झालेल्या शंकराला रावणाने आत्मलिंग न मागता पार्वती मागितली. अशा अनेक कथांत मायेच्या जालाचे वर्णन केलेले आढळते. जेव्हा तुमच्यावरील मायेचा प्रभाव पूर्णपणे नष्ट होईल तेव्हाच तुम्हाला अकायस्थिती प्राप्त होईल.

कर्नाटकातील प्रसिद्ध शिवशरणी अक्कमहादेवीची कथा तुम्हाला माहीतच आहे. तिला जेव्हा मल्लिकार्जुनाचा साक्षात्कार झाला तेव्हा तिच्या ठिकाणी शरीरभाव उरला नाही. तिचा पती एक राजा होता. त्याच्या वागण्याची घृणा येऊन तिने त्याचा आणि राजवैभवाचा त्याग केला. ती जेव्हा बाहेर पडली तेव्हा तिच्या अंगावर एकही वस्त्र नव्हते. ती तशाच विवस्त्र स्थितीत कल्याणीला अनुभवमंटपात आली. अनुभवमंटपाचे अध्यक्ष अल्लमप्रभू होते. तिची विवस्त्र अवस्था पाहून त्यांना देखील आश्चर्य वाटले. परंतु तिच्या ठिकाणी शरीरभाव उरलाच नव्हता. त्यामुळे माझे शरीर विवस्त्र आहे, ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वस्त्रांनी झाकले पाहिजे अशी जाणीवच तिला नव्हती. ज्याची काय 'प्रसादकाय' होते तो शरीरात राहून देखील असा 'अकाय' झालेला असतो. शरीरावरील ममत्व नष्ट होऊन ते भगवंताला अर्पण केले तर ते 'प्रसादकाय' होते. मंदिरात जाऊन देवाला पदार्थ अर्पण केले म्हणून तेच प्रसाद होतात असे नव्हे, तर वीरशैवसिद्धान्तात सर्व काही प्रसाद होऊ शकते. तुमचे शेत प्रसाद होऊ शकते, तुमच्या साऱ्या वस्तू देखील प्रसाद होऊ शकतात. जे जे काही तुम्ही भगवंताला अर्पण कराल ते ते सारे प्रसाद होईल. बसवेश्वरांनी मार्मिक शब्दांत म्हटले आहे -

'कूडलसंगमदेवरनु वलिस बंद प्रसादकायवनु केडिसलागदु'

भगवंताच्या प्राप्तीसाठी जे शरीर प्राप्त झाले आहे ते 'प्रसादकाय' होय, असे बसवेश्वरांनी म्हटले आहे. ज्यासाठी हे शरीर मिळाले आहे त्याच कामी ते लावले पाहिजे असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले आहे. म्हणून ज्याचे शरीर प्रसादकाय होते तो कायेत राहून देखील 'अकाय' होतो. आपले शरीर आपले नसून भगवंताचे आहे अशी ज्याची भावना दृढ होते तो 'अकाय' होतो. हेच तत्त्व अधिक स्पष्ट शब्दांत सिद्धरामेश्वरांनी सांगितले आहे. निर्देह्याला देह समर्पण केल्यावर देही देखील निर्देही बनतो, असे त्यांनी म्हटले आहे. निर्गुण निराकार परमात्मा निर्देही आहे. त्याला जो शरीर अर्पण करतो तो 'काय' असून देखील 'अकाय' होतो. त्याच्या शरीराकडून कर्मे तर घडतातच, परंतु 'कर्मे मी करीत आहे' अशी भावना त्याच्या ठायी नसते. सर्व प्रपंच परमात्म्याचाच आहे. कर्मे तर आपल्याला करावीच लागतात. परंतु ती करताना हे काम आपल्यावर सोपवलेले आहे, आपल्याला ते सेवाभावाने करावे लागेल, अशी भावना ठेवली पाहिजे. असा मनुष्य संसारात राहून देखील असंसारी होईल. 'काये'त राहून देखील त्याला 'अकाय' स्थिती प्राप्त होईल. त्याचे जीवन विलक्षण असते.

ज्याच्या गृहात चिंतामणी रत्नाचे वास्तव्य असते तो ज्याचे चिंतन करील ते त्याला प्राप्त होते, ज्याच्या हातात कल्पवृक्ष असतो, तो ज्याची इच्छा करील ते त्याला त्वरित मिळेल. धनपती कुबेर ज्याचा दास असतो त्याला धनाची चिंता नसते. मायाबंधनापासून मुक्त झालेल्या आणि भगवंताला पूर्ण समर्पित झालेल्या मनुष्याची स्थिती अशीच असते. अशा मनुष्याच्या पायदळी स्वर्ग असतो, त्याच्या हातात सर्व सिद्धींचे वास्तव्य असते आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तो भगवद्रूपच झालेला असतो. 'अकाय' स्थलातील पुरुषाचे शरीर भगवंताच्या मूर्तीसारखे पूजनीय मानले जाते.

> परस्य देहयोगेऽपि न देहाश्रयविक्रिया ।
> शिवस्येव यतस्तस्मामदकायोऽयं प्रकीर्तितः ॥ १६-४४ ॥

भगवान शिव अनेक मूर्ती धारण करून लीला करतात, परंतु त्यांना कोणत्याही विकारांचा लेप लागत नाही. त्याप्रमाणे 'काये'त राहणारा 'अकाय' जीवात्मा 'काये'च्या गुणांपासून आणि विकारांपासून मुक्त असतो. 'काय' 'माये'ला समर्पित केले तर 'सकाय' गेते आणि 'मायी'ला समर्पित झाले तर ते 'अकाय' होते. माया ही परमात्म्याची एक विलक्षण शक्ती असून तिच्या साहाय्यानेच प्रपंचाची निर्मिती होते. ज्याचे शरीर मायेला अर्पित असते तो तिच्या जाळ्यात फसतो आणि जन्मजन्मांतरातून भटकत राहतो. परंतु ज्याचे शरीर 'मायी'ला, मायेच्या पतीला अर्थात् परमात्म्याला समर्पित असते त्याच्यावर मायाजालाचा प्रभाव पडत नाही.

जे मला शरण येतात ते 'माये'मधून मुक्त होतात, असे भगवंतांनी गीतेत म्हटले आहे. जे भगवंताला शरण न जाता केवळ मायेपासून मुक्त होण्याचा प्रयत्न करतात ते अधिकाधिक मायाजाळात गुंतत जातात. जो भगवंताच्या जवळ जातो तो मायेपासून मुक्त होतो आणि जो भगवंतापासून दूर जातो तो मायेच्या तावडीत सापडतो. मायेला समर्पित होणे म्हणजे मायाजालात फसून 'काय'वान होणे होय, तर 'मायी'ला म्हणजे परमात्म्याला समर्पित होणे म्हणजे मायाजालातून मुक्त होऊन 'अकाय' होणे होय. शरीरात राहून देखील शरीरांच्या विकारांपासून मुक्त राहून कसे 'अकाय' होता येते याचा विचार येथपर्यंत केला. याचा अधिक विचार उद्याच्या आशीर्वचनात करू, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
४ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अकायस्थल..२

जिज्ञासू सद्भक्तांनो,

काशीला ज्ञानाची खाण असे म्हटले जाते. तुलसीदास म्हणतात –

'ज्ञान खाण अघहानिकर जहं बस संभुभवानी'

प्रपंचातील सर्व प्राणिमात्रांची पापे नष्ट करून त्यांना ज्ञान प्रदान करण्यासाठी शंकर-पार्वती येथे निवास करतात. येथे भगवान विश्वनाथ सर्वांना मंत्रोपदेश देतात तर भगवती अन्नपूर्णा सर्वांना भिक्षा वाढते. ज्ञानसंपादन करण्यासाठी साधकाला जे हवे असते ते सारे येथे मिळते. जो काशीक्षेत्रात वास्तव्य करून अधिकाधिक साधना करतो त्याला अधिकाधिक ज्ञान मिळून त्याची सर्व पापे नष्ट होतात. मोक्षदायक सप्तपुऱ्यांमध्ये काशी सर्वश्रेष्ठ मानली जाते. काशी सोडून अन्य सहा मोक्षपुऱ्या आहेत. तप:साधना करताना साधकाला मृत्यू आला तर त्याला पुढील जन्म काशीत मिळतो आणि काशीत तपश्चर्या करून तो मुक्त होतो, असे काशीचे माहात्म्य आहे.

'एषां क्वापि गतिर्नास्ति तेषां वाराणसी गति:'

ज्यांना अन्य ठिकाणी मुक्ती मिळत नाही त्यांना काशीत मुक्ती मिळते. सर्व जगताचे गुरू भगवान शिव येथे निवास करतात आणि भक्तांना ज्ञान प्रदान करतात. म्हणून अन्य क्षेत्रांपेक्षा काशीक्षेत्राचे महत्त्व विशेष आहे. अशा पवित्र काशीक्षेत्रात सुरू असलेल्या या ज्ञानसत्रात 'सिद्धान्तशिखामणी'तील सूक्ष्म स्थलांचा आपण विचार करत आहोत. परशिवाशी समरस झाल्यावर ज्याला परावस्था प्राप्त झाली आहे असा जीवन्मुक्त देहधारी असूनही विदेही असतो, 'काये'सोबत त्याचा संबंध असूनही तो 'अकाय' असतो. भगवान शिव अनेक मूर्ती आणि दिव्यदेह धारण करतात तरी ते देहाच्या विकारांपासून मुक्त असतात. त्याप्रमाणेच शिवाशी समरस झालेला जीवन्मुक्त ज्ञानी पुरुषदेखील देहात असूनही देहाच्या विकारांपासून मुक्त असतो. कामक्रोधादी षड्रिपू हे मनुष्यदेहात नांदणारे विकारच होत. त्यांच्याविषयी शास्त्रकारांनी खूप विचार केलेला आहे. एखाद्या अशक्त माणसाला क्रोध आला तर तो समोर उभ्या असलेल्या आडदांड माणसाच्या गालफडात एक ठेवून देतो आणि नंतर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच्या मनात विचार येतो की आपल्या अशक्त देहात एवढी ताकद कोठून आली? काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर यांच्यात एवढी ताकद कशी येते? तेवढी भक्तीत का बरे येत नाही? आपण ईश्वराची भक्ती देखील करतो, परंतु आपल्या ठिकाणी असलेल्या कामात आणि क्रोधात जेवढे सामर्थ्य आहे तेवढे आपल्या भक्तीत नसते. भक्ती ही एक मानसिक वृत्ती आहे, त्याप्रमाणे क्रोध देखील एक मानसिक वृत्तीच आहे. मग क्रोधात जेवढे सामर्थ्य आहे तेवढे भक्तीत का नाही?

यावर शास्त्रकारांनी चिंतन करून निर्णय दिला आहे. मनाच्या अनेक वृत्ती आहेत. परंतु जेव्हा क्रोध येतो त्यावेळी मनाच्या इतर वृत्ती तटस्थ होतात आणि शरीरातील समस्त ऊर्जा क्रोधाच्या दिशेने एकवटली जाते. ज्ञानेंद्रियांतून आणि कर्मेंद्रियांतून शरीरातील ऊर्जा सतत बाहेर वाहात असते. एखाद्या वीजकेंद्रातील वीज वेगवेगळ्या विद्युत्वाहिन्यांतून वाहात असते तशी. जेव्हा मनुष्याला क्रोध येतो तेव्हा ऊर्जेची अन्य दारे बंद होऊन ती संपूर्णपणे क्रोधाला मिळते. त्यावेळी क्रोध मोठ्या भयानक रूपात प्रकट होतो आणि त्याच्या हातून अघटित असे घडते.

परंतु मनुष्य जेव्हा ईश्वराचे भजन करायला बसतो, पूजन अथवा ध्यान करायला बसतो तेव्हा मात्र ही ऊर्जा एकवटत नाही. भक्ती करताना काही महापुरुषांच्या बाबतीत मात्र शरीरातील सर्व ऊर्जा एकवटते आणि त्यांची अत्यंत वेगाने आध्यात्मिक प्रगती होते. हजारो मनुष्यांमधला एखादाच मनुष्य असा असतो की ज्याची समग्र ऊर्जाशक्ती भक्तीत, ध्यानात एकवटते. आपण मात्र पन्नास-साठ वर्षांपासून पूजा, जप, ध्यान करत असलो तरी आपली यत्किंचितही प्रगती होत नाही. याचे कारण आपल्या समग्र चित्तवृत्ती एकवटत नाहीत हे होय. ज्ञानमार्गात, भक्तिमार्गात फार कमी लोक जातात. बहुतेक माणसे कामक्रोधादी विकारांत आपल्या शरीरातील सर्व ऊर्जा खर्च करत असतात. म्हणून येथे म्हटले आहे - 'देहाश्रयविक्रया'. शरीरापासून होणारे कामक्रोधादी विकार जोपर्यंत आपण परशिवाशी एकरूप होत नाही तोपर्यंत आपल्यावर प्रभाव गाजवतात. म्हणून प्रत्येक मनुष्याला सदोदित जागृत राहिले पाहिजे.

सौभर्य नामक ऋषी पाण्यात बसून तपश्चर्या करत असत. त्यांनी जलस्तंभिनी विद्या संपादन केली होती. एकदा त्यांनी पाण्यात माशांची कामक्रीडा पाहिली. त्यावेळी त्यांच्या मनात विचार आले की, आपण आपले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सारे आयुष्य तपश्चर्येसाठी वेचले, आता आपण वृद्ध झालो आहोत, परंतु पाण्यातील हे क्षुद्र मासे जो आनंद उपभोगतात त्या आनंदाचा एक क्षण देखील आपल्या वाट्याला आला नाही. आपल्या तपश्चर्येला काही अर्थ नाही.

असा विचार करून सौभर्य ऋषी उठले आणि त्या देशाच्या राजाकडे, राजा मान्धाताकडे गेले. वार्धक्यामुळे थकलेले शरीर, शुभ्र दाढी, मिशा आणि जटा, चेहऱ्यावर पडलेल्या सुरकुत्या असे ऋषींचे रूप होते. दरबारात आल्यावर राजाने त्यांचे स्वागत केले, आदर सत्कार केला. त्यांची इच्छा विचारली तेव्हा ऋषी म्हणाले,

'हे राजा, मला लग्न करायचे आहे. तुला अनेक मुली आहेत. त्यांपैकी एका मुलीशी माझा विवाह लावून दे .

राजाला आश्चर्य वाटले. तो म्हणाला,

'महाराज, आपण आता वृद्ध झालात. या वयात लग्न करण्याची इच्छा आपल्या मनात कशी निर्माण झाली? आपले थकलेले शरीर लग्न करण्यासाठी योग्य नाही हे आपण ध्यानात घ्यावे.'

'राजा', ऋषी म्हणाले, 'तुला त्याच्याशी काय करायचे आहे? तुझ्या मुलींना येथे बोलाव. त्यांच्यापैकी एकीची मी निवड करतो तिच्याशी माझे लग्न लावून दे.'

राजाला 'नाही' म्हणणे शक्य नव्हते. त्याने नकार दिला असता तर ऋषींनी शाप देऊन त्याचे काही वाईट केले असते. तेव्हा तो सावधगिरीने म्हणाला,

'महाराज, मला पन्नास कन्या आहेत. त्यांना मी येथे बोलावतो. त्यांच्यापैकी जी आपल्याला पसंत करील तिच्याशी मी आपले लग्न लावून देईन.'

ऋषींनी राजाची अट मान्य केली. राजाने आपल्या सर्व कन्यांना दरबारात बोलावले आणि ऋषी कोणाला पसंत आहेत ते विचारले. ऋषींचे थकलेले शरीर आणि एकूण रूप पाहून एकाही मुलीने त्यांना पसंत केले नाही. ऋषींना हे खटकले. मग त्यांनी आपल्या तप:सामर्थ्याने अत्यंत राजबिंडे असे रूप धारण केले. त्यांचे देखणे रूप पाहून राजाच्या सर्व कन्यांनी त्यांना पसंत केले आणि त्यांच्याशी विवाह करण्याची इच्छा प्रकट केली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ऋषींच्या आणि कन्यांच्या इच्छेपुढे राजाचे काही चालले नाही. त्याने आपल्या सर्व मुलींचा विवाह ऋषींशी लावून दिला. ऋषींनी आपल्या पत्न्यांसोबत विविध प्रकारे क्रीडा केली. त्यांना त्यांच्यापासून खूप संतती झाली. त्यानंतर ऋषी आपल्या मनाशी विचार करू लागले की, इतके भोग भोगूनही आपले मन प्रारंभी जसे होते तसेच उपाशी आहे.

कितीही भोग भोगले तरी मनाचे समाधान होणे शक्य नाही. शरीरातील कामक्रोधादी रिपूंना त्यांचे विषय अनंत काळ भोगायला दिले तरी त्यांची भूक कधीही भागणार नाही. म्हणून संयमाने आणि त्यागभावनेनेच त्यांच्यावर मात केली पाहिजे, त्यांना जिंकले पाहिले. असा विचार केल्यावर त्यांनी आपल्या पत्नी-पुत्रांना समोर बसवून ज्ञानोपदेश केला आणि त्यांना मुक्त करून स्वतःही मुक्ती मिळवली.

कोणाच्या मनात कधी कोणती विकृती उत्पन्न होईल हे सांगता यायचे नाही. म्हणून मनुष्याने सदैव सावध, सजग राहिले पाहिजे. जो आपली मानसिक वृत्ती भगवंताच्या ठायी स्थिर करतो तो कामक्रोधादी विकृतींपासून दूर राहतो. तो शरीरात राहून देखील शरीराभिमान नसल्यामुळे 'अकाय' असतो.

परलिङ्गे विलीनस्य परमानन्दचिन्मये ।
कुतो देहेन सम्बन्धो देहिवद्भासनं भ्रमः ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-४५)

ज्याची वृत्ती परशिवब्रह्मात विलीन झाली आहे आणि ज्याला परलिंगाची प्राप्ती होत आहे त्याचा शरीराशी संबंध राहत नाही. पाण्यात राहाणाऱ्या कमळासारखा. त्याच्या पाकळीवर पाण्याचा थेंब पडला तरी थेंब ते शोषून घेत नाही. जलात राहूनही ते जलापासून अलिप्त असते. त्याप्रमाणे शरीरात राहून देखील शिवयोग्याचा शरीराशी संबंध नसतो. तो शरीरापासून अलिप्त असतो. 'काय'धारी असूनही 'अकाय' असतो. ज्ञानी पुरुष देहधारी असल्यामुळे ते देखील आपल्यासारखेच आहेत असा सामान्य माणसांचा समज असतो. ज्ञानी पुरुष बहिरंगाने सर्वसामान्यांसारखा दिसत असला तरी अंतरंगाने त्यांच्यापेक्षा भिन्न असतो. बहिरंगापेक्षा अंतरंगच अधिक महत्त्वपूर्ण असते. आपले शरीर कुठल्या ठिकाणी आहे यापेक्षा आपले मन कुठल्या ठिकाणी आहे ते अधिक महत्त्वाचे असते. तुमचे शरीर काशीत आहेत आणि तुमचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मन घरी असेल तर तुम्ही काशीत असून देखील घरी आहात आणि तुमचे शरीर घरात आहे परंतु तुमचे मन जर काशीत असेल तर घरी असून देखील तुम्ही काशीत आहात. मनुष्याच्या मानसिक स्थितीवरून त्याचे मूल्यमापन केले जाते, त्याच्या शारीरिक स्थितीवरून नव्हे. ज्ञानी पुरुष शरीरात राहून सर्व व्यवहार करतो, परंतु तो शरीरापासून अलिप्त असतो. तो शरीरधारी आहे हा सर्वसामान्य माणसांचा एक भ्रम असतो.

देहाभिमानहीनस्य शिवभावे स्थितात्मन: ।
जगदेतच्छरीरं स्याद् देहेनैकेन का व्यथा ॥ १६-४६ ॥

मी शरीर आहे असा देहाभिमान ज्याने सोडला आहे, मी शरीरापेक्षा वेगळा आहे, शरीर हे भोगायतन आहे, असा भाव ज्याच्या मनात दृढ झाला आहे आणि ज्याचे मन शिवात विलीन झाले आहे त्याच्या दृष्टीने समग्र प्रपंच हेच एक शरीर असते. तो केवळ आपल्या एका शरीरात राहात नसतो तर प्रपंचातल्या सर्व शरीरात त्याचे वास्तव्य असते. ममत्वापासून मुक्त होण्याचे दोन मार्ग शास्त्रकारांनी सांगितले आहेत. ममत्व सोडून देणे हा एक आणि ममत्व सोडता येत नसेल तर ते समग्र विश्वाएवढे व्यापक करणे, वाढवणे हा दुसरा मार्ग. तुमचे ममत्व जर प्रपंचाला व्यापून राहिले तर तुम्ही परमात्मस्वरूपच व्हाल. परमात्मा आणि आपण यामध्ये एवढाच फरक आहे. आपण केवळ आपल्या घरालाच स्वत:चे घर मानतो, परंतु परमात्म्याच्या दृष्टीने प्रपंचातील समस्त घरे त्याचीच असतात. हे घर माझे, हे घर दुसऱ्याचे असा भेद त्याच्या ठिकाणी नसतो. जीवात्म्याच्या ठिकाणी व्यष्टिभावना असते तर परमात्म्याच्या ठिकाणी समष्टिभावना असते. एखाद्या दुकानात जाऊन एका ताग्यातून तुम्ही शर्टसाठी कापड विकत घेतले, ते शिवून अंगात घातले. जर त्या दुकानात आग लागली आणि इतर कापडांबरोबर ज्या ताग्यातून तुम्ही कापड घेतले तो तागाही भस्म झाला तर तुम्हाला दु:ख होत नाही. आपले शर्ट सुरक्षित आहे, ते जर जळाले नाही तर बस झाले; असे तुम्ही समाधान मानता. यालाच व्यष्टिभाव म्हणतात. परंतु संपूर्ण दुकान जळाल्यामुळे दु:ख होणे याला 'समष्टिभाव' म्हणतात. केवळ आपल्या शरीरालाच स्वत:चे न मानता प्रपंचातील सर्व शरीरांना स्वत:चे मानतो म्हणून तो शरीरात असून देखील अशरीरी होय.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिवज्ञानैकनिष्ठस्य नाहंकारभवभ्रमः ।
न चेन्द्रियभवं दुःखं त्यक्तदेहाभिमानिनः ॥ १६-४७ ॥

अहंकाराशी युक्त होऊन जीवात्मा जेव्हा इंद्रियांच्या द्वारा व्यवहार करतो तेव्हा त्याला दुःख भोगावे लागते. आपण केलेल्या कार्याबद्दल 'हे मीच केले' असा जो अहंभाव त्याला 'अहंकार' म्हणतात. कार्यामागील प्रेरकशक्ती परमात्म्याची असते, जीवात्म्याची नसते. परमात्म्याच्या प्रेरणेशिवाय गवताचे पाते देखील हलत नाही. तोच प्रत्येकाच्या हृदयात राहून शरीररूपी यंत्र चालवीत असतो. ज्याच्या प्रेरणेने सर्व व्यवहार चालतो त्याला आपण विसरतो आणि म्हणतो की हे सर्व मीच करत आहे. घोड्यावर बसलेल्या मनुष्याने घोड्याला ओझे होऊ नये म्हणून आपले सामान डोक्यावर घेतले आणि तो जर म्हणाला, 'मी पण घोड्यावर बसायचे, माझे सामान पण घोड्यावर लादायचे. मग घोड्याला ओझे होणार नाही काय? घोड्याला ओझे होऊ नये म्हणून मी माझे सामान डोक्यावर घेऊन घोड्यावर बसलो आहे' तर त्याला तुम्ही आम्ही हसू. कारण त्याने युक्तिवाद केलेला असला तरी त्याचे स्वतःचे ओझे तर घोड्यावर आहेच. परंतु त्याने डोक्यावर घेतलेल्या सामानाचेही ओझे डोक्यावरच आहे; ही वस्तुस्थिती आहे. आपले सारे ओझे खरे तर परमात्माच वाहात असतो. परंतु आपण मात्र म्हणत असतो - मी नसलो तर कसे होणार?

तुमच्यासारखे कित्येक लोक आले आणि गेले, परंतु जगाचा कारभार चाललेलाच आहे. तुमचा बाप गेला, आजा गेला, पणजोबा गेला, खापरपणजोबा गेला. तरीही जग आपल्या गतीने चाललेलेच आहे. उद्या तुम्ही जाल, तुमचा मुलगा जाईल, मुलाचा मुलगा जाईल. तरी या जगाचे काही बिघडणार नाही. जग चालतच राहील. म्हणून एखादे कार्य करीत असताना 'हे मी करीत आहे' अशी भावना न ठेवता 'माझ्याकडून हे कार्य करून घेतले जात आहे' अशी भावना ठेवावी. असे घडले तर तुमच्यावर कोणतेही ओझे पडणार नाही. परंतु अज्ञानी माणसे मात्र, अकारण घोड्यावर बसून डोक्यावर ओझे वाहणाऱ्या माणसाप्रमाणे, ओझे वाहतात.

'निश्चयेन तिष्ठतीति निष्ठाः' असा निष्ठा या शब्दाचा अर्थ आहे. मानसिक वृत्ती अत्यंत स्थिर होणे याला निष्ठा म्हणतात. स्वाती नक्षत्रातला पावसाचा थेंब शिंपल्यात पडला की मोती होतो. एकदा मोती झाल्यावर तो पुन्हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाणी होत नाही. त्याप्रमाणे एकदा तुमचे मन परमात्म्याच्या ठिकाणी स्थिर झाले तर ते किंचित्काल देखील दुसरीकडे वळत नाही. हीच निष्ठा होय. ज्याची निष्ठा परशिवावर असते त्याच्या मनात अहंकार उत्पन्न होत नाही. सारे काही त्याचेच आहे असे तो मानतो. 'नहि कुछ मेरा सब कुछ तेरा' अशीच भावना त्याच्या मनात असते. आपण मात्र असे म्हणत नाही. 'तेरा भी मेरा और मेरा भी मेरा' असे म्हणत असतो. शिवावर अत्यंत निष्ठा असल्यामुळे त्याच्या मनात अहंकाराची भावना उत्पन्न होत नाही. ज्याच्या ठिकाणी अभिमान नसतो त्याला दुःख भोगावे लागत नाही. अभिमानी माणसाला सांसारिक सुखदुःखे भोगावी लागतात आणि निरभिमानी माणसाची त्यांच्यापासून सुटका होते. जोपर्यंत एखादी वस्तू आपली नसते तोपर्यंत तिच्याविषयी आपल्या मनात अभिमान नसतो. जेव्हा ती आपली होते तेव्हा तिच्या विषयीचा अभिमान आपल्या मनात दृढमूल होतो. तिला थोडाही धक्का पोहोचला तर आपल्याला दुःख होते. जर त्या वस्तूविषयी तुमच्या मनात अभिमान नसेल तर तिचे काहीही बरे वाईट झाले तरी तुम्हाला सुख-दुःख होणार नाही.

अज्ञानी माणसे अभिमानी असल्यामुळे त्यांच्या इंद्रियांच्या व्यवहारामुळे त्यांना सुख अथवा दुःख भोगावे लागते. ते सुख-दुःखातच कायमचे गुंतलेले असतात. परंतु ज्ञानी मात्र निरभिमानी असल्यामुळे सुख-दुःखांपासून मुक्त असतो. आपले नाव गाव घेऊन जर कुणी शिवी दिली तर आपल्याला राग येतो. कारण नावाच्या आणि गावाच्या ठिकाणी आपण अभिमान धरलेला असतो. जन्मानंतर काही दिवसांनी आपल्याला एक नाव दिलेले असते. त्याच्या आधी आपल्याला कोणते नाव असते? तुम्हाला ठेवलेले नाव हे तुमचे एकट्याचेच थोडे असते? तेच नाव इतर हजारो लोकांचेही असते. जन्मानंतर तुमचे जे नाव असते आणि मृत्यूनंतर जे नाव राहात नाही त्या नावाविषयी जर अभिमान धरला तर सांसारिक दुःखे भोगल्यावाचून गत्यंतर नाही. शरीराचा अभिमान सुटला की ऐहिकाचा संबंध तुटतो. स्थूलशरीराचा अभिमान सोडला तर इहलोकांशी आपला संबंध सुटतो आणि सूक्ष्मशरीराचा अभिमान सोडला की परलोकांशी असलेला संबंध सुटतो. म्हणून निरहंकार होणे हे सुखाचे एक साधन होय. या अकायस्थलाचा पुढील श्लोकात समारोप करतात -

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

न मनुष्यो न देवोऽहं न यक्षो नैव राक्षसः ।
शिवोऽहमिति यो बुद्ध्यात् तस्य किं देहकर्मणा ॥ १६-४८ ॥

आपल्या हृदयात वास्तव्य करणारा आत्मा मनुष्य, देव, राक्षस किंवा यक्ष नाही. त्या आत्म्याला वेढणारे शरीर मात्र मनुष्याचे असेल, देवाचे असेल, राक्षसाचे असेल किंवा यक्षाचे असेल. शरीर वेगळे आहे आणि 'शरीरी' म्हणजे शरीर धारण करणारा आत्मा वेगळा आहे. आत्मा शिवरूप आहे. परमात्मस्वरूप असा आत्माच आपले खरे स्वरूप आहे. बाह्य शरीर म्हणजे आपण नव्हे असे ज्याला ज्ञान होते त्याला शरीराकडून घडलेल्या कर्मांची बाधा होत नाही. अशा प्रकारे ज्ञानी मनुष्य शरीरात राहून अशरीरी, 'काये'त राहून 'अकाय' असतो. शरीरात राहून देखील शरीराचा अभिमान सोडून अशरीरी कसे होता येते, याचे सुरेख प्रतिपादन अकायस्थलात केलेले आहे. याचे प्रत्येकाने मनन करावे, निदिध्यास करावा आणि कायेत राहून देखील 'अकाय' होण्याचा प्रयत्न करावा, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
५ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परकायस्थल..१

जिज्ञासू सद्भक्तांनो,

तुम्ही काशीक्षेत्रात राहून या ज्ञानसत्राचा लाभ घेत आहात. संसार असार आहे असे ज्ञानी पुरुष मानतात, परंतु या असार संसारातही त्यांनी काही सार शोधून काढले आहे.

'असारे खलु संसारे सारमेतत् चतुष्टयम् ।
काश्यां वास: सतां संग: गंगांभ: शिवपूजनम् ॥'

असार अशा प्रपंचात काशीवास, संतसहवास, गंगास्नान आणि शिवपूजा ही चार सारतत्त्वे आहेत. काशीत वास्तव्य करण्याचे भाग्य मिळाले तर गतजन्मांतील पुण्य फलप्रद झाले आहे असे समजावे. काशीत नुसते वास्तव्य करून उपयोग नाही. येथे संताचा संग घडला पाहिजे. एवढेच नव्हे तर येथे परमपावन गंगेत स्नान केले पाहिजे आणि क्षेत्राधिपती शिवाची पूजा केली पाहिजे. या चारही गोष्टी विधिवत् घडल्या तर जे अप्राप्य असते ते देखील प्राप्त होऊ शकेल. स्वत: कमावून भोजन करणे, कुणावरही क्रोध न करणे आणि कोणाची निंदा न करणे हे तीन नियम पाळले तरच काशीला वास्तव्य केल्याचे खरे पुण्य मिळते. हे नियम पाळून जो वर्षभर काशीत वास्तव्य करतो त्याला, सत्ययुगात एक सहस्र वर्षे तपस्या केल्यावर जे पुण्य मिळते, तेवढा पुण्यलाभ होतो.

तुलसीदासांचे काशीत वास्तव्य होते. ते नित्य गंगास्नान करीत. भिक्षा मागून जी कोरडी भाकरी मिळत असे तिचा नैवेद्य ईश्वराला दाखवून ती प्रसाद म्हणून खात. श्रीराम ही त्यांची इष्टदेवता होय. प्रतिदिवशी ते नऊ लक्ष मंत्रजप करत असत असे सांगतात. त्यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन एके दिवशी ईश्वर प्रकट झाले आणि म्हणाले,

'तुलसीदासा, रोज तुझी कोरडी भाकरी खाऊन फार कंटाळा आला. तिच्या सोबत तोंडी लावायला भाजी नसते की लोणचे. भाजी तर सोडाच पण त्यात मीठ देखील नसते.'

तुलसीदासाला हे ऐकून क्रोध आला. असे म्हणतात की त्यांनी रागाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ईश्वराच्या गालावर प्रहार केला आणि त्याला म्हणाले,

'तू एवढा रसिक केव्हापासून झालास? भक्ताला जे मिळेल तेच तो तुला देईल. त्याच्याजवळ जे नसते ते त्याला मागण्यात काय अर्थ आहे? मी तुझा उपासक नाही तर तुझ्या नामाचा उपासक आहे. मीठ नसलेली कोरडी भाकरी खायची असेल तर माझ्या घरात राहा, नाहीतर तुला दुसरीकडे कोठे जायचे असेल तेथे जा.'

भक्ताच्या ठिकाणी किती निष्ठा असते याचे हे उदाहरण आहे. कोरडी भाकरी खाऊन तुलसीदासांनी जे 'रामायण' लिहिले ते मात्र अमृतमय आहे. त्यांनी कोरडी भाकरी खाल्ली असेल परंतु त्यांच्या वाणीतून प्रकटलेले शब्द मात्र रसपूर्ण जणू अमृतात ओथंबलेले आहेत!

हे माहात्म्य आहे काशीवासाचे, तुलसीदासांच्या तपश्चर्येचे आणि त्यांनी केलेल्या नामजपाचे. म्हणून काशीत वास्तव्य करताना भोगविलासाची भावना दूर सारून संयमाने जीवन व्यतीत केले तर या असार संसारातील सार आपल्याला प्राप्त होईल. तुम्ही गंगास्नान करता, अनुष्ठान करता, शिवपूजन करता, सर्व सिद्धान्तांचा शिखामणी अशा 'सिद्धान्तशिखामणी' या ग्रंथावरील आशीर्वचनेही श्रवण करता. त्यामुळे तुम्हाला चतुर्विध सारांचा सहज लाभ होतो.

देहाभिमान नसल्यामुळे शरीरात राहून देखील ज्ञानी पुरुष अशरीरी असतो, 'अकाय' असतो, असे कालच्या आशीर्वचनात आपण ऐकले आहे. या अशरीरी अवस्थेच्या पलीकडे जी उन्नत अवस्था आहे तिच्यासंबंधी आज विचार करायचा आहे. आजचे जे स्थल आहे त्याचे नाव आहे परकायस्थल.

वशीकृतत्वात् प्रकृतेर्मायामार्गातिवर्तनात् ।
परकायोऽयमाख्यातः सत्यज्ञानसुखात्मकः ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-४९)

ज्याने परशिवब्रह्माचा आपल्या आत्मरूपात साक्षात्कार करून घेतला आहे त्याचे शरीर देखील परब्रह्मासारखे होते. अन्य शास्त्रांपेक्षा थोडा वेगळा विचार येथे मांडला आहे तो समजून घेतला पाहिजे. ज्याला परमात्म्याचा साक्षात्कार होतो त्याचा आत्मा परमात्मस्वरूप होतो असे सर्व शास्त्रे मानतात. येथे शैवाचार्य एक पाऊल अधिक पुढे गेले आहेत. परब्रह्मस्वरूप झालेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आत्मा ज्या शरीरात वास करतो ते शरीर देखील परब्रह्मस्वरूप झालेले असते, असे वीरशैवाचार्य म्हणतात. त्याचे कारण देखील येथे सांगितले आहे. ज्याला परब्रह्माचे ज्ञान झालेले आहे अशा ज्ञानी पुरुषाचे प्रकृतीवर स्वामित्व असते, प्रकृती त्याला वश असते, तो प्रकृतीच्या अधीन नसतो. मन, बुद्धी ही आपली प्रकृती आहे. अज्ञानी माणसावर मन-बुद्धीचा प्रभाव असतो. मन-बुद्धी सांगेल तसा तो वागतो. परंतु ज्ञान्यांच्या शरीरावर आत्म्याचे प्रभुत्व असते, मन-बुद्धीचे नसते. त्याचे मन-बुद्धीवर नियंत्रण असते. तो पाठवेल तेथे त्याचे मन जाते. मनाच्या मागे तो धावत नसतो. त्याची बुद्धी देखील उत्तम विचारांचाच अंगीकार करते. ज्ञानी पुरुष मायेच्या पलीकडे गेलेला असतो. त्याने सच्चिदानंदरूप अशा आत्म्याला जाणलेले असते. तो सच्चिदानंदरूपच झालेला असतो, म्हणून त्याचे शरीर देखील आत्म्याइतकेच पवित्र असते.

शरीर स्वभावतः अपवित्र असते असे शास्त्रे सांगतात. परंतु ते सतत आत्म्याच्या संपर्कात असल्यामुळे त्याच्यात पावित्र्य दृग्गोचर होते. आपण व्यवहारात पाहतो की नख, केस, रक्त यांचा शरीराशी संबंध सुटला तर ते अपवित्र मानले जातात. जी वस्त्रे आपण दिवसभर अंगावर घालतो ती दुसऱ्या दिवशी स्नान करण्याआधी उतरवून ठेवतो. स्नान केल्यावर त्या वस्त्रांना आपण स्पर्श देखील करत नाही. असे का? वस्त्रे तर आपलीच आहेत. ती आपणच अंगावर घातली होती मग त्यांना अपवित्र का मानायचे? तर त्यांचा शरीराशी संबंध सुटला म्हणून. जोवर ती शरीराशी जडलेली होती तोवर ती पवित्र होती. त्याप्रमाणे शरीर मूलतः अपवित्र असले तरी त्याचा आत्म्याशी संबंध असल्यामुळे ते पवित्र असते आणि आत्म्याशी संबंध असेपर्यंत ते पवित्र राहते. शरीरातून आत्मा एकदा निघून गेला की शरीर अपवित्र, अस्पर्श होते.

परंतु ज्या शिवयोग्याने आपल्या आत्मरूपात परशिवब्रह्माचा साक्षात्कार करून घेतला आहे त्याचे शरीर देखील आत्म्याइतकेच पवित्र असते, असे या ठिकाणी म्हटले आहे. आपल्या देशात संतमहात्म्यांच्या शरीरांचे पूजन करण्याची प्रथा यामुळेच पडली आहे. त्यांचा आत्मा जेवढा पवित्र आणि शुद्ध असतो तेवढेच त्यांचे शरीर देखील पवित्र आणि शुद्ध असते. अशुद्ध व्यक्तींना शुद्ध करण्याचे सामर्थ्य त्यांच्या शरीरात असते. अशा महापुरुषांच्या पायाची धूळ श्रद्धेने मस्तकावर धारण केली जाते. घरात धूळ साठली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर ती आपण केरसुणीने झाडून बाहेर फेकून देतो. परंतु संध्याकाळी गायी जेव्हा रानातून परत येतात तेव्हा त्यांच्या पावलांनी उडालेली धूळ पवित्र मानली जाते. ही धूळ अंगावर घेणे याला शास्त्रात 'वायव्यस्नान' म्हणतात. हा एक पवित्र मुहूर्त देखील मानला जातो. त्याला 'गो-रज मुहूर्त' म्हणतात. म्हणजे गायीच्या पावलांनी जेव्हा धूळ उडालेली असते ती वेळ, तो मुहूर्त. त्याप्रमाणे सद्गुरूंच्या पावलांची धूळ अत्यंत पवित्र मानली जाते. तिच्यामुळे शिष्याच्या ठिकाणी असलेला रजोगुण क्षीण होतो. रजोगुणापासूनच कामक्रोधादी विकार उत्पन्न होतात. साधना करून सत्त्वगुणाचा उत्कर्ष करून रजोगुण कमी करता येतो आणि श्रीगुरूंची पायधूळ (रजःकण) मस्तकी धारण करून सुद्धा रजोगुण नष्ट होतो. ज्याच्या जवळ रजोगुण किंचितही नसतो अशा सद्गुरूच्या पदरजाचा स्पर्श आपल्या शरीराला झाला तर देहातला रजोगुण नाहीसा होतो. आपल्या सिद्धान्तात असे म्हटले आहे की, केवळ गंगास्नान केल्याने तुम्हाला पुण्यलाभ होत नाही, तर श्रीगुरूचा पाय मस्तकावर घेऊन जेव्हा गंगास्नान कराल तेव्हाच तीर्थस्नानाचे पुण्यलाभ होते. अशा प्रकारे सद्गुरूचे शरीर आत्माइतकेच पवित्रतम मानले जाते.

ज्याचे शरीर परब्रह्मस्वरूप झाले आहे अशा ज्ञानी पुरुषाला 'परकायस्थली' म्हटले जाते.

परब्रह्मवपुर्यस्य प्रबोधानन्दभासुरम् ।
प्राकृतेन शरीरेण किमेतेनास्य जायते ॥ १६-५० ॥

ज्याचे शरीर परब्रह्मस्वरूप झाले असते त्याच्या शरीरात परब्रह्माइतके सामर्थ्य येते. म्हणून वेदांत म्हटले आहे - 'अयं मे हस्तो भगवत्तरः' तुमचे हात भगवंतस्वरूपच आहेत. जेव्हा भगवंताला तुमचे हात समर्पित होतात आणि भगवंताच्या कार्यात सहभागी होतात तेव्हाच तुमचे हात भगवत्स्वरूप होतील. म्हणून सकाळी उठल्याबरोबर सर्वप्रथम आपले हात पाहावे, असे शास्त्रे सांगतात - 'प्रभाते करदर्शनम्'. आपला हातच आपल्याला पुण्यात्मा किंवा पापात्मा बनवतो. तुमचे हात भगवंताला अर्पण केलें तर त्यांच्यात एवढे सामर्थ्य येते की एखादा संकल्प करून तुम्ही कोणाच्या मस्तकावर हात ठेवला तर त्याची कार्यसिद्धी होऊ शकते. ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याच्या मुखातून वेद वदवले ही कथा सर्वश्रुतच आहे. म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संतांकडे आपण जेव्हा जातो तेव्हा त्यांच्या पायावर डोके ठेवतो आणि त्यांचा वरदहस्त डोक्यावर ठेवून घेतो. त्यांच्या पायाची धूळ आपल्या मस्तकाला लागल्यामुळे आपल्या ठिकाणचा रजोगुण नष्ट होतो आणि भगवंताची पूजा करून त्यांच्या हातात जे सामर्थ्य आलेले असते त्यामुळे आपले मनोरथ पूर्ण होतात.

शिवयोग्याचे मन आनंदाने तुडुंब भरलेले असते. कुठल्या वस्तूची प्राप्ती होवो अथवा न होवो, तो आनंदसागरात डुंबलेला असतो. बाह्य वस्तूच्या प्राप्तीमुळे सामान्य माणसांना आनंद होतो आणि तिच्या वियोगामुळे दुःख होते. परंतु असे ज्ञानी पुरुषांच्या बाबतीत मात्र घडत नाही. तो ज्ञानानंदात सदैव निमग्न असतो. त्याला जो आनंद मिळतो त्याची तुलना कोणत्याही सांसारिक सुखाशी करता येत नाही. सांसारिक संबंध सोडल्यामुळे त्याला अत्यधिक आनंदाची प्राप्ती होते. सुषुप्ति-अवस्थेत जवळजवळ सर्व सांसारिक संबंध तुटलेले असतात तेथे जीवात्म्याला जो आनंद मिळतो तो एकटेपणातला आनंद असतो. म्हणून शरीरधारी असूनही ज्ञानी पुरुष केवळ आत्मानंदात निमग्न असल्यामुळे तो सांसारिक संबंधापासून मुक्त असतो आणि परब्रह्मस्वरूप आत्मा त्याच्या देहात नांदत असल्यामुळे त्याचा देह देखील परब्रह्मस्वरूपच असतो.

सम्यग्ज्ञानाग्निसन्दग्धजन्मबीजकलेवरः ।
शिवतत्त्वावलम्बी यः परकायः स उच्यते ॥ १६-५१ ॥

'परकाय' कुणाला म्हणतात त्याचे येथे स्पष्टीकरण केले आहे. राग आणि द्वेष यांना जन्माचे कारण मानले जाते. जन्म म्हणजे या प्रपंचात येणे आणि मृत्यू म्हणजे या प्रपंचातून निघून जाणे. एकदा मनुष्यजन्म मिळाल्यानंतर कशीही कर्मे केली तरी पुढला जन्म मनुष्याचाच मिळतो, असा काही लोकांचा समज आहे. परंतु कर्मानुसार पुढील जन्म निश्चित होतो, असे कर्मसिद्धान्त सांगतो. एखाद्या रेडिमेड कपड्याच्या दुकानात तुम्ही जेव्हा जाता तेव्हा तुमच्या मापाचा आणि तुमच्याजवळ असलेल्या पैशांत विकत येईल असाच पोशाख तुम्ही खरेदी करता. तुमच्या मापाचा नसलेला आणि तुमच्या खिशाला न परवडणारा असा पोशाख तुम्ही घेत नाही. त्याप्रमाणेच जणू ईश्वर एका दुकानात सर्व प्राण्यांच्या शरीराकृती घेऊन बसलेला असतो. तुम्ही मनुष्यजन्मात केलेले कर्म घेऊन जेव्हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच्याजवळ जाता तेव्हा त्या कर्मानुसार तो तुम्हाला देहाकृती देतो, मग ती मनुष्याची असेल अथवा अन्य प्राण्यांची. जो उत्कृष्ट कर्मे करतो त्याला उत्कृष्ट देह मिळतो आणि जो निकृष्ट कर्मे करतो त्याला निकृष्ट देह मिळतो.

जन्माला कारणीभूत असतो आपला राग (आसक्ती). जीवात्मा जेव्हा शरीर सोडून जातो तेव्हा त्याचे ज्या वस्तूशी आणि व्यक्तीशी संबंध असतात ते जर तुटलेले नसतील तर पुन्हा त्याच ठिकाणी त्याला जन्म घ्यावा लागतो. म्हणून 'राग' हे जन्माचे मूळ कारण आहे. जेथे 'राग' असतो तेथे 'द्वेष' असतोच. जेथे राग असतो तेथे कालांतराने द्वेष येतोच. द्वेष हे रागाचेच दुसरे रूप आहे. सामान्यत: जेथे मैत्री असते तेथे कालांतराने काही ना काही कारणाने भांडण होण्याची शक्यता असते. परंतु सामान्यांच्या बाबतीमध्ये हे घडते. ज्याचे राग-द्वेष ज्ञानाग्नीत जळून गेले आहेत अशा ज्ञानी पुरुषांची कहाणी वेगळी असते. भाजलेले बी जमिनीत पेरले तर ते अंकुरत नाही. ज्ञानी पुरुषांचे संचित कर्म भाजलेल्या बियांप्रमाणे नि:सत्त्व होऊन जाते. पुनर्जन्म देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात राहात नाही. ज्याने शिवज्ञान प्राप्त करून घेतले आहे त्याची सर्व कर्मे दग्ध होऊन जातात, तो शिवतत्त्वावलंबी असतो. प्रत्येकाला कोणते ना कोणते तरी आलंबन (आधार) हवे असते.

खेळणे हा मुलांचा स्वभाव असतो. मूल चिखलाशीही खेळते आणि खेळण्यांशीही खेळते. चिखलात खेळणे चांगले नाही हे त्याला कळत नसते. तुम्हाला त्याचे चिखलात खेळणे बंद करायचे असेल तर त्याच्या हातात दुसरी आकर्षक, उत्तम वस्तू दिली पाहिजे. मग ते चिखलाशी खेळणे सोडून चांगल्या वस्तूशी खेळू लागते. त्याप्रमाणे संसारात राहणारा जीवात्मा शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पाच विषयांशी सदैव खेळत असतो. त्याच्या मनाला विषय हेच आलंबन असतात. तो एकतर पाहात बसेल, ऐकत बसेल, कुणाशी बोलत बसेल, कुणाला स्पर्श करीत राहील किंवा काहीतरी हुंगत राहील. त्याच्या हातून हे विषय काढून घेतले तर तो रडत बसेल. त्याच्या हातून शब्द काढून घ्यायचा असेल तर त्याचा अशब्दाशी परिचय करून द्यावा लागेल. रूपावरून त्याची दृष्टी वळवायची असेल तर त्याला अरूपाचे दर्शन घडवायला हवे. अशब्द-अरूप-अव्यय असा जो परमात्मा आहे त्याच्याशी जर जीवात्म्याचा संबंध जडला तर शब्दस्पर्शादी पंचविषयांपासून तो मुक्त होऊ शकेल. त्यासाठी त्याला शिवतत्त्वावलंबी झाले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाहिजे. ज्याचा संबंध शरीराशी नसतो, ज्याचा संबंध विषयांशी राहात नाही असा अविषयी जो ज्ञानी पुरुष आहे त्याची कर्मे ज्ञानाग्नीत दग्ध झाल्यामुळे त्याला पुढील जन्म मिळत नाही. त्याचे शरीर परब्रह्मस्वरूप असते. त्याला 'परकाय' असे म्हणतात.

अशा ज्ञानी पुरुषाच्या दर्शनाने आणि स्पर्शाने सर्व जीवांचा उद्धार होतो. अशा महापुरुषाचा सहवास तुम्हा आम्हा सर्वांना लाभावा आणि आपले जीवन धन्य व्हावे अशी सदिच्छा व्यक्त करून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
६ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परकायस्थल..२

जिज्ञासू सद्भक्तांनो,

भारतीय साहित्यात महर्षी व्यासांपासून अनेक ग्रंथकारांनी काशीचे माहात्म्य वर्णिले आहे. बृहज्जाबालोपनिषदात नवखंड पृथ्वीवर काशी सर्वश्रेष्ठ आहे असें म्हटले आहे. भगवान शंकरांनी आपल्या त्रिशूलावर काशीनगरी तोलून धरली आहे असे तेथे वर्णन केलेले आहे. शूल म्हणजे ताप. त्रिशूल म्हणजे जीवात्म्याला दु:ख देणारे त्रिविध ताप. आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आदिदैविक हेच ते तीन ताप होत. भगवान शिवाच्या हाती त्रिशूल आहे याचा अर्थ, शिव त्रिशूलाच्या अधीन नसून त्रिशूल शिवाच्या अधीन आहे, असा आहे. अर्थात् हे तीन ताप भगवान शिवाला त्रास देऊ शकत नाहीत. म्हणून जो काशीत निवास करतो त्याला त्रिताप दु:ख देऊ शकत नाहीत. मृत्यूची वार्ता एरव्ही दु:खद मानली जाते, परंतु काशीत मृत्यू आला तर तो मात्र मंगल मानला जातो. एखाद्याला मरणोत्तर मुक्ती मिळाली असेल तर ती आनंदवार्ताच मानायला हवी. काशीत येणारा मृत्यू मंगल आहे. विभूती येथले आभूषण आहे. जिचे धारण केल्यामुळे आपली कर्मे नाश पावतात आणि आपले भाग्य उजळते अशी विभूती काशीचा अलंकार मानली जाते. येथल्या कौपिनधारी तपस्व्यांपुढे भरजरी वस्त्रे धारण केलेला धनवान देखील क्षुद्र ठरतो. अशा काशीनगरीत वास्तव्य करण्याची इच्छा कोणाला बरे होणार नाही? अर्थात् सर्वांनाच होईल. भाग्यानेच काशीचे वास्तव्य आपल्याला लाभते. म्हणून तुम्ही सर्वजण भाग्यवान आहात. आपल्या इष्टलिंगाच्या रूपात भगवान शिवाची पूजा करीत आहात, रोज गंगास्नान करीत आहात आणि या ज्ञानगंगेत सुस्नात होत आहात.

आपण कालपासून परकायस्थलाचा विचार करीत आहोत. जो ज्ञानी, शिवयोगी असतो तो परकाय होतो. अर्थात् परमेश्वर जेवढा श्रेष्ठ असतो तेवढेच ज्ञानी पुरुषाचे शरीरदेखील श्रेष्ठ असते. 'पर' म्हणजे श्रेष्ठ आणि 'काय' म्हणजे शरीर. ज्याला श्रेष्ठ शरीर लाभलेले आहे तो 'परकाय' होय. शरीरे तर सर्वांची सारखीच असतात. जसे गुरूचे शरीर असते तसेच शिष्याचे शरीर असते. पाप्याचे शरीर आणि तपस्व्याचे शरीर सारखेच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिसते. त्यांच्यामध्ये बाह्यत: कोणताही फरक आढळत नाही. असे असले तरी सद्गुरूंचे शरीर विलक्षणच असते. एका कन्नड संताने म्हटले आहे -

'कल्लु देवरादरे काय देवरागदे'

जर दगड देव बनतो तर सद्गुरूचे शरीर देव का बनणार नाही? ज्याच्या अमृतहस्ताने पाषाणाच्या मूर्तीला शिवत्व लाभते आणि त्या मूर्तीची आराधना केल्याने मनुष्याला आपले अभीष्ट प्राप्त होते, अशा सद्गुरूचे शरीर शिवाइतकेच पवित्र आणि श्रेष्ठ मानले जाते. म्हणून 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त म्हटले आहे -

अप्रत्यक्षो महादेव: सर्वेषामात्ममायया ।
प्रत्यक्षो गुरुरूपेण वर्तते भक्तिसिद्धये ॥ ९-५४ ॥

भगवान शिवाचा साक्षात्कार सर्वांना होत नाही. कारण शिव मायाशक्तीने युक्त आहेत. परंतु सद्गुरूंच्या रूपाने प्रत्यक्ष शिवच आपल्याला दृग्गोचर होतात. ज्या शरीराकडून केवळ विहित कर्मेच घडलेली आहेत, निषिद्ध कर्मे मुळीच घडली नाहीत, असे सद्गुरूचे शरीर अत्यंत पवित्र मानले जाते. त्यांच्या हस्तस्पर्शाने अपवित्राला पावित्र्य लाभते. पापी मनुष्य पुण्यात्मा होतो. म्हणून सद्गुरूचे शरीर बाह्यत: सामान्य माणसाच्या शरीरासारखे दिसत असले तरी ते सामान्य नसते, असामान्य असते. त्या शरीरात विलक्षण सामर्थ्य असते आणि त्याचा अनुभव लोक घेत असतात. असा जो श्रेष्ठकाय आहे अर्थात् ज्याचे शरीर परब्रह्मस्वरूप झालेले आहे अशा सद्गुरूला 'परकाय' असे म्हटले जाते. काल तुम्ही ऐकले आहे की ज्ञानाग्नीमुळे ज्याचे कर्म-मायादी दग्ध झाले आहेत अशा ज्ञान्याचे शरीर परब्रह्मस्वरूप झालेले असते.

आपल्याला येथे थोडा विचार करायला हवा. ज्ञानाला 'अग्नी' म्हटले जाते तर संसाराला 'सागर' म्हटले जाते. ज्ञान 'अग्नी' आहे तर संसार 'पाणी' आहे. अग्नीवर पाणी टाकले तर अग्नी विझून जातो, याचा अनुभव आपण नेहमी घेत असतो. तुमचे ज्ञान दृढ नसेल तर त्यावर संसार आक्रमण करतो. अनेक महात्म्यांच्या जीवनात अशा घटना घडलेल्या आहेत. म्हणून ज्ञानप्राप्तीनंतर अहंभाव बाळगू नये. ज्ञानाच्या दृढीकरणासाठी सदैव सत्संगात राहावे लागते. अग्नीचा आणि पाण्याचा प्रत्यक्ष संबंध आला अर्थात् अग्नीवर पाणी टाकले तर अग्नी विझून जातो, हे खरे आहे. परंतु जर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एका मोठ्या भांड्यात पाणी भरून त्याच्या खाली अग्नी पेटवला तर हळूहळू अग्नीसारखेच पाणी तापत जाते आणि हळूहळू पाण्याची वाफ होऊन पाणी नष्ट होते. अग्नीत असे सामर्थ्य आहे. त्याप्रमाणे सत्संग हे जणू एक भांडे आहे, संसार त्यातील पाणी आहे आणि ज्ञान म्हणजे अग्नी आहे. सत्संगरूपी भांड्यात संसाररूपी जल घालून ज्ञानाग्नीने त्याला हळूहळू नष्ट करायला हवे. ज्ञानी झाल्यावर देखील ज्ञान दृढ होईपर्यंत ज्ञानी पुरुषाने सत्संगात राहिले पाहिजे. त्यामुळे त्याला संसारापासून कोणताही धोका होणार नाही.

इन्द्रियाणि मनोवृत्तिवासना: कर्मसंभवा: ।
यत्र यान्ति लयं तेन सकायोऽयं परात्मना ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-५२)

आपली इंद्रिये विषयभोगात प्रवृत्त होतात त्याचे कारण कोणते? डोळे रूप पाहू इच्छितात, कान ऐकू इच्छितात, जीभ स्वाद चाखू पाहाते, नाक गंध हुंगण्याची इच्छा धरते आणि त्वचा स्पर्शानुभव घेऊ पाहाते. याचे कारण काय? तर वासना हेच त्याचे मूळ कारण होय. अनेक जन्मांत जीवात्मा जे जे काही भोगत आला आहे त्या साऱ्यांचे संस्कार त्याच्या मनावर झालेले असतात. जो संस्कार प्रबळ होतो त्याप्रमाणे वर्तन करण्याची त्याची इच्छा होते. जीवात्म्याने अगणित जन्म घेतलेले असतात, त्या जन्मांत असंख्य कर्मे केलेली असतात. केवळ विषयभोग घेण्याचे कर्मच त्याने केले असते तर त्याला पुन्हा जन्म घेण्याची गरज राहिली नसती. म्हणून एका कवीने म्हटले आहे -

'वपु: प्रादुर्भावादनुमितमिदं जन्मनि पुरा
पुरारे न क्वापि क्वचिदपि भवन्तं प्रणतवान् ।
नमन्मुक्त: सम्प्रत्यहमतनुऽग्रेप्यनतिमान्
इतीश: क्षन्तव्यस्तदिदमपराधद्वयमपि ॥'

कवी ईश्वराजवळ जाऊन प्रार्थना करतो की, परमेश्वरा माझ्याकडून दोन अपराध घडले आहेत, त्याबद्दल मला क्षमा करा. मला हे शरीर लाभल्यामुळे मी असे अनुमान करू शकतो की याआधी मी जेवढे जन्म घेतले आहेत त्या जन्मांत मी आपल्याला कधीही नमस्कार केलेला नाही. आपले नाम जपले नाही, आपले ध्यान केले नाही. त्यामुळेच मला हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जन्म घ्यावा लागला. हा एक अपराध माझ्याकडून घडला आहे. आता या जन्मात मी आपल्याला नमस्कार करीत आहे. आपले भजन करीत आहे, नामस्मरण करीत आहे. म्हणून मला विश्वास आहे की यानंतर मला पुनर्जन्म मिळणार नाही, तर मुक्ती मिळणार आहे. त्यामुळे पुढील जन्मात मी आपल्याला नमस्कार करू शकणार नाही. हा दुसरा अपराध माझ्याकडून घडला आहे. म्हणून या दोन अपराधांबद्दल परमेश्वरा, मला क्षमा करा.

याचे तात्पर्य असे की ईश्वरभक्ती न केल्यामुळे जीवात्म्याला वारंवार जन्म घ्यावा लागतो. जन्माचे मूळ कारण वासना होय. वासनेचे मूळ कर्म आहे. आपण जी कर्मे करतो त्यामुळे आपली वासना निर्माण होते. येथे आणखी एक सूक्ष्म विचार केला पाहिजे. बऱ्याच वेळा दैववादी आणि प्रयत्नवादी लोकांमध्ये भांडण चाललेले असते. प्रारब्ध श्रेष्ठ की कर्म श्रेष्ठ? जर प्रारब्ध बलिष्ठ असेल आणि त्याप्रमाणेच आयुष्य घडणार असेल तर प्रयत्न, कर्म कशाला करायचे? असे एक पक्ष म्हणतो. तर कर्म करून आपण आपले प्रारब्ध बदलू शकतो, असे दुसरा पक्ष म्हणतो. यासंबंधी येथे सूक्ष्म चिंतन केलेले आहे.

मनुष्य जेव्हा कर्म करतो तेव्हा त्याच्या कर्मफलाचे दोन भाग होतात. त्याने विहित कर्म केले तर त्याचे एक फल असते पुण्य आणि त्याचा दुसरा भाग असतो शुभवासना. त्याने जर निषिद्ध कर्म केले तर त्याचे फल असते पाप आणि त्याचा दुसरा भाग असतो अशुभवासना. फल आणि वासना असे कर्माचे दोन भाग असतात. फळ प्रत्येकाला भोगावे लागते. पुण्यकर्माचे फळ सुख असून पापकर्माचे फळ दुःख आहे. ते जीवात्म्याला भोगावेच लागते. कर्माचे फळ आपण पुरुषार्थाने, प्रयत्नाने बदलू शकत नाही. परंतु आपली वासना मात्र आपण प्रयत्न करून बदलू शकतो. अशुभवासनेचे शुभवासनेत परिवर्तन करता येते आणि शुभवासनेचे अशुभवासनेत परिवर्तन करता येते. एखाद्या शुभवासना असलेल्या मनुष्याभोवती जर अशुभवासना असलेल्या माणसांची गर्दी झाली तर हळूहळू त्याची शुभवासना अशुभवासनेत परिवर्तित होते. एखाद्या दुरात्म्याने जर सत्संग केला तर हळूहळू त्याची अशुभवासना बदलून ती शुभ होते. वाल्याचा देखील वाल्मीकी होतो. याप्रकारे वासना बदलण्यात आपला पुरुषार्थ सफल होतो. वासना कर्मामुळे बनते. म्हणून मनुष्याने असेच कर्म करावे की ज्याचे शुभ फळ मिळेल आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शुभवासना बनेल. आपल्या हातून घडणारे कर्मच पुढे आपले दैव बनणार असते. म्हणून आपणच आपल्याला घडवतो आणि आपणच आपल्याला बिघडवतो. आपण दुसऱ्यांमुळे बिघडलो या म्हणण्याला काही अर्थ नाही. प्रत्येक मनुष्य आपापल्या कर्मसूत्राने बांधलेला असतो. कर्मामुळे वासना बनते आणि वासनेप्रमाणे इंद्रिये कर्मात प्रवृत्त होतात.

म्हणून येथे सांगितले आहे की, ज्याची कर्मे आणि कर्मजन्य वासना केवळ शिवार्पित झालेली असते त्याचा देह 'परकाय' झालेला असतो. त्याची सर्व कर्मे भगवंतासाठी, त्याच्या तृप्तीसाठी असतात, स्वतःसाठी नसतात. अशा कर्मालाच शास्त्रात 'निष्काम कर्म' असे म्हटले जाते. त्याची कर्मे भगवदर्पण भावनेने होत असतात आणि त्याची वासना देखील भगवदर्पण झालेली असते. कर्म आणि वासना भगवदर्पण झाल्यामुळे त्याचे शरीर देखील भगवद्रूप झालेले असते.

परहन्तामनुप्राप्य पश्येद् विश्वं चिदात्मकम् ।
सदेहोऽतिभ्रमस्तस्य निश्चिता हि शिवात्मता ॥ १६-५३ ॥

अहंकार हा ज्ञानी आणि अज्ञानी दोघांच्याही ठिकाणी असतो. परंतु अज्ञानी माणसाच्या ठिकाणी असलेला अहंकार क्षुद्र असतो तर ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी असलेला अहंकार महान असतो. म्हणून त्याला 'पराहंता' असे म्हणतात. क्षुद्र अहंकाराला 'अपराहंता' तर महान अहंकाराला 'पराहंता' असे म्हणतात. व्यष्टीमधला अहंभाव म्हणजे अपराहंता आणि समष्टीमधला अहंभाव म्हणजे पराहंता होय. ज्याचे मी-पण केवळ शरीरालाच वेढून राहिलेले असतो तो अज्ञानी. ज्याचे मी-पण समग्र विश्वात व्यापून राहिलेले असते तो ज्ञानी. हा आपला आणि हा परका अशी क्षुद्र भेदभावना अज्ञानी माणसाच्या मनात असते. परंतु विश्व हेच ज्याचे कुटुंब झालेले असते अशा महापुरुषाच्या मनात आपपरभाव उरलेला नसतो. आपल्या कुटुंबावर आपले जसे प्रेम असते तसेच त्याचे विश्वातल्या समग्र जीवजंतूंवर असते. त्याच्या मनात कुठलाही भेद शिल्लक राहत नाही. तर केवळ अभेदभावना असते. म्हणून त्याला 'पराहंता' असे म्हटले जाते. संसारातील अहंभाव दूर करण्यासाठी जीवात्म्याला परमात्म्याजवळच जावे लागते.

वाळवंटात जमीन समतल असते. म्हणून तेथे एखादा उंट भल्यामोठ्या पहाडाप्रमाणे दिसतो. परंतु त्याच उंटाला जर हिमालयाजवळ उभे केले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर त्याचे खुजेपण चटकन जाणवते. त्याप्रमाणे मनुष्य जेव्हा आपल्यापेक्षा सर्वार्थाने लहान असलेल्या माणसाजवळ बसतो तेव्हा तो अहंकाराने फुगत जातो. मी यांच्यापेक्षा मोठा आहे असे त्याला वाटते. परंतु तो जेव्हा त्याच्यापेक्षा महान व्यक्तींच्या समोर जाऊन बसतो तेव्हा त्याला आपण किती लहान आहोत हे कळू लागते. तुमच्यापेक्षा लहान लोकांत तुम्ही बसाल तर तुमचा अहंकार वाढीस लागेल. तुमच्यापेक्षा महान लोकांत तुम्ही बसाल तर तुमचा अहंकार कमी होत जाईल. म्हणून आपल्यापेक्षा जो मोठा आहे त्याच्याजवळ जाऊन बसले पाहिजे. श्रीगुरू हाच सर्वांत मोठा आहे. गुरू याचा अर्थ मोठा. लघु म्हणजे लहान आणि गुरू म्हणजे महान. गुरूला परमेश्वरापेक्षाही श्रेष्ठ मानले जाते. कबिरांनी म्हटले आहे –

'गुरु गोविन्द दोऊ खडे काकै लागु पाय ।
बलिहारी गुरु आपने गोविन्द दियो बताय ॥'

जेव्हा आपल्यापुढे दोघे उभे असतील तर प्रथम कुणाला नमस्कार करावा? तर प्रथम श्रीगुरूला नमस्कार करावा असे कबीर सांगतात. गुरू म्हणेल तर देवाला करा. भारतीय संस्कृतीत सद्गुरूला सर्वश्रेष्ठ स्थान दिलेले आहे. स्वत: भगवान शिव म्हणतात –

'मदादि सर्व लोकांना जगद्गुरुवरोत्तमा:'

एकदा पार्वतीने शिवाला विचारले, 'या प्रपंचात सर्वात मोठा कोण?' तेव्हा भगवान शिव म्हणाले –

'न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकम् ।
शिवशासनत: शिवशासनत: शिवशासनत: ॥'

गुरूपेक्षा या जगात अधिक मोठा कोणी नाही. याला मीच प्रमाण आहे, असे त्रिवार भगवान शिवांनी सांगितले आहे. सर्व शास्त्रांचा निर्माता शिवच असल्यामुळे सद्गुरू सर्वश्रेष्ठ आहे. ही त्यांची आज्ञा सर्वांनी मान्य केली पाहिजे. गुरू सर्वात मोठा का आहे? तर त्याने सर्वांत मोठी अशी जी वस्तू – परब्रह्म – प्राप्त करून घेतली आहे. त्यामुळे तो सर्वांत मोठा ठरला, परब्रह्मस्वरूप निर्गुण-निराकार परमात्मा लोकांना उपदेश करू शकत नाही. म्हणून त्याचे महत्त्व गुरूपेक्षा कमी आहे. परंतु गुरू सर्वांना ज्ञानोपदेश करीत असल्यामुळे तो परमात्म्यापेक्षा श्रेष्ठ मानला जातो. ज्याला स्वत:चा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अहंकार दूर करायचा असतो त्याने सद्गुरूच्या चरणाजवळ जाऊन बसले पाहिजे. आपल्या संस्कृतीत मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव, असे उपदेश दिलेले आहेत. माता, पिता आणि गुरू आपल्यापेक्षा मोठे असतात. त्यांच्या सन्निध राहून त्यांची सेवा केल्याने आपला अहंकार दूर होतो. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांच्या सहवासात राहिल्यानेच आपला अहंकार नष्ट होऊ शकतो. सद्गुरूच्या सेवेमुळेच अपराहंता दूर होऊन पराहंता लाभते.

जो परकायस्थली साधक आहे त्याला पराहंता लाभलेली असते. त्याच्या दृष्टीने सारे विश्व शिवमय असते, अशिव काहीही नसते. त्याला परशिवाचा साक्षात्कार झालेला असतो. त्याला सर्वत्र शिवच शिव दिसू लागतो. ज्याला असा साक्षात्कार होत नाही त्याला आपल्या अवती भोवती प्रपंच दिसत असतो. प्रपंच आणि परमात्मा यांच्यात एवढाच फरक आहे. ज्याला परशिव प्राप्त होतो तो सदैव सुखसागरात डुंबत असतो, त्याच्या ठिकाणी किंचितदेखील दुःख नसते. परंतु संसारातील अत्यंत श्रीमंत मनुष्यदेखील दुःखी असतो, याचे कारण काय? याचे कारण हे आहे की, प्रपंच कुणालाही संपूर्णतः मिळत नसतो. परमात्मा मात्र प्रत्येकाला पूर्णपणे मिळतो.

प्रपंचात अनेक सुखे असतात. जीवाला आपल्या प्रारब्धकर्मानुसार त्यातली काही मिळतात. संसारातील समग्र सुखे एका व्यक्तीला कधीच मिळत नाही. मग तो चक्रवर्ती सम्राट असला तरी देखील. सम्राटाला देखील सर्व काही मिळत नसते, त्याला कशा ना कशाची तरी उणीव असतेच. कमी असणे हाच संसार होय. तुम्ही जेव्हा पलंगावर झोपता तेव्हा पलंगावरील उबदार शय्येचा स्पर्श तुमच्या केवळ एका भागाला होत असतो. तुम्ही उताणे झोपलात तर तुमच्या पाठीमागच्या भागाला शय्येचा मऊपणा जाणवतो, पुढच्या भागाला तो स्पर्श लाभणार नाही. पालथे झोपलात तर शरीराच्या पुढील भागाला शय्येचा सुखद स्पर्श होईल, पाठीला होणार नाही. डाव्या कडेवर झोपलात तर फक्त त्याच बाजूला शय्येचे स्पर्शसुख मिळेल, उजव्या कडेला, पाठीला आणि पोटाला मिळणार नाही. अशा प्रकारे तुमचे शरीर जेव्हा मृदू शय्येचे सुख अनुभवत असते तेव्हा ते सुख शरीराच्या केवळ एका भागालाच मिळत असते, तीन भागांना मिळत नसते. त्याप्रमाणे संसारातील सुख मनुष्याला पूर्णांशाने कधीही मिळत नसते. त्यात काही ना काहीतरी उणीव असतेच आणि त्याचे शल्य प्रत्येकाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मनात राहते.

परमात्मा असा नाही. तो ज्याला प्राप्त होईल त्याला संपूर्णत: लाभेल. म्हणून संसारी मनुष्य कितीही ऐश्वर्यसंपन्न असला तरी तो दुःखी असतो आणि परब्रह्माची प्राप्ती झालेला मनुष्य कितीही दरिद्री असला तरी तो पूर्णसुखी असतो. कारण सुखरूप अशा परमात्म्याचा त्याला पूर्णलाभ झालेला असतो. म्हणून सुखमय परमात्म्याचा लाभ झालेल्या सद्‌गुरूजवळ 'सर्व काही मीच आहे' अशी पराहंता उत्पन्न होते. जो सर्व विश्वाला आपल्या रूपात पाहतो अशा सद्‌गुरूला सामान्य देहधारी समजणे हा भ्रम होय.

स्वस्वरूपं चिदाकारं ज्योति: साक्षाद्विचिन्तयन् ।
देहवानपि निर्देहो जीवन्मुक्तो हि साधक: ॥ १६-५४ ॥

आत्मा प्रकाशरूप आहे. दीपज्योत जशी आपल्या भोवतीचा अंधार दूर करते त्याप्रमाणे हृदयकुहरातील अज्ञानांधकार आत्मा दूर करतो. अशा चिद्रूप, ज्ञानरूप आत्म्याचे ध्यान करणारा साधक देहधारी असला तरी तो विदेही म्हणजे जीवन्मुक्त असतो. राजा जनकाला 'विदेही जनक' म्हणत असत. तो बाह्यत: राजव्यवहार करीत असला तरी मनाने त्याच्यापासून संपूर्ण अलिप्त होता. म्हणून सामान्याच्या दृष्टीला तो 'देही' दिसत असला तरी 'विदेही' होता. त्याप्रमाणे ज्याच्या ठिकाणी देहाभिमान नसतो तो देहधारी असून देखील विदेही असतो.

देहस्तिष्ठतु वा यातु योगिन: स्वात्मबोधिन: ।
जीवन्मुक्तिर्भवेत् सद्यश्चिदानन्दप्रकाशिनी ॥ १६-५५ ॥

परकायस्थली शिवयोग्याचे शरीर अनंतकाळ जिवंत राहते असे नाही. ते केव्हा ना केव्हा नष्ट होणारच असते. मरणे हा तर शरीराचा धर्मच आहे. ज्ञानी असो वा अज्ञानी, प्रत्येकाला केव्हा ना केव्हा तरी शरीर सोडावेच लागते. ब्रह्मस्वरूप झालेल्या योग्याला शरीर सोडावे लागत नाही असे नाही. प्रकृतीच्या नियमांचा त्याच्या शरीरावरही अंमल असतो. काही योगीपुरुष योगसामर्थ्याने आपले आयुष्य वाढवू शकतात. जगद्‌गुरू रेणुकाचार्य सातशे वर्षे प्रकट आणि सातशे वर्षे अप्रकट असे चौदाशे वर्षांचे आयुष्य जगले अशी कथा आहे. काही महात्मे दोनशे-चारशे वर्षे जगल्याच्या कथाही आपल्याला माहीत आहेत. याविषयी येथे फारसा विचार करण्याचे प्रयोजन नाही. शरीर असो अथवा नसो, परकायस्थली शिवयोग्याचे सामर्थ्य अबाधित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असते. शरीर जिवंत असताना शरीरात जेवढे सामर्थ्य असते तेवढेच त्याच्या मृतशरीरात असू शकते.

आत्मज्ञानावसानं हि संसारपरिपीडनम् ।
सूर्योदयेऽपि किं लोकस्तिमिरेणोपरुद्ध्यते ॥ १६-५६ ॥

संसारदु:ख कुठपर्यंत असते? तर आत्मज्ञान होईपर्यंत. एकदा आत्मज्ञान झाले की त्याला सांसारिक दु:खे स्पर्श करू शकत नाहीत. तो संसारात असला तरी त्याला आत्मज्ञान झाल्यामुळे त्याला मुक्ती प्राप्त झालेली असते. त्यामुळे सांसारिक पीडेपासून तो मुक्त असतो. सूर्य उगवला की अंधार नाहीसा होतो त्याप्रमाणे आत्मज्ञान झाले की संसारदु:ख नाश पावते. शेवटी या स्थलाचा समारोप करतात -

देहाभिमाननिर्मुक्त: कलातीतपदाश्रय: ।
कथं याति परिच्छेदं शरीरेषु महाबुध: ॥ १६-५७ ॥

परकायस्थली साधक देहाच्या मर्यादेत राहत नसतो. त्याने देहाचा अभिमान सोडलेला असतो. त्याने निवृत्ती, प्रतिष्ठा, विद्या, शांती आणि शांत्यतीत अशा पंचकलांच्या अतीत असे परब्रह्मपद प्राप्त केलेले असते. तो शरीरात असला तरी त्याच्या ठिकाणी देहाभिमान नसतो. म्हणून 'मी या एका शरीरातच आहे' अशी परिमित भाषा त्याच्या ठिकाणी नसते. अशा देहधारी ज्ञानी पुरुषाला देहधारी समजणे हा भ्रम होय. अशा प्रकारे ज्ञानी पुरुषाच्या शरीराला त्याच्या आत्म्याइतकेच श्रेष्ठ मानले जाते. अशा परकायस्थलाच्या साधकाच्या स्थितीचे प्रत्येकाने चिंतन करावे आणि ती स्थिती प्राप्त करून घ्यावी, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांति: शांति: शांति: ॥

ज्ञानमंदिर जंगमवाडी मठ, वाराणसी
७ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धर्माचारस्थल..१

जिज्ञासू सद्भक्तांनो,

आपल्या देशात धार्मिक दृष्टीने काशीनगरीचे विशेष महत्त्व आहे. महर्षी व्यासांनी 'काशीखंड' ग्रंथात काशीचे माहात्म्य वर्णिले आहे. काशीत वास्तव्य करणाऱ्या मनुष्याचा ईश्वराच्या गर्भात निवास असतो, असे भगवान शंकर म्हणतात. माता आपल्या गर्भातल्या शिशूचे सर्वप्रकारे रक्षण करते, त्याप्रमाणे काशीत वास्तव्य करणाऱ्या शिवभक्तांचे भगवान शंकर रक्षण करतात. येथे पुण्यकर्मे करणारेही आहेत तसेच पापकर्मे करणारे आहेत. येथे स्तुती करणारे आहेत तसेच निंदा करणारे देखील आहेत. सर्वांचे रक्षण भगवान शिव करतात. काशीत वास्तव्य करणाऱ्या जीवाला कसलेही भय नसते.

पापी माणसाला देखील काशीत मुक्ती मिळते. मन:पूत वर्तन करावे आणि काशीत येऊन मरावे म्हणजे मुक्ती मिळते, असा याचा अर्थ नाही. जे पुण्यवान असतात त्यांना काशीत मरण आले तर ते तत्काळ मुक्त होतात, परंतु जे पापी असतात त्यांना काशीत मृत्यू आला तर ते जीवात्मे कालभैरवाच्या ताब्यात जातात. कालभैरव त्यांना एक यातनाशरीर देऊन त्यांच्या पापकर्मांची फळे भोगवतो आणि नंतर ते जीवात्मे शुद्ध होऊन त्यांना शिवसायुज्याची प्राप्ती होते. काशीत मृत्यू आला तर मुक्ती मिळते हे निश्चित. कुणाला लवकर तर कुणाला उशिरा एवढेच. काशीत वास्तव्य करून जो तपश्चर्या करून ज्ञानमार्गावर चालतो त्याला सहज मुक्ती मिळते. तुम्ही सगळे नित्य गंगास्नान, इष्टलिंगार्चन आणि सत्संग करीत आहात. यामुळे तुम्ही लवकरच मुक्तिपदाचे अधिकारी व्हाल.

काल तुम्ही परकायस्थली शिवयोग्यासंबंधी काही विचार ऐकले आहेत. परब्रह्मस्वरूप झालेल्या परकायस्थली शिवयोग्याचे शरीर त्याच्या आत्म्याइतकेच पवित्र आणि श्रेष्ठ असते. असा शिवयोगी आपले उर्वरित जीवन कसे जगतो आणि त्याच्यापासून इतरांना कोणती प्रेरणा मिळते हे विशद करणारे स्थल आहे धर्माचारस्थल.

तस्यैव परकायस्य समाचारो य इष्यते ।
स धर्मः सर्वलोकानामुपकाराय कल्प्यते ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(श्रीसिद्धान्तशिखामणी १६-५८)

परकायस्थली शिवयोग्याचे आचरणच समाजात 'धर्म' मानले जाते. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ आहे. धर्म हा पहिला पुरुषार्थ. 'धर्मं चर' अशी वेदांनी आज्ञासुद्धा केली आहे. धर्माने वागावे म्हणजे नेमके काय? तर परकायस्थली शिवयोगी जसे वागतो तसे वागणे म्हणजेच धर्माचरण होय. महापुरुषांचे अनुकरण करणे हाच आपला धर्म होय. सामान्य लोक अनुकरणप्रिय असतात. ते उपदेश ऐकत नसतात. एखाद्याचे वर्तन पाहून त्याप्रमाणे वागायचा प्रयत्न करतात. एखाद्या अजाण बालकाला घेऊन तुम्ही मंदिरात गेलात आणि 'देवाला नमस्कार कर' असे सांगितले तर ते बालक नमस्कार करणार नाही. कारण त्याला नमस्कार या शब्दाचा अर्थ आणि नमस्कारक्रिया यांपैकी काहीच माहीत नसते. परंतु जेव्हा तुम्ही त्याला नमस्कार करून दाखवता तेव्हा मात्र तुमच्याकडे पाहून ते नमस्कार करते. लहान मुले स्वभावत: अनुकरणप्रिय असतात. तुम्ही व्यवहारात पाहता की लहान मुले नवरा-बायको होऊन खेळत असतात. नवरा म्हणजे काय आणि बायको म्हणजे काय याचे त्यांना थोडे देखील ज्ञान नसते. प्लॅस्टिकच्या बाहुलीला लहान मूल समजून ते न्हाऊ-माखू घालतात, पाळण्यात घालून निजवतात. त्यांचे खेळणे मनोरंजनासाठी चाललेले असते. परंतु ते खेळतात मात्र मोठ्या माणसांचे वर्तन पाहून. म्हणून जो मोठा असतो त्याच्यावर अधिक जबाबदारी असते. माता-पिता, वडील बंधू यांच्यावर मोठी जबाबदारी असते. कारण त्यांचे वर्तन पाहूनच लहान मुले वागत असतात. जो मोठा असतो त्याला फार सावधपणे वागावे लागते.

येथे वेदाची आज्ञा आहे - 'धर्मं चर'. धर्म काय आहे? तर वडीलधाऱ्यांचे आचरण हाच धर्म होय. धर्माची व्याख्या अशी केली आहे -

'यतोभ्युदय नि:श्रेयस: सिद्धि स धर्म:'

ज्याच्या आचरणामुळे मनुष्याला ऐहिक सुखांची प्राप्ती होते आणि मुक्तीचाही लाभ होतो तो 'धर्म' होय. अभ्युदय आणि नि:श्रेयस या दोन मनुष्याच्या अभिलाषा असतात. प्रपंचातील सर्व सुखे आणि सर्व सुखाची साधने आपल्याला मिळावीत असे प्रत्येकाला वाटते. सांसारिक सुखे भोगलेल्या जीवाच्या मनात कधीतरी मुक्तीची इच्छा उत्पन्न होते. मनुष्यजीवनाचे अंतिम लक्ष्य भोग हे नाही. परमेश्वराने तुम्हाला भोग यासाठी दिले आहेत की

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुम्ही कधीतरी त्यापासून मुक्त व्हावे. वासनेचा नाश होऊन विरक्ती उत्पन्न व्हावी यासाठी ईश्वराने मनुष्याला भोग प्रदान केले आहेत. मनुष्याला ऐहिक भोग (अभ्युदय) आणि मुक्ती (नि:श्रेयस) हे दोन्ही हवे असतात. त्यासाठी धर्माचे पालन करावे लागते. ज्याच्यामुळे तुमचा ऐहिक अभ्युदय होतो आणि अंती मुक्ती मिळते त्याला 'धर्म' असे म्हणतात. धर्मकार्य करण्याचा अधिकार केवळ मानवालाच आहे. अन्य कोणत्याही जीवमात्राला नाही. कारण मानवयोनी सोडून अन्य जीवयोनी या केवळ भोगयोनी होत. त्यांना केवळ आपल्या कृतकर्मांची फळे भोगण्यासाठीच शरीर मिळाले असते, कर्म करण्यासाठी नव्हे. परंतु मनुष्याला मात्र कर्मफळे भोगण्यासाठी आणि त्याबरोबरच नवी कर्मे करण्यासाठी शरीर मिळालेले असते. मनुष्य हा 'भोक्ता' असतो तसाच 'कर्ता' देखील असतो.

सर्व पशुपक्ष्यांत मनुष्य का बरे वेगळा आहे? त्यालाच धर्माचरण करायला का सांगितले जाते? तुम्ही पाहता की, काही प्राण्यांना दोन पाय आहेत तर काही प्राण्यांना चार पाय आहेत. कृमिकीटकांना तर अनेक पाय असतात. पाय सर्वांना आहेत. परंतु हात मात्र केवळ मनुष्यालाच मिळाले आहेत. भलेही काही प्राणी हाताचे काम पायांनी करत असतील. परंतु पाय म्हणजे हात नव्हेत. माकड हा उत्क्रांतीच्या दृष्टीने मनुष्याच्या आधीचा टप्पा मानला जातो. त्याला अविकसित स्वरूपातील दोन हात मिळालेले आहेत. हातात फळ घेऊन तो ते खाऊ शकतो. काही काळ मागच्या दोन पायांवर उभे राहून चालू शकतो. परंतु शेवटी तो आपल्या हातांचा उपयोग पाय म्हणूनच करतो. इतर प्राणी मात्र हात नसल्यामुळे तोंडानेच खाऊ शकतात. उत्क्रांतीच्या दृष्टीने माकड म्हणजे अर्धविकसित मनुष्यच आहे. पुढे त्याचाच शरीरविकास होऊन मनुष्याला दोन स्वतंत्र हात आणि पाय मिळाले. त्याला चालण्यासाठी दोन पाय आहेत आणि कर्म करण्यासाठी दोन हात आहेत. कोणतेही धर्मकृत्य हातानेच करावे लागते. धर्माचरण करण्याचा अधिकार केवळ मानवालाच मिळाला आहे. म्हणून मनुष्याने धर्माचरण करावे असे शास्त्र सांगते.

जर मनुष्य धर्माने वागणार नाही तर त्याचे कल्याण कदापि होणार नाही. विश्वातल्या प्रत्येक पदार्थात कोणता ना कोणता तरी धर्म असतोच. पृथ्वीत असलेली गुरुत्वाकर्षणशक्ती हा तिचा धर्मच होय. प्रकृती आपला धर्म कधीही सोडत नाही. परंतु मनुष्य मात्र आपला धर्म सोडून वागतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याची असंख्य उदाहरणे आहेत. धर्म सोडून वागतो म्हणून तो दुःखी होतो.

धर्मेन हीन: पशुभि: समान:

जो धर्माचरण करीत नाही तो दिसायला मनुष्य असला तरी पशूसमान असतो. इहलोक सोडून जाताना धर्मच आपली सोबत करीत असतो. अन्य कोणतीही वस्तू आपल्याबरोबर येत नाही. एका सुभाषितकाराने म्हटले आहे -

'विद्या मित्रं प्रवासेषु भार्या मित्रं गृहेषु च ।
व्याधितस्यौषधं मित्रं धर्मो मित्रं मरिष्यत: ॥'

प्रवासात विद्या मित्र असते. प्रवास करताना तुमच्या जवळचे सामान चोर हिरावून घेतील, परंतु तुमच्या जवळची विद्या अर्थात् ज्ञान मात्र ते चोरून नेऊ शकत नाहीत. सर्वस्व लुटून नेले तरी ज्ञानी मनुष्य आपल्या विद्येच्या बळावर ते परत मिळवतो, रडत बसत नाही. म्हणून प्रवासात विद्या ही मित्रवत् असते. गृहस्थांसाठी पत्नी मित्र असते कोणताही विचारविनिमय दोघे मिळून करीत असतात. औषध हे रोग्यांचा मित्र असते. इतर मित्र येतील, बोलतील आणि जातील. परंतु रोग्याचा खरा मित्र औषधच असते. त्याप्रमाणे मरणाऱ्या माणसाचा धर्म हाच एकमेव मित्र असतो. तोच त्याला मृत्यूनंतर सद्‌गती देऊ शकतो. प्रपंच सोडून जाताना जीवात्मा कोणासोबत जातो? तो धर्मासोबत जातो. त्यावेळी आपल्यासोबत केवळ आपला धर्मच येत असतो. दुसरा कोणीही येऊ शकत नाही. ना धन, ना घर, ना पत्नी, ना पुत्र. तुमच्या पुत्राने तुमच्या मृत्यूनंतर जर दान-धर्म केला तर तो मात्र तुमच्या सोबत येईल. तुमच्या अंगावरील सुवर्णालंकार ते ओढून काढतील. मेल्यावर याला अलंकारांचा काय उपयोग? असे म्हणतील. कमावलेली सारी संपत्ती तुम्हाला इथेच सोडून द्यायची आहे. तुमच्या मृत्यूनंतर तुमची पत्नी तुम्हाला अखेरचा निरोप द्यायला दारापर्यंत येते. त्यापुढे ती तुमची सोबत करीत नाही. ज्या शरीराचे तुम्ही जन्मभर कोडकौतुक करता, त्याला खाऊपिऊ घालता, वस्त्रालंकारांनी सजवता त्या तुमच्या शरीराची अखेर मातीच होते किंवा ते अग्नीत भस्मसात केले जाते.

शेवटी तुमच्यासोबत तुमचा धर्मच येतो. केव्हा ना केव्हा तरी, आज ना उद्या, प्रत्येकाला इहलोक सोडून जावेच लागते. ज्यांनी मृत झालेल्या जीवांना तप:सामर्थ्याने जीवदान दिले अशा महात्म्यांना देखील अखेर मृत्यूच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घरी जावेच लागले. यावरून 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' मरण हा शरीराचा धर्मच होय हेच सिद्ध होते. मरण हा शरीराचा स्वभाव आहे आणि जीवन ही विकृती आहे असे शास्त्र सांगते. माणूस मेला की आपण आश्चर्यचकित होतो. परंतु विचारवंतांना मात्र माणूस इतकी वर्षे जगलाच कसा? याचे आश्चर्य वाटते. हा आता खात होता, माझ्याशी बोलत होता आणि अचानक कसा गेला? याचे आपण नवल करीत असतो. परंतु विचारवंताना मात्र इतकी वर्षे याच्या देहात प्राण राहिलाच कसा याचे नवल वाटत असते. श्वासोच्छ्वास अर्थात् प्राणवायूचे वहन हेच आपल्या जिवंतपणाचे लक्षण असते. प्राणवायूचे वहन थांबले तर प्राणोत्क्रमण होते असा अनुभव आहे. एखाद्या फुग्यात हवा भरली की तो टम्म फुगतो आणि त्याला एक टाचणी टोचली की सारी हवा बाहेर पडते. केवळ एका छिद्रामुळे फुग्यातली हवा बाहेर येते. मग आपल्या शरीराला तर नऊ द्वारे आहेत, नऊ छिद्रे आहेत. असे असताना देखील शरीरात इतकी वर्षे प्राण राहिलाच कसा? असे विचारवंतांना वाटते.

चाळीस-पन्नास वर्षे एका शरीरात प्राणवायूचे आत-बाहेर वाहणे चालू असते. तो एकदा नाकाबाहेर गेला आणि परत आलाच नाही तर? तर जीवनच संपून जाईल. शास्त्रे सांगतात की, दिवसातून २१६०० वेळा प्राणवायू आत-बाहेर वाहत असतो. तो इतके वेळा का आत-बाहेर करतो याचाही गंमतशीर विचार काही लोकांनी केला आहे. कधीतरी त्याला एकदा कायमचे बाहेर जायचेच असते म्हणून तो बाहेर जाण्याची जणू 'रिहर्सल' करीत असतो. एकदा तो कायमचा बाहेर गेला तर शरीर 'प्रेत' होते.

मृत्यू अनिवार्य आहे. मृत्यूनंतर देखील एक वेगळे जीवन प्रत्येकाला जगावे लागते. जिवंत असताना काही वस्तूंची आपल्याला आवश्यकता असते, त्याप्रमाणे मृत्यूनंतर देखील कशाची तरी गरज भासतेच. तुम्ही येथे यात्रेसाठी आला आहात. येताना तुम्ही सर्व संपत्ती सोबत आणलेली नाही. आवश्यक तेवढेच धन तुम्ही घेऊन आला आहात. इथे येण्याचा प्रवासखर्च, राहाण्याचा-खाण्याचा खर्च, परत जाताना लागणारा प्रवासखर्च असा सारा हिशोब करूनच तुम्ही योग्य तेवढे पैसे सोबत आणता. सारे धन काही सोबत आणत नाही. देशांतराला जाताना कमावलेल्या धनाचा काही भाग तुम्ही सोबत घेऊन जाता, त्याप्रमाणेच लोकांतराला जाताना तुम्ही इहलोकात जी कमाई केलेली असते तिचा काही भाग सोबत न्यावा लागतो. तुम्ही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

येथून काही नेणार नाही तर तुमचे हाल होणार हे निश्चित. इहलोक सोडताना प्रत्येक जीवात्मा इथे केलेली पुण्य-पापाची कमाई सोबत घेऊन जातो. काही कमाई केल्याशिवाय जीवात्मा इहलोकात राहूच शकत नाही. त्याने शुभकर्मे केली तर त्याला त्याचे शुभफल भोगावे लागते. अशुभकर्मे केली तर अशुभफल भोगावे लागते. परलोकात सद्गती हवी असेल तर मनुष्याला धर्माचरणच केले पाहिजे. म्हणून धर्म हाच मरणोत्तर जीवनात साहाय्यक ठरणारा मित्र होय.

धर्म म्हणजे काय? धर्माचा संग्रह कसा करावा? याविषयी येथे विचार केलेला आहे. धर्मसंग्रहाचे एकूण दहा मार्ग येथे सांगितले आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा, जप आणि ध्यान हे दहा धर्माचार होत. तुम्हाला धार्मिक व्हायचे असेल, धर्माचा संग्रह करायचा असेल तर त्यासाठी हे दहा मार्ग आहेत. यांपैकी कोणत्याही एका मार्गाने तुम्ही धर्मसंग्रह करू शकता.

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दया क्षमा ।
दानं पूजा जपो ध्यानमिति धर्मस्य संग्रहः ॥ १६-५९ ॥

'अहिंसा' हा पहिला धर्म होय. मनुष्य अत्यंत स्वार्थी असतो. दुसऱ्याला दुःख देऊन तो सुख मिळवू पाहतो. दुसऱ्यांना दुःख देणे ही मनुष्याची सामान्य प्रवृत्ती असते. तिचे नियंत्रण करण्यासाठी अहिंसा हा पहिला धर्म सांगितला आहे. म्हणून 'अहिंसा परमो धर्मः' असे म्हटले जाते. प्रत्येक मनुष्यात निर्माणशक्ती आणि विनाशशक्ती असते. मनुष्य काही घडवू शकतो आणि काही बिघडवू शकतो. घडवणे चांगले, बिघडवणे वाईट. माणसाने सतत काही घडवले पाहिजे. दुसऱ्याने काही घडवले तर ते बिघडवू नये. सामान्यतः बिघडवण्याचीच प्रवृत्ती मनुष्यात अधिक आढळते.

एखाद्या जीवाचा प्राण घेणे म्हणजे हिंसा होय. हिंसा हा अधर्म आहे. मनुष्याने कधी हिंसा करू नये. ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांची सृष्टी, पालन आणि संहार अशी अनुक्रमे तीन कार्ये आहेत. त्यांपैकी पहिली दोन कार्ये करण्याची शक्ती मनुष्याला प्राप्त झाली आहे. जीवाची निर्मिती करण्याचे आणि त्याचे पालन करण्याचे सामर्थ्य मनुष्याजवळ आहे. परंतु रुद्राची संहारक शक्ती मात्र त्याला प्राप्त झालेली नाही. एका मनुष्यापासूनच आज अब्जावधी माणसे उत्पन्न झाली आहेत. मनुष्याजवळ जननक्षमता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असल्यामुळे तो ब्रह्मदेवाचे कार्य करू शकतो. त्यासाठी कुणी त्याच्यावर आक्षेप घेऊ शकत नाही. अलीकडे आपल्या देशाची लोकसंख्या वाढत चाललेली आहे म्हणून 'हम दो हमारे दो' असा प्रतिबंध केला आहे तो भाग वेगळा. परंतु सामान्यत: मुलांना जन्म देणे हा काही गुन्हा नाही. अन्न, वस्त्र, निवारा देऊन रक्षण करणे हे विष्णूचे कार्य आहे. आपल्या कुटुंबाचे आणि समाजाचे रक्षण करणे हे काम देखील मनुष्य करू शकतो. त्याबद्दलही त्याला कोणी दोष देणे शक्य नाही. परंतु जीवमात्राचा संहार करण्याचा अधिकार मात्र कोणत्याही मनुष्याला नाही. अधिकार नसला तरी मनुष्य प्राणिहिंसा करीत असतो. आपण ब्रह्मदेवाचे कार्य करू शकतो, विष्णूचे करू शकतो तर मग रुद्राचेच कार्य का करू नये? असे त्याला वाटत असावे. जे करण्याची तुम्हाला अनुमती दिलेली आहे ते कार्य तुम्ही केले तर तुम्ही अपराधी ठरत नाही. परंतु ज्याची अनुमती नाही असे काम केले तर तुम्ही शिक्षेस पात्र व्हाल.

हिंसा, ती दुसऱ्याची असो की स्वत:ची, केल्यावर तुम्हाला शिक्षा भोगावीच लागेल. हत्या करा की आत्महत्या करा, तुमच्या नावावर अपराधच जमा होणार हे निश्चित. तुम्ही म्हणाल की, 'शरीर माझे आहे, त्यातला प्राण माझा आहे, त्याचे काय वाट्टेल ते मी करीन, तुम्हाला काय करायचे?' असे म्हणून तुम्ही आत्महत्येला प्रवृत्त झालात आणि मेलात तर सुटलात. परंतु आत्महत्या करताना जिवंत राहिलात तर मात्र तुरुंगाची हवा खावी लागेल. आत्महत्या हा कायद्याने देखील गुन्हा मानलेला आहे. हत्या आणि आत्महत्या हे दोन्ही गुन्हे आहेत. अर्थात् संहार करण्याचा अधिकार केवळ रुद्राचा आहे, मनुष्याचा नव्हे. प्रकृती माणसाला मरण देते. त्यात तिचा स्वार्थ अथवा वाईट हेतू नसतो. परंतु मनुष्य जेव्हा कोणाला ठार करतो तेव्हा त्याचा त्यात हमखास वाईट हेतू असतो. हिंसेचे अनेक प्रकार आहेत. जो स्वत: हिंसा करतो तो हिंसक आहेच, जो दुसऱ्याकडून हिंसा करवतो तोही हिंसक आहे आणि जो हिंसेचे अनुमोदन करतो, तिचे समर्थन करतो तो देखील हिंसकच होय.

मनुष्यात हिंसेची प्रवृत्ती का निर्माण झाली याची कारणे योगशास्त्रात नोंदविलेली आहेत. लोभामुळे, क्रोधामुळे आणि मोहामुळे मनुष्य हिंसेला प्रवृत्त होतो. लोभ हे हिंसेचे पहिले कारण होय. धन मिळवण्याच्या लोभापायी मनुष्य हिंसा करतो. प्राण्यांचे मांस, कातडे आदी विकण्यासाठी तो हिंसेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवृत्त होतो. क्रोध हे हिंसेचे दुसरे कारण होय. एखाद्या व्यक्तीचा मनुष्य आत्यंतिक द्वेष करतो आणि क्रोधाने आंधळा होऊन त्याची हिंसा करतो. मोह हे हिंसेचे तिसरे कारण आहे. स्वर्गादी पारलौकिक सुखे मिळवण्याच्या मोहापायी यज्ञात प्राणिहिंसा केली जाते. स्त्रीच्या मोहासाठी देखील हिंसा केली जाते.

यज्ञवेदीतील पशुहिंसेसंबंधी प्राचीन काळी मजेशीर विचारला गेला -

'यज्ञात तुम्ही पशुबळी दिल्यावर तुम्हाला स्वर्ग मिळेल, परंतु बळी गेलेल्या बिचाऱ्या पशूला कोणती गती मिळेल?'

'त्याला देखील स्वर्ग मिळेल.' यज्ञकर्त्याने उत्तर दिले. पुढे त्या चाणाक्ष प्रश्नकर्त्याने विचारले -

'मुक्या पशूचा बळी दिल्यावर जर त्याला स्वर्ग मिळतो तर मग तुमच्या घरात बायको-मुले आहेत त्यांची यज्ञात आहुती का देत नाही? त्या पशूप्रमाणेच त्यांनाही सहज स्वर्गप्राप्ती होईल.

स्वर्ग इत्यादी पारलौकिक सुखांच्या मोहामुळे देखील हिंसा केली जाते. म्हणून लोभ, क्रोध आणि मोह ही हिंसेची तीन कारणे होत. अशा प्रकारे हिंसेचे ऐंशी प्रकार सांगितले आहेत. हिंसा हा शब्द ऐकायला आणि वाचायला एक असला तरी त्याचे प्रकार अनेक आहेत. कधीही, कोणत्याही प्रकारची हिंसा न घडणे याला अहिंसाव्रत' म्हटले जाते. हिंसेचे जे सूक्ष्म भेद आहेत त्यासंबंधी अधिक विचार उद्या करू, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांति: शांति: शांति: ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
८ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धर्माचारस्थल..२

जिज्ञासू सद्भक्तांनो,

काशीक्षेत्राला 'कामधेनू' असे संबोधले जाते. आपल्या सर्व इच्छा पूर्ण करणारी कामधेनू आहे, त्याप्रमाणे काशीदेखील एक कामधेनू होय. गाईला आपण चारा खाऊ घालतो तेव्हा ती आपल्याला दूध देते. मग या काशीरूपी कामधेनूचा चारा कोणता? तर ती इथे येणाऱ्या भक्ताजवळचा पुण्य-पापरूपी चारा खाऊन त्यांना मोक्षरूपी अमृतमय दूध देते. येथे पुण्यात्म्याला आणि पापात्म्याला देखील मुक्ती मिळते. याप्रमाणे कलियुगात काशीला कामधेनू मानले जाते. तपश्चर्या करणे ही मनुष्याची काशीक्षेत्रात सहज स्थिती मानली जाते. काशीत येऊन तुम्ही प्राणायाम, ध्यान, धारणा इ. करता ते ठीकच आहे. परंतु येथे जो साधक आपला सर्व भार भगवान विश्वनाथावर सोपवून निश्चिंतपणे झोपतो त्याची निद्रा देखील येथे एक 'योग' ठरतो. काशीत बसून काही गप्पा मारल्या तर त्या गप्पा देखील येथे जप ठरतात. अन्य क्षेत्रांत जप केल्याने जेवढा पुण्यलाभ होतो तेवढाच काशीला बसून केलेल्या सामान्य गप्पांमुळे होतो.

'योगोऽत्र निद्रा जपः प्रजल्पः
स्वेच्छाशनं नैवेद्यं शयनं प्रणामः

जो मनुष्य आपल्या इच्छेनुसार येथे भोजन करतो, ते भोजनच इथला नैवेद्य होय. दंडवत प्रणाम हा सर्वश्रेष्ठ प्रणाम मानला जातो. एकांग, त्र्यंग, पंचांग आणि अष्टांग असे नमस्काराचे चार प्रकार आहेत. साष्टांग (स + अष्टांग = साष्टांग. म्हणजे आठ अंगांसह केलेला नमस्कार) हा सर्वांत श्रेष्ठ नमस्कार मानला गेला आहे. काशीत जर कुणी जमिनीवर सरळ झोपला तर तोच त्याचा साष्टांग नमस्कार होय, असे म्हटले आहे. धर्मसंग्रह करण्यासाठी काशीक्षेत्रात केवढी सवलत दिली आहे ते पाहा. तुम्ही येथे केवळ झोप काढली तरी ईश्वर समजतो की तुम्ही नमस्कार केला. येथे बसून तुम्ही इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या तरी ईश्वर मानतो की तुम्ही त्याचा नामजप करीत आहात. तुम्ही स्वतःसाठी जरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भोजन केले तरी ईश्वर मानतो की तुम्ही त्याला नैवेद्य दाखवता. खाऊन-पिऊन तुम्ही येथे गाढ झोपलात तरी ईश्वर समजतो की तुम्ही योगनिद्रेत लीन झाला आहात. ईश्वर इतका भोळा आहे की तुम्ही जे काही करता त्याचा तो चांगलाच अर्थ घेतो.

या क्षेत्राचा अधिपती तुमच्यावर एवढा विश्वास ठेवतो, म्हणून तुम्ही त्याचा विश्वासघात करू नये. जो तुमच्या शयनाला नमस्कार समजतो, जो तुमच्या भोजनाला स्वत:चा नैवेद्य मानतो, तुमच्या सामान्य गप्पागोष्टींना जप समजतो, तुमच्या गाढ निद्रेला योगनिद्रा समजतो अशा भोळ्या ईश्वराला कधी धोका देऊ नये. जो कपटी असतो त्याच्याशी कपट करणे एकवेळ योग्य मानले जाऊ शकते, परंतु जो भोळाभाबडा असतो त्याच्याशी कपट करणे कधीही योग्य नाही. म्हणून भोळ्या ईश्वराशी कधी कपट करू नये. परंतु ईश्वर जेवढा भोळा आहे तेवढाच चतुरदेखील आहे. त्याच्या हाती त्रिशूल आहे याचे आपण मान ठेवायला हवे. एकदा त्याला समजले की हा केवळ झोप काढतो, एकवेळ देखील ध्यान करीत नाही. हा केवळ स्वत:साठीच खातो, एकदा देखील नैवेद्य दाखवत नाही, हा केवळ गप्पाच मारतो, एकदा देखील आपला नामजप करीत नाही, हा केवळ जमिनीवर अंग टाकतो, परंतु एकदाही साष्टांग नमस्कार करत नाही; तेव्हा मात्र तुमची फजिती झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून या भोलेबाबाच्या नगरीत आल्यावर केवळ धर्माचरण करा, अधर्माने वागून त्याला फसवण्याचा प्रयत्न करू नका.

या काशीनगरीत येऊन तुम्ही धर्मकार्य तर करीतच आहात, परंतु त्याचबरोबर धर्म आणि धर्माचरण याविषयी ज. रेणुकाचार्यांनी जो उपदेश केला आहे तो देखील श्रवण करीत आहात. धर्माचाराविषयी तुम्हाला काही माहिती नसेल तरी त्याचे प्रबोधन येथे होत आहे. धर्माचे दहा प्रकार सांगितलेले आहेत.

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दया क्षमा ।
दानं पूजा जपो ध्यानमिति धर्मस्य संग्रह: ॥
(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-५९)

धर्माचा एक अर्थ असाही सांगितला जातो -
'पतितं पतन्तं पतिष्यन्तं धरतीति धर्म:'
जो पतित झाला आहे, जो पतित होत आहे आणि जो पुढे पतित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होणार आहे अशा तिघांचा जो उद्धार करतो त्याला 'धर्म' असे म्हणतात. जो पापी आहे त्याचा धर्म उद्धार करतो आणि जो पापी होत आहे, जो पुढे पापी होणार आहे अशा लोकांना धर्म सजग करतो. मनुष्याची संपूर्ण उन्नती ज्यामुळे होते त्याला 'धर्म' असे नाव आहे. तुम्हाला धर्म करायचा असेल, धर्मात्मा व्हायचे असेल तर सर्वप्रथम अहिंसेचे पालन करावे लागेल. कालच्या आशीर्वचनात तुम्ही ऐकले आहे की लोभामुळे, क्रोधामुळे आणि मोहामुळे मनुष्य हिंसक बनतो. म्हणून जोपर्यंत लोभ, क्रोध आणि मोह मनुष्याच्या मनात दबा धरून बसले आहेत तोपर्यंत त्याच्या हातून हिंसा होतच राहणार. रोगाचे खरे कारण कळल्याशिवाय आणि ते दूर केल्याशिवाय रोगमुक्त होता येत नाही. त्याप्रमाणे लोभ, क्रोध, मोह ही हिंसेची कारणे दूर केल्याशिवाय आपल्याला पूर्णपणे अहिंसक होता येणार नाही. एखाद्या प्राण्याचा जीव घेणे ही तर हिंसा आहेच, परंतु अर्वाच्य शब्द वापरून कोणाचे मन दुखवणे ही देखील हिंसाच होय. तुमच्या वाणीतून कदाचित अर्वाच्य शब्द बाहेर पडत नसतील, परंतु जर मनातल्या मनात तुम्ही कोणाचे अकल्याण चिंतत असाल तर ती देखील हिंसाच आहे. पहिली शारीरिक हिंसा, दुसरी वाचिक हिंसा तर तिसरी मानसिक हिंसा होय. परमेश्वराने मनुष्याला शरीर, वाणी आणि मन ही जी त्रिकरणे दिली आहेत ती शुद्ध झाल्याशिवाय मनुष्य परमात्म्यापर्यंत पोहोचू शकत नाही. म्हणून कायावाचामनाने जो अहिंसा व्रताचे पालन करतो तोच मनुष्य खरा धार्मिक असतो.

सामान्यतः मनुष्य जेव्हा हिंसेसाठी प्रवृत्त होतो तेव्हा आपण काय करीत आहोत याचे त्याला भान नसते. आपल्या हातून अधर्म घडतो आहे याची त्याला जाणीव नसते. जेव्हा त्याला अधर्माची स्पष्ट जाणीव होईल तेव्हाच तो हिंसेपासून परावृत्त होईल. भगवान गौतम बुद्धांच्या चरित्रात अंगुलीमालाची कथा आलेली आहे. त्याने नऊशे नव्यान्नव व्यक्तींची हत्या केली होती. एक हजार माणसांच्या करंगळ्या तोडून त्याची माळ तो देवीला अर्पण करणार होता. त्याला भेटलेला हजारावा मनुष्य गौतम बुद्ध होता. त्यांनी त्याला झाडाची पाने तोडायला सांगितले. त्याने बरीच पाने तोडून आणल्यावर गौतम बुद्धांनी 'पाने परत झाडाला चिकटव' असे सांगितले 'पाने तोडता येतात परंतु पुन्हा ती झाडाला चिकटवता येत नाहीत' असे अंगुलीमालाने म्हणताच गौतम बुद्धांनी त्याला विचारले की, 'जर तुला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोणाला प्राण देता येत नसतील तर प्राण घेण्याचा अधिकार तुला कोणी दिला?' गौतम बुद्धांच्या प्रश्नाने अंगुलीमालाला आपल्या हातून अधर्म घडतो आहे याची स्पष्ट जाणीव झाली आणि हिंसावृत्तीचा त्याग करून तो गौतमबुद्धांचा अनुयायी झाला. हिंसक मनुष्य देखील अहिंसेचा पूर्ण बोध झाला तर संपूर्ण अहिंसक होऊ शकतो, हेच सत्य अंगुलीमालाची कथा सांगते. जगण्याचा प्रत्येकाला हक्क आहे, म्हणून सर्वांना जगू द्यावे आणि सर्वांसोबत आपणही जगावे. सगळ्यांबरोबर सौहार्द भावाने वर्तन करणे हेच अहिंसेचे मुख्य वर्म होय.

'सत्य' हा दुसरा धर्म आहे. 'सत्यमेव जयते' हे आपल्या राष्ट्राचे बोधवाक्य आहे. जेथे सत्य आहे तेथेच विजय असतो, तेथेच श्रेय असते. सत्याबद्दल एका सुभाषितात असे म्हटले आहे -

'सत्येन धार्यते पृथ्वी: सत्येन तपते रवि: ।
सत्येन वायवो वान्ति सर्वं सत्ये प्रतिष्ठितम् ॥'

शेषाने आपल्या मस्तकावर पृथ्वी धारण केली असे आपली पुराणे सांगतात. शेष म्हणजे काय? सर्वांत शेवटी जे 'शेष' राहते त्यालाच 'सत्य' म्हणतात. मनुष्य मेल्यावर आपण 'राम नाम सत् है' म्हणतो. सारे काही संपल्यावर शेवटी जे उरते ते सत्य असते, या अर्थाने सत्याने पृथ्वी धारण केली आहे आणि सत्यामुळेच ती आजवर टिकली आहे असे म्हटले पाहिजे. अनादिकालापासून सूर्य प्रकाशतो आहे तो सत्यामुळेच. सत्यामुळेच वारा वाहतो आणि सत्यामुळेच सर्वांना प्रतिष्ठा लाभली आहे. सत्यामुळेच सारे काही टिकून राहिले आहे.

'सत्य मूलानि धर्माणि सत्यान्नास्ति परंतप: ।
सत्येन लोकां जयति सत्ये सर्वं प्रतिष्ठितम् ॥'

तुम्ही भले धर्म पाळत असाल, परंतु जर सत्य बोलत नसाल तर तुमचे धर्माचरण व्यर्थ होय. असत्य बोलण्यामुळे तुम्ही केलेल्या धर्मकार्याचे फळ तुम्हाला लाभत नाही. सत्यासाठी राजा हरिश्चंद्राने किती हाल अपेष्टा सहन केल्या, परंतु त्याने सत्य सोडले नाही.

एका माणसाला एकुलता एक मुलगा होता. तो नेहमी खोटे बोलत असे. मुलाच्या खोटेपणाला बाप कंटाळून गेला. त्याने मुलाला परोपरीने समजावले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. एकदा त्या गावात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'राजा हरिश्चंद्र' हे नाटक लागले. मुलाला हे नाटक दाखवले तर तो खोटे बोलणे सोडून देईल असे बापाला वाटले. म्हणून त्याने मुलाला पैसे दिले अन् 'नाटक पाहून ये' असे सांगितले.

मुलगा नाटक बघायला गेला खरा, पण गेला उशिरा. तो नाट्यगृहात जाऊन बसला तेव्हा राजा हरिश्चंद्र राज्य गमावून अरण्यात भटकत होता. मुलाने शेजारच्या माणसाला विचारले - 'हा कोण आहे? याची अशी दशा का झाली?

'हा चक्रवर्ती राजा हरिश्चंद्र आणि तो सत्य बोलण्यासाठी दुःख भोगतो आहे.' शेजाऱ्याने सांगितले.

मुलाला वाटले की, खरे बोलल्यामुळे एवढ्या मोठ्या राजाची इतकी वाईट अवस्था झाली, त्यामुळे खोटे बोलणे हेच चांगले आहे. आता यापुढे अधिक काय बघायचे? असा विचार करून तो झोपी गेला. नाटक संपल्यावर शेजाऱ्याने त्याला उठवले आणि मग तो घरी गेला.

सकाळी बापाने विचारले की, 'नाटक कसे होते? ते पाहून तुला काय वाटले?'

'बाबा', मुलगा म्हणाला, 'नाटक काही चांगले नव्हते. एवढा मोठा चक्रवर्ती राजा, पण खरे बोलल्यामुळे वाया गेला. त्याला खोटे बोलता आले असते तर त्याचे राज्य वाचले असते आणि त्याला दुःखही भोगावे लागले नसते.'

बापाने कपाळावर हात मारून घेतला, मुलगा सुधारण्यापलीकडे गेला होता.

अलीकडे असत्य बोलण्याची प्रवृत्ती फार वाढलेली दिसते. असत्यालाच सत्याची प्रतिष्ठा लाभली आहे की काय असे वाटू लागले आहे. एखादा सत्य बोलत असला तर त्याला असत्य बोलतो आहे असे मानले जात आहे. परंतु मनुष्याने सत्यावर निष्ठा का ठेवावी हे नीट समजून घ्यायला हवे. सत्य हाच मानवी जीवनाचा आधार आहे. असत्य बोलून माणसाला संपत्ती आणि सत्ता मिळेल, परंतु सुख-समाधान मात्र मिळणार नाही.

सत्यामुळेच मनुष्य जिवंत राहतो. कोणी 'जेवायला या' असे म्हटले तर आपण 'भूक नाही' किंवा 'माझे जेवण झाले आहे' असे सहज बोलून जातो. भूक लागलेली असूनही 'भूक लागली नाही' असे म्हणणे हा शिष्टाचाराचा भाग झाला, सत्याचाराचा नव्हे. तुम्ही सत्याचार न पाळता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिष्टाचार पाळाल तर उपाशी मरायची वेळ येईल. म्हणून माणसाला जेव्हा अन्नपाण्याची गरज असते तेव्हा त्याला सत्य बोलावेच लागते. अर्थात् सत्यामुळेच मनुष्य जिवंत राहू शकतो हे यावरून सिद्ध होते. म्हणून वेदांनी 'सत्यं ब्रूयात्, सत्यं वद, धर्मं चर' अशी आज्ञा दिलेली आहे.

सत्य बोलावे, परंतु ते अप्रिय असू नये. वाणीमुळे मनुष्याला प्रतिष्ठा लाभते आणि वाणीमुळेच मिळालेली प्रतिष्ठा गमावली जाते. म्हणून आपल्या जिव्हेवर कठोर शब्द येऊ नयेत याची दक्षता घ्यावी लागते. परमेश्वराने आपल्याला मृदू जिव्हा दिली आहे. म्हणून आपण मृदू बोलावे, कठोर बोलू नये. एखाद्या वाट चुकलेल्या जीवाला सन्मार्ग दाखवण्यासाठी कठोर शब्दांचा उपयोग करावा लागतो हे खरे आहे, परंतु त्यामागची भावना शुद्ध असते. अप्रिय सत्य मात्र बोलू नये, असे शास्त्र सांगते. आपण जे बोलतो ते ज्यावेळी ऐकणाऱ्याला अप्रिय वाटण्याची शक्यता असते त्यावेळी मौन राहावे. आपल्या देशात अनेक साधु-सत्पुरुषांनी सत्य ही आपल्या जीवनाची आधारशिला मानून तपश्चर्या केली. माणसाचा हात जसा महत्त्वाचा असतो तशीच त्याची जीभ देखील महत्त्वाची असते. इतर प्राण्यांना जीभ असते. परंतु मनुष्याला जीभ असते ती केवळ रसास्वाद घेण्यासाठी नव्हे, तर बोलण्यासाठीही असते. म्हणून जिभेने नेहमी सत्य बोलावे आणि सत्यस्वरूप अशा परमात्म्याचे नामस्मरण करावे. सत्यस्वरूप परमात्म्याची आपल्या जिभेवर प्रतिष्ठापना करणे हाच सत्य बोलण्याचा खरा अर्थ होय. परमात्म्याची प्रतिष्ठापना कोठे केली जाते? जर जेथे सत्य आहे तेथे. जेथे सत्य नाही तेथे परमात्म्याचे अस्तित्व संभवत नाही. म्हणून जिभेने सत्य बोलावे आणि सत्यस्वरूप परमात्म्याचे सदैव नामस्मरण करावे.

परमात्म्याने दिलेल्या शरीर, वाणी आणि मन या त्रिकरणांचा जेव्हा दुरुपयोग होतो तेव्हा त्याचा जीवात्म्यावर दुष्परिणाम होतो. वाणीचा दुरुपयोग झाला तर मनुष्याला पशुपक्ष्याचा जन्म लाभतो असे म्हटले जाते. ज्यामध्ये आपली सुख-दु:खे सांगता येत नाहीत अशा वाणी नसलेल्या योनीत त्याला जन्म घ्यावा लागतो. मनुष्यजन्म ही जणू एक मधली अवस्था आहे. इथून उच्च योनीतही जाता येते आणि हीन योनीतही जाता येते. रेल्वे जंक्शनवरून तुम्हाला हव्या त्या मार्गाने जाता येते. हैद्राबादचे तिकीट काढाल तर हैद्राबादला जाल, वाराणशीचे तिकीट काढाल तर वाराणशीला जाल. त्याप्रमाणे मनुष्यजन्म घेऊन तुम्ही जी कर्मे कराल त्यानुसार तुम्हाला पुण्य-पापाचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिकीट मिळेल आणि त्यामुळे उच्च योनी अथवा हीन योनी लाभेल. ज्या गाडीचे तिकीट घेतले आहे त्याच गाडीत तुम्ही बसले पाहिजे. दुसऱ्या गाडीत बसाल तर तुम्हाला उतरून दिले जाईल. म्हणून असे म्हटले गेले आहे –

'जिव्हाग्रे वर्तते लक्ष्मी जिव्हाग्रे मित्र बांधवाः ।
जिव्हाग्रे बंधन प्राप्तिः जिव्हाग्रे मरणं ध्रुवम् ॥'

जिभेमुळे माणूस काय काय मिळवतो? तुमच्या जिभेवर लक्ष्मीचा निवास असतो. तुमचा सारा व्यवहार जिभेवरच अवलंबून असतो. तुम्ही योग्य बोलाल, तोलून मापून बोलाल तर तुम्हाला लक्ष्मी प्राप्त होईल. तुमच्या जिभेचा व्यवहार चांगला नसेल तर तुमच्या जवळ असलेली लक्ष्मीदेखील तुम्हाला सोडून जाईल. जिभेमुळेच तुम्ही मित्र जोडू शकता. ज्याचा मित्रपरिवार मोठा असतो त्याची वाणी चांगली असते असे निश्चित समजावे. गोड बोलल्यानेच मित्र लाभत असतात. म्हणून ज्याची वाणी गोड असते, त्याच्या अवतीभोवती मित्रमंडळीचा आणि बांधवांचा वेढा पडलेला असतो. ज्याची वाणी चांगली नसते त्याला घरातली माणसेदेखील बाहेर हाकलून देतात. जिभेमुळेच बंधनात पडावे लागते. गोड वाणी असलेल्या पोपटाला लोक पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवतात. कर्कश ओरडणाऱ्या कावळ्याला पिंजऱ्यात घालून घरात ठेवले जात नाही. म्हणून आपली जीभ ही बंदिवासाचे कारण देखील ठरू शकते आणि जिभेमुळेच माणसाचे मरण देखील ओढवते. एखाद्या मोठ्या माणसाविषयी काही अपशब्द उच्चारले तर ते मृत्यूला आमंत्रण ठरू शकते. अशा प्रकारे जिभेमुळेच लक्ष्मीची प्राप्ती होते, मित्रपरिवार जोडला जातो, जिभेमुळेच बंदिवासात पडावे लागते आणि जिभेमुळेच मरणदेखील प्राप्त होते. परंतु यापेक्षा एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जिभेमुळेच तुम्हाला मुक्ती देखील प्राप्त होऊ शकते. तुम्हाला जे हवे ते तुम्ही जिभेच्या साहाय्याने मिळवू शकता. म्हणून परमेश्वराने केवळ मनुष्यालाच दिलेल्या या अमूल्य देणगीचा, वाणीचा दुरुपयोग करू नये.

वाणीमुळे मनुष्याची प्रतिष्ठा वाढते असे शास्त्र सांगते. म्हणून तिचा सदुपयोग कराल तर तुमच्यासाठी मुक्तीची पहाट उजाडेल आणि दुरुपयोग कराल तर अंधारलेली वाट तुडवावी लागेल. बरेचसे लोक केवळ वाणीमुळेच दुःख भोगत असतात. ते पाहून वाणीचा दुरुपयोग करू नये हे जाणून घेतले पाहिजे. जोपर्यंत तुम्हाला त्याची जाणीव नव्हती तोपर्यंत ठीक आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परंतु आता यापुढे मात्र आपल्या वाणीने अर्वाच्य, कटू आणि कर्कश शब्दांचा प्रयोग टाळावा. जे बोलाल ते मृदू बोला आणि कमीत कमी बोला. तुमच्या जिभेला असत्य बोलण्याची सवय असेल तर ती सोडण्यासाठी काही उपाय आहेत. पहिला उपाय म्हणजे मौन पाळणे आणि दुसरा उपाय म्हणजे कमीत कमी बोलणे अर्थात मितभाषी असणे. तुम्हाला चांगले, गोड बोलता येत असेल तर तुम्ही अधिक बोलायला हरकत नाही, परंतु तुमच्या जिभेला वाईट बोलण्याची खोड असेल तर मात्र तोंडातून शब्दच बाहेर पडू देऊ नये याची दक्षता घ्यावी. म्हणजे मौन धारण करावे. वाणीवर संयम ठेवूनच आपण वाणी-दोषांपासून मुक्त होऊ शकतो. वाणीने सदोदित भगवन्नामाचा जप घडला तर वाणीच्या दुर्व्यवहारापासून आपला बचाव होऊ शकतो. 'जपतो नास्ति पातकम्' असे जपाचे माहात्म्य सांगितले आहे. भगवन्नामाचा जप केल्याने वाणी शुद्ध होऊन पातकाचा नाश होतो. वाणी शुद्ध झाली तर ती केवळ सत्यच बोलू शकते. म्हणून आपल्या वाणीने नेहमी भगवंताचा नामजप आणि त्याचे भजन केले पाहिजे.

सत्य हे मानवाचे जीवनमूल्य आहे. आपल्या आसपास सगळीच माणसे असत्य बोलत असताना आपणच तेवढे सत्य का बोलावे? असा प्रश्न तुम्हाला पडेल, परंतु असत्य बोलण्याने माणसाची कशी दुर्गती होते हे जाणून तुम्ही असत्यापासून दूर राहिले पाहिजे. सत्य बोलताना प्रथम थोडे कष्ट पडतील, परंतु अभ्यासाने हळूहळू आपल्या वाणीत सत्य बाणवता येईल. रोज शंभर वेळा खोटे बोलण्याची सवय असेल तर खोटे बोलण्याच्या पाच वेळा टाळाव्यात. त्यामुळे खोटे बोलण्याची प्रवृत्ती हळूहळू कमी होत जाईल. तुमच्या जवळ हजारो रुपये असतील आणि त्यातले रोज पाच रुपये तुम्ही खर्च करीत राहिलात तर ते केव्हातरी संपतीलच. त्याप्रमाणे खोटे बोलण्याची प्रवृत्ती हळूहळू कमी होते. म्हणून आपण रोज किती खोटे बोलतो ते मोजून ठेवावे. मग खोटे बोलणे कमी कमी करीत जावे. त्यासाठी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. जेव्हा तुमच्या जिभेवरील असत्य संपूर्ण पुसले जाईल त्याक्षणी तुम्ही सहज सत्यवादी व्हाल, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांति: शांति: शांति: ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
९ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धर्माचारस्थल..३

जिज्ञासू सद्भक्तांनो,

पवित्र श्रावणमासानिमित्त या काशीक्षेत्री आपण ज्ञानसत्रात सहभागी झाला आहात. पृथ्वीवर अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. परंतु त्या सर्वांत काशीक्षेत्राचे माहात्म्य विशेष आहे. असे तीर्थक्षेत्र या जगात दुसरे नाही. अन्य क्षेत्रांत ईश्वराच्या दर्शनासाठी जेव्हा भक्त जातात तेव्हा त्यांच्या मनात सांसारिक इच्छांची पूर्ती व्हावी असा उद्देश असतो, परंतु काशीला येणाऱ्या यात्रेकरूंच्या मनात मात्र ज्ञान आणि वैराग्य यांच्या प्राप्तीची इच्छा असते. येथे भगवती अन्नपूर्णा साधकांना भिक्षा प्रदान करते. त्या प्रसाद-भिक्षेमुळे साधकाच्या मनात वैराग्य उत्पन्न होऊन ज्ञान प्रकाशते. म्हणून या क्षेत्राचे 'काशी' हे नाव सार्थ आहे.

'काश्यते प्रकाश्यते इति काशी'

येथे भक्ताच्या मनात ज्ञान स्फुरते. अन्य क्षेत्रांत ज्ञानप्राप्तीला विलंब लागतो. परंतु काशीत मात्र शीघ्र ज्ञानलाभ होतो. जीवात्म्याच्या हृदयात ज्ञान प्रकाशित करण्याचे अत्यधिक सामर्थ्य या क्षेत्रात असल्यामुळे याला 'काशी' नाव आहे. येथे त्वरित ज्ञानलाभ होत असल्यामुळे काशीची महती फार मानली जाते.

काशी दोन प्रकारची आहे. ब्रह्मांडातील काशी आणि पिंडांडातील काशी. ब्रह्मांडातील काशी कुठे आहे? तर उत्तर प्रदेशात, उत्तरवाहिनी गंगेच्या किनाऱ्यावर आहे. उत्तर दिशेकडून आलेली गंगा पुन्हा उत्तर दिशेकडे वाहाते. वरुणा आणि अस्सी या दोन नद्यांमध्ये जो भूप्रदेश आहे त्यात गंगा उत्तरेकडे वाहाते. येथे गंगा उत्तरवाहिनी असल्यामुळे काशीला फार महत्त्व आलेले आहे. गंगोत्रीपासून सागरात विलीन होईपर्यंत गंगेच्या दीर्घ प्रवाहात लोक स्नान करतात. परंतु काशीत गंगा उत्तरवाहिनी असल्यामुळे उत्कृष्ट मानली जाते. नदी ज्या ठिकाणी उत्तरवाहिनी आणि पश्चिमवाहिनी असते तेथे दिव्य क्षेत्र असते. ही झाली ब्रह्मांडातील काशी. परंतु प्रत्येकाच्या हृदयात एक काशी असते ती पिंडांडातील काशी होय.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जेथे भगवान विश्वेश्वराचे नित्य वास्तव्य असते ती काशी आहे. जसे संपूर्ण विश्वात विश्वेश्वराचे वास्तव्य आहे तसेच प्रत्येक जीवात्म्याच्या हृदयात देखील त्याचे वास्तव्य आहे. प्रत्येक बीजात जसा अंकुर असतो त्याप्रमाणे प्रत्येक जीवात्म्याच्या हृदयात भगवान शिवाचा नित्य निवास असतो. आपल्या हृदयात परमात्मा राहतो, हे ज्ञान ज्याला असते त्याचे हृदय हे काशीक्षेत्र असते. ज्याला हे ज्ञान नसते त्याच्या हृदयाला 'काशी' मानले जात नाही. काशीमध्ये जशी गंगा उत्तरवाहिनी आहे त्याप्रमाणे ज्याच्या मनोवृत्ती ऊर्ध्वमुखी, उत्तरवाहिनी आहेत त्याचे हृदयच काशी होय. सामान्यत: माणसाची मनोवृत्ती अधोमुख असते. फार थोड्या लोकांची वृत्ती ऊर्ध्वमुख असते. सात्त्विक मनुष्याची मनोवृत्ती ऊर्ध्वमुख असते. काशीत गंगादेखील उत्तरेकडे म्हणजे ऊर्ध्वदिशेकडे वाहात आहे. ज्याची मनोवृत्ती ऊर्ध्वमुख असते आणि ज्याला अवघ्या ब्रह्मांडात व्यापून राहिलेले भगवत्तत्त्व आपल्या हृदयात नांदत आहे असे ज्ञान असते त्याचे हृदय 'काशी' होय. ही काशी स्थूलकाशी आहे तर भक्ताच्या हृदयातील काशी जंगमकाशी आहे. जो भक्त जेथे जेथे जाईल तेथे तेथे ती काशी त्याच्यासोबत जाते. त्याला काशीमागे जाण्याची आवश्यकता नसते. काशी त्याच्या मागे मागे जात असते. तुम्ही सारेजण काशीला आला आहात. तुमच्या मनात वैराग्य आणि ज्ञान यांच्या प्राप्तीची इच्छा असली पाहिजे. सांसारिक वस्तूंच्या प्राप्तीचा मोह नसावा. त्या तर तुम्हाला सहज प्राप्त होतील. परंतु जे दुर्लभ आहे त्याच्या प्राप्तीची इच्छा धरावी.

श्रीमद् आद्य शंकराचार्यांचा जन्म सुदूर केरळात झाला होता. ते काशीला येऊन राहिले. जेव्हा ते भिक्षेसाठी बाहेर पडत तेव्हा भिक्षा वाढणाऱ्या प्रत्येक स्त्रीला माता अन्नपूर्णा मानून भिक्षा मागत-

'ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं भिक्षां मे देहि पार्वति'

मला अन्य काही नको. ज्ञान आणि वैराग्याच्या प्राप्तीसाठी मी काशीला आलो आहे.

आद्य शंकराचार्यांना भगवान शिवाचा अवतार मानले जाते. अशा अवतारी पुरुषांनीदेखील काशीला येऊन ज्ञान आणि वैराग्याची भिक्षा मागितली आहे. आपण महापुरुषांचे अनुकरण केले पाहिजे. जो काशीयात्रेला येईल त्याने आपल्या हृदयातील काशी ओळखावी आणि परत जाताना काशीला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सोबत घेऊन जावे. याच उद्देशाने तुम्ही सर्वजण नित्य गंगास्नान करीत आहात, गुरुपादोदकाचे सेवन करीत आहात आणि सायंकाळी या ज्ञानगंगेत सुस्नात होत आहात. तेव्हा तुम्हाला ज्ञान आणि वैराग्य याची प्राप्ती निश्चितच होईल. ज्ञांन-वैराग्याच्या प्राप्तीसाठी मनुष्याला धार्मिक व्हावे लागते. तो जर धर्माचरण करीत नसेल तर तर त्याला काही लाभ होणार नाही. म्हणून 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त धर्माविषयी उपदेश केलेला आहे-

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दया क्षमा ।
दानं पूजा जपो ध्यानमिति धर्मस्य संग्रहः ॥
(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-५९)

दहा धर्माचारांपैकी अहिंसाधर्माबद्दल तुम्ही ऐकले आणि सत्यधर्माबद्दल ऐकत आहात. सत्यासारखा दुसरा धर्म नाही, असे संत म्हणतात. 'धर्म ना दुसर जाणिये'. 'सत्याचा शोध घेण्यासाठीच जीवात्माला जन्म मिळाला आहे. जेव्हा परमेश्वराने मनुष्याला पृथ्वीतलावर पाठविले तेव्हा त्याला सांगितले की, 'भूलोकात जाऊन सत्याचा शोध घेऊन ते प्राप्त करून घे'. सत्य म्हणजे तरी काय? सत्य याचा अर्थ परमात्मा. परमेश्वराने सत्याचा शोध घेण्यासाठी माणसाला भूतलावर पाठवले हे खरे, परंतु त्याचबरोबर त्याची सत्याकडे किती प्रवृत्ती आहे याची परीक्षा घेण्यासाठी एक नाटक देखील केले. त्याने सुवर्णपात्रात सत्य ठेवून त्यावर घट्ट झाकण लावले. उपनिषदांत म्हटले आहे-

'हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्'

सुर्वणपात्रात सत्य दडवून परमेश्वराने माणसाला सांगितले, 'जा, तेथे सत्याचा शोध घे.' जीवात्मा सत्य शोधण्यासाठी भूतलावर आला, परंतु सुवर्णाचे पात्र पाहून मोहात पडला. सत्याचा शोध घेण्याचे भान त्याला राहिले नाही. आपले शरीर हेच ते सुवर्णपात्र होय. या शरीरातच परमेश्वराने सत्य दडवून ठेवले आहे. सत्याचा शोध घेण्यासाठी कोठे दूर जाण्याची आवश्यकता नाही. परंतु तो वरच्या आवरणातच गुंतून पडला आणि शरीराचे कोडकौतुक करण्यात रममाण झाला. एका हिंदी कवीने म्हटले आहे -

'ब्राह्मण के कुल में जन्म लिया । किया धोबी का काम मैने ।
बना चम्हार तभी पहचाना । छिपा हुआ मुझको मै ॥'

मोठी अर्थपूर्ण कविता आहे ही. कवी म्हणतो की, मी ब्राह्मणकुळात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जन्म घेतला हे खरे, परंतु ब्राह्मणोचित कर्मे न करताना धोब्याचे काम केले. म्हणजे दुसऱ्याची निंदा करीत बसलो, त्याचे धुणे धूत बसलो. धोब्याचे काम सोडून जेव्हा मी चांभार झालो, देहावरल्या चर्माचा शोध घेताना आत डोकावून पाहिले तेव्हा तेथे 'मी' मला सापडलो. याचा अर्थ काय आहे? ब्रह्म जाणण्यासाठी मनुष्याचा जन्म झालेला आहे. जो ब्रह्म जाणतो तो ब्राह्मण. या अर्थाने प्रत्येक जीवाचा जन्म ब्राह्मणकुळात झाला आहे. परंतु तो ब्रह्म जाणण्यासाठी काहीच करीत नाही. तो करतो धोब्याचे काम. धोबी काय करतो? तर गावातले सारे मळके कपडे घेऊन नदीवर जाऊन धूत बसतो. दिवसरात्र त्याला हेच काम असते. ज्याप्रमाणे धोबी आयुष्यभर दुसऱ्यांची धुणी धूत असतो त्याप्रमाणे मनुष्य शरीराची व्यवस्था पाहण्यात आयुष्य घालवत असतो. गीतेत शरीराला वस्त्र अशी संज्ञा दिली आहे –

'वासांसि जीर्णानि यथाविहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥'

जुनी वस्त्रे फेकून मनुष्य जसा नवी वस्त्रे धारण करतो त्याप्रमाणे जीवात्मा वृद्धावस्थेतील जीर्णशीर्ण शरीराचा त्याग करून नवा देह धारण करतो आणि नवजात शिशूच्या रूपाने पुन्हा इहलोकात येतो. अंगावरच्या वस्त्राचे जेवढे महत्त्व तेवढेच शरीराचे. अंगावरची वस्त्रे म्हणजे मीच, असे म्हणणाऱ्याला आपण वेडा समजून हसतो. तसेच शरीरात नांदणाऱ्या आत्म्याला न जाणता 'देह म्हणजे मीच आहे' असे म्हणणाऱ्या जीवात्म्याला, संत अज्ञानी समजतात.

सत्य प्राप्त करून घेण्यासाठी जीवात्मा भूतलावर आला. परंतु त्याने या सुवर्णपात्रावरचे झाकण उघडून आत बघितले नाही. त्या पात्रासोबतच खेळ खेळत तो आपले आयुष्य घालवतो. सत्याची प्राप्ती करून घेणे हेच प्रत्येक जीवाचे अंतिम लक्ष्य आहे. सत्याची प्राप्ती सहज होत नाही.

'नायमात्मा प्रवचनेन लभ्य: नायमात्मा बलहीनेन लभ्य:'

शास्त्र सांगते की, आत्मा दुर्बळांना प्राप्त होत नाही. येथे अत्यंत शक्तिशाली माणसाची आवश्यकता असते. अर्थात् मनोनिग्रहाची गरज असते. ज्याचे मन अत्यंत चंचल आहे त्याला कदापि आत्मज्ञान होत नाही, म्हणून सत्य अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. काल तुम्ही ऐकले आहे की,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सत्याच्या प्राप्तीसाठी सत्य बोलावेच लागते. जोपर्यंत सत्य बोलण्याचा अभ्यास होत नाही तोपर्यंत सत्यस्वरूप अशा भगवंताच्या नावाचा अखंड जप केला पाहिजे. जेव्हा तुमच्या जिव्हेवर सत्य प्रतिष्ठित होईल तेव्हा तुमची जिव्हा कधी असत्य बोलणार नाही आणि सत्य बोलता बोलता तुम्हाला सत्याची प्राप्ती होईल.

'अस्तेय' हा तिसरा धर्म होय. अस्तेय म्हणजे अचौर्य, चोरी न करणे.

'स्तेयं परस्वापहरणं तदभावो अस्तेयम्'.

दुसऱ्याच्या संपत्तीचे हरण करणे म्हणजे स्तेय. स्तेयाचा अभाव म्हणजे अस्तेय. उपनिषदांत म्हटले आहे की, तुमच्याजवळ संपत्ती असेल तर तिचा तुम्ही त्याग करावा, परंतु दुसऱ्याच्या धनाचे कधीही अपहरण करू नये. चोरी करण्याची भावना मनात उत्पन्न झाली की मनुष्य भयभीत होतो. अत्यंत निर्भय माणसाला देखील चोरी करताना भीती वाटू लागते. एखाद्या चोराने चोरी करण्यासाठी एखाद्या घरात प्रवेश केला, घरातील सर्वजण गाढ झोपलेले असले आणि त्याच वेळी जर एखादे लहान मूल झोपेत किंचाळले तर भीतीने चोर पळून जातो. धैर्यधराच्या धीरवृत्तीला क्षीण करण्याचे सामर्थ्य चौर्यकर्मात आहे. चोरी करून धन मिळवणे ही अधर्माची कमाई होय. धन कोणत्याही मार्गाने मिळवता येते, असत्य बोलून, दुसऱ्यांना फसवून. आपण धन कशासाठी मिळवतो? तर सुखासाठी, समाधानासाठी. ज्या धनामुळे आपल्याला किंचित् देखील सुख मिळत नाही, केवळ दु:खच दु:ख मिळते त्या धनाचा काय उपयोग?

धनाला 'लक्ष्मी' असे म्हणतात. लक्ष्मीचे तीन प्रकार मानले आहेत. अलक्ष्मी, लक्ष्मी आणि महालक्ष्मी. खोटे बोलून दुसऱ्याला फसवून संपत्ती मिळवणे म्हणजे 'अलक्ष्मी'. थोडे चांगल्या मार्गाने आणि थोडे खोट्या मार्गाने मिळवलेले धन म्हणजे 'लक्ष्मी' होय. अत्यंत शुद्ध मार्गाने, कष्टाने कमावलेले धन म्हणजे 'महालक्ष्मी'. दीपावलीच्या रात्री व्यापारी लक्ष्मीची आणि सरस्वतीची पूजा करतात. त्यावेळी त्या देवतांना 'महालक्ष्मी' आणि 'महासरस्वती' असे संबोधले जाते. ज्या दिवशी व्यापार सुरू केला जातो त्या दिवशी आपण, महालक्ष्मी आणि महासरस्वती मिळावी, अशी प्रार्थना करतो. खातेपुस्तकात 'श्रीमहालक्ष्मी प्रसन्न' आणि 'श्रीमहासरस्वती प्रसन्न' असे लिहितात. स्वस्तिक काढून एकीकडे 'शुभ', एकीकडे 'लाभ' असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लिहून पूजा करतात. महालक्ष्मी प्राप्त करून घेण्यासाठी व्यापाऱ्याला एक विधी सांगितला जातो. प्रथम 'शुभ' आणि नंतर 'लाभ'. व्यापारी जेथे बसतो त्या गादीच्या पाठीमागच्या भिंतीवर मध्ये स्वस्तिक काढून एकीकडे 'शुभ' दुसरीकडे 'लाभ' असे लिहिले जाते. आपल्याला प्रथम 'शुभ' हवे आणि नंतर 'लाभ' हवा, असा त्याचा अर्थ आहे. पूजेनंतर जेव्हा काही मोजून देतात तेव्हा पहिले माप मोजताना व्यापारी 'एक' असे न म्हणताना 'लाभ' असे म्हणतात. खरे तर पहिल्या मापाला 'शुभ' असे म्हणायला हवे. दुसऱ्या मापाला 'लाभ' असे म्हटले पाहिजे नंतर तीन, चार, पाच असे म्हणायला हवे. पूजाप्रसंगी संकल्प करताना प्रथम 'शुभ हवे' असे तोंडाने म्हणतात परंतु व्यापार सुरू करताना मात्र पहिल्या मापाला 'लाभ' म्हणतात आणि नंतर दोन, तीन, चार असे मोजतात.

जेथे प्रथम 'लाभ' येतो तेथे हळूहळू 'लोभ' वाढत जातो. 'लाभात् लोभ: प्रवर्धते' मनुष्याला जसजसा लाभ होतो तसतसा त्याचा लोभ वाढत जातो. सर्व दुर्गुणांत लोभ हा मोठा दुर्गुण मानला जातो. निजगुण शिवयोगी म्हणतात –

'कडुलोभदिंदे दुर्गुणमन्यमुंटे'

लोभाइतका मोठा दुसरा दुर्गुण नाही. लोभी माणूस कमावलेले धन स्वत:साठी खर्च करत नाही. इतरांसाठी देखील खर्च करत नाही. ज्या दुर्गुणामुळे मनुष्याला ऐहिक आणि पारलौकिक सुखे लाभत नाहीत त्याला 'लोभ' म्हणतात. ऐहिक सुखे मिळवण्यासाठी पैसे खर्चावे लागतात आणि पारलौकिक सुखे मिळवण्यासाठी दानधर्मादी कृत्ये करावी लागतात. लोभी मनुष्य दोन्ही करीत नसल्यामुळे तो ऐहिक आणि पारलौकिक सुखांपासून वंचित राहतो. अति-लोभामुळे मनुष्य चोरी करतो, दुसऱ्याची मालमत्ता हडप करतो. इच्छा नसताना एखाद्याकडून जबरदस्तीने पैसे घेणे ही देखील एक प्रकारची चोरीच होय. एवढेच नव्हे, तर तुम्ही एखाद्याला दिलेली वस्तू पुन्हा परत मागणे ही देखील चोरीच आहे.

रामायणामधली कथा तुम्हाला माहीतच असेल. रावणाचा वध करून लंकेवर संपूर्ण विजय मिळवल्यानंतर राम-लक्ष्मण आणि वानरसैन्य परत निघाले. निघण्यापूर्वी काही काळ ते समुद्रकिनाऱ्यावर विश्रांतीसाठी थांबले. तेव्हा वानरांनी आपापसात विचारविनिमय केला. एकजण म्हणाला –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'आपण लंकेवर विजय मिळवून अयोध्येला जात आहोत, परंतु असे रिकाम्या हाताने जाणे योग्य नव्हे. जाताना येथली अत्यंत मौल्यवान वस्तू अयोध्येला घेऊन गेले पाहिजे. म्हणजे तेथे ती आपल्या विजयाचे स्मारक ठरेल आणि लंकाविजयाची सतत आठवण देत राहील.'

यावर सर्वांचे एकमत झाले. दुसरा म्हणाला, 'लंका ही तर सोन्याची नगरी आहे. त्यामध्ये सर्वांत मूल्यवान काय आहे हे आपल्याला माहीत नाही. हनुमंताने मात्र संपूर्ण लंकानगरी अंतर्बाह्य न्याहाळली आहे तेव्हा लंकेतील मूल्यवान वस्तू कोणती ते सांगावे.'

हनुमंत म्हणाला, 'माझ्या मते लंकेतील सर्वात मूल्यवान वस्तू रावणाचे सिंहासन आहे.'

सर्व वानरांनी हनुमंताला सिंहासन घेऊन येण्याचा आग्रह केला. राम-लक्ष्मण हा सर्व प्रकार पाहात होते. ते काही बोलले नाहीत. हनुमंताने एकवार त्यांच्याकडे पाहिले आणि त्यांची मूक संमती आहे असे समजून तो लंकेकडे निघाला. वाटेत त्याला जांबुवंत भेटला आणि त्याने हनुमंताला 'कुठे निघालास ?' असे विचारले. तेव्हा हनुमंताने सर्व प्रकार सांगितला. जांबुवंत वृद्ध आणि अनुभवी होता. त्याने इतरांपेक्षा अधिक पावसाळे पाहिले होते. त्याने हनुमंताला विचारले,

'तू रावणाचे सिंहासन आणायला निघालास खरा, पण त्यासाठी प्रभू रामचंद्रांची अनुमती घेतली आहेस का ?'

'आमची सर्व चर्चा त्यांनी ऐकली. त्यावर ते काही बोलले नाहीत आणि मी इकडे निघाल्यावर त्यांनी मला अडवले नाही. यावरून त्यांची याला संमती आहे असे सिद्ध होते'. हनुमंत म्हणाला.

'हनुमंता', जांबुवंत हसून म्हणाला, 'काही गोष्टी गृहीत धरणे उचित नव्हे, त्यासाठी स्पष्ट आज्ञा घ्यायला हवी. चल, आपण प्रभू रामचंद्राकडे जाऊन त्यांनाच विचारू.'

दोघेही श्रीरामाकडे आले. जांबुवंताने सर्व प्रकार श्रीरामांना कथन केला. तेव्हा श्रीराम म्हणाले, 'त्यात एवढे ते काय ?'

'प्रभू' जांबुवंत हात जोडून म्हणाला, 'अशी घटना याआधी कधी घडली नाही. हे विपरीत आज घडत आहे. लंकेवर विजय मिळवण्याआधी बिभीषण आपल्याकडे आला असताना आपण सर्वांच्या साक्षीने बिभीषणाच्या डोक्यावर समुद्रजलाने अभिषेक करून 'या नगरीचा तू अधिपती आहेस'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे घोषित केले होते. त्यामुळे रावणाच्या सिंहासनावर आता बिभीषणाचा अधिकार आहे. रावणाचे सिंहासन आपण बिभीषणाला दिले आहे. एकदा दिलेली वस्तू परत घेणे वीरपुरुषाला शोभत नाही. दिलेली वस्तू परत घेणे ही एक प्रकारची चोरीच होय.'

जांबुवंताचे म्हणणे श्रीरामाला पटले आणि पुढील सर्व प्रकार टळला.

धर्म इतका सूक्ष्म असतो. 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्' धर्म इतका सूक्ष्म असतो की, बऱ्याच वेळा सामान्य बुद्धीच्या माणसांना आपण धर्माने वागतो की अधर्माने हेच कळत नाही. आपण धर्म करीत आहोत असे समजून ते अधर्मच करीत असतात म्हणून 'स्तेय' हा अधर्म होय. प्रत्येकाने त्यापासून अलिप्त राहिले पाहिजे. मनुष्याने स्वावलंबी बनावे. कष्ट करून धन मिळवावे आणि कमावलेल्या धनातला थोडा भाग इतरांसाठी खर्च करावा, परंतु परधनाचा अपहार कधीही करू नये. चोरी केलेले अन्न जर तुम्ही खाल्ले तर ते तुमच्या रक्तात भिनते आणि तुमचा वंश बिघडून जातो. एवढा सूक्ष्म विचार धर्मशास्त्राने केला आहे. कारण आपले शरीर हे अन्नाचाच परिणाम होय. आपण जे अन्न खातो त्याचेच रक्त तयार होऊन ते सर्व शरीरभर खेळते. म्हणून प्रत्येकाने सावध राहून अस्तेयधर्म अंगी बाणवावा. याबद्दल प्राचीन काळापासून आपले ऋषिमुनी सांगत आलेले आहेत. परंतु या कानाने ऐकून त्या कानाने सोडून देण्याची सवयच माणसाला लागलेली आहे.

बरेच जण तर उपदेश देणाऱ्यालाच त्याचा उपदेश परत करून रिकाम्या हाताने परत जातात. 'फार चांगले झाले, फार चांगले झाले', असे म्हणतात. काय चांगले झाले? तुमच्या आत काही चांगले शिरलेच नाही. अन् चांगले काय झाले? जोपर्यंत आपल्यात चांगुलपणा निर्माण होत नाही तोपर्यंत दुसऱ्याच्या चांगुलपणाला काय अर्थ आहे? प्रत्येकाने आत्मनिरीक्षण करायला हवे. कर्म करताना सूक्ष्म विचार करावा. आपल्या हातून चोरी तर होत नाही ना? आपण कमावलेल्या संपत्तीत चोरीचा काही भाग तर मिसळला नाही ना? असा प्रतिक्षणी विचार करून जो वागतो तोच अस्तेयव्रताचे पालन करीत असतो. अस्तेयव्रताच्या पालनामुळे आपले मन आणि शरीर शुद्ध होते, पवित्र होते. जो अस्तेयाचे पालन करतो तो संपूर्ण निर्भय असतो. जो धर्माने वागतो तो कोणालाही भीत नसतो. परंतु जे अधर्माने वागतात ते सतत भयग्रस्त असतात. चोरी न करण्याचा संकल्प करणे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे देखील धर्माचे साधन होय. धर्माचा मार्ग कठीण असतो म्हणून मनुष्याने अधर्ममार्गावर चालू नये.

अधर्माने वागल्यावर प्रारंभी सुख मिळते, परंतु शेवटी दुःखच वाट्याला येते. त्यावेळी वाटते की अधर्माने वागायला नको होते. माणसासाठी दोन मार्ग आहेत. एक अधर्माचा दुसरा धर्माचा. पहिल्या मार्गावर प्रारंभी फारच सुख दिसते. परंतु शेवटी दुःखच दुःख वाट्याला येते. दुसऱ्या मार्गात प्रारंभी क्लेश जाणवतात, परंतु शेवटी सुखच सुख असते. आपण व्यवहारात पाहतो की जे धार्मिक असतात त्यांच्या जीवनात दुःख असते. परंतु अंतिमतः त्यांना परमसुखाची प्राप्ती होते. येथे तुम्ही तपस्येसाठी आला आहात. येथे सर्वांना गार पाण्याने स्नान करावे लागते, गरम पाणी कोणाला मिळत नाही. घरी रोज गरम पाण्याने स्नान करण्याची सवय असणाऱ्यांना देखील येथे गार पाणीच मिळते. त्यामुळे तुम्हाला थोडे कष्ट होतील. सर्दीची बाधा होईल, परंतु शेवटी पापे नष्ट होऊन सुखच प्राप्त होईल. काही लोक काशीला येऊन देखील गंगास्नान करीत नाहीत. नळाला येणारे पाणी गंगेचेच असते, मग गंगास्नान करायला कशाला जा, असे त्यांना वाटते. आपल्या अनुकूलतेप्रमाणे ते धर्माचा विचार करतात. पाणी गार वाटले तर गरम करून घेतात. परंतु गंगास्नान करणे थोडे कष्टदायक वाटले तरी शेवटी तेच आपल्याला पुण्यलाभ करवते. नळाला येणाऱ्या पाण्यात ते सामर्थ्य नसते.

तीर्थक्षेत्रात घेतलेले कष्ट अंतिमतः पुण्यप्रदच असतात. घरात तुम्ही जसे जेवण घेता तसे जेवण तुम्हाला तीर्थक्षेत्रात मिळणार नाही. तुम्हाला भिक्षान्न स्वीकारावे लागेल. परंतु घरचे सुग्रास भोजन हे केवळ अन्न असते तर मठ-मंदिरातील भिक्षान्न हे प्रसादान्न असते. धर्माचा मार्ग प्रारंभी कष्टदायक वाटला तरी शेवटी तोच अत्यंत सुखकारक असतो. धर्माचरण करणाऱ्या पुरुषांच्या कथा आपल्या प्राचीन ग्रंथांत आढळतात. त्यामध्ये त्या त्या महापुरुषांच्या नशिबात प्रारंभी कष्टच आलेले दिसतात. परंतु शेवटी मात्र त्यांचे जीवन परमसुखाने दरवळून गेलेले आढळते. म्हणून प्रत्येकाने शास्त्रांच्या आदेशानुसार, गुरूच्या आदेशानुसार धर्माचरण करावे. अस्तेयव्रताचे पूर्ण पालन करावे आपल्या कमाईतील प्रत्येक पैसा धर्माने आणि स्वकष्टाने मिळवावा. त्यात चौर्याचा थोडा देखील अंश असू नये याबद्दल दक्ष राहावे.

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांत 'धर्म' हा पहिला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुरुषार्थ आहे. सर्वप्रथम धर्माचा संग्रह करावा, असे सांगितले आहे. धर्माचा संग्रह कोणत्या वयात करावा? आपल्याला वाटते की म्हातारपणी धर्मसंग्रह करावा. परंतु म्हातारपणी आपल्या हातून धर्म होत नाही, धर्मसंग्रह होतो तो तारुण्यातच. धर्म हा पहिला पुरुषार्थ आहे. अर्थ आणि काम हे नंतर आहेत. म्हणजे गृहस्थाश्रम स्वीकारण्यापूर्वी तुम्ही धर्मसंग्रह सुरू केला पाहिजे. जो बाल्याव्यवस्थेत धर्म करतो तो उत्तरायुष्यात कधीही अधर्मी होत नाही. ज्याला अधर्माची सवय झालेली असते तो म्हातारपणात देखील अधर्मच करतो. युवावस्थेत धर्माचा संग्रह करावा अशी वेदांची आज्ञा आहे. म्हणून प्रत्येकाने आपल्या तारुण्यावस्थेतच धर्मसंग्रह केला पाहिजे. ज्याच्या आयुष्यात धर्म प्रथम येतो तो कधी हिंसा करीत नाही, असत्य बोलत नाही, चोरी करीत नाही. येथे जे दहा धर्म सांगितले आहेत त्यांचे पालन करूनच तुम्ही धार्मिक होऊ शकाल आणि धर्मामुळेच तुम्हाला ऐहिक आणि पारलौकिक सुखाचा लाभ होईल, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर,जंगमवाडी मठ,वाराणसी
१० ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

१५

धर्माचारस्थल..४

जिज्ञासू सद्भक्तांनो,

काशीक्षेत्राचे एक नाव 'महास्मशान' असे आहे. स्मशान प्रत्येक गावात असते, परंतु महास्मशान मात्र काशीक्षेत्र हेच होय. स्मशानात चितेवर मनुष्याचा केवळ स्थूलदेहच जळतो, परंतु काशीच्या स्मशानात मात्र सूक्ष्मदेह देखील जळून जातो, म्हणून काशीला 'महास्मशान' असे म्हणतात. सूक्ष्मदेह जळून जातो याचा अर्थ मनुष्याला पुनर्जन्म मिळत नाही. जोपर्यंत सूक्ष्मदेह जिवंत असतो तोपर्यंत जीवात्म्याला मुक्ती मिळत नाही. कारण सूक्ष्मदेहातच सगळ्या वासना, सगळे संस्कार भरलेले असतात. जीवात्मा जेव्हा स्थूलदेह सोडतो तेव्हा आपल्या सूक्ष्मदेहासोबत साऱ्या वासना, संस्कार घेऊन जातो. नवा जन्म घेताना नव्या शरीरात आपल्या सूक्ष्मदेहासह प्रवेश करतो. अन्य स्मशानात केवळ स्थूलदेह जळतो तर काशीच्या स्मशानात स्थूलदेहासह सूक्ष्मदेह देखील नष्ट होतो. अर्थात् जीवात्म्याची जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटका होते. म्हणून काशीला 'महास्मशान' अशी संज्ञा आहे.

भगवान शिवाचे काशीक्षेत्रात नित्य वास्तव्य आहे. शिवाला स्मशान अत्यंत प्रिय आहे. ते स्मशानात राहून तिथल्या पिशाचादिकांशी क्रीडा करतात. शिवाला स्मशान का बरे प्रिय असते? याचा थोडा विचार करायला हवा. काही माणसे मंदिरात जातात, काही मशिदीत तर काही चर्चमध्ये. काहीजण कुठेच जात नाहीत. ते जन्म घेतात, इकडे-तिकडे हिंडतात, मौजमजा करतात आणि एके दिवशी यमराजाचे आमंत्रण येताच निमूटपणे निघून जातात. आयुष्यात एकदाही मंदिरात न जाणारे आणि ईश्वराचे एकदाही दर्शन न घेणारे अनेक लोक जगात असतात. परंतु ईश्वर सर्वव्यापक आहे. तो जसा मंदिरात आहे तसाच मंदिराबाहेर देखील आहे. त्याची नावे अनेक असली आणि त्याला अनेक रूपांत लोक भजत असले तरी तो 'एक' आहे. 'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति.' बरेच लोक आपापल्या परंपरांप्रमाणे कुणी मंदिरात, कुणी मशिदीत तर कुणी चर्चमध्ये जाऊन परमेश्वराची प्रार्थना करतात. परंतु जे लोक शिवाची प्रार्थना तर सोडाच पण त्याचे दर्शन देखील घ्यायला जात नाहीत त्याचे काय? जो मठात जात नाही, जो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंदिरात जात नाही त्याला कधी ना कधी स्मशानात तर जावेच लागणार. म्हणून ईश्वराने विचार केला की प्रत्येकाला जेथे यावेच लागते तेथेच आपण जाऊन बसलो तर त्या बिचाऱ्यांना शेवटी तरी आपले दर्शन घडेल. जीवांवर अशी कृपा करण्यासाठी भगवान शिव स्मशानात जाऊन बसले आहेत.

ज्ञान प्राप्त करण्यासाठी वैराग्याची आवश्यकता असते. स्मशान हे असे स्थान आहे की जेथे बसल्यावर मनुष्याच्या अंगी वैराग्य सहज बाणू शकते. एक माणूस मरतो तेव्हा त्याला अंतिम निरोप देण्यासाठी हजार माणसे स्मशानात जातात. कामधंदा सोडून इतक्या लोकांनी स्मशानात जाण्याची काय आवश्यकता आहे? प्रेताला खांदा द्यायला चार माणसे गेली तरी काम भागण्यासारखे आहे. परंतु एवढी माणसे जातात याचे हे एक कारण आहे की, तेथे गेल्यावर माणसाला थोडे फार ज्ञान आणि वैराग्य यांचा लाभ होतो. मृत शरीर गाडताना पाहून एके दिवशी आपल्याला देखील इथेच यायचे आहे, याचे भान माणसाला येते. याप्रकारे स्मशानात अनेकदा जाऊन त्याला वैराग्य आणि ज्ञान प्राप्त होते. परंतु हे वैराग्य क्षणिक असते आणि फार तर स्मशानातून घरी जाईपर्यंत टिकते. म्हणून या क्षणिक वैराग्याला 'स्मशानवैराग्य' असेही म्हटले जाते. गौतम बुद्धाकडे जेव्हा दीक्षा घ्यायला कुणी येत असे तेव्हा ते त्याला सहा महिने स्मशानात राहायला सांगत. कारण तेथे राहिल्यावर रोज येणारी प्रेते पाहून पाहून त्याच्या मनातील वैराग्य दृढ होत असे. मनुष्याला ज्या ठिकाणी वैराग्याचा सहज लाभ होतो त्या ठिकाणी जाऊन बसावे, असे भगवान शंकरांना वाटले. म्हणून त्याचे वास्तव्य स्मशानात असते. काशीक्षेत्रातही भगवान शिवाचे सदैव वास्तव्य असल्याने या क्षेत्राला 'महास्मशान' असे म्हटले आहे. येथे जो देह सोडतो त्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही. अशा सहज मुक्ती देणाऱ्या या पवित्र क्षेत्रात तुम्ही 'श्रीसिद्धान्तशिखामणी'वर आशीर्वचने ऐकत आहात.

आपण धर्माचारस्थलासंबंधी विचार करीत आहोत. मनुष्याला धार्मिक व्हायचे असेल तर त्याला धर्माचे पालन करावे लागते. 'सत्यं वद, धर्मं चर' असे शास्त्र सांगते. सत्य बोलावे आणि धर्माचे आचरण करावे. म्हणून आचरणालाच 'धर्म' असे म्हणतात. आतापर्यंत तुम्ही अहिंसा, सत्य आणि अस्तेय या धर्मांविषयी बरेच काही ऐकले आहे. आत यापुढे ब्रह्मचर्य, दया, क्षमा आदी धर्मांचा विचार करायचा आहे. शारीरिक तपश्चर्येत ब्रह्मचर्याचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समावेश केला जातो.

'ब्रह्मचर्यंहिसा च शारीरं तप उच्यते'.

असे गीतेत भगवंताने म्हटले आहे. ब्रह्मचर्य आणि अहिंसा यांचे पालन करणे हे शारीरिक तप होय. तप तीन प्रकारचे आहे. वाचिक, मानसिक आणि शारीरिक. देव, गुरू आणि अतिथी यांचा सत्कार करणे, सेवा करणे आणि ब्रह्मचर्याचे पालन करणे हे शारीरिक तप असून त्यामुळे शरीराची शुद्धी होते. ब्रह्मचर्याबद्दल योगशास्त्रात म्हटले आहे -

'गुप्तेंद्रियस्य उपस्थस्य संयमः ब्रह्मचर्यम्'.

ज्या इंद्रियांमुळे मनुष्याची विषयांकडे अधिक प्रवृत्ती होते त्या सर्व इंद्रियांवर नियंत्रण ठेवणे म्हणजे ब्रह्मचर्य होय. पाण्याने पूर्ण भरलेल्या घड्याला जर चार-पाच छिद्रे पाडली तर हळूहळू आतले पाणी बाहेर पडून घडा रिकामा होतो. त्याप्रमाणे माणसाच्या आतली शक्ती इंद्रियांद्वारे हळूहळू बाहेर पडून क्षीण होते. अंतरंगात स्फूर्ती नसेल तर मेधाशक्ती प्राप्त होत नाही आणि मेधाशक्ती जोवर प्राप्त होत नाही तोवर ब्रह्मज्ञानाचा लाभ होत नाही. बृहदारण्यक उपनिषदात एक सुरेख कथा आली आहे.

एकदा प्रजापती ब्रह्मदेवाकडे देव, दानव आणि मानव गेले. तेव्हा त्या सर्वांना ब्रह्मदेवाने एकाक्षरी उपदेश केला. देव, दानव आणि मानव अशा तिघांवर एकेक दृष्टिक्षेप टाकून त्यांनी 'द, द, द' असा त्रिवार उच्चार केला. मग त्यांनी देवांना विचारले की, 'तुम्हाला 'द' चा कोणता अर्थ कळला?'

'भगवन्', देव म्हणाले, 'आम्ही देव आहोत. स्वर्गातले सुखोपभोग घेण्याकडे आमची अधिक प्रवृत्ती आहे. म्हणून आपण 'द' हा उपदेश करून आम्हाला 'इंद्रियांचे दमन करा' असा आपण उपदेश केला.'

याप्रमाणे ब्रह्मदेवाने मानवांना विचारले. तेव्हा त्यांनी 'द' चा अर्थ 'दान करा' असा सांगितला, तर असुरांनी आपली स्वाभाविक प्रवृत्ती दुसऱ्याला पीडा देण्याची असल्याने ती दूर करण्यासाठी 'द' म्हणजे 'दया करा' असा अर्थ सांगितला. याप्रमाणे अत्यंत सूक्ष्म उपदेशदेखील देव-दानव-मानवांना समजला याचे कारण त्यांनी उपदेश श्रवण करण्याआधी तीस वर्षे इंद्रियनिग्रह करून ब्रह्मचर्यव्रताचे पालन केले होते. ब्रह्मदेवाचा एकाक्षरी उपदेश त्यांच्या सबंध जीवनाचा मार्गदर्शक ठरला. म्हणून ज्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मज्ञानप्राप्ती हवी असेल त्याने ब्रह्मचर्यव्रत पाळले पाहिजे.

आपल्या संस्कृतीत जी आश्रमव्यवस्था सांगितली आहे त्यांमध्ये पहिला आश्रम आहे ब्रह्मचर्याश्रम. त्यापुढे गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास असे तीन आश्रम आहेत. ब्रह्मचर्य, वानप्रस्थ आणि संन्यास या तीन आश्रमांत इंद्रियांचा संयम होतो. परंतु फक्त गृहस्थाश्रमात मात्र वंशवृद्धीसाठी ब्रह्मचर्य पालन करू नये, असा शास्त्राचा आदेश आहे. मुले मोठी होऊन ती कर्ती झाल्यावर मनुष्याने वानप्रस्थाश्रम स्वीकारून पुढे पुन्हा ब्रह्मचर्याचे पालन करावे, असे शास्त्र सांगते. जीवनाचा क्रम कसा असावा याबद्दल महाकवी कालिदास सांगतो –

'शैशवेभ्यस्त विद्यानां यौवने विषयैषिणाम् ।
वार्धके मुनिवृत्तिनां योगेनान्ते तनुत्यजाम् ॥'

बाल्यावस्थेत ब्रह्मचर्याचे पालन करून विद्याध्ययन करावे, तारुण्यात विषयभोग भोगून वंशवृद्धी करावी, वार्धक्यात मौन धारण करून मुनीसारखे आचरण करावे आणि अंतकाळी योगसाधना करत देहत्याग करावा; अशी आपली प्राचीन परंपरा कालिदासाने सांगितली आहे. हा एक जीवनक्रम आहे. जे या क्रमाने जीवन जगतात त्यांना सुख लाभते आणि जे हा क्रम बिघडवून जीवन जगतात त्यांना दुःखांना सामोरे जावे लागते. प्रजोत्पत्तीपुरता अपवाद करून जो गृहस्थ ब्रह्मचर्य पाळतो तो ब्रह्मचारीच होय. इंद्रियांचा संयम केल्याशिवाय चित्त एकाग्र होत नाही आणि चित्त एकाग्र होत नसेल तर ब्रह्मज्ञान प्राप्त होत नाही. म्हणून ज्याला ब्रह्मज्ञानप्राप्तीची इच्छा असेल त्याने आपल्या आश्रमानुसार ब्रह्मचर्याचे पालन केले पाहिजे.

यानंतरचा धर्म आहे 'दया'. या प्रपंचात अनेक दुःखीकष्टी जीव राहात असतात. एखाद्याचे दुःख पाहून जर तुमचे हृदय करुणेने पाझरत नसेल तर तुम्हाला 'माणूस' म्हणता येणार नाही. दुःखी जीवांविषयी आपल्या मनात सहवेदना, सहानुभूती निर्माण व्हायला हवी. त्यापेक्षाही 'समानाभूती' निर्माण व्हावी. दुःखी माणसाजवळ चार सांत्वनपर शब्द बोलणे याला 'सहानुभूती' म्हणतात, तर दुःख भोगणाऱ्या माणसाला पाहून तेवढे दुःख आपल्या अंतर्यामी उत्पन्न होणे ही 'समानाभूती' होय. दुःखी माणसाला मदत करण्याची इच्छा म्हणजे दया. तुमच्या हृदयात दया नसेल तर तुम्हाला ब्रह्मज्ञान कदापि प्राप्त होणार नाही. कारण सर्व प्राणिमात्रात आत्मदर्शन घेणे आणि ही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भावना दृढ होणे हीच तर ब्रह्मज्ञानाची एक पायरी आहे. दया हे सर्व धर्मांचे मूळ आहे. तुमच्या मनात दया नसेल तर तुम्ही धार्मिक होणार नाही. ज्याच्या हृदयाला पाझर फुटतो त्यालाच हृदयात भगवद्दर्शन होते. तुम्ही तुमचे प्रतिबिंब पाण्यात पाहू शकता, दगडात नव्हे. प्रतिबिंबित करण्याची शक्ती पाण्यात असते, दगडात नसते. त्याप्रमाणे ज्याच्या हृदयात आर्द्रता असते, जे हृदय पाझरते तिथेच भगवंत दिसू लागतो. हृदयात दया नसेल तर भगवंत दूर जाईल. म्हणून प्रत्येक साधकाने आपल्या मनातली दयाभावना दृढ करावी. एखाद्याने अपराध केल्यावर त्याला शिक्षा करण्याचे सामर्थ्य आपल्यात असूनदेखील त्याच्याविषयी दया दाखवणे याला 'क्षमा' म्हणतात. सहन करण्याची शक्ती म्हणजे 'क्षमा'. ज्याच्याजवळ सहनशक्ती नसते त्यालाही भगवंताची प्राप्ती होत नाही. कारण भगवंताच्या प्राप्तीसाठी अनंत कष्ट सहन करावे लागतात.

संत केवढे सहनशील असतात! त्यांना कुणी शिव्या दिल्या किंवा मारहाण केली तरी ते शांत राहतात. सामान्य माणूस शिवीला उत्तर म्हणून शिवी देतो. परंतु संत मात्र कुणी 'शिवी' दिली तरी त्याला 'ओवी' देतात, शिवी देत नाहीत. त्यांच्याजवळ शाप देण्याचे सामर्थ्य असते, परंतु ते कधीही शापवाणी उच्चारत नाहीत. यालाच 'क्षमा' असे म्हणतात. संताजवळ परिपूर्ण क्षमा असते. परंतु गृहस्थाजवळ मात्र अत्यंत कमी क्षमा असते. गृहस्थजीवनात असे अनेक प्रसंग येतात, त्यावेळी जर आपल्याजवळ क्षमा नसेल तर आपले जीवन उद्ध्वस्त होऊन जाते. म्हणून प्रत्येक मनुष्यासाठी क्षमा हे धर्माचे साधन मानले गेले आहे.

यानंतरचा धर्म आहे 'दान'. दुसऱ्याला न देता स्वतःच खाणे हा अपराध मानला जातो. जो केवळ स्वतःसाठी अन्न शिजवतो आणि फक्त स्वतःच खातो तो अन्न खात नसून पाप खातो, असे गीतेत म्हटले आहे. दुसऱ्याला दिल्याशिवाय खाऊ नये, अशा शास्त्रांचा आदेश आहे. दुसऱ्याला देण्याइतकी उदारभावना तुमच्याजवळ नसेल तर निदान खाण्यापूर्वी देवाला नैवेद्य तरी अर्पण करावा. देव खात नाही हे तुम्हाला चांगले माहीत आहे. तो खात नाही म्हणून तर तुम्ही देवाला नैवेद्य दाखवता! त्याने खाल्ले असते तर तुम्ही त्याला दिले नसते. 'तुझ्याकडे हात माझ्याकडे भात' अशी मराठीत एक म्हण आहे. देव काही खात नाही अशी आपली समजूत आहे. पण ती खरी नाही. देव अर्पण केलेल्या पदार्थावरील आपले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ममत्व खाऊन टाकतो आणि तो पदार्थ 'प्रसाद' म्हणून आपल्याला परत करतो. नवीन कपडे स्वत: घालण्याआधी दुसऱ्याला वापरायला देण्याची एक प्रथा जुन्या काळी होती. वस्तूवरील ममत्व कमी व्हावे हाच हेतू त्यामागे होता, परंतु आज मात्र असे नाही. आपले कपडे आपण घालतो आणि दुसऱ्याचेही कपडे आपणच घालतो. तुम्हाला दुसऱ्याला कपडे वापरायला द्यायचे नसतील तर ते गायीच्या अंगावर टाकून स्वत: वापरावेत किंवा आधी देवाला अर्पण करून मग वापरावेत.

दान हा धर्म आहे, तसाच तो व्यवहार देखील आहे. जग म्हणजे देण्या-घेण्याचा बाजार होय. जगात तुम्ही कोणाला काही देणार नाही आणि दुसऱ्याकडून काही घेणार नाही तर व्यवहारच होणार नाही. श्वासोच्छ्वास करणे हे देखील एक प्रकारचे घेणे-देणेच आहे. तुम्ही नाकाने हवा आत घेतली आणि ती बाहेर सोडलीच नाही तर? तर मृत्यू पत्करावा लागेल. बाहेर हवा सोडल्यानंतर पुन्हा आत घेतली नाही तरी देखील मरावेच लागेल.

ईश्वरदेखील देतो आणि घेतो. तो एका हाताने देतो तर दुसऱ्या हाताने घेतो. हे जग म्हणजे त्यानेच आपल्याला बहाल केलेले वैभव आहे. ईश्वर आधी देतो मग मागतो. मनुष्य मात्र आधी मागतो मग देतो, तर कधी देत देखील नाही. ईश्वर तुम्हाला देतो खूप, पण मागतो कमी. आपल्या कमाईतला दहावा हिस्सा धर्मासाठी खर्च करावा, असे शास्त्र सांगते. धर्म हा ईश्वर मानला तर - कारण धर्म हा ईश्वरच होय - तो तुम्हाला शंभरपट देतो आणि त्यातले फक्त दहापट मागतो. म्हणून आपल्या कमाईतला दहावा भाग धर्मासाठी खर्च करावा. दान केल्याशिवाय कलियुगात धर्मपालन होत नाही.

महाभारतात यक्षाने युधिष्ठिराला काही प्रश्न विचारले. त्यामध्ये 'माणसाचा मृत्यूनंतर मित्र कोण?' हादेखील प्रश्न होता. माणसाला जिवंतपणी मित्र लागतात. मित्र नसेल तर तुमचे दु:ख तुम्ही कुणाजवळ सांगून हलके कराल? तुमचा शत्रू थोडाच तुमचे दु:ख ऐकून घेणार असतो? तुमचा मित्रच तुमचे दु:ख सहृदयपणे ऐकतो, तुमच्या दु:खात सहभागी होतो. सुखात सगळे सहभागी असतात, परंतु दु:खात मात्र केवळ खरा मित्रच सहभागी होतो. यक्षाने जेव्हा विचारले, 'मरणाऱ्या माणसाचा मित्र कोण?' तेव्हा युधिष्ठिराने उत्तर दिले, 'दान हाच मरणाऱ्याचा मित्र होय'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मरणाऱ्याचा मित्र दानच आहे. अंतकाळी दान केल्यावर जे पुण्य लाभते त्यामुळेच जीवात्म्याला पुढे सद्गती मिळते. म्हणून प्रत्येकाने आपल्या शक्तीप्रमाणे आयुष्यभर दान केले पाहिजे. लोभ हे सर्व पापांचे मूळ आहे. लोभी मनुष्य कोणालाच काही देत नाही हे खरे. परंतु मेल्यावर तो एक फुटकी कवडीदेखील घेऊन जाऊ शकत नाही. एका सुभाषितकाराने म्हटले आहे –

'कृपणस्य समो दाता न भूतो न भविष्यति ।
अस्पृशन्नेव वित्तानि यः परेभ्यः प्रयच्छति ॥'

कृपणासारखा दाता या जगात आजपर्यंत कधी झाला नाही आणि यापुढे कधी होणार देखील नाही. कारण इतर दानी माणसे आपल्या हाताने थोडे दान करतात, परंतु कृपण मात्र हातांचा उपयोग न करता मृत्यूनंतर आपले सर्वस्वच इतरांना देऊन जातो, एवढा तो दानशूर असतो. या सुभाषितात अप्रत्यक्षरीत्या लोभी माणसाची टवाळी केली आहे. लोभामुळेच मनुष्याकडून पापे घडतात. म्हणून एका हिंदी कवीने, 'लोभ पाप का बाप बखाना । दान धर्म का मूल' असे म्हटले आहे. एखाद्या वृक्षाची मुळे तोडून टाकली, तर तो जिवंत राहणार नाही, त्याप्रमाणे दानधर्माचा त्याग केला तर आपले धर्मजीवन सुकून जाईल. तुम्ही जेव्हा दान करता तेव्हा ते व्यर्थ जात नाही. एखादे बीज जर तुम्ही भूमीला दान केले तर भूमी सहस्रपटीने त्याची परतफेड करते. तसे तुम्ही केलेले दान वृद्धिंगत होऊन तुम्हालाच परत मिळते.

उपनिषदात एक सुंदर कथा आहे. एका माणसाने सणानिमित्त देव-दानवांना भोजनाचे आमंत्रण दिले. देवांना अग्रमान दिल्यामुळे दानवांना राग आला ते म्हणाले, 'आम्ही देवांपेक्षा ज्येष्ठ आहोत म्हणून आम्हाला भोजनाला आधी बसवा.'

त्या माणसाने ते मान्य केले. परंतु एक अट घातली. तो म्हणाला, 'भोजनात मी तुम्हाला अग्रमान देईन, परंतु त्याआधी तुमच्या हातांना मी काठी बांधीन. ती बांधल्यावरच तुम्ही जेवावे अशी माझी अट आहे.'

दानवांनी ते मान्य केले आणि ते प्रथम जेवायला बसले. ठरल्याप्रमाणे त्यांच्या दोन्ही हातांना खांद्यापासून मनगटापर्यंत सरळ काठी बांधण्यात आली. त्यामुळे दानवांचा हात ताटापर्यंत पोहोचत होता, परंतु तो वाकत नसल्यामुळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तोंडात घास जात नव्हता. त्यांनी खूप वेळ प्रयत्न केला, परंतु त्यांना खाणे जमले नाही. शेवटी कंटाळून काहीच न खाता ते उठले. त्यानंतर देवांची पंगत बसली. देवांच्याही हातांना अशाच काठ्या बांधा असा दानवांनी आग्रह धरला. त्याप्रमाणे देवांच्याही हातांना काठ्या बांधण्यात आल्या. देव कसे जेवणार हे उत्सुकतेने दानव पाहू लागले. परंतु देव होते बुद्धिमान. काठीने बांधल्यामुळे हातात घेतलेला घास स्वतःच्या तोंडापर्यंत येत नाही परंतु तो दुसऱ्याच्या तोंडापर्यंत जाऊ शकतो, हे त्यांनी ओळखले आणि समोरासमोर बसून ते एकमेकांना घास भरवू लागले. हे पाहिल्यावर अशी बुद्धी आपल्याला का सुचली नाही याचे दानवांना दुःख झाले.

तुमच्या ताटातले अन्न दुसऱ्याला न देता तुम्हीच खाल तर तुमची अवस्था दानवांप्रमाणे होईल. तुम्ही दुसऱ्यांना खाऊ घालाल तर दुसरा कुणी तुम्हाला खाऊ घालेल. ज्याच्या घरात नेहमी अन्नदान होते असा मनुष्य दुसरीकडे कुठेही गेला तरी उपाशी राहात नसतो. कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्याच्या भोजनाची व्यवस्था होत असते. जो कधीही अन्नदान करीत नाही त्याची बाहेर निश्चित उपासमार होते. म्हणून दान हा अत्यंत महत्त्वाचा धर्म आहे. त्यामुळे आपल्या मनाला उदारपणा लाभतो. दानामुळेच आपले हृदय विशाल होऊ शकते. तुमचे हृदय विशाल नसेल तर तुम्ही ब्रह्माला कसे जाणाल? ब्रह्म तर अत्यंत व्यापक आहे. त्याला तुमच्या हृदयात साठवून ठेवायचे असेल तर तुमचे हृदय देखील तेवढेच विशाल झाले पाहिजे. संपूर्ण समुद्र एका कमंडलूत मावणार नाही. पूर्ण समुद्र हवा असेल तर समुद्राएवढेच भांडे आणावे लागेल. अन्यथा समुद्र कमंडलूत मावत नाही म्हणून रडत बसावे लागेल. त्याप्रमाणे क्षुद्र हृदयात व्यापक परमात्मा राहूच शकणार नाही. त्यासाठी हृदय विशाल करायला हवे आणि दान केले तरच हृदय विशाल होईल. म्हणून प्रत्येकाने यथाशक्ती दान करून आपले धार्मिक जीवन विकसित केले पाहिजे, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
११ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धर्माचारस्थल..५

जिज्ञासू सद्भक्तांनो,

काशीक्षेत्राचे माहात्म्य आपण प्रतिदिनी श्रवण करीत आहात. काशीच्या अनेक नावांपैकी एक नाव आहे 'अविमुक्तक्षेत्र'. 'अविना मुक्तः अविमुक्तः' असे या नामाचे एक स्पष्टीकरण दिले जाते. अवि म्हणजे पाप. अर्थात् हे क्षेत्र पापमुक्त आहे अथवा या क्षेत्रात आल्यावर पापांपासून मुक्ती मिळते, असा वरील व्युत्पत्तीचा अर्थ होतो. भगवान शिव काशीक्षेत्रात आले तेव्हापासून ते हे क्षेत्र सोडून गेले नाहीत. म्हणून या क्षेत्राला 'अविमुक्तक्षेत्र' म्हणतात. हा दुसरा अर्थ आहे. भगवान शिवाला प्रिय असलेल्या या पवित्र क्षेत्रात आपण सत्संग करीत आहात हे विशेष पुण्यप्रद होय.

अंतरंगशुद्धीसाठी जे आचार सांगितले आहेत त्यांनाच 'धर्म' असे म्हणतात. त्यांच्या आचरणांने मनुष्याचे अंतःकरण अत्यंत सुंदर होते. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा, जप आणि ध्यान हे धर्म अंतरंगसौंदर्य वृद्धिंगत करणारे आहेत. एका सुभाषितकाराने म्हटले आहे -

'हस्तस्य भूषणं दानं सत्यं कण्ठस्य भूषणम् ।
श्रोत्रस्य भूषणं शास्त्रं भूषणै किं प्रयोजनम् ॥'

आपले शरीर अलंकारांनी नटवावे अशी इच्छा प्रत्येकाच्या मनात असते. अलंकार अनेक प्रकारचे असतात. हातातले अलंकार वेगळे, कानातले वेगळे तर कंठातील वेगळे. शक्य तेवढ्या अलंकारांनी श्रीमंत मनुष्य आपले शरीर सजवत असतो. परंतु हे अलंकार क्षणिक असून त्यांच्यामुळे मनुष्याला गर्व होतो आणि त्याच्या मनाचे सौंदर्य उणे होते. दान हा खरा हाताचा अलंकार होय. तुमच्या हातात सोन्याच्या बांगड्या असतील, परंतु तुमच्या हातून जर दान घडत नसेल तर त्या बांगड्या घालून काय उपयोग? माणसाने सत्कार्यासाठी यथाशक्ती दान द्यावे आणि ते सत्पात्राला द्यावे. दानाशिवाय जे उपभोग घेतले जातात ते फारसे सुखावह होत नाहीत.

दानाचे तीन प्रकार आहेत. सोपाधिक दान, निरुपाधिक दान आणि सहजदान. सहजदान हे विलक्षण दान होय. फळाची इच्छा ठेवून दिले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जाणारे दान 'सोपाधिक दान' आहे. फळाची अपेक्षा न ठेवता कर्तव्यभावनेने जे दान केले जाते ते 'निरुपाधिक दान' आहे आणि सहजदान हे या दोन्ही दानांपेक्षा उच्चकोटीतले आहे. पहिल्या दोन दानांत 'मी दाता आहे' अशी अहंभावना असते. परंतु सहजदानात मात्र ही अहंभावना मुळीच नसते. घेणारा आणि देणारा हे दोन्ही भाव ज्या ठिकाणी लोप पावतात ते सहजदान होय. प्रत्येकाचे शरीर, इंद्रिये आणि बुद्धी भिन्न असली तरी सर्वांच्या अंतर्यामी असलेला आत्मा मात्र एकच असतो. डोळ्यांना दिसणारे भेद वरवरचे असतात. जो ज्ञानी असतो त्याच्या दृष्टीने प्राणिमात्रांत भेद नसून एकत्व असते. म्हणून ज्ञानी पुरुषाने दान दिले अथवा घेतले तरी त्याच्या बुद्धीत 'देणारा' आणि 'घेणारा' असा भेद नसतो. म्हणून या दानाला 'सहजदान' असे म्हणतात. समजा, तुमच्या उजव्या हातात एक रुपया आहे. चालता चालता तुम्ही तो डाव्या हातात घेतला. थोड्या वेळाने खिशात ठेवला. येथे कोणी कोणाला दान केले? रुपयाचे स्थान बदलले तरी तो तुमच्या जवळच राहिला. 'रुपया कोणाला दान केला' अशी भावना तुमच्या मनात निर्माण झाली नाही. कारण उजवा हात तुमचाच आहे, डावा हात तुमचाच आहे आणि खिसादेखील तुमचाच आहे. त्याप्रमाणे सहजदानाची स्थिती असते. ज्ञानी पुरुषाजवळ समष्टिभाव असल्यामुळे ज्याला दान दिले त्याच्या शरीरात देखील आपणच आत्मरूपाने नांदत आहोत या सत्याची त्याला प्रचीती आलेली असते. म्हणून त्याने केलेल्या दानात 'मी दाता आहे' असा अहंभाव नसतो. अशा दानाला 'सहजदान' म्हणतात.

अशा प्रकारे ज्ञानी पुरुषाकडून सहजदान घडते तर सामान्य लोकांकडून सोपाधिक आणि निरुपाधिक दान घडत असते. कोणत्या का प्रकारचे असेना, पण माणसाने यथाशक्ती दान केले पाहिजे. कारण दानामुळे माणसाचे हृदय उदार होते; विशाल होते. मनाची विशालताच आपल्याला भगवंताकडे घेऊन जाते. म्हणून प्रत्येक मनुष्याने दान करावे. परंतु ते सत्पात्राला, सत्कार्यासाठी करावे. अपात्र व्यक्तीला दान दिले तर त्याचा उपयोग होत नाही. गाईने गवत खाल्ले तर त्या गवताचे रूपांतर अमृतासमान दुधात होते. तेच दूध जर सापाला पाजले तर त्याचे रूपांतर विषात होते. त्याप्रमाणे योग्य माणसाला दान दिले तर ते सत्कारणी लागते आणि अपात्र माणसाला दान दिले तर ते वाया जाते.

दानानंतरचा धर्म आहे 'पूजा'. एक बाह्य-पूजा असते तर दुसरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंतरंग-पूजा असते. आपण इष्टलिंगाची पूजा करतो, त्याला अभिषेक करतो, गंध लावतो, बेल वाहतो. तन्मय होऊन इष्टदेवतेची जी अर्चना केली जाते तिला 'पूजा' म्हणतात. ज्याची जशी इष्ट देवता असेल त्याने तिची तशी पूजा केली पाहिजे. इष्टदेवतेची मूर्ती दिसायला स्थूल असली तरी तिच्या ठिकाणी आपली भावना जागृत झाल्यामुळे तिच्यात चैतन्याची प्रचीती येते. चैतन्य सर्वत्र व्याप्त आहे. ते जसे अत्यंत सूक्ष्म अशा अणूत आहे तसेच अत्यंत मोठ्या वस्तूत आहे. ते जडात आहे तसेचं चेतनात देखील आहे. जेथे मनुष्याची भावना एकवटते तेथे सत्-चित्-आनंदरूप परमात्मा प्रकट होतो. म्हणून एके ठिकाणी भावना केंद्रित करणे हा भगवंताच्या साक्षात्काराचा मार्ग होय. जोपर्यंत तुम्हाला निर्गुण-निराकाराची पूजा कशी करावी याचे ज्ञान नाही, जोपर्यंत तुमचे मन निराकाराची कल्पना करू शकत नाही तोपर्यंत भगवंताच्या सगुण-साकार रूपाचीच पूजा तुम्ही करायला हवी. सगुण-साकाराची पूजा करता करता निर्गुण-निराकाराकडे जाण्याचा मार्ग तुम्हाला सापडतो. संसाराचे चिंतन सोडून भगवंताच्या सगुण रूपाच्या ठिकाणी जेव्हा तुमचे मन स्थिर होते तेव्हा एकाग्र चित्ताने तुम्ही स्थूलाकडून सूक्ष्माकडे सहज जाऊ शकता.

बाह्यपूजेसाठी भस्म, गंध, बेल इत्यादी बाह्यसामग्री असते त्याप्रमाणे अंतरंगपूजेसाठी अंतरंगसामग्री असते. अंतरंगपूजेला 'मानसपूजा' असेही म्हणतात. स्थूलशरीराकडून बाह्यपूजा केली जाते त्याप्रमाणे सूक्ष्मशरीराकडून अंतरंगपूजा कशी केली जाते हे नीट समजून घेतले पाहिजे. जोपर्यंत मानसपूजा तुमच्या सूक्ष्मशरीराकडून घडत नाही तोपर्यंत तुमची भावना शुद्ध होत नाही. बाह्यपूजा करता करता मानसपूजा करण्याचाही अभ्यास करायला हवा. वृद्धावस्थेत तुम्हाला कदाचित स्नान करता येणार नाही, सरळ बसून तुम्ही पूजा करू शकणार नाही तेव्हा काय कराल? पूजा तर केलीच पाहिजे. अशा वेळी तुम्ही बिछान्यावर पडलेले असाल तरीही मानसपूजा करू शकता. त्यामुळे पूजेत खंड पडणार नाही. म्हणून स्थूलपूजा करता करता मानसपूजा करण्याचा अभ्यास केला पाहिजे.

भगवंताची पूजा करून आपले कार्य संपत नाही. पूजेनंतर त्याच्या नामाचा जपदेखील केला पाहिजे. ज्याच्या जिभेवर निरंतर भगवंताचे नाम नांदत असते अर्थात् जो सतत नामजप करीत असतो त्याला पातकाचा स्पर्श होत नाही. प्रकाशाजवळ अंधार राहात नाही त्याप्रमाणे भगवन्नामाचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जप करणाऱ्याजवळ पाप राहत नाही. भगवन्नाम हे भगवत्स्वरूपच असते. भगवंत वेगळा आणि त्याचे नाम वेगळे, असे असत नाही. नाम हेच त्याचे रूप होय. सद्गुरूकडून नाममंत्राचा लाभ झाला की भगवंताची प्राप्ती झाली असे समजावे. भगवन्नामात जेवढे सामर्थ्य आहे तेवढे भगवंतात देखील नाही. भगवंताने अवतार घेतला आणि तो समाप्तही झाला. परंतु त्याचा नामगजर मात्र आजदेखील चालूच आहे. भगवंताच्या अवतारसमयी भलेही आपण उपस्थित नसू, परंतु त्याच्या नामजपामुळे आपला त्याच्याशी साक्षात् संबंध येतोच आहे. नाम म्हणजे भगवंताशी संबंध साधणारे एक सूत्र होय. एखाद्या मंदिरात पूजेसाठी बसल्यावर आपण मूर्तीला स्पर्श करू शकत नाही. त्यावेळी अभिषेक करताना आपल्या हाती एक सूत्र दिले जाते. सूत्र धरून तुम्ही गाभाऱ्याबाहेर बसलात तरी आत जी पूजा चाललेली असते ती तुम्हीच करीत आहात असे समजले जाते. त्याप्रमाणे नाम हे भक्त आणि भगवंत यांना जोडण्याचे काम करत असते. म्हणून पंचाक्षरी महामंत्राला 'शैवसूत्र' असे एक नाव दिलेले आहे.

मनुष्य जेव्हा भगवन्नामाचा जप सुरू करतो त्यावेळी त्याचा भगवंताशी संबंध जोडला जातो. तुम्ही इतके जण आमच्यासमोर बसलेले आहात. तुमच्यापैकी एकाचे नाव घेऊन जर आम्ही हाक मारली तर तो जागा होईल आणि उठून आमच्याकडे येईल. ज्याचे नाव घेतले तोच येईल, दुसरा येणार नाही. नामात एवढे सामर्थ्य असते. तुमचे नाव घेऊन तुम्हाला इथपर्यंत खेचून आणता येते. एकवेळ नाव उच्चारले जर तुम्ही आमच्यापर्यंत येता तर हजारवेळा, लक्षवेळा तुम्ही भगवंताचे नाम घेतले तर तो तुमच्याजवळ का बरे येणार नाही? भगवंताला आपल्या सन्मुख करण्याचा नाम सर्वांत सोपा उपाय आहे. म्हणून नाव हे भगवंताशी संबंध साधणारे सूत्र होय.

भगवन्नामाची पुन्हा पुन्हा आवृत्ती करणे यालाच 'जप' असे म्हणतात. भगवन्नामाचा सतत जप केल्याने आपल्या हृदयात एक विलक्षण ऊर्जा उत्पन्न होते. येथे आपण पंखा फिरताना पाहतो, ट्यूब प्रकाशित होताना पाहतो. ही किमया विद्युत्शक्तीची आहे. विद्युत् कशी निर्माण होते? तर एक चक्र सतत स्वत:भोवती फिरल्यामुळे. मग ते चक्र पाण्याच्या धारेखाली फिरणारे विद्युत्जनित्रातील चक्र असो की जनरेटरमधील चक्र असो. एक चक्र सतत स्वत:भोवती फिरल्यामुळे जशी विद्युत्शक्ती उत्पन्न होते त्याप्रमाणे भगवन्नामाचा सतत जप केल्याने आपल्या आत एक विलक्षण ऊर्जा निर्माण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होते. त्या शक्तीमुळे साधकाचे सर्व मानसिक दोष दूर होतात. म्हणून माणसाच्या मनात परिवर्तन करण्यासाठी धर्माचरणाची नितांत आवश्यकता आहे.

वेशभूषा करून आपण आपल्या सौंदर्यात परिवर्तन करू शकतो. परंतु बाह्य-अलंकार धारण करून मनात परिवर्तन करता येत नाही. वस्त्रालंकारांनी आपण आपले मूळ स्वरूप काही काळ लपवू शकतो, परंतु थोड्या काळाने ते प्रकट झाल्याशिवाय राहात नाही. रामायणातील शूर्पणखेने राम-लक्ष्मणांसमोर जाताना सुंदर रूप धारण करून आपले खरे स्वरूप लपवले होते. परंतु ते दोघे वश होत नाहीत हे लक्षात येताच तिने आपले मूळस्वरूप प्रकट केले. शिवलिंगावर बसलेला, भगवान शिवाच्या सान्निध्यात राहणारा विंचू नांगीने डंख करण्याची आपली वृत्ती थोडीच सोडून देत असतो? म्हणून बाह्य आभूषणे काही काळपर्यंतच मनुष्याचा स्वभावदोष झाकून ठेवू शकतात. ते त्याच्या स्वभावात परिवर्तन घडवू शकत नाहीत. परंतु अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य इत्यादी अंतरंगातील आभूषणे मात्र आपले अंतरंगसौंदर्य वृद्धिंगत करीत असतात. भलेही शरीरावर एकही सुवर्णाचे आभूषण नसले तरी देखील. धर्मालंकार ज्याच्याजवळ असतात त्याला त्याचा लाभ होतोच, परंतु इतरांनाही त्यामुळे लाभ होतो. बाह्य अलंकार मात्र अनेक दृष्टीने हानिकारक ठरतात. अंतःकरणातील दोष दूर करून त्याला सात्त्विक करणारे हे दहा धर्मालंकार होत.

'जप' हा देखील एक सात्त्विक अलंकार होय. जपामुळे साधकाचे मन पवित्र होते. जप कधीही आणि कुठेही करता येतो. सकाळी स्नान केल्यानंतर लिंगपूजा करून तुम्ही जप करता हे योग्य आहे. परंतु इतर वेळीही काम करीत असताना सतत जप केला पाहिजे. अंतकाळी भगवंताचे नाम जिभेवर यावे यासाठी जन्मभर सतत जप करावा लागतो. आयुष्यभर नामजप करून देखील अंतकाळी ते जिभेवर येईलच याची खात्री देता येत नाही.

'जनम जनम मुनि यतन कराहि । अंत राम कहि आवत नाहि ॥'

असें तुलसीदासांनी म्हटले आहे. अंतकाळी आपली जशी बुद्धी असते तशीच पुढे गती मिळते. ती सद्‌गती असेल वा दुर्गती. आयुष्यभर भगवंताचा नामजप करून देखील मृत्यूच्या क्षणी संसाराचे स्मरण होण्याचा संभव असतो. त्यावेळी संसार आठवला तर पुन्हा जन्म-मृत्यूचे चक्र मागे लागते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्याच्यावर तुमचे अत्यंत प्रेम असते त्याचेच तुम्हाला वारंवार स्मरण होत असते. तुम्हाला जर संसाराचे सतत स्मरण होत असेल तर तुमचे प्रेम संसारावर आहे. भगवंताचे सतत स्मरण होत असेल तर तुमचे प्रेम भगवंतावर आहे असे समजा. संसाराची सतत आठवण होत असेल तरी अजून वेळ गेलेली नाही. जोपर्यंत तुमचे शरीर स्वस्थ आहे, जोपर्यंत तुम्हाला आयुष्य आहे, तोपर्यंत तुम्ही बरेच काही करू शकता. विद्यार्थी वर्षभर अभ्यास करतो तेव्हा शेवटी त्याला तीन तासांत परीक्षा द्यावी लागते. जर तो तीन तासांत प्रश्नांची उत्तरे नीट लिहू शकला नाही तर त्याचा वर्षभरातला अभ्यास वाया गेल्यात जमा आहे. जसे लौकिक जीवन आहे तसेच पारलौकिक जीवन आहे. म्हणून आपल्याजवळ अजून वेळ आहे. एक वर्ष नसेल, पण महिना असेल. महिना नसेल तर एक दिवस तरी असेल. एक दिवस नसेल तर निदान एक तास तरी असेल. या एका तासात आपण बरेच काही करू शकतो. आपली भावना उत्कट असेल तर एका तासात आपण आपले सबंध जीवन बदलून टाकू शकतो. कदाचित् आपल्याजवळ एक तासदेखील नसेल, केवळ एक मिनिट असेल तर तेही पुरेसे आहे. सत्संगाला फार वेळ नको. अत्यंत कमी वेळात देखील तो तुम्हाला बरेच काही देऊ शकतो. अहिंसा, सत्य, पूजा यांच्यात तुम्ही कमीत कमी वेळ घालवला तरी तेवढ्या काळात जो धर्मसंग्रह होतो त्याच्यामुळे भयावह संसारापासून जीवात्म्याला मुक्ती मिळते. म्हणून ज्याला भगवंताशी संबंध जोडायचा असेल त्याच्यासाठी नामजप हे अत्यंत सोपे साधन आहे. गीतेत भगवंतांनी म्हटले आहे -

'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि'

यज्ञ अनेक प्रकारचे आहेत काही यज्ञांत तर पशुहिंसाही होते. यज्ञ करण्यासाठी अनेक प्रकारची सामग्री जमवावी लागते. गरिबांना यज्ञ करणे शक्य होत नाही. परंतु गरिबातला गरीबदेखील करू शकेल असा यज्ञ म्हणजे 'जपयज्ञ' होय. जपयज्ञ म्हणजे भगवंताचे नामस्मरण. ते केल्याने मनुष्याला अपार पुण्यलाभ होतो. म्हणून आपल्या जिभेवर भगवंताच्या नामाची स्थापना करावी. उठताना, बसताना, जेवताना, झोपताना प्रत्येक क्षणी त्याचा नामजप करावा. सांसारिक कार्य करताना भगवन्नामाचा जप सहज करता येतो. नामजपामुळे कामात किंवा कामामुळे नामजपात विघ्न येत नाही. तुम्ही दुसऱ्याशी बोलता बोलता जसे काम करीत असता किंवा काम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करता करता जसे दुसऱ्याशी बोलत असता त्याप्रमाणे.

यानंतरचा धर्म आहे 'ध्यान'. ज्याच्या नावाचा आपण सतत जप करत असतो त्याच्या अलौकिक रूपाचे सतत चिंतन करणे म्हणजे 'ध्यान' होय. भगवंताचे ध्यान केल्याने त्याचे आपल्या हृदयातील अस्तित्व जाणवते. आपण संसाराचे ध्यान केले तर संसार आपल्या आत शिरेल. भगवंताचे ध्यान केले तर भगवंत आपल्या आत शिरेल. प्रत्यक्षात आपल्या जवळ वस्तू नसल्या तरी त्याचे ओझे आपण आपल्या मनात वागवत असतो. घर, शेत, मुले इत्यादी. हे सारे आपल्यापासून दूर असतात. तरी आपल्या मनात ओझे होऊन बसलेले असतात. आपण भगवंताचे ध्यान करीत नाही, संसाराचे करतो. म्हणून संसार आपल्या मनात दबा धरून बसलेला असतो. आपल्या मनात एकतर संसार राहील किंवा भगवंत राहील. दोन्ही एकावेळी राहणे शक्य नाही. परंतु भगवंत असा विलक्षण आहे की तो जर एकदा आपल्यात शिरला तर संसाराला मनातून कायमचा हद्दपार करतो. परंतु तुम्ही भगवंताला आमंत्रणच देत नाही. तो तर तुमच्याजवळ येण्यासाठी उत्सुक आहे. तुम्ही जेव्हा त्याचे ध्यान कराल, ध्यानाद्वारे त्याला आवाहन कराल तेव्हा तो तुमच्याजवळ येईल. भगवंत हा मंगलधाम आहे. तो जेव्हा तुमच्या हृदयात प्रतिष्ठित होईल तेव्हा तुमचा संसारदेखील मंगल होईल आणि शेवटी तुम्हाला परममांगल्याची प्राप्ती होईल.

याप्रमाणे 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त अहिंसेपासून ते ध्यानापर्यंत दहा धर्म सांगितले आहेत. शिवज्ञानसंपन्न योगीदेखील या धर्मांचे आचरण करतात. आपले आचरण पाहून अन्य लोक धर्माचरण करीत असतात याची जाणीव असल्यामुळे ते धर्माचरण करीत असतात. ज्ञानीपुरुषाच्या धर्माचरणामुळे सामान्य माणसाला धर्माचरणाची प्रेरणा मिळत असते. म्हणून सर्वांनी आपल्या आत्मोन्नतीसाठी अवश्य धर्माचरण केले पाहिजे. दहा धर्मांपैकी एका धर्माचे जरी पालन करायला सुरुवात केली तरी हळूहळू प्रगती होऊन तुम्ही महान धार्मिक व्हाल. या धर्मपालनामुळेच तुम्हाला ऐहिक आणि पारलौकिक सुखांची प्राप्ती होईल, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
१२ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

१७

धर्माचारस्थल..६

जिज्ञासू सद्भक्तांनो,

काशीक्षेत्राच्या अनेक नावांपैकी एक नाव आहे 'वाराणसी'. दक्षिणवाहिनी गंगा काशीक्षेत्रात उत्तरवाहिनी होते. त्याचप्रमाणे वरुणा आणि अस्सी या दोन नद्या काशीक्षेत्राच्या दोन बाजूंनी वाहात असतात. या दोन नद्यांच्या मधल्या भूप्रदेशालाच 'वाराणसी' (वरुणा + अस्सी) असे म्हणतात. गंगानदीत अनेक जलचर प्राणी राहातात. परंतु काशीक्षेत्राजवळच्या प्रवाहात मात्र एखाद्या जलचर प्राण्याने माणसाचा घात केल्याचे उदाहरण नाही. भगवान विश्वेश्वराची ही कृपाच होय. अशा पवित्र काशीक्षेत्रात आपण धर्माचरण, सत्संग करीत आहात. धर्म मनुष्याला पशुत्वाकडून देवत्वाकडे नेत असतो. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त जे दहा धर्म सांगितलेले आहेत त्यांचे आचरण का बरे करावे? केले नाही तर चालणार नाही काय? असा प्रश्न कोणाला पडेल. या प्रश्नाचे उत्तरच जणू ज. रेणुकाचार्यांनी पुढील श्लोकात दिले आहे -

शिवेन विहितो यस्मादागमैर्धर्मसंग्रहः ।
तस्मात्तमाचरन् विद्वान् तत्प्रसादाय कल्प्यते ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-६०)

वेद आणि आगम हे आपल्या देशातील सर्वांत प्राचीन वाङ्मय होय. परमेश्वराच्या श्वासातून वेद निर्माण झाले आणि त्याच्या कंठातून आगम निर्माण झाले अशी पारंपारिक श्रद्धा आहे. वेद आणि आगम म्हणजे परमेश्वराची आज्ञा होय. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा, जप आणि ध्यान या दहा धर्मांचे प्रतिपादन आगमांत केलेले आहे. 'श्रीसिद्धान्तशिखामणी' हा ग्रंथ अठ्ठावीस शिवागमांचे सार आहे. त्यामुळे या ग्रंथात देखील या दहा धर्मांचे पालन करावे, असे प्रतिपादन केलेले आहे. हे दहा धर्म म्हणजे परमेश्वराचा आदेश होय. म्हणून त्याचे पालन केले पाहिजे. जीवात्म्याला भगवान शिवाचा अनुग्रह आणि कृपा हवी असते. शिवाच्या अनुग्रहाशिवाय आणि प्रसादाशिवाय जीवात्म्याला कैवल्य प्राप्त होत नाही. शिवाची कृपा संपादन करण्यासाठी दहा धर्मांचे पालन करावे लागते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्व जीव 'पशू' असून शिव 'पशुपती' आहेत. पशूंचा उद्धार करण्यासाठीच तर भगवान् शिवांनी धर्मोपदेश केलेला आहे. आपले पशुत्व नष्ट करायचे असेल तर धर्मपालन अवश्य केले पाहिजे. कारण धर्म पतितांचा उद्धार करतो. शिवाने उपदेशिलेल्या धर्मांचे जो पालन करतो त्याच्यावर शिवाची कृपा होते. जे ज्ञानाने आणि कर्माने प्राप्त होत नाही ते भगवान शिवाच्या कृपेने सहज प्राप्त होते. शिवप्रसादाने सर्व दुःखे आणि सर्व संकटे दूर होतात. शिवाची कृपा हवी असेल तर त्याच्या आज्ञेचे पालन करायला हवे. मालकाची मर्जी सांभाळायची असेल तर सेवकाने मालकाची आज्ञा तंतोतंत पाळली पाहिजे, त्याप्रमाणे धर्माचरण करणे म्हणजे शिवाज्ञा पाळणे होय. ज्याच्या आचरणात धर्म नसतो त्याची तुलना पशूसोबत केली जाते. धर्माचरण केले तरच पशुत्वापासून मुक्ती मिळू शकते. एक सुभाषितकार म्हणतो –

'आश्चर्यमेद् मनुष्यलोके अमृतं परित्यज्य विषं पिबन्ति ।
धर्मं प्रसंगादपिनाचरन्ति पापं प्रयत्नेन समाचरन्ति ॥'

सुभाषितकाराला माणसाचे वर्तन पाहून आश्चर्य वाटते. धर्माचरण करण्याचा प्रसंग येऊनं देखील माणूस धर्माचरण करीत नाही आणि प्रसंग नसताना देखील प्रयत्नपूर्वक पापाचे आचरण करतो. सहज प्राप्त झालेल्या अमृताकडे पाठ फिरवून हट्टाने विष पिण्यासारखीच ही गोष्ट आहे. म्हणून शिवकृपा संपादन करण्यासाठी माणसाने धर्माचरण केलेच पाहिजे.

अधर्मं न स्पृशेत् किंचिद् विहितं धर्ममाचरेत् ।
तं च कामविनिर्मुक्तं तमपि ज्ञानपूर्वकम् ॥ १६-६१ ॥

जीवनात अधर्माचरण करण्याचा प्रसंग आला तरी अधर्माचरण करू नये. हिंसा करण्याची, खोटे बोलण्याची वेळ आली तरी तसे करणे टाळावे. 'जे करा' असे शास्त्र सांगते अशा विहित कर्माचे प्रयत्नपूर्वक आचरण करावे. पूजा, जप, ध्यान आदी धर्मांचे आचरण फळाची अपेक्षा न ठेवता करावे. थोडे केल्यावर फार मिळावे अशी वृत्ती व्यापाऱ्याची असते, साधकांची नसते. परमात्मा तर द्यायलाच बसलेला आहे. त्याने आतापर्यंत बरेच काही दिले. हा सारा प्रपंच त्यानेच आपल्याला दिलेला आहे. त्याने इतके काही दिले आहे की त्याला स्वतःच्या अंगावर घालण्याइतके वस्त्रदेखील शिल्लक राहिलेले नाही. राहायला घर राहिले नाही. म्हणून तो स्मशानात जाऊन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बसला. सर्व काही देऊन तो दिगंबर झाला तरीदेखील त्या दिगंबरालाच लोक सारखे काहीतरी मागतच असतात. कर्म करणे हे मनुष्याचे कर्तव्य आहे तर त्याचे फळ देणे हे ईश्वराचे काम आहे. न मागता त्याने इतके दिले तरी तुम्ही त्याला सारखे मागतच असता. मग त्याने तुमच्यावर नाराज का बरे होऊ नये? सतत बापाजवळ काही ना काही मागणाऱ्या मुलावर बाप नाराज होतो त्याप्रमाणे. म्हणून पुन्हा पुन्हा मागून, देणाऱ्याचा अवमान करू नये. जो केलेल्या कर्माच्या फळाची आशा ठेवतो त्याला शास्त्रकाराने कृपण असे संबोधले आहे. 'कृपणाः फलहेतवः' जो कृपण असतो तो वारंवार काहीतरी मागत असतो. मनुष्याने उदार व्हावे, कृपण होऊ नये.

परमेश्वर उदार आहे. त्याच्याजवळ उदार होऊनच गेले पाहिजे. स्वभाव आणि गुण सारखे असतील तरच दोघांत मैत्री होऊ शकते. तसे नसेल तर मैत्री संभवत नाही. परमेश्वर उदार आणि तुम्ही कृपण असाल तर तुमच्यात सख्य कसे निर्माण होईल? म्हणून वीरशैवसिद्धान्तात 'शिव होऊन शिवाची पूजा करावी' असे म्हटले आहे. जीवभावाने शिवपूजा कराल तर काहीतरी मागण्याची इच्छा होईल. शिवाजवळ जसे उत्तम गुण आहेत, तसे उत्तम गुण संपादन करून शिवाजवळ जायला हवे. मागणाऱ्याला फारसे काही मिळत नाही, परंतु न मागणाऱ्याला मात्र सारे काही मिळते. म्हणून निष्काम भावनेने धर्माचरण करावे आणि ते ज्ञानपूर्वक करावे. आपण काय करीत आहोत याचे ज्ञान नसेल तर त्यामुळे अनर्थ घडू शकतो.

पंचतंत्रात एक प्रसिद्ध कथा आहे. झोपलेल्या राजाचे रक्षण करणाऱ्या माकडाला राजाच्या चेहऱ्यावर बसलेल्या माशीला हाकलायचे होते. त्याने माशीला अनेकदा उडवले. परंतु ती पुन्हा राजाच्या चेहऱ्यावर बसली. हे पाहून त्याने तलवारीने तिच्यावर वार केला. परिणामी राजाचा मृत्यू ओढवला. माकडाचा उद्देश चांगला होता. परंतु आपण जे करीत आहोत त्याचा कोणता परिणाम होईल याचे त्याला ज्ञान नव्हते. त्यामुळे तो राजाचा प्राणरक्षक न ठरता प्राणभक्षक ठरला. म्हणून आपले प्रत्येक कर्म जाणिवपूर्वक केले पाहिजे.

आत्मवत् सर्वभूतानि संपश्येद् योगवित्तमः ।
जगदेकात्मताभावाद् निग्रहादिविरोधतः ॥ १६-६२ ॥

आपल्या आत्म्याप्रमाणेच इतर सर्व भूतांना मानले पाहिजे. कारण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अवघे विश्व चैतन्यानेच भरून गेलेले आहे. तेथे मूलत: कोणताच भेद नाही. जेव्हा सर्व भूतांत आत्मरूप दिसू लागते तेव्हा सारे भेद मावळून जातात. मग कोणाबद्दल मनात द्वेष राहत नाही की कोणाबद्दल राग राहत नाही. सर्व जीवात्म्यांना आत्मरूप मानणारी भावना दृढ झाली तर आपल्या हातून कुणालाही इजा पोहोचत नाही आणि कुणाचेही अकल्याण होत नाही. सर्व भूतांत आत्मरूप पाहणे हेच ज्ञान होय.

एक एव शिव: साक्षाज्जगदेतदिति स्फुटम् ।
पश्यत: किं न जायेत ममकारो हि विभ्रम: ॥ १६-६३ ॥

प्रपंच निर्मितीपूर्वी एकमेव ब्रह्म होते. पुढे 'एक'च 'अनेक' झाले. म्हणून अनेकांत आपण एकालाच पाहिले पाहिजे. हे सर्व विश्व म्हणजे साक्षात् शिवच आहे, अशी भावना दृढ करायला हवी. जो या दृष्टीने प्रपंचाकडे पाहतो त्याच्या मनात विशिष्ट वस्तूबद्दल ममत्व असत नाही.

धर्म एव समस्तानां यत: संसिद्धिकारणम् ।
निस्पृहोऽपि महायोगी धर्ममार्गं च न त्यजेत ॥ १६-६४ ॥

ज्याला सांसारिक गोष्टींशी काही देणे-घेणे नसते अशा अत्यंत नि:स्पृह माणसाने धर्माचरण करण्याची जरुरी आहे काय? असा प्रश्न कोणी उपस्थित केला तर त्याचे येथे उत्तर दिले आहे. माणसाला भोग आणि मोक्ष दोन्ही हवे असतात. इहलोकात असताना त्याला सुखोपभोग हवे असतात तर परलोकात जाताना त्याला सद्‌गतीची अपेक्षा असते. धर्म या दोन्ही अपेक्षा पूर्ण करतो. ज्याच्या आचरणामुळे माणसाचा अभ्युदय होतो आणि अंती मुक्ती प्राप्त होते त्यालाच 'धर्म' असे म्हणतात. अशा सर्वसिद्धिदायक धर्माचे आचरण जो नि:स्पृह आहे अशा माणसाने देखील केले पाहिजे. आपण नि:स्पृह आहोत म्हणून धर्माचा त्याग करण्याचा त्याला अधिकार नाही.

ज्ञानामृतेन तृप्तोऽपि योगी धर्मं न संत्यजेत् ।
आचारं महतां दृष्ट्वा प्रवर्तन्ते हि लौकिका: ॥ १६-६५ ॥

ज्ञान ही अंतिम व्यवस्था आहे. शिव-जीवाच्या अभेदाचा बोध हेच खरे ज्ञान होय. या ज्ञानाने पूर्ण तृप्ती लाभते. ज्याला ज्ञानामृताने तृप्ती लाभली अशा ज्ञानसंपन्न पुरुषाने धर्माचरण करावे काय?

एकदा एका सत्पुरुषाच्या आश्रमात एक ज्ञानी पुरुष गेला. भोजनाची वेळ झाल्यावर आश्रमातील सेवकांनी त्याला हातपाय धुण्यास सांगितले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेव्हा तो म्हणाला,

'मी ज्ञानगंगेत सुस्नात झालो आहे. मला हातपाय धुण्याची काय गरज आहे?'

सेवक बिचारे गप्प बसले. त्यांनी त्याला तसेच जेवायला वाढले. परंतु त्याच्यासमोर पाणी मात्र ठेवले नाही. ज्ञानी पुरुष जेवू लागला. जेवता जेवता त्याला तहान लागली. त्याने पाणी मागितले. त्यावेळी एक सेवक म्हणाला,

'महाराज, तुम्ही ज्ञानगंगेत स्नान केलेले आहे आणि ज्ञानामृताने तृप्त झाला आहात. तुम्हाला या वरच्या पाण्याची काय गरज आहे?'

आपली विद्या आपल्यालाच फळली याची त्या ज्ञानी पुरुषाला जाणीव झाली.

ज्ञानी पुरुषालादेखील आचरणाची आवश्यकता असते. म्हणून त्यांनी आचरणाचा त्याग करू नये. अज्ञानी माणसाला ज्ञानी होण्यासाठी धर्माचरणाची गरज असते. मग ज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्याने धर्माचरण सोडून कसे चालेल? त्याचे आचरण पाहूनच इतर सामान्य माणसे वागत असतात. ज्ञानी पुरुषाकडून जर अधर्माचरण होत असेल तर सामान्य माणसाला अधर्माचरणासाठी एक आयतेच निमित्त मिळेल. म्हणून त्याने निष्ठापूर्वक धर्माचरण करायला हवे. शेवटी धर्माचारस्थलाचा समारोप करताना ज. रेणुकाचार्य म्हणतात –

सदाचारप्रिय: शम्भु: सदाचारेण पूज्यते ।
सदाचारं विना तस्य प्रसादो नैव जायते ॥ १६-६६ ॥

भगवान शिव आचारप्रिय आहेत. लिंगाचार, सदाचार, शिवाचार, गणाचार आणि भृत्याचार असे पाच आचार वीरशैवसिद्धान्तात सांगितलेले आहेत. त्यामधील सदाचार या आचाराविषयी येथे सांगितले आहे. भगवान शिव हे सदाचारप्रिय आहेत. सदाचारी होऊनच त्यांची पूजा केली पाहिजे. दुराचरण करणाऱ्याची पूजा भगवान शिवाला मान्य होत नाही. सदाचारी झाल्याशिवाय भगवान शिवाची कृपा आपल्यावर होणार नाही. म्हणून जे शिवाला प्रिय आहेत आणि ज्यामुळे मनुष्याचे शरीर, वाणी आणि मन ही त्रिकरणे शुद्ध होतात अशा धर्मांचे आचरण मनुष्याने करायला हवे. मन पवित्र असेल तरच भगवत्कृपेचा लाभ होतो. स्नान करून, स्वच्छ धुतलेली वस्त्रे नेसून जेव्हा आपण पूजेला बसतो तेव्हा आपल्या मनात प्रसन्नता दरवळत राहते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्नान केल्याने शरीरावरचा मळ धुतला जाऊन शरीर स्वच्छ, शुद्ध होते. परंतु मनावर साचलेला मळ मात्र बाहेरच्या पाण्याने नष्ट होत नाही. तो नष्ट होतो केवळ धर्माचरण केल्याने. धर्माचारस्थलात सांगितलेले जे दहा धर्म आहेत ते शिवाज्ञा मानून त्यांचे प्रत्येकाने निष्ठेने आचरण केले पाहिजे. दहा धर्मातल्या एका धर्माला जरी आपले जीवनमूल्य मानून त्याप्रमाणे आपण आचरण केले तरी खूप काही साधले जाईल. उसाच्या एका पेरातून दुसरे पेर सहज उगवते त्याप्रमाणे एका धर्माच्या आचरणाचा अंगीकार केला तरी त्यातूनच पुढे दुसऱ्या धर्माचेही सहज आचरण घडू लागते. एका धर्माचे आचरण केले तरी पुढील नऊही धर्म हाताशी येतात. परंतु जर आरंभच केला नाही तर काहीच घडणार नाही. म्हणून साधकाने दहांपैकी निदान एका धर्माच्या आचरणाला तरी आरंभ करावा. एका सुभाषितकाराने म्हटले आहे-

'निशायां दीपकश्चंद्रः प्रभाते दीपको रविः ।
त्रैलोक्ये दीपको धर्मः सुपुत्रः कुलदीपकः ॥'

चंद्र रात्रीला प्रकाशित करतो, सूर्य दिवसाला प्रकाशित करतो, सुपुत्र आपल्या कुळाला उजळून टाकतो. त्याप्रमाणे धर्म त्रैलोक्याला प्रकाशित करणारा असतो. आपल्या जवळचा धर्म जणू हातात घेतलेल्या दिव्यासारखा असतो. हातात दिवा घेऊन तुम्ही अंधारात निघालात तर तो दिवा अंधार दूर करतो. त्याप्रमाणे तुमच्या जवळचा धर्म तुम्ही जेथे कुठे जाल तेथले अज्ञान आणि धर्म नष्ट करतो. रात्र कितीही अंधारलेली असली तरीही तुमच्या मुठीतला प्रकाश तुम्ही ज्या वाटेवर चालाल ती वाट उजळून टाकतो. हाती प्रकाश असेल तर अंधारचे भय बाळगायचे कारण नाही. तुमची वाट पावलापावलांवर उजळत जाईल. हातात प्रकाश नसेल तर दगडधोंड्यांना ठेचकाळण्याशिवाय गत्यंतर नाही. त्याप्रमाणे तुमच्या हृदयातला धर्म तुम्हाला आत्मोद्धाराची वाट दाखवत असतो. सुखी व्हायचे असेल तर प्रत्येकाने धर्माचरण करायला हवे. केवळ धर्मच त्रैलोक्याला उजळून टाकू शकतो, एवढे सांगून आजचे आशीर्वचन आणि धर्माचारस्थलाचे विवरण पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर,जंगमवाडी मठ, वाराणसी
१३ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भावाचारस्थल..१

जिज्ञासू सद्भक्तांनो,

काशीला 'आनंदकानन' असे म्हणतात. कानन म्हणजे अरण्य. सर्वांना परमानंद देणाऱ्या भगवान शिवाचे वास्तव्य काशीला असल्यामुळे सर्वांना येथे केवळ आनंदाचीच प्राप्ती होते. दु:खापासून मुक्ती मिळवण्यासाठी सारे लोक काशीला येत असतात. काशीला आनंद मिळत नसेल तर मग कुठे मिळेल? आनंदप्राप्तीसाठी आपल्याला काही साधना करावी लागते. केवळ मागितल्याने आनंद मिळत नसतो. आनंद सर्वांना हवा असतो, परंतु ज्यामुळे आनंदाची प्राप्ती होते ते धर्माचरण मात्र कुणाला नको असते, असे महाभारतात म्हटले आहे. धर्माचरणाशिवाय आनंद प्राप्त होत नाही. मोबदला दिल्याशिवाय या जगात काहीही मिळत नाही. तुम्ही शारीरिक कष्ट करणार नसाल, काही तपस्या करणार नसाल, उपवासादी व्रते करणार नसाल तर तुम्हाला अलौकिक आंनद कसा प्राप्त होईल? लौकिक सुखाला तिलांजली दिल्याशिवाय अलौकिक सुख हाती लागणार नाही. म्हणून काशीक्षेत्रात तुम्हाला आनंदाची प्राप्ती होईल, परंतु ती होण्यासाठी तुम्हाला नियमबद्ध वर्तन करावे लागेल. काशीला येणाऱ्या जीवांचे दु:ख दूर करून त्यांना भगवान शिव परमानंद देतात. म्हणून काशीला 'आनंदकानन' अशी एक संज्ञा आहे. गंगास्नान, भगवान विश्वेश्वराचे दर्शन आणि जंगमवाडी मठातला सत्संग या साऱ्यांचा लाभ तुम्हाला नित्य होत आहे. यापेक्षा मोठा आनंद दुसरा कोणता असेल?

धर्म म्हणजे काय? त्याचे आचरण कसे करावे? याविषयी कालच्या आशीर्वचनात आपण विचार केलेला आहे. यानंतरचे स्थल आहे भावाचारस्थल.

भाव एवास्य सर्वेषां भावाचार: प्रकीर्तित: ।
भावो मानसचेष्टात्मा परिपूर्ण: शिवाश्रय: ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-६७)

भाव म्हणजे भावना. भाव ही मनाची वृत्ती होय. वृत्ती जेव्हा सांसारिक विषयांचे ग्रहण करणारी असते तेव्हा तिला वैषयिक वृत्ती म्हणतात. परंतु जेव्हा ती वृत्ती भगवान शिवाचा आश्रय घेते तेव्हा तिला 'भाव' अशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संज्ञा दिली जाते. प्रत्येक मनुष्याजवळ चित्त आणि वित्त असते. चित्त म्हणे मन आणि वित्त म्हणजे धन. वित्त तुम्ही अनेकांना वाटून देऊ शकता. परंतु चित्त मात्र केवळ एकालाच म्हणजे भगवान शिवालाच दिले पाहिजे. जेव्हा चित्तवृत्ती संपूर्णपणे भगवंताला अर्पण केली जाते तेव्हा ती भावना होते. धर्माचरणात शारीरिक क्रियांना प्राधान्य असते. खोटे न बोलणे, हिंसा न करणे इत्यादी. भावाचारस्थलात सूक्ष्मशरीराचा व्यवहार कसा असावा, याविषयी सांगितलेले आहे. स्थूलशरीराला काही कर्म करायचे असेल तर त्यासाठी सूक्ष्मशरीराचे साहाय्य लागते. सूक्ष्मशरीराशिवाय स्थूलशरीराकडून कोणतेही काम घडले तरी ते न केल्यातच जमा असते. हेच पुढे सांगतात –

भावनाविहितं कर्म पावनादपि पावनम् ।
तस्माद् भावनया युक्तं परधर्मं समाचरेत् ॥ १६-६८ ॥

सत्य बोलावे, अशी शास्त्राज्ञा आहे. तुम्ही जेव्हा सत्य बोलता तेव्हा ते मनापासून बोलता की केवळ शास्त्राज्ञा पाळायची म्हणून बोलता? यात देखील फरक आहे. तुम्ही पूजा करता तेव्हा केवळ करायची म्हणून करता की अगदी मन:पूर्वक करता? केवळ शास्त्राज्ञा पाळण्यासाठी तुम्ही एखादे कर्म करीत असाल आणि त्यात जर तुमचे मन नसेल तर त्या कामाला काही अर्थ नाही. एखाद्या नोकराला झाडायला सांगितले, त्याचे त्यात मन असेल तरच त्याच्या हातून काम चांगले होईल, अन्यथा होणार नाही. त्याचे कामात मन नसेल तर मालकाला त्याच्या मागे उभे राहून 'इथले झाडून काढ, तिथले झाडून काढ' असे सांगावे लागते. म्हणून केवळ आज्ञा पाळणे महत्त्वाचे नसून त्या कामात माणसाची श्रद्धा, भावना असली पाहिजे. नोकर अगदी मन लावून म्हणजे भावनापूर्वक काम करतो अशी मालकाची खात्री झाली तर त्याचा नोकरावर पूर्ण विश्वास बसतो. त्याप्रमाणे भगवान शिवाने पूजा करा, जप करा इत्यादी ज्या आज्ञा आगमशास्त्रात दिलेल्या आहेत त्या आपण भावपूर्वक पाळल्या पाहिजेत. आपण पूजा करतो, ध्यान देखील करतो. परंतु ध्यान करता करता कुठून कुठे जातो याचा पत्ता देखील लागत नाही. म्हणजेच आपले कर्म भावनापूर्वक होत नाही. दुसऱ्या माणसाला तुमची भावना दिसत नाही, केवळ तुमचे कर्म दिसते. आपण करीत असलेल्या कार्यात जर आपले मन गुंतले नसेल तर ते कार्य निष्फळ होईल हे निश्चित.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुम्ही काशीला आला आहात तेव्हा येथले प्रसिद्ध तुलसीमानसमंदिर पाहून घ्या. तुम्ही मंदिरात जाल तेव्हा डावीकडेच तुलसीदासांची एक मूर्ती दिसेल. मूर्तीसमोर तुलसीरामायण ठेवलेले आहे. ध्वनिवर्धकावरून रेकॉर्डद्वारे तुलसीरामायणाचा पाठ चाललेला असतो. त्यावेळी मूर्तीचे ओठ हलत असतात. यांत्रिक पद्धतीने तशी सोय केलेली आहे. जणू तुलसीदासांची मूर्तीच रामायण गात आहे असे पाहणाऱ्यांना वाटते. परंतु विचार केला तर काय दिसते? मूर्तीचे ओठ हलत असतात. कोणता दोहा आपल्या मुखातून बाहेर पडत आहे आणि त्याचा अर्थ काय आहे? हे काहीही मूर्तीला कळत नसते. मूर्तीच्या हातातली तुळसीमाळ देखील यांत्रिकपणे फिरत असते. परंतु त्यामुळे मूर्तीकडून जप घडत असतो काय? मूर्तीच्या सगळ्या क्रिया यांत्रिक असतात. अशा पद्धतीने मूर्तीचे ओठ हजारो वर्षे हलत राहिले, तिच्या हातातली माळ कितीही फिरत राहिली तरी त्या पाठाचे आणि जपाचे कवडीइतकेही फळ मूर्तीला मिळणार नाही हे उघड आहे. कारण तिथे भावना नाही, अंत:करण नाही, सूक्ष्मशरीर नाही.

सूक्ष्मशरीरातच तर धर्म-अधर्माचा संग्रह होत असतो. स्थूलशरीर हे केवळ साधन होय. त्याप्रमाणे जेव्हा एखादा मनुष्य पूजा, जप, ध्यान करतो आणि पाहणाऱ्याला जर तो कर्म करताना दिसतो तरी त्याला त्या कर्माचे काहीही फळ मिळत नाही. कर्मात आपली भावना आहे की नाही हे पाहणाऱ्याला कळणे शक्य नाही. म्हणून आपणच आत्मपरीक्षण करायला हवे. आपण जे करीत आहोत ते भावनापूर्वक करीत आहोत की नाही? तुम्ही थोडेसेच धर्मकार्य करा. परंतु त्यात तुमची भावना ओता. तेव्हा तुमचे ते कर्म अत्यंत पवित्र आणि फलप्रद असेल. म्हणून धर्माचरण भावनापूर्वक करावे. तुम्हाला, शंभर वेळा-हजार वेळा जप करा, असे का बरे सांगितले जाते? हजार वेळा मंत्रजप केला तर निदान दहावेळा तरी तुम्ही कदाचित भावनापूर्वक कराल. तुम्ही एक लक्ष जप केला तर त्यातला निदान दहा हजार जप तरी तुम्ही भावनापूर्वक केला असण्याचा संभव असतो. भावनेने जेवढे कराल तेवढेच तुम्हाला फळ देणारे असेल. बाकीचा केवळ शीण. भावना सर्वश्रेष्ठ मानली जाते. तुमचे शरीर येथे असेल परंतु तुमचे सूक्ष्मशरीर दुसऱ्या ठिकाणी असेल तर तुमचे स्थूलशरीर इथे असून काय उपयोग? तुमचे सूक्ष्मशरीर जेथे गेले असेल तेथलेच फळ तुम्हाला मिळेल, येथले मिळणार नाही. म्हणून प्रत्येकाने भावनापूर्वक म्हणजे मन लावून धर्माचरण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केले पाहिजे.

भावेन हि मनःशुद्धिर्भावशुद्धिश्च कर्मणा ।
इति संचिन्त्य मनसा योगी भावं न सत्यजेत् ॥ १६-६९ ॥

भावनेमुळेच मनुष्याचे मन शुद्ध होते. भगवंताच्या रूपाचे तुम्ही चिंतन कराल तेव्हा तुमची भावना तदाकार होऊन शुद्ध होईल. भावना विषयाकार होते तेव्हा ती अशुद्ध असते आणि जेव्हा ती भगवदाकार होते तेव्हा ती शुद्ध असते. तिचा विषय अशुद्ध असेल तर ती अशुद्ध आणि तिचा विषय शुद्ध असेल तर ती शुद्ध असते. पाऊस आकाशातून कोसळतो तेव्हा त्याला कोणताही रंग नसतो. परंतु मातीत पडून तो वाहू लागतो तेव्हा त्याला गढूळ रंग येतो. काळ्या मातीत मिसळला तर काळा आणि लाल मातीत मिसळला तर लाल होतो. जेथे केवळ खडक आहेत तेथे कोसळला तर खडकाशी एकरूप न होता आहे तसाच राहतो. त्याप्रमाणे लहान बालकाची मनोवृत्ती अत्यंत शुद्ध असते. वय वाढल्यावर आणि विषयांशी परिचय झाल्यावर त्याची भावना वैषयिक होते. अशुद्ध वस्तूशी संबंध आल्यावर मुळात शुद्ध असलेली वृत्ती अशुद्ध बनते. भावनेने भगवान शिवाचा आश्रय घेतला तर ती मात्र अत्यंत शुद्ध, पवित्र होते.

शिवभावनया सर्वं नित्यनैमित्तिकादिकम् ।
कुर्वन्नपि महायोगी गुणदोषैर्न बाध्यते ॥ १६-७० ॥

संध्यासमयी इष्टदेवाची पूजा करावी अशी शास्त्राज्ञा आहे. संध्यावंदन या शब्दात, संध्याकाळी थोरामोठ्यांना आणि जो सर्वांत मोठा आहे अशा भगवंताला वंदन करावे, असाच अर्थ भरलेला आहे. संध्या तीन प्रकारची आहे. प्रातःकालीन संध्या, मध्यान्हकालीन संध्या, सायंकालीन संध्या. अरुणोदय झाला, परंतु सूर्योदय मात्र झाला नाही असा संधिकाल म्हणजे 'प्रातःकालीन संध्या'. सूर्यास्त झाला परंतु अंधार मात्र पडलेला नाही असा संधिकाल म्हणजे 'सायंकालीन संध्या' होय, आणि सूर्य जेव्हा मध्यान्हकाळी, दोन्ही संध्यांच्या मध्यावर असतो ती 'मध्यान्हकालीन संध्या'. मनुष्याने सदासर्वदा शिवपूजा, शिवचिंतन करावे. परंतु ते शक्य झाले नाही तर निदान या तिन्ही संध्यासमयी तरी करावे. रात्री झोपल्यानंतर श्वासोच्छ्वासावर आपले नियंत्रण राहात नाही. कदाचित् रात्री उच्छ्वास सोडल्यानंतर पुन्हा आत श्वास घेतला न जाण्याचा संभव असतो. परंतु परमेश्वराने रात्रभर आपला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्वास नियंत्रित आणि नियमित ठेवला याबद्दल त्याच्याविषयी सकाळी उठल्याबरोबर कृतज्ञता व्यक्त करायला हवी. हेच प्रात:कालीन संध्याकर्म होय. दुपारी भोजन करण्यापूर्वी परमेश्वराचे स्मरण करायला हवे. 'आधी पोटोबा नंतर विठोबा' असे करू नये. सगळे काही करण्यासाठी आपल्याला वेळ असतो, परंतु देवपूजा करण्यासाठी अजिबात वेळ नसतो. अशी सवय जडलेली असते. तीर्थयात्रेला गेल्यावर लोक घाईघाईने देवदर्शन उरकतात आणि निवांत भोजन करीत असतात. तुम्ही जेवढ्या रसिकतेने तन्मय होऊन भोजन करता तेवढे तन्मय होऊन भगवंताचे भजन कधी करता का? भगवंताचे पूजन केल्याशिवाय भोजन करणे ही पशुवृत्ती होय. पशू केव्हाही खातात त्यांच्यासाठी कधी खावे आणि कसे खावे याचे नियम नाहीत. परंतु मनुष्यासाठी मात्र, अन्न भगवंताला अर्पण करून ते प्रसाद म्हणून भक्षण करावे, असा नियम आहे. असे केले तरच तुमचे मन प्रसन्न राहील. म्हणून मध्यान्हकाळी परमेश्वराची पूजा आणि चिंतन करावे. त्याचप्रमाणे संध्याकाळी देखील भगवंताचे पूजन आणि स्मरण करावे.

जसा आकाशात सूर्य असतो तसा आपल्या अंत:करणात देखील ज्ञानसूर्य आहे. त्याचा कधी अस्त होत नाही. त्याला भगवद्रूप मानून त्याची आराधना करावी. हे देखील एक आगळे संध्यावंदनच आहे.

आत्मज्योतिषि सर्वेषां विषयाणां समर्पणम् ।
अन्तर्मुखेन भावेन होमकर्मेति गीयते ॥ १६-७२ ॥

संध्यावदनानंतर काही लोक होम देखील करतात. होम बाह्यहोम आणि आंतरहोम असा दोन प्रकारचा आहे. यज्ञकुंड सिद्ध करून, त्यात मंत्राग्नी चेतवून परमेश्वराचे नाव घेत त्यात समिधा आणि हविर्द्रव्ये अर्पण करणे हा बाह्यहोम होय. परंतु एवढ्याने होमक्रिया पूर्ण होत नाही. आपल्या अंतर्यामी वसणारे जे अवगुण आहेत, त्यांचा होम करणारी एक वेगळी होमक्रिया आहे. यज्ञक्रियेबद्दल एक विचार येथे नमूद करावासा वाटतो. काही जणांचा यज्ञाला विरोध असतो. माणसाला खायला तूप मिळत नाही आणि तुम्ही मात्र यज्ञात तूप जाळून टाकता, असा त्यांचा आक्षेप असतो. परंतु मनुष्याचे जीवनदेखील एक यज्ञ - जीवनयज्ञ होय. यज्ञ करणे याचा अर्थ, त्यागभावना दृढ करणे, असा आहे. यज्ञात एखादी वस्तू भगवंताच्या नावाने जेव्हा अर्पण केली जाते तेव्हा ती समष्टिरूप म्हणजे व्यापक होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यासाठी काही दृष्टान्त देता येतील. एक मिरची जर एखाद्या माणसाने खाल्ली तर त्याच्या डोळ्यांतून-नाकातून पाणी येईल, त्याला ठसका लागेल. पण तीच मिरची जर पेटलेल्या अग्नीत टाकली तर तिथे बसलेल्या सर्वांनाच ठसका लागतो. अग्नीत अर्पण केल्याने वस्तूचे सामर्थ्य जणू काही वाढते.

विद्युत्शक्ती हे अग्नीचेच एक रूप आहे. तिच्यामुळेच आपला आवाज हजार-दहा हजार-लक्ष लोकांपर्यंत पोहोचू शकतो. रेडिओद्वारे टी.व्ही.द्वारे ध्वनी आणि रूपदेखील कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचते. या व्यापकतेमागे विद्युत्शक्ती आहे, हे मान्य करावे लागते. ती नसेल तर सर्व क्रिया ठप्प होते. त्याप्रमाणे अग्नीत जेव्हा भगवंताला आवाहन करून आपण काही अर्पण करतो तेव्हा ते समष्टिरूप, सर्वव्यापक होते. कारण भगवंतच मुळात समष्टिरूप आहे. त्याला अर्पण केलेली वस्तू सर्वांनाच फळ देणारी ठरते. म्हणून शास्त्रात म्हटले आहे -

'यज्ञाद् भवति पर्जन्य: पर्जन्याद् अन्नसंभव:

प्राचीन काळी पाऊस पडावा म्हणून यज्ञ करीत असत. यज्ञामुळे पाऊस होई आणि पावसामुळे अन्न पिकत असे. आपल्याजवळ जे आहे ते भगवंताला देणे याचा अर्थ, त्यागभावनेची जोपासना करणे, असा आहे. आज यज्ञप्रथा लुप्त झाली असली तरी क्वचित् कुठे अजूनही यज्ञ होताना दिसतो. हा यज्ञ बाह्य होय. परंतु दुसरा यज्ञ आंतरिक यज्ञ आहे. आपल्या हृदयात जी आत्मरूप ज्ञानज्योत आहे तिच्यात विषयांचे अर्पण करणे हाच आंतरिक यज्ञ होय.

विषयांना ज्ञानाग्नीत का अर्पण करावे? शास्त्र सांगते की विषय हे विषरूप आहेत. विषयभोगी मनुष्याचा अंतकाल लवकर होतो. 'मृत्योर्माऽमृतं गमय' - मृत्यूकडून मला अमृतत्वाकडे ने - अशी उपनिषदांत प्रार्थना केली आहे. मृत्यूकडे जाणाऱ्या माणसांना अमृतत्वाकडे नेले पाहिजे. शब्दस्पर्शादी विषयांकडे ज्या मनुष्याची प्रवृत्ती असते तो मनुष्य, विषय नव्हे तर विषाचे सेवन करीत असतो. काही विषांचा चटकन् परिणाम होतो तर एखादे विष हळूहळू परिणाम करत असते. त्याप्रमाणे विषयसेवनामुळे आपले शरीर जर्जर होते, इंद्रिये थकतात आणि बुद्धी देखील क्षीण होते. मनुष्य ज्ञानप्राप्तीची साधने गमावून बसतो. परंतु जर विषमय विषय भगवंताला अर्पण केले तर मात्र त्या विषाचे अमृत होते. मीराबाईच्या हाती दिलेला विषाचा प्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अमृतमय झाला अशी कथा आहे. अशुद्धाला शुद्ध करण्याचे सामर्थ्य परमेश्वराजवळ आहे. मनुष्याला रूप पाहावे लागते, शब्द ऐकावा लागतो, स्पर्शानुभव घ्यावा लागतो, रस चाखावे लागतात आणि गंध हुंगावे लागतात. त्यापासून मनुष्याची सुटका नाही हे खरे असले, तरी त्याच्या भावनेत परिवर्तन झाले तर विषय अमृतमय होतात. म्हणून भगवान शिवाला विषय अर्पण करणे, हाच एक प्रकारचा होम होय.

वीरशैवसिद्धान्तात इष्टलिंगपूजा तर सांगितलीच आहे परंतु त्याशिवाय प्रत्येक इंद्रियात एकेका लिंगाची भावना करावी, असेही सांगितले आहे. आचारलिंग गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग आणि महालिंग. मनात महालिंगाची भावना आणि अन्य इंद्रियांत आचारलिंगादी लिंगांची भावना केली जाते. या भावनेमुळे जेव्हा डोळे रूप पाहतात तेव्हा ते केवळ रूप न राहता रूपप्रसाद होतो. त्याचप्रमाणे स्पर्शप्रसाद, रसप्रसाद, गंधप्रसाद आणि शब्दप्रसाद असे विषय प्रसादरूप होतात. विषय प्रसादरूप झाल्यावर त्यांचा भाग घेतल्यावर मनात वासना उत्पन्न होत नाही. म्हणून भोजन करण्यापूर्वी ते जसे लिंगार्पित करावे लागते त्याप्रमाणे विषय सेवन करण्याआधी ते लिंगाना अर्पण करून नंतर प्रसाद म्हणून सेवन केले पाहिजेत.

'आहार' याचा अर्थ केवळ भोजन नव्हे. बाहेर जे जे म्हणून काही आहे ते आपल्या आत घेणे म्हणजे आहार होय. नेत्राचा आहार रूप होय, श्रोत्राचा आहार शब्द आहे, त्वचेचा आहार स्पर्श आहे, घ्राणाचा आहार गंध आहे, रसनेचा आहार रस आहे. म्हणून सर्व प्रकारचे आहार भगवंताला अर्पण केले तर ते आहार न राहता 'प्रसाद' होतात. केवळ विषयांचा भोग घेणे वेगळे आणि प्रसादरूपी विषयांचा भोग घेणे वेगळे. येथे भावनेत अंतर पडते. विषयांना प्रसाद करण्याचे सामर्थ्य आपल्या भावनेत आहे. विषयांचा तसाच भोग घेतला तर ते अनंतकाळ दुःखदायक ठरतात. विषयांत प्रथम सुख दिसते, परंतु नंतर मात्र ते दुःखदायक आहेत याची प्रचीती येते. म्हणून विषयांचा प्रसाद म्हणून स्वीकार केला तर ते दुःखदायक ठरत नाहीत. विषयवासनेचा मनावर संस्कार होत नाही. संस्कार म्हणजे तो विषय पुन्हा भोगण्याची इच्छा होणे. विषय-वासनेपेक्षा प्रसाद-वासना चांगलीच आहे. ती वासना शांतिप्रद आणि मुक्तिप्रद आहे. म्हणून हृदयातील ज्ञानाग्नीत विषयांची आहुती देऊन म्हणजेच विषयांना भगवदर्पण करून त्यांना प्रसादरूप करणे हाच एक प्रकारचा आंतरिक होम होय. हा होम करण्यासाठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

थोडा अभ्यास करावा लागेल. प्रयत्नाने हळूहळू तो साध्य होईल. म्हणून प्रत्येकाने कर्म करताना ते भावनायुक्त करावे म्हणजे त्याचे पूर्ण फळ मिळेल, एवढे सांगून आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
१४ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भावागमस्थल..२

जिज्ञासू सद्भक्तांनो,

काशीचे एक नाव 'आनंदकानन' आहे हे यापूर्वी सांगितलेच आहे. आनंदकाननातील एका विभागाला 'जंगमवाटिका' असे नाव आहे. वाटिका म्हणजे उपवन. जंगमवाटिकेचेही महत्त्व अनन्यसाधारण आहे. जंगमांचे हे वास्तव्यस्थान होय. 'जंगम' या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. श्रीसिद्धान्तशिखामणी'त या शब्दाचा एक अर्थ सांगितला आहे -

जानन्त्यतिशयाद् ये तु शिवं विश्वप्रकाशकम् ।
स्वस्वरूपतया ते तु जङ्गमा इति कीर्तिताः ॥

(श्रीसिद्धान्तशिखामणी, ११-३६)

सर्व विश्व प्रकाशित करणाऱ्या भगवान शिवाला जो आत्मरूपाने जाणतो अशा ज्ञानी पुरुषाला 'जंगम' असे म्हणतात. आनंदकाननातील या जंगमवाटिकेत असे अनेक तपस्वी, चारित्र्यसंपन्न जंगम शिवयोगी होऊन गेले आहेत. जंगमवाटिकेलाच अलीकडे 'जंगमवाडी' असे नाव मिळाले आहे. या पीठाचे मूळ संस्थापक श्रीविश्वाराध्य हे भगवान शिवाच्या ईशान मुखातून उत्पन्न झाले. विश्वातल्या समस्त प्राणिमात्रांकडून जे पूजिले जातात ते 'विश्वाराध्य' होत. जगात पूजा कोणाची केली जाते? एक सुभाषितकार म्हणतो -

'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते'

राजा केवळ आपल्या राज्यातच पूजनीय असतो तर विद्वानाची पूजा सर्वत्र केली जाते. जगद्गुरू विश्वाराध्यांनी येथे जे पीठ स्थापन केले आहे त्याला 'ज्ञानपीठ' अशी संज्ञा आहे. या पीठाकडून अनेक ऋषिमुनींना तत्त्वबोधाचा उपदेश लाभला आहे. कैलासमंटपात जी गुरुगादी आहे, जिची भक्तगण सतत पूजा करतात तिच्यावर बसूनच ज. विश्वाराध्यांपासून आजवर अनेक आचार्यांनी धर्मोपदेश केलेला आहे. दुर्वासासारख्या अत्यंत क्रोधी तपस्व्याला देखील याच पीठाकडून उपदेश लाभला आहे. क्रोधावर विजय मिळवायचा असेल तर ज्ञानसंपादन करायला हवे. ज्यावेळी तुम्हाला अत्यंत क्रोध येईल त्यावेळी समजा की दुर्वास तुमच्या मनातच दडलेला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हृदयात ज्ञान प्रकाशल्याशिवाय कामक्रोधादी विकार नाहीसे होणार नाहीत. दुर्वास मुनींना इथे ज्ञानोपदेश लाभला याचा अर्थ असा होतो की क्रोध-काम इत्यादी अवगुण घेऊन जरी कोणी आला तरी त्याला येथे ज्ञान प्राप्त होऊन त्याची विकारांपासून मुक्तता होते. या पीठपरंपरेवर जे आचार्य होऊन गेले त्या सर्वांच्या वाणीतून आणि कृतीतून ज्ञानगंगा वाहात आली आहे. जंगम म्हणजे ज्ञानी. अशा ज्ञानी पुरुषांचे वास्तव्यस्थान म्हणजेच जंगमवाटिका, जंगमवाडी. अशा पवित्र जंगमवाटिकेत बसून श्रद्धायुक्त मनाने तुम्ही ज्ञानोपदेश श्रवण करीत आहात, हा आनंदकाननात लाभणारा आनंदच होय.

कालपासून आपण भावाचारस्थलांचा विचार करीत आहोत. या स्थलाबद्दल ज. रेणुकाचार्य पुढे सांगतात -

भावयेत् सर्वकर्माणि नित्यनैमित्तिकानि च ।
शिवप्रीतिकराण्येव संगराहित्यसिद्धये ॥ १६-७३ ॥

कर्म अनेक प्रकारचे असून त्याचे विहित कर्म आणि निषिद्ध कर्म असे वर्गीकरण केले जाते. 'जे करा' असे शास्त्र सांगते ते विहित कर्म आणि 'जे करू नका' असे शास्त्र सांगते ते निषिद्ध कर्म. काय करावे आणि काय करू नये हे माणसांना कळत नाही, म्हणून परमेश्वराने वेद-आगमांच्या द्वारा ते विवरून सांगितले आहे. जे निषिद्ध कर्म आहे ते कधीही करू नये, परंतु विहित कर्म सदोदित करावे. विहित कर्माचे नित्य, नैमित्तिक, काम्य आणि प्रायश्चित्त असे चार भाग केले जातात. जे नित्य करावे लागते आणि न केले तर मनुष्य दोषास्पद ठरतो ते नित्यकर्म होय. इष्टलिंगपूजन, धर्मग्रंथाचा स्वाध्याय ही वीरशैवांची नित्यकर्मे होत. याप्रमाणे अन्य धर्मीयांची नित्यकर्मे आहेत. काही निमित्ताने करावी लागणारी कर्मे 'नैमित्तिक कर्मे' होत. श्रावण महिन्यात, अधिक मासात, अनुष्ठान-व्रत करणे, तीर्थयात्रा करणे इत्यादी नैमित्तिक कर्मे होत. अशी इतरही नैमित्तिक कर्मे आहेत. लौकिक आणि पारलौकिक सुखांच्या अपेक्षेने केले जाणारे कर्म हे 'काम्यकर्म' होय. स्वर्गप्राप्तीच्या इच्छेने कर्म करणे हे तर काम्यकर्म आहेच, परंतु तुम्ही ईश्वरला लौकिक सुखे मागण्यासाठी जे काही कर्म करता ते देखील काम्यकर्मच होय. भगवंतालाही आपण लालूच दाखवतो. व्यवहारात लालूच दाखवण्याची जी सवय जडली तिचा परमार्थातदेखील उपयोग करतो. ईश्वराला वाटते की ठीक आहे - लालूच दाखवायला आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खूप काही मागायला तरी आपल्याकडे येतोय ना, तर येऊ दे. मागितल्यावर याच्या कामना पूर्ण होतील आणि कधीतरी कामना संपून हा निष्काम होईल. ज्यात काहीतरी कामना असते त्याला 'काम्यकर्म' म्हणतात.

चौथे कर्म 'प्रायश्चित्त कर्म' होय. आपल्या हातून निषिद्ध कर्म घडल्यावर त्याच्या परिमार्जनासाठी जे कर्म केले जाते ते प्रायश्चित्त कर्म होय. शास्त्रात अनेक प्रायश्चित्ते सांगितली आहेत. त्यात साधारण प्रायश्चित्त आणि असाधारण प्रायश्चित्त असे दोन भाग पडतात. मनुष्याकडून पापकर्म घडल्यानंतर त्याच्या परिमार्जनासाठी जे विशेष प्रायश्चित्त आचरावे लागते त्याला 'असाधारण प्रायश्चित्त' म्हणतात. या प्रायश्चित्ताने त्या विशिष्ट पापाचेच परिमार्जन होते, दुसऱ्या पापकर्माचे होत नाही. जन्मजन्मांतरात मनुष्याकडून जी पापकर्मे घडतात आणि ज्यांची त्याला जाणीव देखील नसते अशा पापकर्मांच्या परिमार्जनासाठी घेतले जाणारे प्रायश्चित्त म्हणजे 'साधारण प्रायश्चित्त कर्म' होय. सर्व दुष्कृत्यांच्या परिमार्जनासाठी, एखाद्या ब्रह्मास्त्रासारखे हे प्रायश्चित्त कर्म आहे. पवित्र नद्यांत स्नान करणे, तीर्थक्षेत्रांतील देवतांचे पूजन करणे इत्यादी कर्मांना साधारण प्रायश्चित्त कर्म म्हटले जाते.

मनुष्याने कोणतीही कर्मे केली नाहीत तरी त्याला नित्यकर्मे आणि नैमित्तिक कर्मे करावीच लागतात. ती कर्मे करताना मनुष्याची भावना कशी असावी याबद्दल या श्लोकात सांगितले आहे. कुठलीही अपेक्षा न ठेवता केवळ शिवकृपा व्हावी म्हणून नित्य, नैमित्तिक कर्मे करावीत. अशा कर्मांनी संसारापासून मुक्ती मिळते. जन्मजन्मांतरांपासून आपल्याला संसाराचा संग जडलेला आहे. आपले मन दिसायला लहान दिसते, परंतु त्यात जन्मजन्मांतरांच्या संस्कारांचा प्रचंड साठा असतो. कॉम्प्युटरच्या फ्लॉपीवर – जी लहान दिसते – प्रचंड माहिती साठवून ठेवता येते त्याप्रमाणे. आपण जेवढे जन्म घेतले, त्यामध्ये जेवढ्या व्यक्तींशी आपला संबंध आला, त्या जन्मांत आपण काय काय भोगले या साऱ्या संस्कारांचा संग्रह आपल्या मनात साठलेला आहे. मनाच्या तळातून ज्यावेळी जो संस्कार पृष्ठभागावर येईल तेव्हा त्या संस्कारानुसार वागण्याची माणसाला इच्छा होते. हे सारे संसारसंगामुळे झाले आहे. संसाराचा संग तोडायचा असेल तर भगवंताशी संग जोडायला पाहिजे. जीवात्म्याला एकतर संसाराशी संग करावा लागेल, नाहीतर भगवंताशी. म्हणून संसाराचा संग सोडण्यासाठी प्रत्येक मनुष्याला फळाची अपेक्षा न ठेवता केवळ शिवकृपेच्या लाभासाठी नित्य-नैमित्तिक कर्मे करावी लागतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिवे निवेश्य सकलं कार्याकार्यं विवेकत: ।
वर्तते यो महाभाग: स संगरहितो भवेत् ॥ १६-७४ ॥

संसारात राहून देखील संसारापासून अलिप्त राहता येते. ज्ञानी पुरुष वरवर पाहता सामान्य माणसाप्रमाणे दिसतो, परंतु त्याची अंतरंगस्थिती सामान्यापेक्षा वेगळी असते. कृष्ण ज्ञानी असून देखील भोगी होता. परंतु अंतरंगात तो विरक्त होता. अंतर्यामी आसक्ती नसेल तर भोगी देखील विरागी असतो. शुक त्यागी होता तरी तो ज्ञानी होता. राम आणि जनक राजभोगी होते, तरी देखील ते राजयोगी होते. प्राचीन काळी जे चक्रवर्ती राजे होऊन गेले, त्यांनी गुरुगृही जाऊन विद्याध्ययन केले होते. ते योगाभ्यास करीत असत. राज्य सांभाळून, राजभोग भोगून; शेवटी योगसाधना करीत देहत्याग करीत असत. अशी भारतीय परंपरा आहे. शरीराने भोगासक्त दिसणारा मनुष्य मनाने अत्यंत विरक्त असू शकतो, हे अनेक ज्ञानी पुरुषांनी आपल्या जीवनक्रमाने सिद्ध केले आहे. अज्ञानी माणसापेक्षा ज्ञानी मनुष्य अधिक चांगला संसार करू शकतो. म्हणून संसारात राहायचे असेल तर ज्ञानी होऊन राहिले पाहिजे. संसारात राहिल्यामुळे ज्ञानी पुरुषाचे काहीही नुकसान होत नाही.

ज्ञानी पुरुष संसारात वावरताना कर्माबद्दल अहंभाव बाळगत नाही. अर्थात् 'हे कर्म मी करत आहे' असे तो मानत नाही. कर्म आपल्या द्वारा घडत आहे, ईश्वर ते आपल्याकडून करवून घेत आहे, अशी भावना त्याची असते. आपण केवळ निमित्तमात्र आहोत अशी त्याची भावना असते. अज्ञानी मनुष्य मात्र देहाभिमान आणि कर्माबद्दल अहंभाव बाळगतो. म्हणून त्याला दु:ख भोगावे लागते. भावना शिवमय झाली तर ज्ञानी पुरुषाकडून घडणाऱ्या प्रत्येक कार्यात शिवतत्त्वाचा साक्षात्कार होतो आणि कर्म करून देखील तो अकर्ता ठरतो. म्हणून योग्याकडून घडणारे कार्य आणि भोग्याकडून घडणारे कार्य यात अंतर पडते. तुलसीदासांनी संसारात अलिप्तपणाने कसे जगावे हे सांगताना एक सुंदर दृष्टान्त दिला आहे -

'तुलसी जग मे यूं रहो जो रसना मुख माहि ।
खाती है घी तेल नित फिर भी चिकनी नाहि ॥'

आपल्या मुखातील जिभेप्रमाणे आपले वर्तन असावे. आपली जीभ तेल-तूप खाऊन देखील कधी तेलकट होत नाही. आपल्या हाताला जर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेल-तूप लागले तर हात तेलकट होतो. तो गरम पाण्याने साबण लावून धुवावा लागतो. परंतु तेल-तूप खाल्ल्यानंतर कोण्या मनुष्याने आपली जीभ साबणानें स्वच्छ धुतली असे तुम्ही कधी ऐकले आहे का? तेल-तूप खाऊन देखील जीभ त्यापासून अलिप्त राहते. म्हणून जिभेला गुरू मानून त्याप्रमाणे वर्तन करावे. सारा प्रपंचच आपला गुरू होऊ शकतो. आपले शरीर देखील आपला गुरू आहे. ते प्रत्येक क्षणी आपल्याला उपदेश करीत असते. तो आपण ऐकत नाही हा भाग वेगळा. संसारात जगणे ही देखील एक कला आहे. जोपर्यंत आयुष्य आहे तोपर्यंत संसारात राहावेच लागणार. संसारात शरीर लिप्त होत नाही, इंद्रिये लिप्त होत नाहीत, लिप्त होते ते मन आणि बुद्धी. संसाराशी मनाचा प्रत्यक्ष संबंध येत नाही, तो इंद्रियांच्या द्वारे येतो. सारी इंद्रिये मनाचे समाधान करण्यासाठी रात्रंदिवस धडपडत असतात. परंतु मन मात्र कधीही तृप्त होत नाही. ते सदोदित अतृप्तच असते.

महर्षी याज्ञवल्क्यांनी विद्वत्संन्यास घ्यायचे ठरवले तेव्हा त्यांनी आपली संपत्ती दोन्ही स्त्रियांना वाटून टाकली. त्यांची पहिली पत्नी कात्यायनी यावर काही बोलली नाही, परंतु दुसरी पत्नी मैत्रेयी मात्र त्यांना म्हणाली,

'महाराज, आपण जे धन आम्हाला दिले आहे त्यामुळे आम्हाला अमृतत्वाची प्राप्ती होईल का?

'धनामुळे अमृतत्व मिळत नाही ते त्यागामुळे मिळते.' याज्ञवल्क्य म्हणाले.

'जर यामुळे अमृतत्व मिळत नसेल तर हे धन घेऊन मी काय करू?' मैत्रेयी म्हणाली.

जगातली सारी संपत्ती जरी आपण एक माणसाला दिली तरी त्याचे मन तृप्त होणार नाही. मनाची हाव इतकी मोठी आहे की त्यासाठी हा सारा प्रपंच देखील कमी पडतो. परिपूर्ण असे परब्रह्म मिळाले तरच मन तृप्त होऊ शकते. मनाच्या झोळीत कितीही दान टाकले तरी ती रिकामी ती रिकामीच राहते. आजवर सांसारिक वस्तूंनी मन तृप्त झाल्याचे एकही उदाहरण नाही. ज्याच्या मनात शिवभावनेचा उदय होतो आणि ज्याला शिवपरब्रह्माची प्राप्ती होते असा मनुष्य मात्र पूर्ण तृप्त असतो. त्याला अन्य कोणत्याही विषयांची किंवा वस्तूंची आवश्यकता नसते. शिवभावनायुक्त होऊन जो कर्मे करतो तो संसार-संगापासून मुक्त होतो. अर्थात् त्याच्या मनात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सांसारिक वस्तूंविषयी आसक्ती राहात नाही. शरीराचा संसाराशी संबंध असावा, परंतु मनाने संसारापासून अलिप्त राहावे. हीच योग्यांची जीवनकला आहे. ही कला ज्याला साधते त्याला संसाराची बाधा होत नाही.

संसारी माणसे 'हे मी केले नाही' असे वरवर म्हणतात. परंतु त्यांच्या मनात मात्र कर्माबद्दल अहंभाव जागा असतो. एखाद्याने घर बांधले आणि तुम्हाला दाखवले तेव्हा तुम्ही सहज म्हणता की, 'छान बांधले आहे घर'. तेव्हा तो म्हणतो 'छे! मी कुठे काय केलं, ही तर ईश्वराची कृपा आहे.' तो ईश्वराला श्रेय देतो ते केवळ वरवर बोलण्यातून. परंतु त्याच्या मनात मात्र 'हे माझे कर्तृत्व आहे' असा अहंकार असतो. कर्तृत्वभावना जेव्हा जागी होते तेव्हा मनात अहंकार दाटतो. मद्यपान केल्यावर जसा मनुष्य झिंगतो त्याप्रमाणे अहंकार झाल्यावर देखील झिंगतो. शास्त्राने कर्म करण्याला प्रतिबंध केलेला नाही. फक्त ते करताना 'हे मी केले असा अहंभाव टाळा' एवढीच अट घातली. अहंकारशून्य कृती ही लोककल्याणकारीच असते यात शंका नाही. शेवटी या स्थलाचा समारोप करताना ज. रेणुकाचार्य म्हणतात -

आत्मानमखिलं वस्तु शिवमानंदचिन्मयम् ।
एकभावेन सततं संपश्यन्नेव पश्यति ॥ १६-७५ ॥

आत्मसाक्षात्कार कुणाला होतो? जीव, शिव आणि जगत् असे तीन पदार्थ आहेत. हे दिसतात तीन परंतु मुळात एकच आहेत. शिवपरब्रह्मच जीव आणि जगत् या रूपात अभिव्यक्त झालेले आहे. प्रेरयिता, भोक्ता आणि भोज्य अशी नावे शिव, जीव आणि जगत् या तीन पदार्थांना 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त दिलेली आहेत. एक शिवपरब्रह्मच या तीन रूपांनी नटले आहे. एकच तीन होतात तेव्हा संसार आणि तिन्हीचे एक होते तेव्हा परब्रह्म. मी शिव असून 'प्रपंच शिवमय आहे, शिवाशिवाय दुसरे काहीही अस्तित्वात नाही' अशा दृढ भावनेने जो तीन तत्त्वांतील एकत्व पाहतो तोच खऱ्या अर्थाने शिवाला जाणतो. जीवांच्या रूपाने आणि प्रपंचाच्या रूपाने आपल्या समोर शिव परब्रह्मच उभे आहे याची जाणीव होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही भावनाच आपल्याला शिवसाक्षात्कारापर्यंत घेऊन जाते. ज्याला ही भावना करता येत नसेल त्याला शिवसाक्षात्कार होणे शक्य नाही. तुकडोजी महाराजांचे एक प्रसिद्ध भजन आहे -

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'मनी नाही भाव, म्हणे देवा मला पाव,
देव अशानं भेटायचा नाही रे ।
देव बाजारचा भाजीपाला नाही रे ॥'

बाजारात जाऊन भाजीपाला खरेदी करावा तसा तुम्हाला देव सापडणार आहे का? बाजारात जाऊन तुम्हाला फार तर देवाची मूर्ती विकत घेता येईल. ती मूर्ती घरी आणून तिची देव्हाऱ्यात प्रतिष्ठापना केल्यावर तिच्यामध्ये देवत्वाची भावना करावी लागेल. भावनाबळाने भगवंत भेटेल. ती बाजारात खरेदी करता येण्यासारखी वस्तू नाही. म्हणून शिव, जीव आणि प्रपंच हे तिन्ही एकच आहेत अशी दृढ भावना केली पाहिजे. वेदान्तात प्रपंच मिथ्या मानला आहे परंतु सिद्धान्तात मात्र प्रपंच शिवस्वरूप मानला आहे. प्रपंचाला मिथ्या म्हणणारे कितीतरी लोक प्रपंच सोडून गेले, परंतु प्रपंच अजून आहे तसाच आहे. म्हणून त्याला मिथ्या मानण्यापेक्षा शिवस्वरूप मानणेच अधिक योग्य होय. प्रपंच शिवस्वरूप मानला तर कोणालाही तुच्छ मानण्याची बुद्धी होत नाही. म्हणून सर्वत्र शिवभावनेने पाहावे, असे भावाचारस्थलातील प्रतिपादन आहे. तुम्हा सर्वांच्या हृदयात या शिवभावनेचा उदय होऊन तुमच्या दृष्टीपुढे शिव परब्रह्म सदोदित उभे राहावे, असा आशीर्वाद देऊन आजचे आशीर्वचन पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
१५ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञानाचारस्थल

जिज्ञासू सद्भक्तांनो,

तुम्ही प्रतिदिनी काशीक्षेत्राचे माहात्म्य आणि 'श्रीसिद्धान्तशिखामणी'वरील आशीर्वचन ऐकत आहात. काशीक्षेत्राइतकेच जंगमवाटिकेचेही महत्त्व आहे. वीरशैवांसाठी हे एक देवक्षेत्र आहे आणि गुरुक्षेत्र देखील आहे. सर्व यात्रांमध्ये गुरुयात्रा ही श्रेष्ठ यात्रा होय. आपण देवदर्शनाला गेलो तर तेथे दर्शन होईल, आपली श्रद्धा तेथे समर्पित करता येईल, परंतु आपल्या मनात काही शंका असतील तर त्यांचे निरसन मात्र होणार नाही. म्हणून शास्त्राने श्रीगुरूला चालता बोलता देव मानला आहे. गुरूच आपल्या मनातील शंकांचे निरसन करून आपल्याला आत्मकल्याणाची वाट दाखवत असतो. काशीच्या जंगमवाटिकेत होऊन गेलेल्या जगद्गुरूंनी समस्त मानवजातीला आत्मकल्याणाचा मार्ग दाखवून दिलेला आहे. काल तुम्ही ऐकले आहे की जगद्गुरू विश्वाराध्यांनी या ज्ञानपीठाची स्थापना केली आहे. आपले जीवितकार्य संपवण्याआधी त्यांनी आपले पट्टशिष्य श्रीमल्लिकार्जुन महास्वामीजींना पीठाधिकार दिला. त्यानंतर ज. विश्वाराध्य विश्वेश्वर लिंगात विलीन झाले.

ज. मल्लिकार्जुन महास्वामीजी तीनशे अकरा वर्षे पीठाधिकारी होते असे इतिहासात नमूद आहे. त्यानंतर त्यांनी संजीवन समाधी घेतली. कैलासमंटपात ज. विश्वाराध्यांच्या मूर्तीखाली त्यांची समाधी आहे. श्रद्धाळू, साधक आणि सिद्ध इत्यादी लोकांना त्यांचे दर्शन घडल्याचेही सांगण्यात येते. त्यानंतर झालेल्या अनेक जगद्गुरूंनी 'मल्लिकार्जुन महास्वामीजी' हेच नाव धारण करून कार्य केले. जवळ जवळ सत्तर जगद्गुरूंनी हेच नाव धारण केले होते. एक्कावन्नाव्या जगद्गुरूंच्या काळात काशीच्या जयनंददेव नरेशाने गायी चारण्यासाठी भूमी दान केली. त्या दानपत्रात त्या भूमीला 'जंगमपूर' असे म्हटले असून आज त्या जागेवर काशी हिंदू विश्वविद्यालय उभे आहे. अनादिकालापासून या पीठावर ज्ञानी आणि तपस्वी जगद्गुरूंची परंपरा चालत आली आहे. त्यांच्याच कृपाशीर्वादाने आज देखील या ज्ञानपीठाद्वारे धर्मप्रसार-प्रचार कार्य अखंड चालू आहे. अशा ज्ञानपीठातील या ज्ञानमंदिरात तुम्ही एक महिन्यापासून 'श्रीसिद्धान्तशिखामणी'वर आशीर्वचने ऐकत आहात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लिंग-षटस्थलांतर्गत माहेश्वरस्थलातील 'ज्ञानाचारस्थल' या अंतिम स्थलाचा आज विचार करायचा आहे.

ज्याप्रमाणे मनुष्याला क्रिया करावी लागते, भावना करावी लागते त्याचप्रमाणे त्याला ज्ञान देखील संपादन करावे लागते. या आधी धर्माचाराविषयी आणि भावाचाराविषयी आपण विचार केला आहे. आज ज्ञानाचारासंबंधी बोलायचे आहे. भावाचारसंपन्न अशा शिवयोग्याचा ज्ञानयुक्त आचारच इतरांसाठी ज्ञानाचार ठरतो.

> शिवाद्वैतपरं ज्ञानं ज्ञानमित्युच्यते बुधैः ।
> सिद्धेन वाप्यसिद्धेन फलं ज्ञानान्तरेण किम् ।
>
> (श्रीसिद्धान्तशिखामणी, १६-७७)

प्रत्येक जीवात्म्याला काही ना काही ज्ञान असतेच. परंतु ज्या ज्ञानामुळे केवळ पोट भरता येते त्याला 'ज्ञान' म्हटले जात नाही. ज्या ज्ञानामुळे जीवात्मा संसारपाशातून मुक्त होतो ते खरे ज्ञान होय. मनुष्याला सांसारिक ज्ञान भरपूर आहे. तरी देखील त्याला कसे खावे, किती खावे, कसे बसावे हे शिकावेच लागते. माणसाला खाता येते, परंतु कसे खावे हे मात्र माहीत नसते. माणसाला जे ज्ञान असते तेवढ्याने त्याच्या जीवनाला पूर्णत्व लाभत नाही. आपला जन्म होतो, आपण शिकतो, काही ग्रंथ वाचतो. त्यामुळे उपजीविकेचे साधन मिळते. परंतु तेवढे काही पुरेसे नाही. जे संपादन केल्यावर आपल्याला कृतकृत्यता वाटेल असे ज्ञान प्राप्त करून घ्यायला हवे. जीव आणि शिव यांच्यातील ऐक्याचे ज्ञान हेच खरे ज्ञान होय. परंतु सामान्य माणसांजवळ मात्र जीव वेगळा आणि शिव वेगळा असे भेदज्ञान असते. भेदज्ञानामुळेच तर जीवात्म्याला जन्मजन्मांतरातून प्रवास करावा लागतो. जन्ममरणरूपी संसारातून मुक्त होण्यासाठी अद्वैतज्ञानाची आवश्यकता असते. त्याच अद्वैतज्ञानाला येथे 'शिवाद्वैतज्ञान' अशी संज्ञा दिली आहे. हे दोन शिवांचे अद्वैत आहे. ज्याला आपण 'जीव' म्हणतो तो जीव नसून शिवच आहे. आद्य शंकराचार्यांना कुणी एकाने विचारले,

'आपण मोठमोठे जाडजूड ग्रंथ लिहिले आहेत, परंतु ते वाचायला आम्हाला वेळ नाही. म्हणून त्यांचे सार फक्त एका श्लोकात सांगा.'

शंकराचार्य हसून म्हणाले, 'एका श्लोकात तरी कशाला? अर्ध्या श्लोकातच सांगतो–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथ कोटिभि: ।
ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापर: ॥

केवळ अर्ध्या श्लोकात श्रीशंकराचार्यांनी आपल्या ग्रंथाचे सार सांगितले आहे - ब्रह्म सत्य आहे, जग मिथ्या आहे आणि जीव ब्रह्म आहे. जीव स्वत:ला जीव म्हणवतो, परंतु वस्तुत: तो जीव नसून शिवच आहे. जीवावस्थेत देखील तो शिवाचाच अंश असतो. जीव हा शिव आणि शिव तर शिवच आहे. अशा दोन्ही शिवांचे जे अद्वैत तेच शिवाद्वैत. जीवाने शिवत्व प्राप्त करून घेतल्यावरच त्याला शिवाशी समरस होता येते. पाण्यात पाणी, दुधात दूध एकरूप व्हावे त्याप्रमाणे. जो शिव बाह्य जगतात आहे तोच आपल्या आत्मरूपात देखील आहे. हे ज्ञान ज्याला होते तोच शिवज्ञानी होय. हे ज्ञान सोडून अन्य ज्या कशाला ज्ञान असे म्हटले जाते ते ज्ञान नसून अज्ञान आहे. तुम्हाला गणिताचे ज्ञान नसले, विज्ञानाचे ज्ञान नसले आणि जगातील विभिन्न भाषांचे ज्ञान नसले तरी एक शिवाद्वैत ज्ञान असेल तरी ते पुरेसे आहे आणि जर तुम्हाला शिवाद्वैतज्ञान नसेल आणि इतर सारे ज्ञान असले तरी ते काही उपयोगाचे नाही.

'एक विज्ञानेन सर्व विज्ञानम्'

एकाला जाणल्याने सर्व ज्ञान होते अशी वस्तू केवळ परब्रह्म हीच होय. एका शिवाला जाणले म्हणजे सर्व प्रपंचाला जाणले असे होते. जगातल्या सर्व पदार्थांचे ज्ञान एका माणसाला होणे शक्य नाही, ते अवघड आहे. परंतु एका परमात्म्याला जाणणे मात्र सोपे आहे. परंतु माणसाला तेच अवघड वाटते. जगातले अन्य ज्ञान प्राप्त झाले नाही तरी चालेल, परंतु एक शिवाद्वैतज्ञान मात्र प्राप्त करून घेणे महत्त्वाचे आहे.

निर्मलं हि शिवज्ञानं नि:श्रेयसकरं परम् ।
रागद्वेषादिकलुषं भूय: संसृतिकारणम् ॥ १६-७८ ॥

सांसारिक ज्ञानापेक्षा शिवाद्वैतज्ञान अधिक महत्त्वाचे का आहे? तर ते निर्मल होय. शिव अत्यंत पवित्र आहे म्हणून त्याचे ज्ञान देखील तेवढेच पवित्र आहे. ज्ञानाचे पावित्र्य आणि निर्मलता त्याच्या विषयावर अवलंबून असते. शरीर अपवित्र मानले जाते. शरीरातून आत्मा निघून गेल्यावर शरीराला 'प्रेत' म्हणतात. प्रेताला स्पर्श केल्यावर मनुष्य स्नान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करून शुद्ध होतो. परंतु जिवंत माणसाला स्पर्श केल्यावर मात्र कोणी स्नान करीत नाही. कारण शरीर जोपर्यंत पवित्र आत्म्याच्या सान्निध्यात असते तोपर्यंत पवित्र असते. पवित्र आत्म्याचा संपर्क तुटला की शरीर अपवित्र होते.

शिवाद्वैतज्ञान हे अत्यंत पवित्र आहे, निर्दोष आहे. प्रयत्नपूर्वक हे ज्ञान का प्राप्त करून घ्यावे? कारण त्यामुळे सर्वश्रेष्ठ वस्तूचा लाभ होतो. एक प्रेय असते तर दुसरे श्रेय असते. प्रपंचातील सर्व भोग्य वस्तू म्हणजे प्रेय होत, कारण त्या प्रिय वाटतात. परंतु त्या श्रेयस्कर नव्हेत. जिच्यामुळे जन्म-मृत्यूच्या चक्रातून जीवात्म्याची सुटका होते ती मुक्ती म्हणजे निःश्रेयस होय. मुक्तीचा लाभ केवळ शिवज्ञानामुळेच होईल, अन्य कोणत्याही ज्ञानामुळे नव्हे. शिवाद्वैतज्ञानाशिवाय अन्य जे काही ज्ञान आहे ते राग-द्वेषयुक्त आहे. त्यामुळे जीवात्म्याला संसारचक्रात भ्रमावे लागते. शिवाद्वैतज्ञानी पुरुषाजवळ राग-द्वेष नसतो. राग-द्वेष करण्यासाठी भेदबुद्धी हवी, अनुकूल-प्रतिकूल ज्ञान हवे. आधी भेदबुद्धी, मग अनुकूल-प्रतिकूल ज्ञान, मग अनुकूल व्यक्तीविषयी राग आणि प्रतिकूल व्यक्तीविषयी द्वेष उत्पन्न होईल. भेदज्ञान राग-द्वेषाचे कारण होय, भेदज्ञानाला अज्ञान कारण होय. शिवाद्वैत भक्ताने ज्याचे अज्ञान नष्ट झाले आहे त्याच्याजवळ भेदज्ञान नसते. अज्ञान नाही म्हणून भेदज्ञान नाही, भेदज्ञान नाही म्हणून अनुकूल-प्रतिकूल ज्ञान नाही, अनुकूल-प्रतिकूल ज्ञान नाही म्हणून राग-द्वेष नाही आणि राग-द्वेष नाहीत म्हणून जन्म-मरण नाही. शिवाद्वैतज्ञानामुळे सारे भेद मावळून जातात. हे ज्ञान निःश्रेयस प्राप्त करून देणारे आहे, म्हणून शिवाद्वैत ज्ञान प्राप्त करण्यासारखे आहे.

परिपूर्णं महाज्ञानं परतत्त्वप्रकाशकम् ।
अवलम्ब्य प्रवृत्तो यो ज्ञानाचारः स उच्यते ॥ १६-७९ ॥

परतत्त्व हे सर्वश्रेष्ठ तत्त्व होय. वीरशैवसिद्धान्तात सर्व प्रपंचाला तत्त्वात्मक मानले आहे. पृथ्वीपासून ते शिवापर्यंत छत्तीस तत्त्वे सांगितली आहेत. छत्तीस तत्त्वांमधील उत्कृष्ट तत्त्व 'शिवतत्त्व' असून ते महाज्ञानाने प्राप्त होते. शिवतत्त्व हे परिपूर्ण आहे. प्रपंचातील अन्य वस्तू मात्र अपूर्ण आहेत. कालपरिच्छेद, वस्तुपरिच्छेद, देशपरिच्छेद इत्यादींनी त्या परिच्छिन्न झालेल्या आहेत. इथे आहे तर तिथे नाही. या काळात आहे तर त्या काळात नाही. तुम्ही घर सोडून इथे आलात म्हणून तुमचे अस्तित्व घरात नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इथून तुम्ही घरी जाल तेव्हा तुमचे इथले अस्तित्व नष्ट होईल. या काळात आपण आहोत, भावी काळात आपण नसू. दोन वस्तू परस्परभिन्न असतात, त्या एक नसतात. अशा प्रकारे देशपरिच्छेद, कालपरिच्छेद आणि वस्तुपरिच्छेद यांच्यामुळे प्रपंचातील प्रत्येक वस्तू अपूर्ण आहे. कुठलीही सांसारिक वस्तू पूर्ण ब्रह्मांडाला व्यापून राहू शकत नाही. परंतु परमात्मा ही एकच वस्तू अशी आहे की जी परिपूर्ण आहे. तो एक आहे, तो इथे तिथे सर्वत्र आहे. तो मागील काळात होता, या काळात आहे, पुढील काळातही असणार आहे.

परमात्म्याचे स्वरूप सांगण्यासाठी आकाशाची उपमा दिली जाते. आकाश काशीत आहे, तसेच तुमच्या गावात, सर्वत्र आहे. ते सर्वत्र समान आहे. त्याच्यात कोणताही भेद नाही. हवेत फरक असतो, पाण्यात फरक असतो, पृथ्वीत फरक असतो. माणूस दुसऱ्या गावाला गेला तर त्याची प्रकृती बिघडते. त्याबद्दल त्याला विचारल्यावर तो सांगतो की, 'जरा हवा पाण्यात बदल झाला म्हणून प्रकृती बिघडली.' परंतु आकाशात मात्र कोणताही बदल होत नाही. म्हणून परमात्म्याचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी आकाशाचेच उदाहरण दिले जाते. आकाश सर्वत्र आहे, पूर्ण आहे. परमात्मा तर आकाशाचा आकाश आहे. साऱ्या ब्रह्मांडाला अवकाश देणाऱ्या आकाशाला परमात्मा अवकाश देतो. म्हणून परमात्मा परिपूर्ण मानला जातो. तो सर्व काळांत, सर्व वस्तूंत आणि सर्वत्र व्याप्त आहे. म्हणून त्याचे ज्ञानदेखील परिपूर्ण आहे. अशा परमात्म्याचे ज्ञान प्राप्त करणे हे जीवात्म्याचे लक्ष्य होय. त्याच्या स्वरूपाविषयी पुढे सांगतात –

निर्विकल्पे परे धाम्नि निष्कले शिवनामनि ।
ज्ञानेन योजयेत् सर्वं ज्ञानाचारी प्रकीर्तितः ॥ १६-८० ॥

सर्व परमात्मस्वरूप आहे असे मानले तरी आपल्याला प्रत्येक वस्तू भिन्न दिसत असते. मग यासाठी काय करावे? त्यासाठी परमात्मदृष्टी मिळवावी लागेल. परमात्मा निर्विकल्प आणि निष्कल आहे. वस्तूचे नाम-रूप वगळून तिच्यातील अस्ति-भाति-प्रिय यांचा अनुभव घ्यावा लागतो. यालाच सत्-चित्-आनंद असेही म्हणतात. प्रत्येक वस्तूच्या बाबतीत 'ही वस्तू अस्तित्वात आहे, ती दिसते आणि ती मला हवी' अशी मनुष्याची भावना असते. परमात्म्याच्या अस्तित्वामुळेच प्रपंचातील वस्तूला अस्तित्व असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच्यामुळेच ती प्रकाशित होते आणि त्याच्या ठायी असलेला आनंदच वस्तूंत प्रतीत होत असतो.

यद्भासा भासंते विश्वं यत्सुखेनानुमोदते ॥ १-४ ॥

परमात्म्याच्या प्रकाशानेच विश्व प्रकाशित होत आहे आणि त्याच्या ठायी असलेल्या सुखामुळेच जग सुखी होत आहे, हे ज्ञान जेव्हा तुम्हाला होईल तेव्हा सर्व प्रपंच निर्विकल्प, निष्कल अशा शिवरूपात दिसू लागेल. परंतु त्यासाठी शिवभावना दृढ करण्याचा अभ्यास करायला हवा. श्रवण, मनन, निदिध्यास करून जो साधना करतो त्याची दृष्टी हळूहळू अंतर्मुख होऊ लागते. मग त्याला सर्व प्रपंच शिवमय दिसू लागतो. तुमची दृष्टी जर बहिर्मुख असेल तर तुम्हाला तुमच्या हृदयातला शिवदेखील दिसणार नाही.

ज्ञानं मुक्तिप्रदं प्राप्य गुरुदृष्टिप्रसादतः ।
कः कुर्यात् कर्मकार्पण्ये वांछा संसारवर्धने ॥ १६-८१ ॥

ज्ञानप्राप्तीसाठी जशी परिश्रमाची गरज असते तशीच गुरूच्या कृपादृष्टीची आवश्यकता असते. गुरुकृपा नसताना कितीही अभ्यास केला तरी नीट आकलन होत नाही. गुरूवर नितांत श्रद्धा ठेवून, त्यांच्याकडून श्रवण करून, जो साधना करतो त्यालाच मुक्तिप्रद ज्ञान लाभते. अशा ज्ञानी पुरुषाकडून ज्यांच्यामुळे पुनर्जन्म मिळतो अशी कर्मे घडत नाहीत. त्याची कर्मे ज्ञानमय असतात. ज्ञानरूपी सामग्रीने ज्ञानरूप अशा परमात्म्याची तो सदैव पूजा करीत असतो.

कर्म ज्ञानाग्निना दग्धं न प्ररोहेत् कथंचन ।
यदाहुः संसृतेर्मूलं प्रवाहानुगतं बुधाः ॥ १६-८२ ॥

ज्याला गुरुकृपेने आणि परिश्रमाने ज्ञान लाभते त्याची सारी कर्मे दग्ध होतात. ज्ञानाग्नीत मोठे सामर्थ्य असते. माणूस जन्माला येतानाच आपल्या मनात जन्मजन्मांतरातील संचितकर्म घेऊन येतो. ते भोगता भोगता नवीन कर्मे करून संचितकर्मात पुन्हा भर घालत राहतो आणि पुढल्या जन्माची शिदोरी बांधून घेतो. म्हणून कर्माची गती अत्यंत गहन आहे असे म्हटले जाते. आपल्या हातून कौणते कर्म घडले आहे, ते कधी पक्व होईल आणि त्यांच्यामुळे आपल्याला कोणता जन्म मिळेल, हे जाणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घेणे अत्यंत कठीण आहे. म्हणून कर्माला जाणण्याऐवजी ते जाळणे हे अधिक महत्त्वपूर्ण मानले जाते. सर्व कर्मांना जाळणारे एकमेव ब्रह्मास्त्र म्हणजे ज्ञानाग्नी. एखादे बी भाजले आणि नंतर ते पेरले तर उगवत नाही, हे आपण व्यवहारात पाहतो. त्याप्रमाणे ज्याच्या हृदयात ज्ञानाग्नी प्रकट होतो त्याच्या मनातले संचित संस्कार, वासना आणि कर्म हे सारे जळून जाते. त्यानंतर त्याला पुनर्जन्म मिळत नाही. असंख्य जन्मे देणारा जो कर्मसाठा आपल्या आत आहे तो कितीही कर्मे केली तरी नष्ट होत नाही. कर्माने कर्माचा थोडाफार नाश होईल. परंतु संपूर्ण कर्म मात्र नष्ट होणार नाही. ज्ञानाग्नीने मात्र सर्व संचित कर्मे दग्ध होतात. संचित कर्मे दग्ध झाल्यावर ज्ञानी पुरुषाकडून नवा कर्मसंचय होत नाही. त्याच्याकडून कर्मे घडली तरी त्या कर्मात कर्तृत्वभाव नसल्यामुळे त्याची फळे त्याला भोगावी लागत नाहीत. मग शेवटी उरते ते प्रारब्धकर्म. ते मात्र भोगल्याशिवाय संपत नाही. ते ज्ञानी आणि अज्ञानी दोघांनाही भोगावे लागते. प्रारब्धकर्म भोगता भोगता जर मृत्यू आला तर उर्वरित प्रारब्ध भोगण्यासाठी पुन्हा जन्म घ्यावा लागतो. ज्ञानी पुरुषांचे विदेहावस्थेतील अवतार म्हणजे अवशिष्ट प्रारब्धकर्म भोगण्यासाठी घेतलेले जन्मच होत. याप्रमाणे ज्ञान झाल्यानंतर संचितकर्मे जळून जातात. नव्या कर्मांचा संचय होत नाही आणि प्रारब्धकर्मे भोगून ज्ञानी पुरुष मुक्त होतो. त्यानंतर त्याचे पुन्हा गर्भवासाचे संकट टळते.

ज्ञानेन हीन: पुरुष: कर्मणा बद्ध्यते सदा ।
ज्ञानिन: कर्मसंकल्पा भवन्ति किल निष्फला: ॥ १६- ८३ ॥

'मी करतो' अशा भावनेने जो कर्म करतो म्हणजे ज्याच्या मनात कर्माबद्दल अहंभाव असतो असा अज्ञानी मनुष्यच कर्मबंधनात सापडतो. परंतु ज्ञानी पुरुषांच्या कर्मात कर्तृत्वभावना नसल्याने त्यांना कर्मे बांधून ठेवू शकत नाहीत. शेवटी ज्ञानाचारस्थलाचा समारोप करताना ज. रेणुकाचार्य म्हणतात -

शुद्धाचारे शुद्धभावो विवेकी
ज्योति: पश्यन् सर्वतश्चैकमेव ।
ज्ञानध्वस्तप्राकृतात्मप्रपंचो
जीवन्मुक्तश्चेष्टते दिव्ययोगी ॥ १६- ८४ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शुद्ध आचार, शुद्ध भाव आणि शुद्ध ज्ञान यांचा समन्वय येथे सांगितला आहे. विहित कर्म करणे हा शुद्ध आचार होय. कर्म करताना अहंभाव न ठेवता हे शिवकृपेसाठी करीत आहोत अशी शिवभावना ठेवणे ही शुद्ध भावना होय. शरीर, मन आणि बुद्धी यांच्या पलीकडे असलेले आत्मरूप म्हणजे आपण आहोत हे शुद्ध ज्ञान होय. शरीरातून चैतन्य बाहेर प्रकटलेले पाहून काही लोकांनी शरीरालाच आत्मा मानले. काही लोकांनी इंद्रियालाच आत्मा मानला. त्यानंतर काही लोकांनी इंद्रियांचे संचलन करणाऱ्या मनाला आत्मा मानले. त्यापुढे काही लोकांनी मनाला प्रेरणा देणारी बुद्धी हीच आत्मा होय असे मानले. परंतु त्यापुढे विवेकी पुरुषांनी शोध घेतला आणि त्यांना बुद्धी पलीकडच्या स्वतंत्र, स्वयंभू आत्म्याचा शोध लागला. आत्मा हेच परतत्त्व आहे हे त्यांना जाणवले.

'इंद्रियाणि परान्याहुः इंद्रियेभ्यः परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धि या बुद्धेः परतरस्तु सः ॥'

असे गीतेत म्हटले आहे. मनुष्याने अंतर्मुख कसे व्हावे हेच जणू इथे सांगितले आहे. मनुष्याला सर्वप्रथम आपले शरीर दिसते. शरीर हेच सर्वस्व आहे असे त्याला वाटते. परंतु विचार केल्यावर त्याला जाणवते की ज्याला आपण शरीर म्हणतो ते म्हणजे इंद्रियांचा समूह होय. इंद्रिये वेगळी काढली तर शरीराला अस्तित्वच राहत नाही. म्हणजे त्याची दृष्टी थोडी शरीरापलीकडे गेली. मग पुढे त्याला समजते की इंद्रिये स्वतंत्र नाहीत. त्यांच्याद्वारे मन कार्यरत असते. मन जागेवर नसेल तर डोळ्यांनी पाहूनही त्यांना काही दिसत नाही, कानांनी ऐकूनही त्यांना काही ऐकू येत नाही. ज्या इंद्रियांच्या व्यवहारात मन नसते त्या इंद्रियाकडून काहीही घडले तरी त्याचा आपल्याला पत्ता लागत नाही. म्हणून विवेकी मनुष्य इंद्रियांच्या अध्यक्षाला म्हणजे मनाला आत्मा मानू लागतो. मन हे चंचल आहे ते कधी स्थिर राहात नाही. परंतु त्याच्या पलीकडली बुद्धी स्थिर दिसते. म्हणून विवेकी मनुष्य मनालाच आत्मा मानू लागतो. परंतु बुद्धी जड असून ती सुषुप्ति-अवस्थेत विलीन होते हे त्याच्या लक्षात येते. कितीही बुद्धिवादी मनुष्य असला तरी गाढ निद्रेत त्याची बुद्धी जागी राहात नाही, त्याची अवस्था अजाण बालकासारखी असते आणि नंतर त्याला कळते की ज्याच्यामुळे बुद्धी प्रकाशित होते असे स्वयंभू, स्वतंत्र चैतन्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पलीकडे आहे; तेच आत्मा होय.

याप्रमाणे शुद्ध आचार, शुद्ध भावना आणि शुद्ध ज्ञान यांच्या साहाय्याने जो मनुष्य आपल्या हृदयातील अंतर्ज्योतीचा साक्षात्कार करून घेतो त्याला कोणतीही कर्मे बांधून ठेवू शकत नाहीत. तो जीवन्मुक्त अवस्थेत विचरण करीत असतो. बाह्यदृष्टीने पाहिले तर तो जीवन जगत असतो आणि अंतर्दृष्टीने पाहिले तर तो जीवन्मुक्त असतो. याप्रमाणे 'श्रीसिद्धान्तशिखामणी'तील ज्ञानाचारस्थलात ज्ञानाचे आणि ज्ञानी पुरुषाचे माहात्म्य वर्णिले आहे. तुम्ही सर्वजण शुद्ध आचार, शुद्ध भावना आणि शुद्ध ज्ञान यांच्या साहाय्याने, सद्गुरुकृपेने शिवाद्वैतज्ञान संपादन करावे आणि जीवन्मुक्त व्हावे, अशी शुभकामना व्यक्त करून ज्ञानाचारस्थलावरील हे आशीर्वचन आणि लिंग-षट्स्थलातील माहेश्वरस्थलावरील आर्शीर्वचने पूर्ण करीत आहोत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ज्ञानमंदिर, जंगमवाडी मठ, वाराणसी
१६ ऑगस्ट १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्रिया, भाव आणि ज्ञान
ही शिवप्राप्तीची तीन साधने.
इष्टलिंगाची नित्यपूजा ही क्रिया.
'मी शिवच आहे' अशी दृढभावना हा भाव.
जग शिवरूप असून मी शिवरूपच आहे हे ज्ञान
क्रिया आणि ज्ञान यांच्या मध्यावर
भाव उभा असतो.
क्रिया आणि ज्ञान जेव्हा भावपूर्ण असतात
तेव्हा शिवसाक्षात्कार होतो.
माहेश्वरस्थलात प्रवेश केलेला जीवन्मुक्त
क्रिया, भाव आणि ज्ञान
यांचा समन्वय कसा साधतो
आणि सकाय, अकाय, परकाय या स्थलांतून
तो कसा प्रवास करतो
याचे सुरेख विवेचन करीत आहेत
प. पू. श्रीकाशीजगद्गुरूंची
ही रसाळ आणि चिंतनगर्भ आशीर्वचने!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi